# महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन, भत्ते आणि अन्य सोयी-सुविधा यासंबंधीचे अधिनियम, नियम आणि निर्णय अंतर्भूत असलेली पुस्तिका

(जुलै, २०१७ प्रमाणे)

एचबी ११६२–१

# प्रस्तावना

महाराष्ट्र विधीमंडळ सदस्यांना अनुज्ञेय असलेले वेतन, भत्ते आणि अन्य सोयी या संदर्भातील अधिनियम, नियम व निर्णय संकलित केलेल्या पुस्तिकेची नवीन आवृत्ती प्रकाशित करण्यात येत आहे.

सदर पुस्तिकेत सदस्यांना अनुज्ञेय असलेल्या वेतन आणि भत्त्यांव्यतिरिक्त मिळणाऱ्या विनामूल्य प्रवासाच्या सवलती, नवीन मोटारगाडी खरेदी करण्याकरिता सवलत या संबंधीचे नियम, शासनाचे निर्णय संग्रहित करण्यात आलेले आहेत. तसेच सदस्यांच्या वैद्यकीय सुविधांच्या संदर्भात नियम आणि शासन निर्णय देखील अंतर्भूत करण्यात आले आहे.

या आवृत्तीत आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांसंदर्भातील मार्गदर्शक तत्त्वे याबाबतच्या शासन निर्णयांचा समावेश करण्यात आला आहे. पुस्तिकेची नवीन आवृत्ती सदस्यांना निश्चितच उपयुक्त ठरेल अशी मला आशा आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १ जुलै २०१७.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

## अनुक्रमणिका



| अनु- क्रमांक (१) | विषय (२) | | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६ | .. | १ |
| २ | महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (भत्ते) नियम, १९५९ | .. | ११ |
| ३ | महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (मार्ग परिवहन सेवेद्वारा विनामूल्य प्रवास) नियम, १९६१. | .. | २८ |
| ४ | महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (रेल्वेने विनामूल्य प्रवास) नियम, १९६५ | .. | ३३ |
| ५ | महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ | .. | ४३ |
| ६ | महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (वैद्यकीय मदत) नियम, १९६६ | .. | ६० |
| ७ | महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य-विद्यमान व माजी सदस्यांना वैद्यकीय सुविधा लागू करण्यासंदर्भातील एकत्रित शासन निर्णय (सूची क्रमांक एक) | .. | ८० |
| ८ | आकस्मिक निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयातून घेतलेल्या वैद्यकीय उपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती या संदर्भातील एकत्रित शासन निर्णय (सूची क्रमांक दोन) | .. | १११ |
| ९ | आकस्मिक आजार व त्यावरील उपचारासाठी शासनाने मान्यता दिलेली खाजगी रुग्णालये, एकत्रित शासन निर्णय (सूची क्रमांक तीन) | .. | १६२ |
| १० | वैद्यकीय उपचारांतर्गत कृत्रिम अवयव, उपयंत्रे खरेदी खर्चाची प्रतिपूर्ती एकत्रित शासन निर्णय (सूची क्रमांक चार) | .. | .. |
| ११ | महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (अपंग सदस्यांना सोयी) आदेश, १९६९ | .. | २१२ |
| १२ | महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (स्वीय सहायकांची नेमणूक) नियम, १९८१ | .. | २१३ |
| १३ | महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांना नवीन मोटारगाडी खरेदी करण्याकरिता सवलत. | .. | २१६ |
| १४ | आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम मार्गदर्शक तत्त्वे (शासन निर्णय/परिपत्रके). | .. | २२४ |

## सदस्यांचे वेतन व भत्ते याबाबत संक्षिप्त माहिती

### (दिनांक २४ ऑगस्ट, २०१६ प्रमाणे)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | मूळ वेतन | .. | दरमहा | रुपये ६७,००० |
| (२) | महागाई भत्ता | .. | दरमहा | रुपये ८८,४४० |
| (३) | दूरध्वनी सुविधा | .. | दरमहा | रुपये ८,००० |
| (४) | टपाल सुविधा | .. | दरमहा | रुपये १०,००० |
| (५) | संगणक चालकाची सेवा मिळण्यासाठी रक्कम | .. | दरमहा | रुपये १०,००० |
| | एकूण | .. | दरमहा | रुपये १,८३,४४० (रुपये एक लाख त्र्याऐंशी हजार चारशे चाळीस फक्त) |

## सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४९

### १. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**–(१) या अधिनियमास महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६ असे म्हणता येईल.

(२) तो, १ नोव्हेंबर १९५६ रोजी अंमलात आला असल्याचे मानले जाईल.

२. **व्याख्या.**–विषयात किंवा संदर्भात काहीही प्रतिकूल नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) " विधानसभा " म्हणजे महाराष्ट्र विधानसभा ;

(ब) " सभापती " म्हणजे विधानपरिषदेचा सभापती ;

(क) " समिती " म्हणजे, यथास्थिती, विधानसभेची किंवा विधानपरिषदेची समिती किंवा या दोहोंची संयुक्त समिती;

(ड) " विधानपरिषद " म्हणजे महाराष्ट्र विधानपरिषद ;

(ई) " सदस्य " म्हणजे यथास्थिती, विधानसभेचा किंवा विधानपरिषदेचा सदस्य ;

(फ) " मंत्री ", " राज्यमंत्री " आणि " उपमंत्री " म्हणजे महाराष्ट्र सरकारचे अनुक्रमे मंत्री, राज्यमंत्री आणि " उपमंत्री " आणि " मंत्री " यांमध्ये मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री यांचा समावेश होतो ;

(फफ) " नवीन सदस्य " म्हणजे जो सदस्य मुंबई विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) अधिनियम, १९६९ च्या प्रारंभानंतर विधानसभेवर किंवा विधानपरिषदेवर निवडून आलेला किंवा नामनिर्देशित केलेला असा सदस्य, आणि यामध्ये पुनः निवडून आलेल्या किंवा पुनः नामनिर्देशित केलेल्या सदस्यांचा समावेश होतो ;

(ग) " संसद सचिव " म्हणजे मंत्र्यांचा संसद सचिव ;

(ह) " अध्यक्ष " म्हणजे विधानसभेचा अध्यक्ष ;

(आय) " पदावधी " याचा अर्थ—

(अ) नवीन सदस्याच्या बाबतीत असा सदस्य यथास्थिती विधानसभेत किंवा विधानपरिषदेत आपले पदग्रहण करील त्या तारखेपासून (किंवा पद रिकामे झाल्याची तारीख किंवा तो निवडून आल्याच्या किंवा त्याच्या नामनिर्देशनाच्या अधिसूचनेची तारीख यापैकी जी नंतरची असेल त्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत तो वर सांगितल्याप्रमाणे पदग्रहण करण्याची शक्यता नसेल तर राज्य सरकार याबाबत आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा आधीच्या अन्य तारखेपासून) सुरू होणारा ; आणि ज्या तारखेस त्याचे पद रिकामे होईल त्या तारखेस संपणारा कालावधी ;

(ब) अन्य कोणत्याही सदस्यांच्या बाबतीत, मुंबई विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते (दुरुस्ती) अधिनियम, १९६९ च्या प्रारंभापूर्वी कोणत्याही तारखेपासून सुरू होणारा आणि ज्या तारखेस त्याचे पद रिकामे होईल त्या तारखेस संपणारा कालावधी असा होतो.

३. **सदस्यांना द्यावयाचे वेतन व भत्ते.**—(१) * प्रत्येक सदस्यास आपल्या पदावधीत, महाराष्ट्र शासनाच्या प्रधान सचिवाला अनुज्ञेय असणारे आणि वेळोवेळी सुधारणा करण्यात येईल असे किमान मूळ वेतन व महागाई भत्ता मिळून होणाऱ्या वेतनाएवढे वेतन देण्यात येईल.

(२) ** वगळण्यात आले.

४. **सदस्यांना द्यावयाचा दैनिक भत्ता.**—कलम ८ अन्वये याबाबत करण्यात येतील अशा नियमांच्या किंवा देण्यात येतील अशा आदेशांच्या अधीन राहून प्रत्येक सदस्यास ज्या ठिकाणी विधानसभेचे किंवा विधानपरिषदेचे अधिवेशन किंवा समितीची बैठक भरवण्यात येईल त्या ठिकाणी विधानसभेच्या किंवा विधानपरिषदेच्या अधिवेशनात किंवा यथास्थिती समितीच्या बैठकीस उपस्थित राहण्याच्या प्रयोजनासाठी निवासाच्या कालावधीतील प्रत्येक दिवसासाठी किंवा ज्या ठिकाणी समितीचा अध्यक्ष म्हणून सदस्याच्या कर्तव्याशी संबंधित असलेले कोणतेही कामकाज चालवण्यात येत असेल किंवा सदस्य या नात्याने त्याच्या कर्तव्याशी संबंधित असलेले अन्य कोणतेही कामकाज चालवण्यात येत असेल अशा कोणत्याही ठिकाणी निवासाच्या कालावधीतील प्रत्येक दिवसासाठी रुपये # २,००० या दराने दैनिक भत्ता देण्यात येईल :

परंतु, एखादा सदस्य ज्या ठिकाणी असे अधिवेशन किंवा बैठक भरवण्यात आली असेल किंवा ज्या ठिकाणी असे कामकाज चालवण्यात येत असेल अशा ठिकाणी सामान्यपणे रहात असेल किंवा कामकाज चालवत असेल तर अशा सदस्याच्या बाबतीत, पूर्वोक्त नियमाच्या किंवा आदेशांच्या अधीन, असा सदस्यास, ज्या दिवशी तो अशा अधिवेशनास किंवा बैठकीस उपस्थित राहील किंवा असे कामकाज चालवील अशा प्रत्येक दिवसासाठी रुपये # २,००० या दराने दैनिक भत्ता देण्यात येईल ; परंतु लागोपाठच्या दोन बैठकांमधील किंवा ज्या दिवशी असे कामकाज चालवण्यात आले असेल अशा दिवसांमधील तीन दिवसांपेक्षा अधिक नसेल इतक्या दिवसांचा खंड हा, जो सदस्य अशा खंडात अधिवेशनाचे किंवा बैठकीचे ठिकाणी किंवा असे कामकाज चालवण्याचे ठिकाण सोडत नसेल अशा सदस्यासाठी उपस्थितीचे किंवा असे कामकाज चालवण्याचे दिवस असल्याचे मानले जाईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या व कलम ५ च्या प्रयोजनांसाठी सभापतींच्या किंवा यथास्थिती अध्यक्षांच्या मान्यतेनुसार, कोणत्याही ठिकाणी, संसदीय प्रथा व कार्यपद्धती यासंबंधीच्या कोणत्याही उजळणी पाठ्यक्रमात भाग घेण्यासाठी किंवा कोणतेही चर्चासत्र, परिषद किंवा कोणत्याही संसदीय कामकाजाशी संबंधित असलेल्या बाबींसंबंधातील कोणत्याही संसदीय संघटनेच्या विद्यापीठाच्या किंवा इतर मान्यताप्राप्त संस्थेच्या कोणत्याही सभेस उपस्थित राहण्यासाठी सदस्याची कोणत्याही ठिकाणी उपस्थिती ही, सदस्य या नात्याने त्यांच्या कर्तव्यांशी संबंधित असलेले कामकाज चालविण्यासाठी त्या ठिकाणी असलेली त्यांची उपस्थिती असल्याचे मानण्यात येईल.

५. (१) **सदस्यांना द्यावयाचा प्रवास भत्ता.**—प्रत्येक सदस्यास, ज्या ठिकाणी विधानसभेचे किंवा

---

* सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ चे कलम ३ अनुसार पोट-कलम (१) ऐवजी नवीन समाविष्ट करण्यात आले.

** सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ चे कलम ३ (ख) अन्वये वगळण्यात आले.

# सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ चे कलम ४ मधील " रु. १००० " या मजकुराऐवजी " रु. २००० " हा मजकूर दिनांक २४ ऑगस्ट २०१६ पासून समाविष्ट करण्यात आला.

विधानपरिषदेचे अधिवेशन किंवा समितीची बैठक भरवण्यात येईल त्या ठिकाणी विधानसभेच्या किंवा विधानपरिषदेच्या अधिवेशनात किंवा समितीच्या बैठकीस उपस्थित राहण्याच्या प्रयोजनासाठी किंवा समितीचा अध्यक्ष म्हणून त्याच्या कर्तव्याशी संबंधित असलेले कोणतेही कामकाज चालवण्याच्या किंवा सदस्य म्हणून त्याच्या कर्तव्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही अन्य कामकाजाकडे लक्ष देण्याच्या प्रयोजनासाठी, ज्या ठिकाणी असे कामकाज चालवण्यात यावयाचे असेल असा ठिकाणापर्यंत केलेल्या प्रवासासाठी आणि अशा ठिकाणापासून परतीच्या प्रवासासाठी —

(एक) त्या सदस्याने प्रत्यक्षात कोणत्याही वर्गाने प्रवास केला तरी, रेल्वेच्या किंवा आगबोटीच्या वातानुकूलित टू-टियरच्या प्रवासभाड्याच्या दीडपट या दराने, आणि

(दोन) रेल्वेने किंवा आगबोटीने केलेल्या प्रवासाशिवाय आणखी सडकेने, समुद्रातून किंवा नदीतून केलेल्या प्रवासासाठी दर मैलास तशाच रीतीने विहित करण्यात येईल अशा दराने प्रवास भत्ता देण्यात येईल :

परंतु, एखादा सदस्य, असे अधिवेशन किंवा बैठक ज्या ठिकाणी भरविण्यात आली असेल त्या ठिकाणी किंवा सदस्य म्हणून जी कर्तव्ये असतात त्यांच्याशी संबंधित काम जेथे चालते त्या ठिकाणी सामान्यतः रहात असेल किंवा कामधंदा करीत असेल तर, अशा सदस्यांस, त्याच्या निवासस्थानापासून किंवा कामधंद्याच्या जागेपासून जेथे अधिवेशन भरले आहे अशा ठिकाणापर्यंत व परत, किंवा सदस्य या नात्याने त्याची जी कर्तव्ये असतील त्याच्याशी संबंधित काम जेथे चालू असेल अशा ठिकाणापर्यंत व परत, याप्रमाणे त्याने केलेल्या प्रवासाकरिता सहा रुपये प्रति किलोमीटर या दराने प्रवास भत्ता मिळण्यास हक्कदार असेल :

परंतु, आणखी असे की, एखादा सदस्य महाराष्ट्र राज्याबाहेरील कोणत्याही ठिकाणी सामान्यपणे रहात असेल किंवा कामकाज चालवत असेल तर या कलमान्वये अशा सदस्यास, त्याने राज्याच्या सीमांच्या आत केलेल्या प्रवासाच्या भागासाठीच प्रवास भत्ता मिळण्याचा हक्क असेल :

परंतु, आणखी असे की, एखादा सदस्य कलम ५-अक अन्वये तरतूद केलेल्या सोयीनुसार रेल्वेने आणि आगबोटीने प्रवास करील किंवा कलम ५-अ अन्वये विनामूल्य पासावर प्रवास करील तेव्हा, असा प्रवास रेल्वेने केला आहे असे समजून असा सदस्यास केलेल्या प्रवासाच्या अंतरासाठी पहिल्या वर्गाच्या एका भाड्याच्या रकमेइतका प्रवास भत्ता मिळण्याचा हक्क असेल :

परंतु, आणखी असे की, ज्यावेळी एखादा सदस्य रेल्वेने प्रत्यक्षात वातानुकूलित टू-टियरने किंवा थ्री-टियरने प्रवास करील त्यावेळी जर असा प्रवास या कलमामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रयोजनाकरिता किंवा यथास्थिती, कलम ५-अक अन्वये तरतूद केलेल्या सुविधांच्या अनुसार असेल तर त्या सदस्यास वातानुकूलित टू-टियरच्या भाड्याच्या दीडपट एवढी किंवा यथास्थिती अशा एका भाड्याएवढी रक्कम प्रवास भत्ता म्हणून मिळण्याचा हक्क असेल.

"(१-अ) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही सदस्याला वर्षाच्या संपूर्ण कालावधीत राज्यातील कोणत्याही विमानतळावरून कोणत्याही शहरापर्यंत किंवा नगरापर्यंत किंवा कोणत्याही शहरांपासून किंवा नगरांपासून कोणत्याही विमानतळापर्यंत एकूण बत्तीस वेळा

एकेरी, आणि राज्यातील कोणत्याही विमानतळापासून राज्याबाहेर असलेल्या भारताच्या हद्दीतील कोणत्याही विमानतळापर्यंत व तेथून एकूण आठ वेळा एकेरी विमान प्रवास करता येईल.

**स्पष्टीकरण** (एक).— या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, ज्या सदस्याच्या निवासस्थानापासून त्याच्या सर्वात जवळ असलेले विमानतळ हे राज्याच्या बाहेर येत असेल अशा सदस्याच्या संबंधात, " राज्यातील कोणतेही विमानतळ " या संज्ञेत त्यांच्या निवासस्थानापासून सर्वात जवळ असलेल्या राज्याबाहेरील विमानतळाचा अंतर्भाव असेल.

"**स्पष्टीकरण** (दोन).— जेथे सदस्य, आपल्या पत्नीसह किंवा, यथास्थिती, पतीसह विमानाने प्रवास करील किंवा पार पाडील तेथे, अशा प्रकारे केलेला किंवा पार पाडलेला प्रत्येक एकेरी प्रवास या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, दोन एकेरी प्रवास असा मोजण्यात येईल."

(२) कलम ४ मध्ये किंवा या कलमामध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, विधानसभेच्या किंवा विधानपरिषदेच्या कोणत्याही अधिवेशनाच्या मुदतीत जर सदस्य, अधिवेशन ज्या ठिकाणी भरविण्यात आले असेल त्या ठिकाणापासून तो सामान्यतः ज्या ठिकाणी रहात असेल किंवा व्यवसाय करीत असेल त्या ठिकाणापर्यंतचा आणि तेथून परतीचा असा प्रवास करील तर त्यास त्याच्या विकल्पानुसार, एकतर असा प्रवासाच्या मुदतीसाठी दैनिक भत्ता किंवा प्रवास भत्ता घेण्याचा हक्क असेल.

**५अअ. समितीचा समिती प्रमुख किंवा सदस्य भारताच्या कोणत्याही भागांत कामाच्या संबंधात दौऱ्यावर असताना त्यास द्यावयाचे भत्ते.**— समितीच्या प्रमुखास किंवा सदस्यांस, असा समिती प्रमुख किंवा सदस्य म्हणून आपली कर्तव्ये पार पाडण्यासाठी केलेल्या दौऱ्यांच्या ओघात त्यांनी भारताच्या कोणत्याही भागात केलेल्या प्रवासाच्या बाबतीत कलम ४ व ५ मध्ये तरतूद केलेल्या दरांनी दैनिक भत्ता व प्रवास भत्ता देण्यात येईल.

**५अब. समितीच्या प्रमुखास वातानुकूलित डब्यातून रेल्वेने किंवा विमानाने प्रवास करण्याचा हक्क असेल.**— कलम ५ व ५अअ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही सदस्यास कोणत्याही समितीची प्रमुख म्हणून त्यांच्या कर्तव्याशी संबंधित असलेले कोणतेही कामकाज चालवण्याच्या प्रयोजनासाठी त्या कलमामध्ये निर्दिष्ट केलेला प्रवास वातानुकूलित डब्यातून रेल्वेने किंवा विमानाने करता येईल, किंवा पार पाडता येईल, आणि अशा बाबतीत त्यास अशा प्रत्येक प्रवासासाठी वातानुकूलित मार्गाचा भाड्याच्या सव्वापट रकमेइतका किंवा यथास्थिती विमानाच्या भाड्याइतका प्रवास भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

**५अक. (१) आगगाडीने आणि बोटीने मोफत प्रवास.**— प्रत्येक सदस्यास त्याबाबत नियमाद्वारे किंवा आदेशांद्वारे विहित करण्यात येईल अशा रितीने व अशा शर्तीच्या अधीन, ज्यामुळे त्यास भारताच्या कोणत्याही भागात कोणत्याही रेल्वेने पहिल्या वर्गाने किंवा यथास्थिती वातानुकूलित टू-टियरने किंवा थ्री-टियरने किंवा महाराष्ट्राच्या कोणत्याही भागात आगबोटीने प्रवास करण्याचा हक्क मिळेल, अशा सोयी पुरविण्यात येतील :

परंतु, सदस्यास, एकतर एकट्याने किंवा आपल्या पती-पत्नीसह किंवा आपल्या अज्ञान मुलांसह संयुक्तपणे किंवा आपल्या पत्नी-पतीसह व अज्ञान मुलांसह किंवा सोबत्यासह संयुक्तपणे भारताच्या कोणत्याही भागात, मग तो भाग राज्यांतर्गत असो किंवा राज्याबाहेर असो रेल्वेने असा प्रवास करता

येईल. तथापि, अशा सदस्याने राज्याबाहेर प्रवास केलेले अंतर आणि त्याच्या कुटुंबातील व्यक्तींनी किंवा सोबत्याने राज्यांतर्गत किंवा राज्याबाहेर प्रवास केलेले अंतर हे कोणत्याही वित्तीय वर्षी एकूण तीस हजार किलोमीटर्सपेक्षा अधिक होता कामा नये.

**स्पष्टीकरण.—** प्रवासाच्या अंतरासाठी असलेली तीस हजार किलोमीटर्सची कमालमर्यादा मोजण्याच्या प्रयोजनासाठी सदस्याने राज्याबाहेर केलेल्या प्रवासाचे किलोमीटर्स व त्याच्या कुटुंबातील व्यक्तींनी किंवा सोबत्याने त्यांच्या निवासस्थानापासून, मग ते राज्यांतर्गत असो किंवा राज्याबाहेर असो, केलेल्या प्रवासाचे अंतर (किलोमीटर्स) हे वेगवेगळे मोजण्यात येईल.

(२) (अ) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जर सदस्य एक तर एकट्याने किंवा त्याची पत्नी-पती आणि अज्ञान मुले यांच्यासह किंवा सोबत्यासह संयुक्तपणे राज्यात किंवा राज्याबाहेर भारताच्या कोणत्याही भागात या कलमात तरतूद केल्याप्रमाणे रेल्वेऐवजी, विमानाने प्रवास करील तर त्यास, जणू काही यथास्थिती त्याने किंवा त्या दोघांनी किंवा त्या सर्वांनी, रेल्वेच्या वातानुकूलित टू-टियरने प्रवास केला होता असे समजून, तीस हजार किलोमीटर्सच्या मर्यादेस अधीन राहून, प्रवास भत्त्याची मागणी करण्याचा हक्क असेल अशा बाबतीत, विमानाने केलेल्या प्रवासाचे भाडे आणि रेल्वेच्या वातानुकूलित टू-टियरचे प्रवास भाडे यांतील फरकाची रक्कम सदस्याला सोसावी लागेल.

(ब) ज्या बाबतीत उपरोक्तप्रमाणे एखादा सदस्य एकतर एकट्याने किंवा त्याच्या कुटुंबातील व्यक्तीसह किंवा सोबत्यासह संयुक्तपणे हा प्रवास राज्याबाहेर भारतातील कोणत्याही भागात आगबोटीने किंवा मार्गपरिवहनाच्या बसने करील त्याबाबतीत त्याला, प्रवासासाठी असलेल्या तीस हजार किलोमीटर्सच्या कमाल मर्यादेच्या अधीन, राज्याबाहेरील भारताच्या कोणत्याही भागात प्रवास करण्यासाठी, तेवढ्याच अंतरासाठी रेल्वेच्या वातानुकूलित टू-टियरच्या प्रवासाच्या भाड्यापेक्षा आगबोटीच्या प्रवासाचे भाडे किंवा बसचे भाडे कमी असेल तर असे कमी भाडे मागण्याचा हक्क राहील किंवा जर आगबोटीच्या प्रवासाचे भाडे किंवा बसचे भाडे तेवढ्याच अंतराच्या रेल्वेच्या वातानुकूलित टू-टियरचा प्रवास भाड्यापेक्षा अधिक असेल तर तेवढ्याच अंतराच्या रेल्वेच्या वातानुकूलित टू-टियरचा प्रवास भाड्याची मागणी करण्याचा हक्क राहील आणि त्याला दोन भाड्यामधून फरक सोसावा लागेल.

(३) या कलमात आणि कलम ५-अ मध्ये ज्याबाबतीत एखाद्या सदस्याला जोडीदारासह संयुक्तपणे (अज्ञान मुलांसह किंवा अज्ञान मुलांशिवाय किंवा सोबत्यासह) प्रवास करण्याची सुविधा देण्यात आली असेल त्याबाबतीत महिला सदस्य असल्यास, तिला प्रवासाच्या या सुविधा, वेळोवेळी तिच्या पतीसह किंवा त्याऐवजी कलम ६, पोट-कलम (२) खालील स्पष्टीकरणात व्याख्या केल्याप्रमाणे, तिच्या कुटुंबातील इतर कोणत्याही व्यक्तींसह संयुक्तपणे घेण्याचा हक्क राहील.

**५अ. मार्गपरिवहन सेवेने मोफत प्रवास.—** प्रत्येक सदस्यास एक विनामूल्य अहस्तांतरणीय पास आणि आकार न देता जागा राखून ठेवण्यासाठी एक प्रमाणक पुस्तक पुरविण्यात येईल ; त्यामुळे त्यास, एकतर एकट्याने किंवा आपल्या पत्नीसह/पतीसह किंवा सोबत्यासह संयुक्तरित्या त्याबाबत नियमाद्वारे किंवा आदेशाद्वारे विहित करण्यात येतील अशा मार्गपरिवहन सेवेने तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित यांनी सोय केलेल्या मार्गपरिवहन सेवेने (महाराष्ट्र राज्याच्या ज्या भागात

अशा सेवा चालू असतील अशा कोणत्याही भागात) विहित करण्यात येईल अशा वर्गाने वा अशा शर्तीच्या अधीन केव्हाही प्रवास करण्याचा हक्क असेल.

**५ब. सदस्यांनी पद रिक्त केल्यावर त्यांना द्यावयाच्या दैनिक भत्ता व प्रवास भत्ता :—**या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी एखादी व्यक्ती सदस्य असण्याचे बंद झाल्यानंतर अशा व्यक्तीस,—

(अ) ज्या दिवशी ती सदस्य असण्याचे बंद झाले असेल त्या दिवसाच्या लगेच नंतरच्या दिवसासाठी कलम ४ मध्ये तरतूद केलेल्या दराने दैनिक भत्ता, आणि

(ब) परतीच्या प्रवासासाठी, अशा प्रवासासाठी कलम ५ मध्ये तरतूद केलेल्या दराने प्रवास भत्ता मिळण्याचा हक्क असेल आणि नेहमीच हक्क होता असे मानले जाईल.

**५क. सदस्यांना दूरध्वनीची सोय :—** (१) प्रत्येक सदस्यास, तो सामान्यतः जेथे राहात असेल त्या ठिकाणी किंवा निवासासाठी तो वापरत असेल अशा, राज्यातील इतर कोणत्याही ठिकाणी शासनाच्या खर्चाने, दूरध्वनी बसवून मिळविण्याचा हक्क असेल (दूरध्वनीच्या) प्रारंभिक ठेवीदाखलची तो बसविण्यादाखलची व भाडे खर्चादाखलची रक्कम राज्य शासनाकडून सोसण्यात येईल.

(२) एखाद्या सदस्याने पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या आपल्या निवासाच्या ठिकाणी स्वखर्चाचे दूरध्वनी बसवून घेतला असेल त्या बाबतीत. अशा दूरध्वनीच्या संबंधातील भाडेखर्च शासनाकडून करण्यात येईल.

(३) प्रत्येक सदस्याला, त्या कलमान्वये दूरध्वनीची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे किंवा नाही किंवा सदस्याने, स्वतःच्या खर्चाने दूरध्वनी बसवून घेतला आहे किंवा कसे ही गोष्ट विचारात न घेता, त्याला दरमहा रुपये ८,००० एवढी रक्कम देण्यात येईल.

**६. सुखसोयी :—** (१) सदस्यास, भाडे न देता किंवा कलम ८ अन्वये केलेल्या नियमांद्वारे किंवा आदेशांद्वारे विहित करण्यात येईल असे भाडे देऊन व अशा प्रमाणात व अशा शर्तीवर राहण्याची जागा मिळण्याचा आणि विहित करण्यात येतील अशा अन्य सोयी मिळण्याचा हक्क असेल :

परंतु, सदस्यांसाठी असलेल्या कोणत्याही वसतिगृहात सदस्यांच्या निवासाची तरतूद केली असेल त्या बाबतीत, ती तरतूद, भाड्याशिवायची असेल.

(२) कलम ८ अन्वये केलेल्या नियमांच्या किंवा आदेशाच्या अधीन राहून सदस्यास स्वतःसाठी व त्याच्याजवळ रहात असलेल्या व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या त्याच्या कुटुंबातील व्यक्तींसाठी राज्य सरकारकडून चालविण्यात येणाऱ्या रुग्णालयांमध्ये विनामूल्य जागा मिळण्याचा आणि वैद्यकीय मदत व उपचार मिळण्याचा हक्क असेल.

**स्पष्टीकरण.—** या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी " त्याच्या कुटुंबातील व्यक्ती " या शब्दप्रयोगाचा अर्थ, पती, पत्नी, मुलगा, मुलगी, वडील, आई, भाऊ किंवा बहीण असा होतो.

(३) सदस्यास, स्वीय सहायकाच्या सेवा विनामूल्य मिळण्याचा हक्क असेल. या प्रयोजनासाठी, सदस्यास, कलम ८ अन्वये केलेल्या नियमांद्वारे किंवा आदेशांद्वारे विहित करण्यात येईल अशी अर्हता धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची आपला स्वीय सहायक म्हणून नियुक्ती करता येईल. अशाप्रकारे नियुक्त केलेल्या स्वीय सहायकास, या बाबतीत केलेल्या नियमांस किंवा आदेशांस अधीन राहून दरमहा

रुपये * २५,००० इतके निश्चित वेतन राज्य शासनाकडून देण्यात येईल.

# (३ अ) प्रत्येक सदस्यास संगणक चालकाची सेवा मिळण्यासाठी दरमहा रुपये १०,०००/- इतकी रक्कम देण्यात येईल.

(४) ** वगळण्यात आले.

(५) प्रत्येक सदस्यास स्टेशनरी व टपाल खर्चापोटी दरमहा रु. १०,००० देण्यात येतील.

**६अ. सदस्यांना प्रवासाच्या सोयी :—**या अधिनियमाच्या इतर उपबंधास बाध येऊ न देता, आपल्या पत्नीसह/पतीसह किंवा सोबत्यासह प्रवास करणाऱ्या प्रत्येक सदस्यास, प्रत्येक अधिवेशनात एकदा, स्वतःच्या नेहमीच्या निवासस्थानापासून अधिवेशनाच्या ठिकाणापर्यंत आणि परतीच्या प्रवासाकरिता आपल्या पत्नीसह/पतीसह किंवा सोबत्यासह रेल्वेच्या पहिल्या वर्गाचे भाडे किंवा यथास्थिती आगबोटीचे भाडे मिळण्याचा हक्क असेल :

परंतु ज्यावेळी एखादा सदस्य आपल्या पती/पत्नीसह रेल्वेच्या वातानुकूलित टू-टियरने प्रत्यक्षात प्रवास करील त्यावेळी त्यास, त्याच्या पती-पत्नीसाठी वातानुकूलित टू-टियरच्या एका वेळच्या भाड्याची रक्कम मिळण्याचा हक्क असेल.

**६ब. विधानमंडळ सदस्यांसाठी जिमखान्याची सुविधा :—**(१) राज्य शासनास आदेशाद्वारे, उक्त आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटींना व शर्तींना अधिन राहून राज्य विधानमंडळाच्या सदस्यांना जिमखाना, क्लब हाऊस किंवा मनोरंजन केंद्र इत्यादींसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या प्रयोजनार्थ, मुंबई येथील विधान भवनाच्या किंवा आमदार निवासाच्या लगतच्या परिसरात महाराष्ट्र राज्य विधानमंडळाला भूखंडाचे वाटप करता येईल.

**स्पष्टीकरण :—**या कलमाच्या प्रयोजनार्थ, "राज्य विधानमंडळाचे सदस्य" याचा अर्थ, राज्य विधानमंडळाचे विद्यमान व भूतपूर्व सदस्य असा आहे.

(२) राज्य शासनाने पोट-कलम (१) अन्वये महाराष्ट्र राज्य विधानमंडळाला भूखंडाचे वाटप केल्यानंतर, खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे पदाधिकाऱ्यांचा समावेश असलेली एक व्यवस्थापकीय समिती, अशा वाटपाच्या दिनांकापासून, असा जिमखाना, क्लब हाऊस किंवा, यथास्थिती, मनोरंजन केंद्र, इत्यादींचे व्यवस्थापन, पर्यवेक्षण, चालन व देखभाल करण्याकरिता, घटीत करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल :—

| | | | |
|---|---|---|---|
| (क) | सभापती | .. | अध्यक्षपदस्थ व्यक्ती, पदसिद्ध |
| (ख) | अध्यक्ष | .. | सह-अध्यक्षपदस्थ व्यक्ती, पदसिद्ध |
| (ग) | मुख्यमंत्री | .. | सदस्य, पदसिद्ध |
| (घ) | उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद | .. | सदस्य, पदसिद्ध |
| (ङ) | उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा | .. | सदस्य, पदसिद्ध |

* सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ चे कलम ६ (क) पोट-कलम (३) मधील " रु. १५०००" या मजकुराऐवजी दिनांक २४ ऑगस्ट २०१६ रोजीपासून " रु. २५०००" हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

** सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ चे कलम ६(ग) अनुसार वगळण्यात आले.

# सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ चे कलम ६ चे पोटकलम (३अ) अन्वये नव्याने समाविष्ट.

| | | | |
|---|---|---|---|
| (च) | उप मुख्यमंत्री | . . | सदस्य, पदसिद्ध |
| (छ) | संसदीय कार्यमंत्री | . . | सदस्य, पदसिद्ध |
| (ज) | विधानसभा व विधानपरिषद यांमधील विरोधी पक्षनेते. | . . | सदस्य, पदसिद्ध |
| (झ) | संसदीय कार्य राज्यमंत्री | . . | सदस्य, पदसिद्ध |
| (ञ) | राज्य विधानमंडळातील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांकडून अध्यक्षपदस्थ व्यक्तीने नामनिर्देशित केलेला प्रत्येकी एक सदस्य. | . . | सदस्य, पदसिद्ध |

(३) अध्यक्षपदस्थ व्यक्ती, सदस्यांमधून एका कोषाध्यक्षाची आणि आवश्यक वाटतील अशा अन्य पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करील आणि अध्यक्षपदस्थ व्यक्तीने नामनिर्देशित केलेला, महाराष्ट्र विधानसभेचा किंवा महाराष्ट्र विधानपरिषदेचा प्रधान सचिव हा, त्या समितीचा पदसिद्ध कार्यकारी सचिव असेल.

(४) महाराष्ट्र राज्य विधानमंडळाने अशा भूखंडावर उभारलेल्या अशा जिमखान्याच्या क्लबहाऊसच्या किंवा मनोरंजन केंद्राच्या कामांची उद्दीष्टे, स्वरूप व व्याप्ती इत्यादी आणि असा जिमखाना, क्लब हाऊस किंवा यथास्थिती, मनोरंजन केंद्र यांच्या सदस्यांकडून वसूल करावयाचे सदस्यत्व शुल्क, वार्षिक वर्गणी शुल्क किंवा इतर कोणतेही शुल्क किंवा आकार, व्यवस्थापकीय समितीने त्याबाबतीत तयार केलेल्या नियमांद्वारे, विहित केल्याप्रमाणे असतील आणि असे नियम तयार करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, ते राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येतील.

(५) व्यवस्थापकीय समितीला, हा अधिनियम व त्याखाली करण्यात आलेले नियम व त्या त्या वेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा यांच्या तरतुदींना अनुसरून, तिचा कारभार चालवण्यासाठी व तिची कार्य व कर्तव्ये पार पाडण्यासाठी, उपविधी तयार करता येतील.

(६) व्यवस्थापकीय समितीचा कार्यकारी सचिव हा, अध्यक्षपदस्थ व्यक्तीच्या निदेशांनुसार समितीच्या बैठकी बोलावण्यासाठी तसेच बैठकींचे कार्यवृत्त तयार करण्यासाठी आणि समिती निदेश देईल अशी इतर कर्तव्ये व कार्ये पार पाडण्यासाठी जबाबदार असेल.

**६क.** (१) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, कलम ६ब अन्वये, राज्य शासनाकडून भूखंडाचे वाटप झाल्यानंतर “जिमखाना निधी”, “क्लब निधी” किंवा यथास्थिती, “मनोरंजन केंद्र निधी” या नावाचा एक निधी उभारील. या निधीमध्ये पुढील रकमांचा समावेश असेल,—

(एक) कायद्याद्वारे त्याबाबतीत यथोचितरित्या विनियोजन केल्यानंतर, राज्य शासनाकडून सुरुवातीला पाच कोटी रुपयांपेक्षा कमी नसेल इतके अनुदान देण्यात येईल ;

(दोन) सदस्यत्व शुल्क, देणगी, दाननिधी किंवा भाड्याच्या रुपाने किंवा इतर कोणत्याही साधनाद्वारे सदर संस्थेला प्राप्त झालेली अन्य कोणतीही रक्कम ;

(२) जिमखाना, क्लब किंवा यथास्थिती, मनोरंजन केंद्र भारतीय स्टेट बँक किंवा अन्य कोणताही राष्ट्रीयीकृत बँकेत चालू आणि बचत ठेव खाते ठेवील.

(३) असे खाते, व्यवस्थापकीय समिती, प्राधिकृत करील अशा पदाधिकाऱ्यांकडून चालविण्यात येईल.

(४) व्यवस्थापकीय समिती, प्रत्येक वित्तीय वर्षाच्या समाप्तीच्या तीन महिन्यांच्या आत, त्यांचे वार्षिक अहवाल, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे ठेवील.".

७. **मंत्री, राज्यमंत्री, उप मंत्री, अध्यक्ष, सभापती, विरोधी पक्षनेता किंवा वेतनी संसद सचिव यांना या अधिनियमान्वये वेतन आणि भत्ते मिळण्याचा हक्क असणार नाही :—**या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, मंत्री, राज्यमंत्री किंवा उप मंत्री, पक्ष सभापती, विरोधी पक्षनेता किंवा संसद सचिव हा विधानसभेचा किंवा विधानपरिषदेचा सदस्य आहे या कारणामुळे मंत्र्यास, राज्यमंत्र्यास, उपमंत्र्यास, अध्यक्षास, सभापतीस, विरोधी पक्षनेत्यास किंवा वेतनी संसद सचिवास या अधिनियमान्वये कोणतेही वेतन, भत्ते किंवा राहण्याची जागा मिळण्याचा हक्क असणार नाही.

८. **नियम किंवा आदेश करण्याची शक्ती :—** (१) (अ) या कलमान्वये नियम किंवा आदेश करण्याच्या प्रयोजनासाठी राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची एक संयुक्त समिती प्रस्थापित करण्यात येईल आणि तीत सभापतीने नामनिर्देशित केलेले विधानपरिषदेतील पाच सदस्य आणि अध्यक्षाने नामनिर्देशित केलेले विधानसभेतील दहा सदस्य असतील आणि वित्त मंत्री हा तिचा पदसिद्ध सदस्य व समिती प्रमुख असेल.

(ब) खंड (अ) अन्वये प्रस्थापित करण्यात आलेल्या संयुक्त समितीस तिची कार्यपद्धती विनियमित करण्याची शक्ती असेल.

(क) वित्त मंत्र्यांव्यतिरिक्त संयुक्त समितीचा सदस्य हा त्याचा नामनिर्देशनाच्या तारखेपासून एक वर्षासाठी असा सदस्य म्हणून पद धारण करील आणि संयुक्त समितीतील कोणतीही नैमित्तिक जागा यथास्थिती, सभापती किंवा अध्यक्ष नामनिर्देशनाने भरील.

(ड) खंड (अ) अन्वये प्रस्थापित केलेल्या संयुक्त समितीस राज्य सरकारशी विचारविनिमय करून या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम किंवा आदेश करता येतील.

(ई) खंड (ड) अन्वये करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा आदेश सभापतींकडून व अध्यक्षांकडून ते मान्य करण्यात येईपर्यंत आणि **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येईपर्यंत अंमलात येणार नाहीत ; आणि नियमांची किंवा आदेशांची अशी प्रसिद्धी ही, ते यथोचितरित्या करण्यात आले असल्याचे निर्णायक प्रमाण असेल.

(२) या कलमान्वये कोणताही नियम किंवा आदेश १ नोव्हेंबर १९५६ च्या आधीची नसेल अशा कोणत्याही तारखेपासून भूतलक्षी प्रभावासहीत करता येईल.

(३) या कलमान्वये केलेले नियम किंवा आदेश या अधिनियमात अधिनियमित करण्यात आले असल्याप्रमाणे परिणामक्षम असतील.

**९. निरसन.**—मुंबई विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९३७, मुंबई विधानमंडळ सदस्यांचा दैनिक भत्ता अधिनियम, १९५० व मुंबई विधानमंडळ सदस्यांचा प्रवास भत्ता अधिनियम, १९५० (ज्याचा या कलमात उक्त अधिनियम असा उल्लेख करण्यात आला आहे) आणि जे प्रदेश १ नोव्हेंबर १९५६ नंतर नवीन मुंबई राज्याचा भाग बनले असतील अशा कोणत्याही प्रदेशात किंवा प्रदेशांच्या संबंधात त्या तारखेच्या निकटपूर्वी अंमलात असेल अशा, या अधिनियमातील उपबंधाच्या तत्सम असलेला कोणताही विधी निरसित समजण्यात येईल :

परंतु, अशा रीतीने निरसन करण्यात आले असले तरी, उक्त अधिनियमान्वये केलेले कोणतेही नियम किंवा आदेश, या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसतील तितपत. या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नियमांद्वारे किंवा आदेशांद्वारे त्यांचे अतिक्रमण करण्यात येईपर्यंत, अंमलात रहातील आणि ते या अधिनियमांच्या उपबंधान्वये करण्यात आले आहेत, असे मानले जाईल.

## २. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (भत्ते) नियम, १९५९

**१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.**–(१) या नियमास महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (भत्ते) नियम, १९५९ असे म्हणता येईल.

(२) तो १ नोव्हेंबर १९५६ रोजी अंमलात आला असल्याचे मानले जाईल.

**२. व्याख्या.**–संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमांत,—

(अ) " अधिनियम " म्हणजे महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, (१९५६ चा मुंबई ४९) ;

(ब) " दिवस " म्हणजे मध्यरात्री सुरू होणारा चोवीस तासांचा कालावधी ;

(क) " सभागृह " म्हणजे, यथास्थिती, विधानसभा किंवा विधानपरिषद ;

(ड) " सदस्य " म्हणजे यथास्थिती, विधानसभेचा किंवा विधानपरिषदेचा सदस्य; परंतु यात मंत्री, राज्यमंत्री किंवा उपमंत्री किंवा सभापती किंवा उप सभापती किंवा विधानसभा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष किंवा विरोधी पक्षनेता किंवा वेतनी संसदीय सचिव यांचा समावेश होत नाही.

(ई) " निवासाचा कालावधी " म्हणजे सभागृहाच्या अधिवेशनास किंवा समितीच्या बैठकीस प्रारंभ झाल्यावर सुरू होणाऱ्या आणि अधिवेशनाच्या किंवा बैठकीच्या समाप्तीनंतर संपणाऱ्या ज्या कालावधीत सदस्य ज्या ठिकाणी अधिवेशन किंवा बैठक भरवण्यात आली असेल त्या ठिकाणी अधिवेशनास किंवा बैठकीस उपस्थित राहण्यासाठी निवास करील असा कालावधी; आणि त्यात अधिवेशनाच्या किंवा बैठकीच्या प्रारंभाच्या निकटपूर्वीच्या दिवसाचा आणि अधिवेशनाच्या किंवा बैठकीच्या समाप्तीच्या लगेच नंतरच्या दिवसाचा समावेश होतो ;

(फ) " कलम " म्हणजे अधिनियमाचे कलम.

**३. दैनिक भत्ता.**—या नियमांच्या उपबंधांच्या अधीन, सदस्यांना निवासाच्या कालावधीच्या प्रत्येक निवासासाठी कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रु. *२,००० या दराने दैनिक भत्ता मिळण्याचा हक्क असेल :

परंतु, तो सदस्य त्या निवासाच्या कालावधीत,—

(अ) कोणत्याही दिवशी (हा दिवस, तो ज्या दिवशी त्या अधिवेशनाच्या किंवा बैठकीच्या ठिकाणाहून अंतिमरित्या प्रयाण करील आणि परत येणार नाही असा दिवस नसेल) अशा ठिकाणी निदान सहा तासांसाठी राहिला नसेल; आणि

(ब) त्या दिवशी अधिवेशन किंवा बैठक भरवण्यात आली असेल तेव्हा, तो त्या दिवशी आजारपणामुळे किंवा अशा ठिकाणाहून अंतिमरित्या अशा प्रयाणामुळे असेल त्याव्यतिरिक्त, अशा अधिवेशनास किंवा बैठकीस उपस्थित राहिला नसेल तर त्या सदस्यास त्या दिवसासाठी दैनिक भत्ता मिळण्याचा हक्क असणार नाही.

---

* महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (भत्ते) (सुधारणा) नियम २०१६ चा नियम ३ अन्वये दिनांक २४ ऑगस्ट २०१६ पासून " रुपये १००० " या ऐवजी " रुपये २००० " हे शब्द व आकडे समाविष्ट करण्यात आले. (महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय अधिसूचना क्र. ४१६३, दिनांक ४ फेब्रुवारी २०१७)

**४. सदस्यांना प्रवासभत्ता मिळण्याचा हक्क केव्हा असेल.**—या नियमाच्या उपबंधाच्या अधीन, कोणत्याही सदस्यास, त्याने त्याच्या नेहमीच्या राहण्याच्या ठिकाणापासून ज्या ठिकाणी सभागृहाचे अधिवेशन किंवा समितीची बैठक भरवण्यात आली असेल अशा ठिकाणापर्यंत अशा अधिवेशनास किंवा बैठकीस उपस्थित राहण्याच्या प्रयोजनाखाली केलेल्या पहिल्या प्रवासासाठी आणि अधिवेशन किंवा बैठक समाप्त होण्यापूर्वी किंवा त्यानंतर, त्या ठिकाणापासून केलेल्या परतीच्या प्रवासासाठी असेल त्याव्यतिरिक्त कलम ५ अन्वये प्रवास भत्ता मिळण्याचा हक्क असणार नाही :

परंतु, एखादा सदस्य त्याच्या नेहमीच्या राहण्याच्या ठिकाणाव्यतिरिक्त, अन्य ठिकाणापासून असा प्रवास करील किंवा अशा ठिकाणी परत जाईल तेव्हा, त्यास, प्रत्यक्ष केलेल्या प्रवासासाठी किंवा त्याच्या नेहमीच्या राहण्याच्या ठिकाणापासून किंवा ठिकाणापर्यंतच्या प्रवासासाठी यापैकी जो कमी असेल तो प्रवास भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

**५. प्रवास भत्त्याचा दर.**—(१) या नियमाच्या उपबंधाच्या अधीन, सदस्यास कलम ५ अन्वये, त्या कलमात वर्णन केल्याप्रमाणे त्याने केलेल्या प्रवासासाठी, यापुढे तरतूद केलेल्या वर्गाकरिता व दरांनी, प्रवास भत्ता मिळण्याचा हक्क असेल, म्हणजे—जर तो प्रवास—

(अ) रेल्वेने किंव आगबोटीने केला असेल तर, असा दर त्यामधील पहिल्या वर्गाच्या किंवा यथास्थिती वातनुकूलित टू-टियर किंवा थ्री-टियर भाड्याच्या दीडपट असेल ;

(ब) सडकेने—

प्रत्येक किलोमीटरला * वीस रुपये एवढा दर असेल.

(क) समुद्रातून किंवा नदीतून स्टीम लाँचने किंवा आगबोटीव्यतिरिक्त कोणत्याही जल यानाने केला असेल तर, असा दर प्रत्येक किलोमीटरला ** वीस रुपये असेल.

(२) (अ) पोट-नियम (१) अन्वये काढावयाची भत्त्याची परिगणना अगदी जवळच्या मार्गासाठी, म्हणजे सदस्य ज्या मार्गाने प्रवासाच्या नेहमीच्या पद्धतीने अत्यंत वेगाने त्याच्या इष्ट स्थानी पोहोचेल अशा मार्गासाठी करण्यात येईल. जेथे एकांपेक्षा अधिक मार्ग सारखेच जवळचे असतील तेथे सर्वात स्वस्त मार्गासाठी प्रवास भत्त्याची परिगणना करण्यात येईल.

(अअ) सदस्य सामान्यपणे ज्या ठिकाणी रहात असेल किंवा कामकाज चालवत असेल अशा ठिकाणच्या अगदी जवळच्या रेल्वे स्थानकावर किंवा बंदरात यथास्थिती, सर्व आगगाड्या किंवा सर्व आगबोटी किंवा स्टीम लाँच थांबत नाहीत या कारणांमुळे सदस्यास अगदी जवळच्या मार्गाने प्रवास करणे सोयीस्कर नसेल तेव्हा, त्यास जास्त सोयीस्कर असलेल्या मार्गाने प्रवास करता येईल, आणि अशा बाबतीत, ज्या मार्गाने त्याने प्रत्यक्ष प्रवास केला असेल त्या मार्गासाठी प्रवास भत्त्याची परिगणना करण्यात येईल.

(ब) सर्वात जवळचा मार्ग तात्पुरता बंद असेल तेव्हा त्यानंतरच्या सर्वात जवळच्या मार्गासाठी पूर्वोक्त प्रवास भाड्याप्रमाणे किंवा दराने अतिरिक्त भत्ता देता येईल.

---

* महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (भत्ते) सुधारणा नियम २०१६ चा नियम ५ पोटनियम (१) च्या (अ) अनुसार दिनांक २४ ऑगस्ट २०१६ पासून " पंधरा रुपये " या मजकूराऐवजी " वीस रुपये " हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

** महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (भत्ते) सुधारणा नियम २०१६ चा नियम ५ पोटनियम (१) च्या (ब) अनुसार दिनांक २४ ऑगस्ट २०१६ पासून " पंधरा रुपये " या मजकूराऐवजी " वीस रुपये " हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(बब) कोणत्याही आगबोटीच्या येण्याच्या किंवा जाण्याच्या वेळांमुळे यथास्थिती, अधिवेशनाच्या किंवा बैठकीच्या किंवा राहण्याच्या ठिकाणी व लवकर पोहोचणे गैरसोयीचे आणि अशक्य असेल तर, सदस्यास त्या नंतरच्या सर्वात जवळच्या आणि स्वस्त खुष्कीच्या मार्गाने प्रवास करता येईल आणि अशा प्रवासासाठी प्रवास भत्ता घेता येईल.

(क) सर्वात जवळच्या मार्गाच्या संबंधात शंका किंवा विवाद उद्‌भवेल त्या बाबतीत ती बाब, यथास्थिती, सभापतींकडे किंवा अध्यक्षांकडे विचारार्थ पाठविण्यात येईल, आणि सभापती किंवा अध्यक्ष सर्वात जवळचा मार्ग निश्चित करील आणि असा निर्णय अंतिम असेल.

६. **काही विशिष्ट बाबतीत सदस्यास समितीच्या बैठकीत उपस्थित राहण्यासाठी भत्ते मिळण्याचा हक्क असणार नाही.**—नियम ३ व ४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी सदस्यास,—

(अ) कोणत्याही दिवशी समितीच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी, तो अशा बैठकीच्या त्या दिवशीच्या एकूण कालावधीच्या निदान अर्ध्या कालावधीसाठी अशा बैठकीस उपस्थित नसेल तर, या अधिनियमान्वये प्रवास भत्ता किंवा दैनिक भत्ता मिळण्याचा हक्क असणार नाही ;

(ब) सभागृहाचे अधिवेशन चालू असेल तेव्हा समितीची बैठक बोलावण्यात आली असेल अशा बाबतीत, त्याने अधिवेशनास उपस्थित राहण्यासाठी केलेल्या प्रवासासाठी त्याने आधीच प्रवास भत्ता घेतला असेल तर, त्याला प्रवास भत्ता मिळण्याचा हक्क असणार नाही :

परंतु, पूर्वोक्त कालावधीसाठी बैठकीस उपस्थित न राहण्याबद्दल समाधानकारक स्पष्टीकरण देण्यात आल्यास यथास्थिती, सभापतीस किंवा अध्यक्षास खंड (अ) अन्वये भत्ते देण्यास मंजुरी देता येईल.*

७. **मधल्या प्रवासासाठी प्रवास भत्ता.**—(१) सभागृहाचे अधिवेशन चौदा दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी भरवण्यात आले असेल तेव्हा चौदा दिवसांचा कोणताही अखंड कालावधी संपल्यानंतर, जो सदस्य अशा चौदा दिवसांच्या कालावधीत कोणत्याही सात बैठकींना उपस्थित राहिल्यानंतर अधिवेशनाच्या ठिकाणाहून महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही ठिकाणी जाईल अशा सदस्यास, त्याने अशा ठिकाणापर्यंत केलेल्या प्रवासासाठी आणि अधिवेशनास उपस्थित राहण्यासाठी त्या ठिकाणाहून परतण्यासाठी केलेल्या प्रवासासाठी नियम ५ अन्वये अनुज्ञेय असलेल्या दराने प्रवास भत्ता मिळण्याचा हक्क असेल ; मात्र, अशा प्रवास भत्त्याची एकूण रक्कम, सदस्याने प्रवास केला नसता तर अनुपस्थितीच्या दिवसांसाठी अधिनियमान्वये अशा सदस्यास जो दैनिक भत्ता अनुज्ञेय झाला असता अशा दैनिक भत्त्याच्या एकूण रकमेपेक्षा अधिक होता कामा नये.

(२) पोट-नियम (१) मध्ये काहीही असले तरी, जेव्हा असे प्रवास, चौदा दिवसांची उक्त मुदत समाप्त होण्यापूर्वी करण्यात आले असतील. तेव्हा उक्त प्रवास हे सुद्धा पोट-नियम (१) च्या प्रयोजनासाठी जर सदस्य, उक्त पोट-नियमात आवश्यक असल्याप्रमाणे सात बैठकींना हजर राहिला असेल आणि प्रवासाची सुरूवात आणि चौदा दिवसांची उक्त मुदतीची समाप्ती यांमधील दिवस किंवा कालावधी हा, ज्या मुदतीत सभागृहाची कोणतीही बैठक भरविण्यात आली नाही अशी अखंड मुदत असेल तर, उक्त पोट-नियमांनुसारच करण्यात आले आहेत असे समजण्यात आले पाहिजे.

८. **स्थगनकालात समितीच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी भत्ते.—**समितीची बैठक एकापेक्षा अधिक दिवस स्थगित करण्यात आली असेल आणि ज्या ठिकाणी बैठक भरविण्यात आली असेल त्या ठिकाणाहून सदस्य सामान्यपणे ज्या ठिकाणी राहत असेल किंवा कामकाज चालवित असेल त्या ठिकाणापर्यंत त्याने प्रवास केला असेल आणि बैठक भरविण्यात आलेल्या ठिकाणी, तो परत आलेला असेल तर त्याला त्याच्या इच्छेनुसार, एकतर अशा प्रवासाच्या कालावधीसाठी दैनिक भत्ता किंवा प्रवास भत्ता घेण्याचा हक्क राहील.

९. **स्थगित अधिवेशनास सदस्य उपस्थित राहतील तेव्हा अनुज्ञेय असलेले भत्ते.—**एखादा सदस्य अधिवेशनाच्या किंवा समितीच्या बैठकीच्या ठिकाणी येऊन पोहोचेल आणि असे अधिवेशन किंवा बैठक पुढच्या तारखेपर्यंत स्थगित करण्यात आली असेल तेव्हा, अशा सदस्यास स्थगनाची पुरेशी आगाऊ सूचना नसेल तर, त्यास नियम ८ नुसार भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

१०. **अधिवेशनापूर्वी किंवा अधिवेशनानंतर भरण्यात आलेल्या समितीच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी भत्ते.—**(१) एखाद्या समितीची बैठक सभागृहाच्या अधिवेशनास प्रारंभ होण्यापूर्वी पाचपेक्षा अधिक नसतील इतके दिवस आधी भरवण्यात आली असेल आणि अधिवेशनास प्रारंभ होण्यापूर्वी स्थगित किंवा समाप्त करण्यात आली असेल तेव्हा,—

(अ) जर सदस्य, बैठकीचे स्थगन किंवा समाप्ती आणि अधिवेशनाचा प्रारंभ यामधील कालावधीत, ज्या ठिकाणी बैठक भरवण्यात आली असेल अशा ठिकाणी राहिला असेल तर अशा सदस्यास अशा कालावधीत त्याच्या राहण्याच्या प्रत्येक दिवसासाठी कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने दैनिक भत्ता घेता येईल.

(ब) तो सामान्यपणे ज्या ठिकाणी राहत असेल किंवा कामकाज चालवत असेल अशा ठिकाणास त्याने असा कालावधीत भेट दिली असेल, आणि तो अधिवेशनास उपस्थित राहण्यासाठी या ठिकाणाहून परत येईल तर त्यास, त्याने केलेल्या प्रवासासाठी नियम ५ अन्वये अनुज्ञेय असलेल्या दराने प्रवास भत्ता घेता येईल ; परंतु अशा प्रवास भत्त्याची एकूण रक्कम, या खंडाच्या उपखंड (अ) त्यास लागू झाला असता तर त्याने जितका दैनिक भत्ता घेतला असता त्या दैनिक भत्त्याच्या रकमेपेक्षा अधिक होता कामा नये.

(२) एखाद्या समितीची बैठक सभागृहाच्या अधिवेशनाच्या स्थगनानंतर किंवा सत्र समाप्तीनंतर पाच दिवासांच्या आत भरवण्यात आली असेल, तेव्हा—

(अ) जर सदस्य, अधिवेशनाचे, स्थगन किंवा सत्र समाप्ती आणि बैठकीचा प्रारंभ यामधील कालवधीत, ज्या ठिकाणी अधिवेशन भरविण्यात आले असेल अशा ठिकाणी राहिला असेल तर अशा सदस्यास अशा कालावधीत त्याच्या राहण्याच्या प्रत्येक दिवसासाठी कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट दराने दैनिक भत्ता घेता येईल.

(ब) तो सामान्यपणे ज्या ठिकाणी राहत असेल किंवा कामकाज चालवत असेल अशा ठिकाणास त्याने अशा कालावधीत भेट दिली असेल आणि तो बैठकीस उपस्थित राहण्यासाठी त्या

ठिकाणाहून परत येईल तर त्यास, त्याने केलेल्या प्रवासासाठी नियम ५ अन्वये अनुज्ञेय असलेल्या दराने प्रवास भत्ता घेता येईल. पंरतु, अशा प्रवासभत्त्याची एकूण रक्कम, या खंडाचा उपखंड (अ) त्यास लागू झाला असता तर त्याने जितका दैनिक भत्ता घेतला असता त्या दैनिक भत्त्याच्या रकमेपेक्षा अधिक भत्ता होता कामा नये.

**१०-अ. कार्यालयास हजर राहण्यासाठी समिती प्रमुखास भत्ते.—**समिती प्रमुख म्हणून सदस्य कामकाज चालवित असताना ज्या बाबतीत लागोपाठच्या दोन दिवसांमधील खंडकाळ तीन दिवसांपेक्षा जास्त नसेल त्या बाबतीत, जर सदस्य सदरहू खंडकालात, सामान्यपणे तो ज्या ठिकाणी राहत असेल किंवा कामकाज चालवित असे, त्या ठिकाणास भेट देईल आणि पुन्हा असे कामकाज चालविण्यासाठी परत येईल. तर त्यास कलम ५ अन्वये अनुज्ञेय असलेल्या प्रवास भत्त्याइतकी किंवा ज्या ठिकाणी कामकाज चालविण्यात आलेले होते. त्या ठिकाणी त्याने मुक्काम केला असता तर कलम ४ अन्वये अनुज्ञेय असलेल्या दैनिक भत्त्याइतकी, यापैकी जी कमी असेल ती रक्कम मिळण्याचा हक्क असेल.

" **१०अअ. राज्याबाहेर केलेल्या अभ्यास दौऱ्याकरिता सदस्यांना द्यावयाचा भत्ता व सुविधा.-** या नियमांच्या उपबंधाच्या अधीन, कलम ५ अअच्या तरतुदींनुसार राज्याबाहेर केलेल्या विधानमंडळ समितीच्या अभ्यास दौऱ्यामध्ये भाग घेणाऱ्या सदस्यास पुढील हक्क असेल :—

(अ) सदस्यास त्याच्या निवासस्थानापासून समितीच्या प्रस्तावित दौऱ्याकरिता जमण्यासाठी निश्चित केलेल्या ठिकाणापर्यंत आणि परतीच्या प्रवासाकरिता, नियम ५ पोट-नियम (१) नुसार प्रवास भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

(ब) कलम ५ अक मध्ये सदस्यास राज्याबाहेर रेल्वेने प्रवास करण्याकरिता घालून दिलेल्या किलोमीटरच्या मर्यादेस अधीन राहून,—

(एक) जर त्याने रेल्वे कूपन पुस्तकाच्या सुविधेचा लाभ घेतला असेल तर, त्याला वातानुकूलित टू-टियरचे एक पट भाडे मिळण्याचा हक्क असेल ;

(दोन) जर त्याने रेल्वे कूपन पुस्तकाच्या सुविधेचा लाभ न घेता रेल्वेने प्रवास केला असेल तर, त्याला वातानुकूलित टू-टियरचे दीड पट भाडे मिळण्याचा हक्क असेल.

(क) कलम ५(१अ) मध्ये घालून दिलेल्या फेऱ्यांच्या एकूण संख्येच्या अधीन राहून, राज्याबाहेर विमानाने प्रवास करता येऊ शकेल.

(ड) राज्याबाहेरील अभ्यास दौऱ्यादरम्यान सडकेने, समुद्र मार्गे प्रवास करण्याकरिता समितीकडे जर शासकीय वाहन उपलब्ध नसेल तर, यथास्थिती, सडकेने किंवा बोटीने एकूण प्रवासाकरिता नियम ५(१) नुसार घालून दिलेल्या दराने प्रवास भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

(ई) या नियमाच्या उपबंधाच्या अधीन, सदस्यास निवासाच्या कालावधीच्या प्रत्येक दिवसाकरिता कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने दैनिक भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

(फ) सदस्यास खाजगी रीतीने केलेला प्रवास आणि खाजगी रीतीने केलेला अधिवास किंवा जोडून केलेल्या खाजगी प्रवास खर्चाची कोणत्याही प्रकारची प्रतिपूर्ती अनुज्ञेय असणार नाही.

(ग) कलम ५अक मध्ये घालून दिल्याप्रमाणे किलोमीटर्सच्या मर्यादेस अधीन राहून, सदस्य, ज्यांची एकापेक्षा अधिक समित्यांवर नियुक्ती करण्यात आलेली आहे त्यांना समिती सदस्य या नात्याने, कोणत्याही एका समितीच्या राज्याबाहेरील अभ्यास दौऱ्यावर आपल्या पत्नीसह-पतीसह प्रवास करण्याची मुभा असेल, अशा दौऱ्यामध्ये,—

(एक) पत्नी-पतीच्या प्रवासाकरिता राज्याबाहेरील प्रवासाच्या रेल्वे कूपनाचा लाभ घेता येऊ शकेल ;

(दोन) जर संबंधित व्यक्तींनी रेल्वेने प्रवास केला असेल, तर त्यांना वातानुकूलित टू-टियरचे रेल्वेच्या एका वेळच्या भाड्याची प्रतीपूर्ती अनुज्ञेय असेल."

**११. कोणत्याही दिवशी अधिवेशनास किंवा बैठकीत उपस्थित राहिल्यानंतर राजीनामा देणाऱ्या किंवा सदस्य असण्याचे बंद होणाऱ्या सदस्यास त्या दिवसासाठी वेतन व भत्ते मिळण्याचा हक्क असणे :–** एखादा सदस्य सभागृहाच्या अधिवेशनास किंवा समितीच्या बैठकीस उपस्थित राहिल्यानंतर लगेच आपल्या पदाचा राजीनामा किंवा सदस्य असण्याचे बंद होईल तेव्हा त्यास या नियमात काहीही अंतर्भूत असले तरी, तो ज्या दिवशी राजीनामा देईल किंवा सदस्य असण्याचे बंद होईल त्या दिवसासाठी त्याचे वेतन, दैनिक भत्ते आणि तसेच, तो सामान्यपणे ज्या ठिकाणी राहत असेल किंवा कामकाज चालवत असेल त्या ठिकाणी परत जाण्याच्या प्रवासासाठी प्रवास भत्ता घेण्याचा हक्क असेल, ज्या ठिकाणी अधिवेशन किंवा बैठक भरवण्यात आली असेल अशा ठिकाणी, तो ज्या दिवशी त्याने राजीनामा दिला असेल किंवा तो सदस्य असण्याचे बंद झाले असेल त्या दिवसांच्या लगेच नंतरच्या दिवशी निदान सहा तासांसाठी राहिला असेल तर, त्यास अशा लगेच नंतरच्या दिवसासाठी देखील दैनिक भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

**१२. अन्य नात्याने आधीच भत्ता घेण्यात आला असेल तर पुन्हा न घेणे :—**या नियमात काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या सदस्याने अन्य नात्याने एखाद्या प्रवासासाठी किंवा मुक्कामासाठी सरकारी कोषागारातून किंवा इतर कोणत्याही शासकीय अथवा निमशासकीय संस्थांकडून प्रवास भत्ता किंवा दैनिक भत्ता घेतला असेल तर त्यास प्रवसासाठी किंवा मुक्कामासाठी त्यास या नियमान्वये अनुज्ञेय असलेला प्रवास भत्ता किंवा दैनिक भत्ता घेता येणार नाही.

**१३. प्रवास भत्ता आगाऊ घेता येईल.—** एखाद्या सदस्यास या नियमान्वये त्याच्या अंतिम परतीच्या प्रवासासाठी आगाऊ भत्ता घेता येईल.

**१४. दैनिक भत्ता आगाऊ न देणे.—**कोणत्याही सदस्यास दैनिक भत्ता आगाऊ देण्यात येणार नाही.

**१५. बिलांची लेखापरीक्षा.—**(१) प्रवास भत्त्याची किंवा दैनिक भत्त्याची मागणी करणाऱ्या सदस्याने याबाबतचे बील तयार केले पाहिजे आणि त्यावर, त्याच्या मागणीस लागू असलेले खालील नमुन्यातील कोणतेही एक किंवा अधिक प्रमाणपत्रे पृष्ठांकित केली पाहीजेत व ते बील महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे सादर केले पाहिजे.

(कलम ४ चे परंतुक पहा)

(एक) प्रमाणित करण्यात येते की, दिनांक ................................. रोजी सुरू होणाऱ्या व दिनांक........................... रोजी संपणाऱ्या खंडाच्या ज्या कालावधीसाठी कलम ४ च्या परंतुकान्वये दैनिक भत्त्याची मागणी करण्यात आली आहे, त्या कालावधीत मी अधिवेशनाचे किंवा बैठकीचे ठिकाण सोडून गेलो नव्हतो.

(कलम ५ चे परंतुक पहा)

(दोन) प्रमाणित करण्यात येते की, सामान्यपणे मुंबई/नागपूर येते राहत नाही किंवा कामकाज चालवत नाही.

(तीन) प्रमाणित करण्यात येते की, सडकेने, समुद्रातून किंवा नदीतून केलेल्या प्रवासाची अंतरे, मला खात्री करून घेणे शक्य होते तेथवर बरोबर आहेत.

(नियम ३ पहा)

(चार) प्रमाणित करण्यात येते की, ज्या दिवसासाठी/दिवसांसाठी दैनिक भत्त्याची मागणी करण्यात आली आहे. त्या दिवशी मी विधानपरिषदेच्या/विधानसभेच्या बैठकीस/बैठकींना उपस्थित राहिलो होतो/ आजारीपणामुळे किंवा अंतिम प्रयाणामुळे उपस्थित राहू शकलो नाही.

(पाच) प्रमाणित करण्यात येते की, मागील बाजूस नमूद केल्याप्रमाणे ज्या दिवसासाठी दैनिक भत्त्याची मागणी करण्यात आली आहे अशा प्रत्येक दिवशी, विधानपरिषदेच्या/विधानसभेच्या अधिवेशनास/ समितीच्या बैठकीस उपस्थित राहण्याच्या प्रयोजनासाठी मी मुंबई/नागपूर येथे सहा तासांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी राहिलो नाही.

(पाच) (अ) प्रमाणित करण्यात येते की, (१) विधानसभा/विधानपरिषद अधिवेशनास उपस्थित राहणे, (२) समितीच्या बैठकीस उपस्थित राहणे, (३) समिती प्रमुख म्हणून माझ्या कर्तव्याशी संबंधित असलेले कामकाज पार पाडणे, (४) सदस्य म्हणून माझ्या कर्तव्याशी संबंधित असलेले कामकाज पार पाडणे या प्रयोजनार्थ ज्या ठिकाणी अधिवेशन/बैठक घेण्यात येते अशा ठिकाणी किंवा जेथे अशा प्रकारचे कामकाज पार पाडावयाचे आहे अशा ठिकाणापर्यंत केलेला प्रवास हा देयकामध्ये दर्शविण्यात आलेल्या पद्धतीप्रमाणे प्रत्यक्षात करण्यात आला होता.

[नियम ५ (१) (एक) आणि कलम ५ पहा]

(सहा) प्रमाणित करण्यात येते की, सडकेने भाड्याच्या वाहनातून केलेल्या प्रवासाच्या बाबतीत, सडकेने कलेल्या प्रवासासाठी मागणी करण्यात आलेला भत्ता, वाहन भाड्याने घेण्यासाठी मी प्रत्यक्ष केलेल्या खर्चापेक्षा अधिक नाही.

[कलम ५ (१) (एक) चे तिसरे परंतुक पहा]

(सात) प्रमाणित करण्यात येते की, सडकेने केलेला प्रवास हा विनामूल्य पासाच्या सोयीचा उपयोग करून राज्य परिवहन सेवेद्वारा केलेला नाही.

(नियम ६ पहा)

(आठ) प्रमाणित करण्यात येते की, समितीच्या ज्या बैठकीच्या किंवा बैठकींच्या बाबतीत प्रवास भत्त्याची आणि दैनिक भत्त्याची मागणी करण्यात आली आहे. त्या बैठकीस किंवा बैठकींना मी त्या दिवशीच्या/त्या दिवसांपैकी प्रत्येक दिवशीच्या एकूण कालावधीच्या निदान अर्ध्या कालावधीसाठी उपस्थित राहिलो होतो.

(नियम ७, ८, ९, व १० पहा.)

(नऊ) प्रमाणित करण्यात येते की, ज्या प्रवासासाठी मी नियम ७, ८, ९, १० अन्वये, प्रवास भत्त्याची मागणी केली आहे ते प्रवास मी प्रत्यक्ष केलेले आहेत.

(नियम ८, ९, व १० पहा.)

(दहा) प्रमाणित करण्यात येते की, ...................................... रोजी सुरू होणाऱ्या आणि ...................................... रोजी संपणाऱ्या ज्या कालावधीसाठी मी नियम ८, ९, १० आणि नियम ३ अन्वये दैनिक भत्त्याची मागणी केली आहे त्या कालावधीत मी मुंबई/नागपूर येथे सहा तासांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी राहिलो होतो.

(नियम १२ पहा.)

(अकरा) प्रमाणित करण्यात येते की, मी अन्य नात्याने यापूर्वी त्याच प्रवासासाठी प्रवास भत्ता किंवा त्याच मुक्कामासाठी दैनिक भत्ता घेतलेला नाही.

(नियम १३ पहा.)

(बारा) प्रमाणित करण्यात येते की, जेथे विधानसभेचे/विधानपरिषदेचे अधिवेशन घेण्यात आले होते किंवा जेथे बैठक झाली होती किंवा कामकाज पार पाडण्यात आले होते त्या ठिकाणापासून परतीच्या प्रवासाच्या प्रयोजनार्थ मी आगाऊ प्रवास भत्ता घेतलेला आहे अशा परतीच्या प्रवासासंबंधीचा तपशील प्रवास पूर्ण झाल्यानंतर सादर करण्यात येईल. तसेच मी अशी लेखी हमी देतो की, या देयकाद्वारे मी घेतलेल्या प्रवास भत्त्याच्या आगाऊ रकमेपेक्षा, प्रत्यक्षात केलेल्या परतीच्या प्रवासाच्या संदर्भात अनुज्ञेय असलेली प्रवास भत्त्याची रक्कम जेवढ्या रकमेने कमी असल्याचे, काही असल्यास आढळून येईल तेवढी रक्कम मी परत करीन.

(२) बिलावर विधानमंडळ सचिव किंवा त्याने याबाबत प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी प्रतिस्वाक्षरी करील आणि त्या बिलाची रक्कम सदस्यास त्याच्या अभिहस्तांकित खात्यावरील धनादेशाने किंवा ज्या कोषागारातून तो वेतन घेत असेल त्या कोषागारातून चुकती करण्यात येईल :

परंतु, सदस्याने नियम ९ अन्वये भत्त्यांची मागणी केली असेल तेव्हा, सचिव किंवा असा अधिकारी बिलावर प्रतिस्वाक्षरी करण्यापूर्वी, त्या बिलावर खालील प्रमाणपत्र देखील पृष्ठांकित करील :—

प्रमाणित करण्यात येते की, * .................................................... यांस अधिवेशनाच्या + ................................................ च्या बैठकीच्या दिनांक ......................... च्या स्थगनाची पुरेशी आगाऊ सूचना मिळाली नव्हती.

---

* येथे सदस्याचे नाव लिहावे.

+ येथे समितीचे नाव लिहावे.

येथे स्थगनाची तारीख लिहावी.

(३) त्यानंतर चुकती केलेली प्रमाणके महालेखापाल यांच्याकडे पाठविण्यात येतील.

**१६-अ. डाकबंगले इत्यादीत राहण्यासाठी जागा :—**एखादा सदस्य, सदस्य म्हणून त्याच्या कर्तव्याशी संबंधित असलेले कोणतेही कामकाज करण्याच्या प्रयोजनासाठी महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही ठिकाणास भेट देईल तेव्हा, तशा अर्थाचे प्रमाणपत्र दिल्यावर, त्यास अशा कामकाजासाठी अशा ठिकाणी त्याच्या निवासाच्या कालावधीत सरकारी डाकबंगल्यात, निरीक्षण बंगल्यात, विश्राम भवनात किंवा विश्रामगृहात, वर्ग-१ अधिकारी कामावर असताना त्यांना ज्या अटींवर व शर्तींवर त्यात जागा देण्यात येते त्याच अटींवर व शर्तींवर जागा देण्यात येईल.

**१७. दूरध्वनीची सोय :—**एखादा सदस्य, यथास्थिती, सभागृहाच्या अधिवेशनाच्या वेळी किंवा समितीच्या बैठकीच्या वेळी त्याबाबतीत, विधानमंडळ सदस्याच्या वसतिगृहात राहत असेल अशा सदस्यास, उक्त आमदार निवासात बसवण्यात आलेल्या दूरध्वनीवरून आणि तसेच, सदस्यांच्या उपयोगासाठी विधानसभा किंवा विधानपरिषद कक्षांजवळ बसवण्यात आलेल्या दूरध्वनीवरुन विनामूल्य स्थानिक दूरभाषिते करण्याचा हक्क असेल.

**१८. सदस्यांच्या बिलांमधून सरकारला देय असलेल्या व अन्य देय रकमांची वसुली :—**(१) जेव्हा जेव्हा घरभाडे, दूरध्वनीच्या देय रकमा, इत्यादींसारख्या सरकारला देय असलेल्या कोणत्याही रकमा सदस्यांकडे थकित असल्याचे कळवण्यात आले असेल आणि संबंधित प्राधिकाऱ्यांकडून त्यांच्या पुष्ट्यर्थ मागणी किंवा बिले मिळाली असतील आणि वारंवार विनंती करूनही अशा सदस्याने अशा देय रकमा देण्यात कसूर केली तेव्हा तेव्हा त्या सदस्यासाठी व त्याच्या वतीने तयार करावयाच्या पुढच्या वेतन किंवा प्रवास भत्त्याच्या व दैनिक भत्त्याच्या बिलातून अशा देय असलेल्या रकमेइतकी रक्कम वजा करण्यात येईल व शिल्लक रक्कम त्यास देण्यात येईल.

(२) सामान्यपणे एखाद्या सदस्याच्या नावे थकित असलेल्या कोणत्याही बिनसरकारी देय रकमा त्याच्या वेतन किंवा भत्त्यातून वसूल करण्यात येणार नाही. परंतु जेव्हा, तो समितीबरोबर दौऱ्यावर असेल तेव्हा त्याच्या अशा संसदीय कर्तव्याच्या ओघात त्यास पुरवण्यात आलेल्या सेवांबद्दल अशा रकमा देय असतील आणि अशा सेवांची व्यवस्था महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील अधिकाऱ्यांच्या विनंतीवरून निमसरकारी संस्थांकडून किंवा खाजगी व्यक्तींकडून किंवा त्यांच्या सांगण्यावरून करण्यात आली असेल आणि वारंवार विनंती करूनही, अशा सदस्याने अशा देय रकमा देण्यास कसूर केली असेल तेव्हा, अशा सदस्याच्या वेतन किंवा प्रवास भत्त्याच्या किंवा दैनिक भत्त्याच्या बिलातून त्यांची वसुली करता येईल.

**१९. मृत सदस्यास देय असलेल्या रकमांचे प्रदान :—** (१) एखादा सदस्य कोणत्याही वेळी मरण पावला असला तरी ज्या दिवशी तो मरण पावला असेल त्या दिवसासाठी मृत सदस्याचे वेतन व भत्ते काढण्यात येतील.

(२) कोणत्याही मृत सदस्याच्या नावे वेतन किंवा भत्त्याबद्दल जमा असलेली कोणतीही रक्कम किंवा (कोणत्याही वैध देय रकमा वजा केल्यानंतर) त्यांची शिल्लक देय होईल तेव्हा, अशा रकमा प्रदान

करणे ज्या अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल तो अधिकारी नेहमीच वैध प्राधिकारपत्र सादर करण्यास न सांगता,—

(एक) अशी रक्कम किंवा यथास्थिती, शिल्लक रुपये ८,००० पेक्षा अधिक नसेल तेव्हा मागणीदाराचा अधिकार व हक्क याविषयी पुरेशी मानण्यात येईल अशी चौकशी करण्यात आल्यानंतर, तो सदस्य त्याच्या मृत्यूच्या निकटपूर्वी सामान्यपणे ज्या जिल्ह्यात रहात होता किंवा कामकाज चालवत होता त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशान्वये ;

(दोन) अशी रक्कम किंवा यथास्थिती, देय शिल्लक रुपये ८,००० पेक्षा अधिक असेल तेव्हा मागणीदाराने सभापती किंवा अध्यक्ष सांगेल अशा जामिनांसह क्षतिपूर्ती बंधपत्र करून दिल्यावर सभापतींच्या किंवा अध्यक्षांच्या आदेशान्वये (अशा आदेश मागणीदाराचा अधिकार व हक्क याविषयी यथास्थिती, सभापतींची किंवा अध्यक्षांची खात्री झाल्यानंतर आणि नेहमीचे वैध प्राधिकारपत्र सादर करण्याबाबत आग्रह धरण्याने मागणीदारास अकारण त्रास होईल असे त्याचे मत झाल्यावर देण्यात येईल) ;

मृत सदस्यांच्या वतीने त्या रकमेवर हक्क सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस यथास्थिती ती रक्कम किंवा शिल्लक देता येईल.

(३) पोट-नियम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मागणीदाराचा अधिकार किंवा हक्क याविषयी कोणतीही शंका असेल तेव्हा, मागणीदाराने मृत सदस्यांच्या संपत्तीचा कारभार पाहणे त्याच्याकडे सोपवण्यात आल्याचा पुरावा म्हणून मृत्युपत्राप्रमाणे किंवा वहिवाटपत्र किंवा धारकास अशी रक्कम किंवा शिल्लक स्वीकारण्याचा हक्क प्राप्त करून देणारे, भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ अन्वये किंवा सन १८२७ चा मुंबई विनियम क्रमांक ८ अन्वये देण्यात आलेले प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय कोणतीही रक्कम दिली जाणार नाही.

## परिशिष्ट-एक

### प्रवास भत्ता

**शासनाने नेमलेल्या कोणत्याही समित्या किंवा निकाय (Bodies) यामध्ये सेवा करणाऱ्या किंवा यांच्यासमोर साक्षीदार म्हणून उपस्थित होणाऱ्या महाराष्ट्र विधानमंडळ/संसद सदस्यांना प्रवास भत्ता देणे.**

### महाराष्ट्र शासन

### वित्त विभाग

निर्णय क्र. टीआरए. १४७०/१३१-अठरा, सचिवालय, मुंबई ४०० ०३२ (बीआर),

दिनांक २७ जानेवारी १९७१.

**पहा.**—शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक टीआरए. १४६३/१०२४-अठरा, दिनांक २५ जुलै १९६७.

### निर्णय

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक टीआरए. १४६३/१०४२-अठरा, दिनांक २५ जुलै १९६७, अन्वये महाराष्ट्र राज्य विधानमंडळ सदस्यांना/संसद सदस्यांना शासनाने नेमलेल्या समितीचे बिनसरकारी सदस्य म्हणून त्यांनी केलेल्या प्रवासाबद्दल, त्यांना विधानमंडळ सदस्य/संसद सदस्य म्हणून अनुज्ञेय असलेल्या दरांनी प्रवास भत्ता, ती समिती राज्य पातळीवरील समिती आहे, विभागीय किंवा जिल्हा किंवा तालुका पातळीवरील समिती आहे ही वस्तुस्थिती विचारात न घेता, घेण्याची परवानगी देण्यात आली आहे. या निर्णयास अनुलक्षून मुंबई नागरी सेवा नियम, खंड दोनचे परिशिष्ट बेचाळीस-ए याच्या भाग एक मधील नियम १, पोट-नियम (२) मध्ये त्याप्रमाणे सुधारणा करण्यात आली. या निर्णयांमध्ये महाराष्ट्र राज्य विधानमंडळाच्या सदस्यांनी/संसद सदस्यांनी प्रवास भत्ता/दैनिक भत्ता “ कोणत्या दरांनी ” घ्यावयाचा त्याचा निर्देश असल्यामुळे, प्रवास भत्त्याशी व दैनिक भत्त्याशी संबंधित सर्व बाबींमध्ये अशा सदस्यांचे मुंबई नागरी सेवा नियमांद्वारे नियमन व्हावयाचे आहे की काय अशी शंका उपस्थित करण्यात आली आहे. शासन असा निदेश देत आहे की, अशा सर्व बाबींमध्ये तसेच चौकशी आयोगासमोर किंवा समिती इ. समोर साक्षीदार म्हणून, उपस्थित होण्यासाठी करावयाच्या प्रवासांबाबत, या सदस्यांना, विधानमंडळ/ संसद सदस्यांच्या भत्त्याशी संबंधित असलेले नियम लागू होतील व मुंबई नागरी सेवा नियम त्यांना लागू होणार नाहीत. त्याप्रमाणे मुंबई नागरी सेवा नियम, खंड दोनमध्ये पुढील आणखी सुधारणा करण्यात याव्यात :—

### सुधारणा

**एक.**—मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ (यात यापुढे ज्याचा निर्देश “मुख्य नियम” असा करण्यात आला आहे), याच्या परिशिष्ट बेचाळीसमधील खंड दोन मध्ये “भाग एक सर्वसाधारण” या शीर्षकाखाली—

(१) “सूचना” या शीर्षकासह सुरू होणाऱ्या परिच्छेदात शेवटी पुढील मजकुराची भर घालण्यात येईल :—

“ महाराष्ट्र राज्य विधानमंडळाच्या आणि संसदेच्या सदस्यांच्या बाबतीत, शासनाने नेमलेल्या कोणत्याही समितीचे किंवा निकायाचे (Bodies) सदस्य म्हणून किंवा त्यासमोर

उपस्थित होणारे साक्षीदार म्हणून त्याच्या कोणत्याही कर्तव्यांच्या पालनार्थ त्यांनी केलेल्या प्रवासांबद्दल प्रवास भत्त्याचे प्रदान (यात दैनिक भत्ता, रेल्वेने व बोटीने केलेल्या प्रवासातील आनुषंगिक खर्च आणि सडक मैल भत्ता याचा समावेश आहे.) जणू काही हे प्रवास, विधानमंडळ सदस्य किंवा यथास्थिती संसद सदस्य म्हणून असलेल्या त्यांच्या कर्तव्यांशी संबंधित कोणतेही कामकाज करण्याच्या प्रयोजनासाठी करण्यात आले होते असे समजून, महाराष्ट्र राज्य विधानमंडळ सदस्य किंवा यथास्थिती संसद सदस्य यांच्याशी संबंधित असलेल्या कायद्यानुसार केले जाईल."

(२) नियम १ मधील पोट-नियम (२) वगळण्यात येईल.

**दोन.**—मुख्य नियमांच्या परिशिष्ट **बेचाळीस-बी** मधील भाग चार वगळण्यात येईल.

२. हे आदेश, ते काढल्याच्या तारखेपासून अंमलात येतील आणि प्रलंबित प्रकरण त्यानुसार निकालात काढण्यात येतील. यापूर्वीच निकालात काढलेली प्रकरणे पुन्हा सुरू करण्यात येऊ नयेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पांडुरंग राव,**
शासनाचे अवर सचिव.

## परिशिष्ट-दोन

**महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद सदस्यांचे वेतन व भत्ते तसेच त्यांच्या स्वीय सहायकांचे पारिश्रमिक करिता अवर सचिव स्तरावरील स्वतंत्र आहरण व संवितरण अधिकारी घोषित करणेबाबत.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
**ज्ञापन क्रमांक : म.वि.स./२८९२८/ह,**
**विधान भवन, मुंबई- ४०० ०३२.**
**दिनांक : २० नोव्हेंबर,२०१४**

**संदर्भ-**

१) वित्त विभाग निर्णय क्रमांक टीआरडब्ल्यू.१३८१/प्र.क्र.६५/८९/कोषागार-४, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १८ ऑक्टोबर, १९८९.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उपसभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६, महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेते यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ तसेच महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६ या सर्व अधिनियमानुसार संबंधितांना वेतन व भत्ते अदा करण्यात येतात. तसेच वरिल अधिनियमानुसार मा.पिठासीन अधिकारी व मा.विरोधी पक्षनेते यांच्या स्वीय सहाय्यकांना वेतन व महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय अधिसूचना क्र.२६१५२/H-३८, दि.०६ ऑक्टोबर, १९८१ व वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. टी.आर.डब्ल्यू.१३८१/८४१/सी.आर./एडीएम -९, दि.०६ फेब्रुवारी, १९८२ अनुसार मा.सदस्यांच्या स्वीय सहायकांचे पारिश्रमिक अदा करण्यात येते. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शा.नि.क्र. टी.आर.डब्ल्यू १३८१/प्र.क्र.६५/८९/कोषागार-४,दिनांक १८ ऑक्टोबर,१९८९ मधील तरतुदीप्रमाणे मा.पिठासीन अधिकारी व मा.विरोधी पक्षनेते व मा. सदस्य हे त्यांचे स्वतःचे वेतन व भत्ते तसेच त्यांच्या स्वीय सहायकांचे वेतन/परिश्रमिक याकरिता स्वतः आहरण व संवितरण अधिकारी आहेत.

**ज्ञापन :**

उपरोक्त कार्यपध्दती ऐवजी मा.पिठासीन अधिकारी, मा.विरोधी पक्षनेते व सर्व विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते यासंबंधीची देयके तसेच त्यांच्या स्वीय सहाय्यकांचे वेतन/पारिश्रमिकांची देयके महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रित अधिकाऱ्यांच्या देयकाप्रमाणे (महाराष्ट्र कोषागार नियम १९ नमुना) एकत्रितरित्या विधानमंडळ सचिवालयाकडून अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथे दाखल केली जातील. सदर देयके अधिदान व लेखा कार्यालयाकडून पारित करुन सदर रक्कम प्रथम ECS द्वारे महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या आहरण व संवितरण अधिकारी यांच्या खात्यात जमा करुन सदर रक्कम थेट संबंधिताच्या बँक खात्यात NEFT/ECS पध्दतीद्वारे जमा करण्यात येईल.

उपरोक्त प्रयोजनार्थ अवर सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन मुंबई या स्तरावरील अधिकारी **स्वतंत्र आहरण व संवितरण अधिकारी** म्हणून राहतील.

मा.पिठासीन अधिकारी व मा.विरोधी पक्षनेते व महाराष्ट्र विधनमंडळ सदस्य यांचे वेतन व भत्ते तसेच त्यांच्या स्वीय सहायकांचे वेतन/पारिश्रमिक आहरित करण्यासाठी ते स्वत: आहरण व संवितरण अधिकारी म्हणून यापुढे कार्यरत राहणार नाहीत. मात्र वैद्यकीय प्रतिपूर्तीबाबत या अगोदर अस्तित्वात असलेलीच कार्यपध्दती अवलंबिण्यात येईल व यासाठी मा.पिठासीन अधिकारी व मा.विरोधी पक्षनेते व मा. सदस्य स्वत: आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कार्यरत राहतील. तसेच प्रवास देयकाच्या बाबतीत यापूर्वीचीच कार्यपध्दती कायम राहील.

हे आदेश वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.२००/२०१४/कोषा.प्र.५, दिनांक २९ ऑक्टोबर, २०१४ च्या अनुमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर ज्ञापन महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या Email-mls-mumbai@rediffmail.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(मेघना तळेकर)**
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**<u>प्रत :</u>**

१) मा. सभापती, (महाराष्ट्र विधानपरिषद),यांचे सचिव.
२) मा. अध्यक्ष, (महाराष्ट्र विधानसभा) यांचे सचिव.
३) मा. उप सभापती, (महाराष्ट्र विधानपरिषद), यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४) मा. उपाध्यक्ष, (महाराष्ट्र विधानसभा) यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
५) मा. विरोधी पक्षनेता, (महाराष्ट्र विधानपरिषद) यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
६) मा. विरोधी पक्षनेता, (महाराष्ट्र विधानसभा) यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
७) सर्व महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा सदस्य.
८) महालेखाकार, (लेखा व हकदारी)-१, महाराष्ट्र, मुंबई.
९) महालेखाकार, (लेखा व हकदारी)-२, महाराष्ट्र, नागपूर
१०) वित्त विभाग.
११) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालयं.
१२) संचालक, लेखा व कोषागारे, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई.
१३) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान् व लेखा कार्यालय, बांद्रा, मुंबई.
१४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी/उप कोषागार अधिकारी.
१५) सहाय्यक अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई.
१६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष
१७) महाराष्ट्र विधानमंडळ पक्ष कार्यालय.

## परिशिष्ट-तीन

**महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद सदस्यांचे वेतन व भत्ते तसेच त्यांच्या स्वीय सहायकांचे पारिश्रमिक आहरण करण्याच्या पध्दतीत सुधारणा.**

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण- १०१५/प्र. क्र.१३ /कोषा प्र - ५,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

तारीख: २० फेब्रुवारी, २०१५

वाचा -

**१) शासन निर्णय क्र.टीआरडब्ल्यु-१३८१/प्र.क्र.३६५/८९/कोषागार-४ दि.१८/१०/१९८९.**

**२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ज्ञापन क्र.म.वि.स./२८९२८/ह, दि.२०/११/२०१४.**

प्रस्तावना -

वित्त विभाग, शासन निर्णय क्र.टीआरडब्ल्यु-१३८१/प्र.क्र.३६५/८९/कोषागार-४, दि.१८/१०/१९८९ अनुसार राजपत्रित अधिका-यांच्या वेतन आहरण करण्याच्या पध्दतीत सुधारणा करण्यात आली आहे. मात्र ही सुधारणा शासन निर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या संवर्गातील पदाधिका-यांना लागू करण्यात आली नसल्याने राज्यमंत्र्यांसह सर्व मंत्री आणि विधानसभा/विधानपरिषद यांचे अध्यक्ष/सभापती, उपाध्यक्ष/उपसभापती व सदस्य यांचे वेतन व भत्ते सद्याच्या प्रचलित पध्दतीनुसारच काढण्याचा निर्णय त्यावेळी झाला आहे. महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद सदस्यांचे वेतन व भत्ते तसेच त्यांच्या स्वीय सहायकांचे पारिश्रमिक ECS/EFT व्दारा महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयामार्फत अदा करण्याची कार्यपध्दती सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याअनुषंगाने महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने संदर्भाधीन २ येथील ज्ञापनान्वये अवर सचिव स्तरावरील अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित केले आहे. यासंदर्भात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय-**

१. पिठासीन अधिकारी, विरोधी पक्षनेते व सर्व विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते यासंबंधीची देयके तसेच त्यांच्या स्वीय सहाय्यकांचे वेतन/पारिश्रमिकांची देयके महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रित अधिका-यांच्या देयकाप्रमाणे (महाराष्ट्र कोषागार नियम १९ नमूना) एकत्रितरित्या विधानमंडळ सचिवालयाकडून अधिदान व लेखा कार्यालय,मुंबई येथे दाखल केली जातील.

२. सदर देयके अधिदान व लेखा कार्यालयाकडून पारित करुन रक्कम प्रथम ECS व्दारे महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या आहरण व संवितरण अधिकारी यांच्या खात्यात जमा करुन सदर रक्कम थेट संबंधिताच्या बँक खात्यात NEFT/ECS पध्दतीव्दारे जमा करण्यात येईल.

३. पिठासीन अधिकारी व विरोधी पक्षनेते व महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य यांचे वेतन व भत्ते तसेच त्यांच्या सहायकांचे वेतन/पारिश्रामिक आहरित करण्यासाठी ते स्वत: आहरण व संवितरण अधिकारी म्हणून यापुढे कार्यरत राहणार नाहीत.

४. वैद्यकीय प्रतिपूर्तीबाबत या अगोदर अस्तित्वात असलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात येईल व यासाठी पिठासीन अधिकारी व विरोधी पक्षनेते व सदस्य स्वत: आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कार्यरत राहतील. तसेच प्रवास देयकाच्या बाबतीत यापूर्वीचीच कार्यपध्दती कायम राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०२२०१६२४५२५८०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NARAYAN BHASKAR RINGANE

Digitally signed by NARAYAN BHASKAR RINGANE
DN: CN = NARAYAN BHASKAR RINGANE, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = Finance Department
Date: 2015.02.20 16:52:41 +05'30'

**( ना.भा.रिंगणे )**

उपसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१.मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.

२.सर्व सन्मानिय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य,

३.राज्यपालांचे सचिव

४.मुख्यमंत्र्यांचे सचिव

५.सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

६.सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग

७.मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख

८.प्रबंधक, मुळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई

९.प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई

१०.प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई

११.महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर

१२.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर

१३.आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२

१४.आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर ४४४००१

१५.प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई

१६.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

१७.सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई

१८.प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई

१९.प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई

२०. मख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२१. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली

२२.सर्व विभागीय आयुक्त

२३.सर्व जिल्हाधिकारी

२४.सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

२५.संचालक , लेखा व कोषागारे, मुंबई

२६.अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई

२७.सहसंचालक,लेखा व कोषागारे,कोकण/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/ अमरावती

२८.मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई

२९.सहसंचालक,स्थानिक निधी लेखा मुंबई /पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती

३०.वित्त विभागातील सर्व कार्यासने

३१.निवड नस्ती कोषा प्र.५

## ३. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (मार्ग परिवहन सेवेद्वारा विनामूल्य प्रवास) नियम, १९६१

१. या नियमास महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (मार्ग परिवहन सेवेद्वारा विनामूल्य प्रवास) (सुधारणा) नियम, १९६१ असे म्हणता येईल.

(२) तो दिनांक २९ डिसेंबर १९६० पासून अंमलात आले आहेत असे मानले जाईल.

२. या नियमांच्या उपबंधाच्या अधीन, महाराष्ट्र विधानसभेच्या व महाराष्ट्र विधानपरिषदेच्या प्रत्येक सदस्यास सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांच्याकडून परिशिष्टातील नमुन्यात एक ओळखपत्र-नि-मार्ग प्रवासपत्र (ज्याचा यापुढे या नियमांमध्ये 'ओळखपत्र' असा उल्लेख करण्यात आला आहे.) देण्यात येईल व त्यामुळे त्यास, एकतर एकट्याने किंवा आपल्या पत्नीसह/पतीसह किंवा सोबत्यासह संयुक्तपणे—

(अ) मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रम, मुंबई (ज्याचा यापुढे 'उपक्रम' असा उल्लेख करण्यात आला आहे.) च्या बसने, आणि

(ब) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित (ज्याचा यापुढे 'महामंडळ' असा उल्लेख करण्यात आला आहे) च्या बसने किंवा आरामगाडीने विनामूल्य प्रवास करण्याचा हक्क असेल.

२-अ. वगळण्यात आला.

३. नियम २ अन्वये ज्या सदस्याला ओळखपत्र दिले असेल त्या सदस्याला त्या ओळखपत्राच्या प्राधिकारावर महामंडळाची किंवा उपक्रमाची बस राज्याच्या ज्या कोणत्याही भागात चालविण्यात येत असेल त्या भागात कोणत्याही वेळी प्रवास करण्याचा हक्क असेल.

४. वगळण्यात आला.

५. वाहकाने किंवा त्याबाबतीत यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या यथास्थिती, उपक्रमाच्या किंवा महामंडळाच्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याने मागणी केल्यावर सदस्य आपले ओळखपत्र तपासणीसाठी हजर करील.

६. जेथे जेथे बसमध्ये एकाहून अधिक वर्गाच्या जागेची सोय असेल तेथे तेथे सदस्याला कोणत्याही वर्गाने प्रवास करता येईल.

७. सदस्य ज्या वर्गाने प्रवास करत असेल त्या वर्गातून अनुज्ञेय असेल तितके सामान विनामूल्य नेण्याचा हक्क असेल आणि कोणतेही अधिक सामान असल्यास त्यास संबंधित उपक्रमाने त्याबाबतीत विहित केलेल्या दराने पैसे भरावे लागतील.

---

* महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (मार्ग व परिवहन सेवेद्वारा विनामूल्य प्रवास) (सुधारणा) नियम, २०४ अन्वये "किंवा सोबत्यासह" अशी सुधारणा करण्यात आली आहे.

८. या नियमान्वये दिलेले ओळखपत्र, त्याचा धारक, यथास्थिती, विधानपरिषदेचा, किंवा विधानसभेचा सदस्य असेपर्यंतच विधिग्राह्य असेल आणि धारकाने ते ओळखपत्र तो, यथास्थिती, विधानपरिषदेचा किंवा विधानसभेचा सदस्य असण्याचे बंद झाल्यावर लवकरात लवकर, सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांच्याकडे परत केले पाहिजे.

९. जेव्हा सदस्याचे ओळखपत्र हरवले असेल तेव्हा त्याने ते हरवल्याबाबत तात्काळ महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाला कळवले पाहिजे. असे प्रतिवृत्त मिळाल्यावर आणि त्याच्या तारखेपासून एक महिना संपल्यानंतर त्या सदस्याने १ रुपया दिल्यावर त्यास नवीन ओळखपत्र देता येईल. ओळखपत्र नंतर सापडल्यास ते ताबडतोब महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाला परत करण्यात आले पाहिजे.

**माजी आमदार/खासदार यांच्या वाहनांना पथकर शुल्कातून सूट.**

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण २०११/प्र. क्र. ९३/रस्ते-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ५ मार्च २०१२.

**वाचा.—** शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक खाक्षेस-२००८/ प्र.क्र. १२२/रस्ते-९, दिनांक ३० जुलै २००९.

**प्रस्तावना :**

पथकरविषयक धोरणाबाबत दिनांक ३० जुलै २००९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून त्यात पथकराच्या धोरणाबाबत शासनाने विविध बाबींबाबत निर्णय घेतलेले आहेत. सदर पथवकरविषयक धोरणामध्ये आजी आमदार/खासदार प्रवास करीत असलेल्या वाहनांना पथकर शुल्कातून सूट आहे. त्याचप्रमाणे माजी आमदार/खासदार यांच्या वाहनांना पथकर शुल्कातून सूट देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरून पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय :**

महाराष्ट्रातील माजी आमदार/खासदार प्रवास करीत असलेल्या वाहनांना पथकर शुल्कातून सूट देण्यात यावी. सदर शासन निर्णय दिनांक ६ मार्च २०१२ पासून अंमलात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१२०३०५०७५२२३३२३००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**म. न. डेकाटे,**
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

**परिशिष्ट**

(पहा नियम २)

**ओळखपत्र-नि-मार्ग प्रवासपत्र**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित, मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रम, मुंबई.

महाराष्ट्र विधानसभेच्या/विधानपरिषदेच्या सदस्यांचे ओळखपत्र-नि-मार्ग प्रवासपत्र.

नाव : अहस्तांतरणीय,

पत्ता :

विधानसभा/विधानपरिषद सदस्य.

अनुक्रमांक :

छायाचित्र :

सदस्याने एकट्याने/सदस्याने आपल्या पत्नीसह/पतीसह किंवा सोबत्यासह संयुक्तपणे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसने किंवा आराम बसने/महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या बसने किंवा आराम बसने/मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या बसने विनामूल्य प्रवास करण्यास उपयोगी.

महिला सदस्यांच्या बाबतीत पतीऐवजी तिचा मुलगा, मुलगी, वडील, आई, भाऊ किंवा बहिण किंवा सोबती यांच्यासाठी देखील उपलब्ध होईल.

सचिव,
महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद,

दिनांक : सदस्याची स्वाक्षरी.

---

(१) हे ओळखपत्र ज्यास देण्यात आले असेल, तो सदस्य ते सुरक्षित ठेवण्यास जबाबदार राहील.

(२) ओळखपत्र हरवल्यास त्याबाबत सचिव, महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद यास तसे ताबडतोब कळवावे.

(३) सदस्यत्व समाप्त झाल्यावर हे ओळखपत्र परत करावे.

(४) हे ओळखपत्र, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे पगार व भत्ते अधिनियम, १९५६ (१९५६ चा मुंबई ४९) याच्या कलम ५-अ चे उपबंध आणि उक्त अधिनियमाच्या कलम ८ अन्वये केलेले नियम यांच्या अधीन राहून देण्यात आले आहे.

(५) हे ओळखपत्र प्रवासाचे तिकीट म्हणून समजण्यात यावे आणि ते, तिकिटास लागू असलेले नियम व अटी यांच्या अधीन असेल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० जानेवारी २००४.

क्रमांक २१०५/ह.—महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६ (सन १९५६ चा मुंबई ४९) याच्या कलम ८, पोट-कलम (१), खंड (अ) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या संयुक्त समितीने "महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (मार्ग परिवहन सेवेद्वारा विनामूल्य प्रवास) नियम, १९६१" यात आणखी सुधारणा करण्याकरिता उक्त कलम ८, पोट-कलम (१) व पोट-कलम (२) च्या खंड (ड) अन्वये तिला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून व राज्य शासनाशी विचारविनिमय करून तिने तयार केलेले व उक्त कलम ८, पोट-कलम (१), खंड (ई) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे ज्यांना महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सभापतींनी आणि महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षांनी संमती देऊन पुष्टी दिलेली आहे असे पुढील नियम सर्वसाधारण माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहेत :—

**नियम**

**१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.**—(१) या नियमांना महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (मार्ग परिवहन सेवेद्वारा विनामूल्य प्रवास) (सुधारणा) नियम, २००४ असे म्हणता येईल.

(२) ते दिनांक ८ जानेवारी २००१ रोजी अंमलात आले असल्याचे मानण्यात येईल.

**२. नियम २ ची सुधारणा.**—महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (मार्ग परिवहन सेवेद्वारा विनामूल्य प्रवास) नियम, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य नियम " म्हणून करण्यात आला आहे) यातील नियम २ मध्ये " पत्नीसह/पतीसह " या मजकुरानंतर "किंवा सोबत्यासह" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**३. परिशिष्टातील सुधारणा.**—मुख्य नियमासोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये,—

(अ) आपल्या " पत्नीसह/पतीसह " या मजकुरानंतर " किंवा सोबत्यासह " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

(ब) " बहिण " या मजकुरानंतर " किंवा सोबती " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

**विलास पाटील,**

प्रधान सचिव,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

## ४. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (रेल्वेने विनामूल्य प्रवास) नियम, १९६५

**१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.**—(१) या नियमांना महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (रेल्वेने विनामूल्य प्रवास) नियम, १९६५ असे म्हणता येईल.

(२) हे नियम अधिनियमाच्या कलम ५-अक अन्वये अधिसूचित केलेल्या तारखेस अंमलात येतील.

**२. व्याख्या.**—या नियमास, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर—

(अ) " अधिनियम " म्हणजे, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम (सन १९५६ चा मुंबई ४९);

(ब) " कुपन पुस्तक " म्हणजे, या नियमान्वये सदस्याला दिलेले रेल्वे प्रवास कुपन पुस्तक;

(क) " सदस्य " म्हणजे, यथास्थिति, महाराष्ट्र विधानसभेचा किंवा महाराष्ट्र विधानपरिषदेचा सदस्य;

(ड) " सचिव " म्हणजे, सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**३. सदस्यांना कुपन पुस्तके पुरविणे.**—(१) अधिनियमाचे कलम ५-अक आणि हे नियम, यांच्या उपबंधास अधीन राहून, प्रत्येक सदस्याला सचिवाकडून पुढील गोष्टी पुरवण्यात येतील :—

(अ) प्रत्येकी रुपये ५,००० एवढे मूल्य असणाऱ्या तीन कुपन पुस्तकांचा एक संच, यामुळे त्याला महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागात कोणत्याही रेल्वेने पहिल्या वर्गाचे किंवा यथास्थिती वातानुकुलित टू-टियरने किंवा थ्री-टियरने एकट्याने प्रवास करण्याचा हक्क प्राप्त होईल, आणि

(ब) प्रत्येकी रुपये ५,००० एवढे मूल्य असणाऱ्या तीन कुपन पुस्तकांचा एक संच, यामुळे त्याला महाराष्ट्र राज्याच्या बाहेर एकट्याने आणि सदस्याची पत्नी/तिचा पती आणि अज्ञान मुले किंवा सोबती यांना सदस्यांबरोबर महाराष्ट्र राज्यात किंवा महाराष्ट्र राज्याबाहेर प्रवास करण्याचा हक्क प्राप्त होईल; तथापि, या कुपन पुस्तक संचावर केलेला एकूण प्रवास एका वित्तीय वर्षात तीस हजार किलोमीटरपेक्षा अधिक होता कामा नये :

परंतु, तिकिटाचे भाडे देणे आरक्षण शुल्क देणे, अति जलद गाड्यांसाठी पूरक आकार देणे आणि झोपण्याच्या जागेसाठी शायिकांचा जादा आकार भरणे याकरिता केवळ स्थानकाच्या खिडकीवरच ही कुपने वापरता येतील :

आणखी असे की, प्रवास मार्गावर असताना यथास्थिती अशा जादा आकाराचे किंवा आरक्षण आकाराचे रोख प्रदान केल्याबद्दलची पावती प्रस्तुत केल्यानंतर सचिव, सदस्याला उक्त-आकाराची प्रतिपूर्ती करील.

(२) जर सदस्याने राज्यामध्ये स्वतः रेल्वेने कोणताही प्रवास करताना, अशा प्रवासासाठी कुपने वापरण्यापेक्षा पहिल्या वर्गाचे सिझन तिकीट खरेदी करणे अधिक किफायतशीर आहे, आणि सचिवांची खात्री होईल तर अशा बाबतीत ती वरील नियम (१), परिच्छेद (अ) मध्ये उल्लेख केलेली कुपने, पहिल्या वर्गाच्या अशा सिझन तिकिटाच्या खरेदीसाठी वापरण्यात परवानगी देऊ शकेल.

**४. कुपन पुस्तकांचा पुरवठा करण्यासाठी मागणी.—**(१) जेव्हा जेव्हा आवश्यकता असेल तेव्हा तेव्हा सचिव या नियमान्वये व तद्‌नुसार सदस्यांच्या उपयोगासाठी कुपन पुस्तकांचा पुरवठा करण्यासाठी महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई यांच्याकडे मागणी करील.

(२) अशी मागणी आल्यावर, कोणत्याही भारतीय रेल्वेने भारतातील कोणत्याही भागात, मग तो भाग महाराष्ट्र राज्यात असो किंवा यथास्थिती राज्याबाहेर असो, प्रवास करण्यासाठी टू-टियरसाठी वापरता येतील अशा, नियम ३ मध्ये निर्देश केलेल्या, प्रथम वर्गाच्या कुपन पुस्तकांच्या संचाचा महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई पुरवठा करील आणि आवश्यक तेवढी रक्कम महाराष्ट्र राज्य शासनाच्या नावे खर्ची टाकील.

**५. रेल्वे प्रवास कुपन पुस्तकांचे पैशांच्या स्वरूपातील मूल्य.—**(१) रेल्वे प्रवास कुपने पुस्तक रुपाने उपलब्ध असतील. प्रत्येक पुस्तकात रुपये ५,००० एवढे पैशांच्या स्वरूपातील मूल्य असणारी कुपने असतील. कुपनाची किंमत सचिव, विधानमंडळ सचिवालय यांना रेल्वे प्राधिकाऱ्यांशी विचारविनिमय केल्यानंतर योग्य वाटेल अशी असेल.

(२) प्रत्येक कुपन पुस्तकावर पुस्तक क्रमांक असेल आणि त्यातील प्रत्येक कुपनावर पुस्तक क्रमांक व अनुक्रमाने कुपन क्रमांक असेल.

**६. कुपन पुस्तकाची किंमत.—**वगळण्यात आला.

**७. कुपन पुस्तकावरील प्रमाणपत्र.—**प्रत्येक कुपन पुस्तकावर सचिव, पुढीलपैकी योग्य असे एक प्रमाणपत्र लावील.

**एक**

(सदस्य स्वतः रेल्वेने राज्यामध्ये प्रवास करील तेव्हा त्याने वापरावयाचे)

मी, याद्वारे प्रमाणित करतो की, श्री./श्रीमती/कुमारी हे/ह्या महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद सदस्य असून महाराष्ट्र राज्यात ते/त्या करणार असलेल्या प्रवासाबद्दल त्यांना रेल्वे कुपने घेऊन तिकिटे देण्यास हरकत नाही.

मुद्रा

सचिव,

दिनांक

महाराष्ट्र विधानमंडळ.

**दोन**

(सदस्य एकट्याने महाराष्ट्र राज्याबाहेर रेल्वेने प्रवास करील तेव्हा आणि सदस्याबरोबर त्याची पत्नी/तिचा पती व अज्ञान मुले, सोबती किंवा महाराष्ट्र राज्यात किंवा राज्याबाहेर प्रवास करतील तेव्हा वापरावयाचे).

मी, याद्वारे प्रमाणित करतो की, श्री. /श्रीमती/कुमारी .............................................................. हे/ह्या महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद सदस्य आहेत आणि (ब) राज्याबाहेर सदस्य एकट्याने करणार असलेल्या प्रवासाबद्दल, किंवा (ब) सदस्याबरोबर संयुक्तपणे त्यांची पत्नी/त्यांचा पती व अज्ञान मुले किंवा सोबती महाराष्ट्र राज्यात किंवा राज्याबाहेर करणार असलेल्या प्रवासाबद्दल त्यांना रेल्वे प्रवास कुपने घेऊन तिकिटे देण्यास हरकत नाही.

**टीप**.—महिला सदस्याच्या बाबतीत, पतीच्या ऐवजी पुढीलपैकी कोणाही एकालादेखील तिकीट देता येईलः—

त्यांचा मुलगा, मुलगी, त्यांचे वडील, त्यांची आई, भाऊ किंवा बहीण किंवा सोबती त्यांच्याबरोबर असताना.

(मुद्रा)

सचिव,

दिनांक महाराष्ट्र विधानमंडळ.

८. **कुपन पुस्तक देण्यापूर्वी करावयाच्या आवश्यक गोष्टी.**—(१) सचिवाने सदस्यास कुपन पुस्तक देण्यापूर्वी, ज्या सदस्याला ते द्यावयाचे असेल त्याचे नाव त्या कुपन पुस्तकात लिहिले पाहिजे.

(२) असे कोणतेही कुपन पुस्तक देण्यापूर्वी, सचिव (अशा प्रत्येक पुस्तकाच्या मुखपृष्ठावर छापलेल्या) पुढीलपैकी योग्य अशा एका प्रतिज्ञापनावर सदस्याची रीतसर सही घेईलः—

**एक**

मी, श्री. /श्रीमती/कुमारी याद्वारे असे जाहीर करीत आहे की, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे पगार व भत्ते याबाबत अधिनियम, १९५६ (१९५६ चा मुंबई ४९) याच्या कलम ५-अक अन्वये आणि तद्न्वये केलेल्या नियमानुसार मला अनुज्ञेय असणाऱ्या महाराष्ट्र राज्यामध्ये करावयाच्या प्रवासासाठीच मी कुपनाचा वापर करीन.

दिनांक सदस्याची सही.

**दोन**

मी, श्री. /श्रीमती/कुमारी                                        याद्वारे जाहीर करीत आहे की, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे पगार व भत्ते याबाबत अधिनियम, १९५६ (१९५६ चा मुंबई ४९) याच्या कलम ५-अक (१) चे परंतुक याच्या तरतुदीनुसार आणि तद्न्वये केलेल्या नियमानुसार करावयाच्या प्रवासासाठीच मी कुपनांचा वापर करीन.

दिनांक                                        सदस्याची सही.

**९. एकावेळी वापरावयाच्या कुपन पुस्तकांची संख्या व त्यांची उपलब्धता.**—(१) नियम ३, पोट-कलम (१) च्या खंड (अ) अन्वये द्यावयाच्या कुपन पुस्तकांच्या पहिल्या संचाशिवाय कोणतीही नवीन कुपन पुस्तके सदस्याने सचिवाकडे या नियमांसोबतच्या अनुसूचीत विहित केलेल्या कोणत्याही योग्य अशा नमुन्यात, वापरलेल्या कुपनांचा हिशेब प्रस्तुत केल्याखेरीज आणि अशा सदस्याला पूर्वी दिलेल्या कुपन पुस्तकांत त्याने/तिने, वापर केलेला आहे, किंवा ती विधीग्राह्य मुदतीच्या शेवटच्या दिवशी किंवा तत्पूर्वी सचिवांकडे परत केली आहेत याबद्दल सचिवांची खात्री झाल्याखेरीज देण्यात येणार नाही :

परंतु, सदस्याकडून असा कोणताही हिशेब प्रस्तुत करण्यात आला नाही किंवा तो अशी पुस्तके गहाळ झाली असून असा हिशेब देण्यात आपण असमर्थ असल्याचे कळवील त्याबाबतीत, सचिव, सदस्याला देय असणाऱ्या प्रवास व दैनिक भत्त्यातून अशा कुपनांचे किंवा यथास्थिती कुपन पुस्तकांचे पैशाच्या स्वरूपातील मूल्य वसूल करील;

(२) सदस्यानी विधीग्राह्यतेचा कालावधी संपण्यापूर्वी न वापरलेली कोणतीही कुपने परत केली नाहीत तर, त्याचे मूल्य, सदस्याला देय असणाऱ्या प्रवास व दैनिक भत्त्यातून सचिवांमार्फत वसूल केले जाईल :

परंतु, उपरोक्तप्रमाणे एखाद्या सदस्याकडून न वापरलेल्या कुपनांचे मूल्य वसूल करणे शक्य नव्हते असे सचिवांचे मत झाले असेल तर तो सदस्य दोन्ही सभागृहांपैकी कोणत्याही सभागृहाचा सदस्य असण्याचे बंद झाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यामार्फत ते मूल्य जमीन महसुलाची थकबाकी म्हणून त्याच्याकडून वसूल केले जाईल ;

(३) या अधिनियमाच्या कलम ५-अक मध्ये नमूद केलेल्या प्रवासासाठी, कुपन पुस्तकावर ज्या सदस्याचे नाव विनिर्दिष्ट करण्यात आलेले असेल, त्याच सदस्यास ते कुपन पुस्तक वापरण्याकरिता उपलब्ध राहील ;

(४) या नियमाखाली देण्यात आलेली कुपन पुस्तके, रेल्वेने ज्या तारखेस ती सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचेकडे निर्गमित केली असतील त्या तारखेपासून ३ वर्षांच्या कालावधीकरिता विधीग्राह्य असतील व अशी तारीख कुपन पुस्तकांवर नमूद करण्यात येईल.

**१०. कुपन पुस्तके व कुपन हस्तांतरणीय नसणे.**—(१) या नियमान्वये दिलेली कुपन पुस्तके व त्यामधील कुपने अहस्तांतरणीय असतील आणि ती ज्यांच्या नावाने दिलेली असतील त्यांच्याच प्रवासासाठी त्यांचा उपयोग केला जाईल ;

(२) कोणतीही व्यक्ती सदस्य असण्याचे बंद झाल्यास कुपन पुस्तक सचिवाला परत करण्यात येईल.

**११. कुपने देऊन तिकिटे विकत घेण्याची पद्धत.**—(१) एकतर एकट्याने किंवा पत्नीसह/पतीसह किंवा पत्नीसह/पतीसह व अज्ञान मुलांसह संयुक्तपणे प्रवास करण्याची इच्छा असणारा कोणताही सदस्य, कुपन पुस्तकातून कोणतेही कुपन फाडून न घेता ते कुपन पुस्तक तिकीट लिपिकाकडे हजर करीत. सुटी कुपने, म्हणजे, कुपन पुस्तकातून फाडून घेतलेली कुपने कोणत्याही परिस्थितीत स्वीकारली जाणार नाहीत ;

(२) तिकीट लिपिक प्रवासासाठी आवश्यक तितकी कुपने जातीने कुपन पुस्तकातून काढून घेईल. कुपने काढून घेण्यापूर्वी तिकीट लिपिक हा कुपन पुस्तकधारकाला आपले ओळखपत्र दाखवण्यास आणि त्याची सही कुपन पुस्तकातील सहीशी ताडून पाहण्यासाठी एका कागदाच्या तुकड्यावर त्यास सही करण्यास सांगू शकेल. प्रत्यक्षात जितकी कुपने आवश्यक असतील त्यापेक्षा अधिक कुपने कुपन लिपिकाने पुस्तकातून काढून घेतल्यास 'चुकीने काढून घेतलेली', यासारखा योग्य तो शेरा त्याने अशा काढून घेतलेल्या कुपनांच्या मागच्या बाजूवर लिहावा. असा शेरा मारलेली सुटी कुपने जेव्हा तिकीट देण्यासाठी हजर करण्यात येतील तेव्हा ती स्वीकारण्यात येतील, मात्र, ज्या कुपन पुस्तकातून ती तिकिटे काढून घेण्यात आली ते कुपन पुस्तक हजर केले पाहिजे ;

(३) तिकिटांवर छापलेले भाडे खोडून टाकल्यावर आणि तिकिटांच्या किंवा पहिल्या वर्गाचे सिझन तिकिटांच्या मागील बाजूस "केवळ सदस्यांसाठी रेल्वे प्रवास कुपने" असे लाल शाईने लिहिल्यानंतर तिकीट लिपिक कुपनाच्या किंवा कुपनांच्या बदली आवश्यक असेल ते एकेरी प्रवास तिकीट किंवा पहिल्या वर्गाचे सिझन तिकीट देईल.

**स्पष्टीकरण.**—तिकिटे देण्यासाठी एकाच सदस्याच्या नावाने दिलेल्या दोन वेगवेगळ्या कुपन पुस्तकांतून रेल्वे प्रवास कुपन हजर केल्यास तिकीट किंवा पहिल्या वर्गाचे सीझन तिकीट, लिपिक ती कुपने या नियमाच्या उपबंधांच्या अधीन, स्वीकारील.

**१२. सदस्यांची ओळख.**—एखादा सदस्य, त्याला नियम ११ अन्वये दिलेल्या तिकिटावर प्रवास करील तेव्हा तो सचिवाने यथोचितरित्या साक्षांकित केलेले आपले छायाचित्र असलेले ओळखपत्र आपल्याजवळ ठेवील आणि रेल्वे प्राधिकाऱ्यांनी मागणी केल्यावर ते हजर करील.

**१३. रेल्वे प्रवास कुपनावर दिलेल्या तिकिटांची उपलब्धता.**—तिकीट ज्या तारखेस दिले असेल ती तारीख लक्षात घेता तिकिटांच्या उपलब्धतेचा कालावधी हा सर्वसाधारण तिकीट ज्या कालावधीसाठी उपलब्ध असतील तोच असेल.

**१४. यात्रेकरू व सीमा कर (टर्मिनल टॅक्स).**—ज्या ठिकाणी यात्रेकरू किंवा सीमा कर आकारण्यात येतो त्या ठिकाणी जाण्यासाठी किंवा त्या ठिकाणाहून परतीच्या प्रवासासाठी रेल्वे प्रवास कुपनाच्या बदली तिकीट देताना कुपन हजर करणाऱ्या व्यक्तीकडून यात्रेकरू किंवा सीमा कर रोख वसूल करण्यात येईल. याप्रमाणे वसूल केलेली कराची रक्कम तिकिटांवर नमूद करण्यात येईल.

**१५. सामान.—**पहिल्या वर्गाच्या सर्वसाधारण तिकिटांवर जितके सामान घेणे अनुज्ञेय आहे तितके सामान विनामूल्य नेण्याचा सदस्यास हक्क असेल, आणि अधिक सामान असेल तर, संबंधित रेल्वे प्रशासनाने विहित केलेल्या सामानाच्या दराने सदस्य रोख पैसे भरील.

**१६. बदली न केलेली कुपने.—**कोणताही सदस्य बदली न केलेल्या रेल्वे प्रवास कुपनांवर प्रवास करत असल्याचे आढळून आल्यास, तो बिनातिकीट प्रवास करत आहे असे समजण्यात येईल आणि तो विहित केलेल्या शिस्तीस पात्र राहील, अशा बाबतीत असा सदस्य भाडे अतिरिक्त आकार रोख भरील.

**१७. कुपनांचा वापर.—**महाराष्ट्र राज्यात किंवा यथास्थिती राज्याबाहेरील प्रवास करण्यासाठी तिकिटघराच्या ठिकाणी रेल्वे प्रवास कुपनांच्या बदली प्रवासी तिकिटे घेण्याखेरीज अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी अशी कोणतीही कुपने वापरली जाणार नाहीत, आणि सामान आकारण्यासारखे अन्य कोणतेही आकार देण्यासाठी रेल्वे प्रशासन अशी कुपने कोणत्याही परिस्थितीत स्वीकारणार नाही.

**१८. कुपनांची जप्ती.—**ज्या शर्तीवर कुपन पुस्तक देण्यात आले असेल त्या शर्ती पाळण्यात आल्या नाहीत असे सिद्ध झाल्यावर रेल्वे प्रशासनात असे कुपन पुस्तक जप्त करता येईल. असे करण्यापूर्वी, रेल्वे प्रशासनाने ती बाब सचिवाकडे विचारार्थ पाठवून अशा जप्तीसाठी त्याची संमती मिळवावी. अशा जप्तीनंतर, सचिवास कुपन पुस्तिकांची किंमत परत करण्यासाठी येईल.

**१९. परतावा.—**(१) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांनी, संबंधित रेल्वे प्रशासनाला परत केलेल्या न वापरलेल्या रेल्वे कुपनांवरील परतावा हा, या न वापरलेल्या कुपनांच्या मूल्यांच्या १० टक्के रक्कम वजा केल्यानंतर देण्यात येईल. मात्र अशी कुपने त्यांचा विधिग्राह्यतेचा कालावधी संपल्यानंतर एक महिन्याच्या आत रेल्वेला परत करण्यात आली पाहिजेत ;

(२) रेल्वे नियमांच्या अधीन राहून, न वापरलेल्या किंवा अंशतः वापरलेल तिकीट रेल्वे प्रशासनाकडे सादर केल्यानंतर, त्यावर परतावा अनुज्ञेय असेल. सर्व बाबतीत सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांनाच परतावा देण्यात येईल. कोणत्याही सदस्याला स्वतंत्रपणे परतावा दिला जाणार नाही.

**२०. नियम १० ते १९ कुपन पुस्तकांवर छापणे.—**नियम १० ते १९, दोन्ही धरून, याचे उपबंध प्रत्येक कुपन पुस्तकावर सविस्तर छापण्यात येतील.

# अनुसूची

## नमुना एक

(नियम ९ पहा)

(सदस्याने राज्यामध्ये रेल्वेने करावयाच्या प्रवासासाठी कुपनांचा उपयोग करण्याकरिता)

**सदस्याचे नाव :**

**पुस्तक क्रमांक :**

| प्रवासाचा दिनांक | स्थानक पासून | स्थानक पर्यंत | पैशाच्या स्वरूपातील मूल्य | कुपनांचे अंतर किलोमीटरमध्ये |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | | |

दिनांक सदस्याची सही.

## नमुना दोन

(नियम ९ पहा)

(सदस्याने राज्याबाहेर एकट्याने आणि राज्यामध्ये किंवा राज्याबाहेर पत्नीसह/पतीसह आणि अज्ञान मुलांसह किंवा सोबत्यासह संयुक्तपणे रेल्वेने करावयाच्या प्रवासासाठी कुपनांचा वापर करण्याकरिता).

**व्यक्तीचे नाव :**

**सदस्य आणि त्याच्या सोबतच्या व्यक्तींची नावे :**

**पुस्तक क्रमांक :**

| प्रवासाचा दिनांक | स्थानक पासून | स्थानक पर्यंत | कुपनांचे पैशाच्या स्वरूपातील मूल्य | अंतर किलोमीटरमध्ये |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | | |

दिनांक सदस्याची सही.

**भारत सरकार**

**रेल्वे मंत्रालय**

(रेल्वे मंडळ)

नवी दिल्ली,
दिनांक १५ मार्च १९८२.

क्रमांक टी. सी.-दोन/२२५६/७९/१,
प्रधान सचिव, आय. आर. सी. अे.
नवी दिल्ली.

**विषय.**—महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांना रेल्वे प्रवास कुपनांचा पुरवठा-आयआरसीअे कोचींग टेरीफ क्र. २२ मधील नियम २५०, भाग एक (खंड १).

सदस्यांना रेल्वेने विनामूल्य प्रवासविषयक नियमांच्या संबंधात महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियमात सुधारणा करणाऱ्या **राजपत्रात** प्रसिद्ध झालेल्या अधिसूचनेतील उताऱ्याची प्रत सोबत पाठविण्यात येत आहे. आयआरसीअे कोचींग टेरीफ क्र. २२ मधील नियम २५० चा भाग एक (खंड १) चे आवश्यक ते दुरुस्ती पत्र कृपया त्वरित निर्गमित करण्यात यावे.

महाराष्ट्र शासनाने असे सुचविले आहे की, राज्याबाहेरच्या प्रवासासाठी वापरावयाची पैशांच्या स्वरूपातील मूल्य असणारी कुपने सदस्याला त्याची पत्नी/तिचा पती आणि अज्ञान मुले यांच्या राज्यातील प्रवासाकरिता वापरण्याची परवानगी देण्यात यावी. रेल्वे मंत्रालयाने या सूचनेला समंती दिलेली असून ही सूचना उपरोक्त प्रवास भाड्या विषयीच्या नियम २५० मध्ये समाविष्ट करण्यात यावी अशी इच्छा व्यक्त केली आहे. सदस्य, राज्यातील त्यांच्या स्वतःच्या प्रवासाकरिता ‘ महाराष्ट्र राज्यात ’ वापरण्याकरिता असलेल्या कुपनांचाच उपयोग करणे चालू ठेवतील.

**नवीन मल्होत्रा,**
सहसंचालक, ट्रॅफिक कमर्शिअल (आर) दोन
रेल्वे मंडळ.

# विधानमंडळ सदस्यांना अनुज्ञेय वैद्यकीय सुविधांबाबतचे नियम आणि शासन निर्णय :—

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

# ५. महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१

(दिनांक १ सप्टेंबर १९८७ पर्यंत सुधारित)

## सार्वजनिक आरोग्य विभाग

सचिवालय, मुंबई, दिनांक ९ मे १९६१/वैशाख १९, १८८३

क्रमांक एमएजी. १०५८-एस– पुढील " महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ " सर्वसाधारण माहितीकरिता प्रसिद्ध करण्यात येत आहे.

## महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१

(दिनांक १ सप्टेंबर १९८७ पर्यंत सुधारित)

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ**.—(१) या नियमांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ असे म्हणता येईल.

(२) ते संपूर्ण महाराष्ट्र राज्यात लागू होतील.

(३) ते (१) जून १९६१ पासून अंमलात येतील.

त्या तारखेपासून, महाराष्ट्र राज्याच्या शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असणारे, भूतपूर्व मुंबई राज्य, मध्य प्रदेश राज्य व हैदराबाद राज्य यांचे शासकीय कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय देखभालीसबंधीचे नियम व आदेश निरसित होतील.

२. **व्याख्या**.—या नियमामध्ये विषयानुसार किंवा संदर्भानुसार एतद्विरुद्ध काहीही नसेल तर.—

(१) " रुग्ण " म्हणजे, शासकीय कर्मचारी किंवा त्याच्या कुटुंबातील कोणतीही व्यक्ती ;

(२) " शासकीय कर्मचारी " म्हणजे रोजंदारीवर नेमलेला कर्मचारीवर्ग वगळता, महाराष्ट्र शासनाने पूर्णवेळ तत्त्वावर नेमलेली कोणतीही व्यक्ती, मग ती कायम असो किंवा तात्पुरती असो आणि त्यामध्ये—

(अ) रजेवर असलेला किंवा निलंबित केलेला (Under Suspension) शासकीय कर्मचारी; आणि ;

(ब) कोणत्याही शासकीय रुग्णालयातील मानसेवी वैद्यकीय अधिकारी ;

(क) एक वर्षापेक्षा कमी नसलेली सेवा झालेले व मासिक दराने वेतन घेणारे कार्यव्ययी आस्थापनेवर (Work charged Establishment) नेमलेले कर्मचारी यांचा समावेश होतो. नि. स. आ. एचजी. क्रमांक ०६२/५८०७४ दिनांक ४ जानेवारी १९६९.

(३) " कुटुंब " म्हणजे,—

(एक) शासकीय कर्मचाऱ्याची पत्नी किंवा पती ;

(दोन) शासकीय कर्मचाऱ्यावर अवलंबून असतील अशी शासकीय कर्मचाऱ्याची औरस मुले ; सावत्र मुले व कायदेशीर दत्तक घेतलेली मुले ;

शा.नि.न.वि. व सा.आ.वि. क्र. एमएजी. १०६५/८४५३४/पी. दिनांक ९-४-६९ व शा.नि. सा.आ.वि. क्र. एमएजी. १२७३/६१३७३/एमईडी. ६, दिनांक २७-९-७३.

(तीन) शासकीय कर्मचाऱ्यावर पुर्णपणे अवलंबून असलेले शासकीय कर्मचाऱ्याचे आईवडील;

**टीप.—**महिला शासकीय कर्मचाऱ्याला तिच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या आणि तिच्या बरोबर राहत असलेल्या आई-वडिलांची किंवा तिच्या सासू-सासऱ्यांची निवड करता येईल.

(चार) शासकीय कर्मचाऱ्यावर पूर्णपणे अवलंबून असलेला १८ वयाखालील अविवाहित भाऊ ;

(पाच) शासकीय कर्मचाऱ्यांवर पूर्णपणे अवलंबून असलेल्या अविवाहित बहिणी व घटस्फोटीत बहिणी (वय लक्षात न घेता) ;

शा.नि.न.वि. व सा.आ.वि. क्र. एमएजी. १०६९-६५०२३/पी., दिनांक २१-१२-७०.

(सहा) महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ खाली, प्रतिपूर्ती करण्यासाठी अंशकालिक तत्त्वावरील नोकरी व्यतिरिक्त अन्य नोकरीस असलेली शासकीय कर्मचाऱ्याची मुले आणि अविवाहित मुलीही लाभदायक नोकरीत असल्याचे समजण्यात येईल. आणि ती त्याच्यावर अवलंबून असल्याचे मानण्यात येणार नाही.

शा.नि.न.वि. व सा.आ.वि. क्र. एमएजी. १२७३/६१३७३-६, दिनांक २७-९-७५.

(सात) निवृत्तिवेतन घेत असलेले शासकीय कर्मचाऱ्यांचे आईवडील तसेच घटस्फोटीत बहीण हे त्यांचे कमाल उत्पन्न दरमहा रुपये २५० असेल या अटीस अधीन राहून शासकीय कर्मचाऱ्यावर अवलंबून असल्याचे समजण्यात येईल.

शा.नि.न.वि. सा.आ.वि. क्र. एमएजी. १०७६/१०७-पीएच-९, दिनांक ३०-१०-७६ व शा.नि. न.वि. व सा.आ.वि. क्र. एमएजी ११७०/२५७१०, दिनांक.

(आठ) यथास्थिती शासकीय कर्मचाऱ्याचा पती किंवा पत्नी वैद्यकीय भत्ता देण्याऱ्या किंवा वैद्यकीय सुविधा पुरविणाऱ्या राज्य शासन, रेल्वे, संरक्षण, शासनाच्या मालकीची संघटना किंवा खाजगी संघटना यांमध्ये काम करीत असेल तर त्याला/तिला " महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ " अन्वये सवलतींचा लाभ घेण्याचा किंवा तो/ती काम करीत असलेल्या संघटनेने ठरविलेल्या सवलतींचा लाभ घेण्याचा हक्क असेल.

(४) " प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी (Authorised Medical Attendant) " म्हणजे—

(अ) ज्याचे वेतन दरमहा रु. ५०० पेक्षा कमी नाही अशा शासकीय कर्मचाऱ्याच्या, त्याचप्रमाणे मुंबईतील इतर कोणत्याही **राजपत्रित** अधिकाऱ्यांच्या बाबतीत, मुंबईतील शासकीय रुग्णालयांचा

अधीक्षक किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेला इतर कोणताही अधिकारी आणि मुफसल क्षेत्रात. जिल्हा शल्यचिकित्सक किंवा यथास्थिती जिल्हा वैद्यकीय अधिकारी किंवा याबाबतीत त्यांनी प्राधिकृत केलेला इतर कोणताही अधिकारी.

(ब) ज्या अराजपत्रित शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा रु. १५० पेक्षा जास्त परंतु दरमहा रु. ५०० पेक्षा कमी असेल अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्या ठिकाणचा किंवा जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणचा महाराष्ट्र वैद्यकीय सेवा वर्ग दोनचा अधिकारी.

(क) ज्या शासकीय कर्मचाऱ्याचे वेतन दरमहा रु. १५० किंवा कमी असेल त्यांच्या बाबतीत, महाराष्ट्र वैद्यकीय सेवा वर्ग तीन किंवा महाराष्ट्र वैद्यकीय सेवा वर्ग तीन (अ) मधील त्या ठिकाणचा किंवा त्यांच्या जवळपासच्या ठिकाणचा अधिकारी.

**टीप १**.— ज्या ठिकाणी महाराष्ट्र वैद्यकीय सेवा वर्ग दोन किंवा वर्ग ३, वर्ग तीन (अ) मध्ये दोन किंवा अधिक अधिकारी असतील त्या ठिकाणी त्या अधिकाऱ्यांपैकी वरिष्ठतम अधिकारी हा पोट-नियम (४) च्या खंड (ब) आणि (क) च्या प्रयोजनासाठी प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी असेल.

**टीप २**.— ज्या ठिकाणी वरील तीन प्रवर्गापैकी कोणत्याही प्रवर्गाचा एकच प्राधिकृत वैद्यकीय अधिकारी असेल त्या ठिकाणी वैद्यकीय देखभाल व उपचार याची गरज असणाऱ्या कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यासाठी तो सक्षम प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी असेल.

**टीप ३**.— कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याचा प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी हा, महाराष्ट्र राज्यामध्ये ज्या ठिकाणी तो कर्मचारी किंवा त्याच्या कुटुंबातील व्यक्ती आजारी पडेल त्या ठिकाणच्या संदर्भात ठरवण्यात येईल-ते ठिकाण त्याला नोकरीवर पाठवल्याचे ठिकाण असो, त्याचे तात्पुरते राहण्याचे ठिकाण असो किंवा तेथे तो रजा घालवत असेल असे ठिकाण असो.

(५) " शासकीय रुग्णालय " म्हणजे संपूर्णपणे शासनाच्या नियंत्रणाखाली असणारे शासकीय रुग्णालय/दवाखाना/प्रसूतीगृह/प्राथमिक आरोग्य केंद्र, वैद्यक व्यवसायीचे अर्थसहाय्यित केंद्र आणि राज्य मदत देत असलेले कोणतेही रुग्णालय/ दवाखाना/ प्रसूतीगृह आणि नगरपालिकेची आणि जिल्हा परिषदेची रुग्णालये/दवाखाने आणि त्यामध्ये, ज्या बाबतीत पूर्वोक्तपैकी कोणतीही संस्था उपलब्ध नसेल त्याबाबतीत कोणत्याही लष्करी रुग्णालयाचा समावेश होतो. शा. नि. न.वि. सा. आ. वि. एमएजी. १०६३/ ५९३७८/एस, दि. २१-६-६८.

**टीप १**.—सामान्यतः शासकीय कर्मचाऱ्याने आणि त्यांच्या कुटुंबियाने शासकीय रुग्णालयातून उपचार घ्यावेत. वरील नियमान्वये मान्यताप्राप्त असलेल्या अशासकीय रुग्णालयामध्ये/दवाखान्यामध्ये, उपचार करून घेण्यापूर्वी गंभीर प्रकरणे वगळता, शासकीय कर्मचाऱ्यांनी न चुकता त्यांच्या प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्यांचा सल्ला घ्यावा. शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. एमएजी. १०८१/४९०७/पीएच-९ए, दिनांक १९ ऑक्टोबर १९८३, १९ ऑक्टोबर १९८४ यामध्ये नमूद केलेल्या १८ आजारांखेरीज एखाद्या गंभीर आजाराच्या बाबतीत जर त्यांना एखाद्या अशासकीय रुग्णालये/दवाखाना इत्यादीमध्ये दाखल व्हावयाचे झाल्यास तसे त्यांच्या प्राधिकृत देखभाल अधिकाऱ्यास ताबडतोब कळविले पाहिजे. शा.नि. न.वि. सा.आ.वि. एमएजी. १०६२ एस, दि. १२-९-६२. व शा.नि. सा. वि. क्र. एमएजी १०८१/४९०७/ पीएच-९, दि १९-१०-८३. १९-१०-८४

**टीप २**.—खाली नमूद केलेल्या आजारांसाठी त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या संस्थाना मान्यता देण्यात आली आहे:—

| अ. क्र. | आजाराचे नाव | प्राधिकृत संस्थेचे नाव | आदेश क्रमांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | लहान मुलांचे आजार | बाई जेरबाई वाडीया रुग्णालय, मुंबई | एमएजी १०६५/१७९१४/एस, दिनांक २४ मे १९६६. |
| २ | कर्करोग | १ टाटा मेमोरीयल रुग्णालय, मुंबई | एमएजी. १०७१/७८२०/पी., दिनांक २५ ऑगस्ट १९७१. |
| | | २ बालाभाई नानावटी रुग्णालय, मुंबई | एमएजी १०८६/४९०७/आ.९, दिनांक १ सप्टेंबर १९८७. |
| | | ३ कॅन्सर रिलीफ सोसायटी, नागपूर | |
| | | ४ अश्विनी रुरल कॅन्सर रिसर्च ॲण्ड रिलीफ सोसायटी, बार्शी | |
| | | ५ श्री. सिद्धेश्वर कॅन्सर हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सोसायटी, सोलापूर | |
| | | ६ इंडियन कॅन्सर सोसायटीच्या महाराष्ट्रातील सर्व संस्था. | |
| | | ७ कॅन्सर इन्स्टिटयूट, अड्यार मद्रास. | |
| ३ | ऑर्थोपेडीक उपचार | ऑर्थोपेडीक हॉस्पिटल, महालक्ष्मी, मुंबई | एमएजी. १०७१/७८२०/पी, दिनांक २५ ऑगस्ट १९७१. |
| | | ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ फिजीकल मेडिसीन ॲण्ड रिहॅबिलिटेशन महालक्ष्मी, मुंबई | एमएजी १०८१/२९१६/आ. ९. दिनांक ५ जुलै १९८५. |
| ४ | मधुमेह | रहेजा रुग्णालय, मुंबई | एमएजी १०८१/२९१६/आ. ९, दिनांक ४ फेब्रुवारी १९८६. |
| ५ | मणक्याचे विकार, खुब्याचे विकार, वेदनायुक्त सांध्याचे विकार व ते बदलण्याची शस्त्रक्रिया, दुर्बिणीद्वारे गुडघ्याच्या विकाराचे निदान व उपचार. | संचेती इन्स्टिट्यूट फॉर ऑर्थोपेडीक रिहॅबिलिटेशन, पुणे | एमएजी १०८६/१५६४/आ. ९, दिनांक १५ जुलै १९८६. |
| ६ | (अ) हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया (Bye-Pass | सदर्न रेल्वेज, हेडक्वार्टर्स हॉस्पिटल, पेराम्बूर, मद्रास. ख्रिश्चन मेडिकल कॉलेज ॲण्ड | एमएजी. १०८४/४१५७/ सीआर-१५६/आ. ९, दिनांक २९ एप्रिल १९८५. |

| अ. क्र. | आजाराचे नाव | प्राधिकृत संस्थेचे नाव | आदेश क्रमांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | Coronary Surgery) | हॉस्पिटल, बेल्लोर.<br>के. ई. एम. रुग्णालय, मुंबई.<br>जसलोक हॉस्पिटल, मुंबई.<br>बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई.<br>कस्तुरबा हॉस्पिटल, भोपाळ.<br>श्रीचित्राई तिरुनल इन्स्टिटयुट ऑफ मेडिकल सायन्सेस ॲण्ड टेक्नॉलॉजी, त्रिवेंद्रम. | |
| (ब) | मूत्रपिंड प्रतिरोपण (Kidney Transplan- tation) | ख्रिश्चन मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल, बेल्लोर.<br>ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, नवी दिल्ली.<br>पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्यूट, चंदिगढ.<br>जसलोक हॉस्पिटल, मुंबई. | एमएजी. १०८४/४१५७/ सीआर- १५६/आ. ९. दिनांक २९ एप्रिल १९८५. |
| (क) | हृदय शस्त्रक्रियेची प्रकरणे | सदर्न रेल्वेज, हेडक्वार्टर्स हॉस्पिटल, पेराम्बूर, मद्रास.<br>ख्रिश्चन मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल, बेल्लोर.<br>के.ई.एम. रुग्णालय, मुंबई.<br>ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस, नवी दिल्ली.<br>बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई.<br>जी. बी. पंत हॉस्पिटल, दिल्ली.<br>श्रीचित्राई तिरुनल इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस ॲण्ड टेक्नॉलॉजी, त्रिवेंद्रम.<br>पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्यूट, चंदिगढ.<br>एस.एस.के.एम हॉस्पिटल, कलकत्ता.<br>कस्तुरबा हॉस्पिटल, भोपाळ. | एमएजी. १०८४/४१५७/ सीआर- १५६/आ. ९. दिनांक २९ एप्रिल १९८५. |
| | | वाडीया इन्स्टिट्यूट ऑफ कार्डिऑलॉजी, पुणे,<br>रुबी हॉल क्लिनिक, पुणे. | एमएजी. १०८६/२२६०/आ-९. दिनांक २७ एप्रिल १९८७. |

(६) " वैद्यकीय देखभाल " म्हणजे प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याने शासकीय रुग्णालयात किंवा रुग्ण जर शासकीय रुग्णालयात जाण्याच्या परिस्थितीत नसेल तर रुग्णाच्या घरी किंवा त्याने आधी मान्य केले असेल तर प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याच्या रोगचिकित्सा कक्षामध्ये (कन्सल्टिंग रूम) केलेली देखभाल आणि त्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

(अ) शासकीय रुग्णालयात किंवा शासकीय प्रयोगशाळेत उपलब्ध असतील आणि प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्यास आवश्यक वाटतील अशा, रोगनिदानाच्या प्रयोजनाकरिता करावयाच्या परीक्षेच्या व अन्वेषणाच्या विकृती चिकित्साविषयक, अणुजीव शास्त्रविषयक, क्ष-किरणविषयक आणि इतर पद्धती ; आणि

(ब) प्राधिकृत वेद्यकीय देखभाल अधिकारी आवश्यक असल्याचे प्रमाणित करील असा, विशेषज्ञ किंवा वैद्यकीय अधिकारी प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याशी विचारविनिमय करून ठरवील त्या मर्यादेपर्यंत व तशा रीतीने घ्यावयाचा शासकीय विशेषज्ञाचा म्हणजे शासकीय रुग्णालयाला संलग्न अशा मानसेवी वैद्यकीय अधिकाऱ्याचा किंवा शासनाच्या सेवेत असणाऱ्या इतर कोणत्याही वैद्यकीय अधिकाऱ्याचा किंवा तसे अधिकारी नसतील तर इतर कोणत्याही विशेषज्ञाचा सल्ला.

(७) " उपचार " म्हणजे जेथे रुग्णावर उपचार करण्यात येईल अशा शासकीय रुग्णालयात उपलब्ध अशा सर्व वैद्यकीय आणि शल्यचिकित्साविषयक सुविधांचा उपयोग व त्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

(अ) प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याला आवश्यक वाटतील अशा, विकृती चिकित्साविषयक, अणुजीव शास्त्रविषयक, क्ष-किरण शास्त्रविषयक पद्धती किंवा अन्वेषणाच्या अन्य पद्धतींचा वापर करणे ;

(ब) राज्यातील शासकीय रुग्णालयामध्ये सर्वसाधारणपणे उपलब्ध असतील अशी विशेष किंवा सामान्य औषधे, लस, रक्तजल (Sera) किंवा त्यासंबंधीचे इतर उपचारविषयक पदार्थ पुरविणे ;

(क) शासकीय रुग्णालयामध्ये सर्वसाधारणपणे उपलब्ध नसतील आणि रुग्णाची स्थिती सुधारण्यासाठी किंवा बिघडण्यास प्रतिबंध होण्यासाठी आवश्यक असल्याबद्दल प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी लेखी प्रमाणित करील अशी औषधे, लस, रक्तजल किंवा त्यासंबंधीचे उपचारविषयक पदार्थ पुरविणे ;

(ड) जेथे रुग्णाला दाखल केले असेल अशा रुग्णालयात सर्वसाधारणपणे पुरविण्यात येणारी सर्वसाधारण वॉर्डातील जागा पुरवणे.

**टीप.—** रुग्णालयामध्ये विशेष जागा उपलब्ध असेल आणि जर अशी विशेष जागा घेण्याची रुग्णाची इच्छा असेल व अशा जागेबद्दलच्या आकारापैकी-मग तो आहारासह असो किंवा आहाराशिवाय असो ५० टक्के आकार देण्याची हमी देईल तर त्याला विशेष जागा पुरवण्यात येईल.

(इ) त्या रुग्णालयाकडून आंतररुग्णांना सर्वसाधारणपणे देण्यात येतात अशा शुश्रूषाविषयक सोयी.

**टीप.—** जेथे रुग्णाची योग्य ती शुश्रूषा करण्यात नोकरीवरील परिचर्या कर्मचारी अपुरे असतील अशा शासकीय रुग्णालयात किंवा जर रुग्णाला विशेष परिचर्या सुविधा आवश्यक असण्याइतपत त्याची परिस्मिदी (गंभीर) असेल तर प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्यास त्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार, त्याला आवश्यक वाटेल अशा कालावधीसाठी एक जादा परिचारिका नेमता येईल ;

(फ) त्या रुग्णालयाकडून इतर रुग्णांना सर्वसाधारणपणे देण्यात येतो असा आहार ;

(ग) महिला रुग्णांचे बाळंतपण ;

(ह) रक्त संक्रमण (ट्रान्स्फ्युजन) सेवा ;

(आय) शासकीय दंतोपचार रुग्णालयांमध्ये कवळी इत्यादीचा खर्च वगळून उपलब्ध होणारे सर्व दंतोपचार ; शा.नि. न.वि. व सा.आ.वि क्र. एमएजी-१०७१/१६१६/पी, दिनांक १७ फेब्रुवारी १९७२.

(जे) आवश्यक असेल तेथे, रुग्णाला रुग्णालयात नेण्याकरिता रुग्णवाहिका सेवेची तरतूद करणे ; शा.नि. न.वि. व सा.आ.वि. क्र. एमएजी-१०७०/४१७३१/एस. दिनांक १७ सप्टेंबर १९७३.

**टीप.—** रुग्णवाहिका सेवा आवश्यक असेल आणि ती उपलब्ध नसेल तेव्हा रुग्णाला आणि त्याच्या/तिच्या परिचराला, आवश्यक असेल तर प्रवासाच्या नित्याच्या पद्धतीने इष्ट स्थानी प्रवासी लवकरात लवकर पोहचेल अशा निकटतम मार्गाने प्रवास करता येईल. शंकास्पद प्रकरणाच्या बाबतीत प्राधिकृत देखभाल अधिकारी निकटतम आणि अत्यंत स्वस्त दराचा मार्ग ठरवू शकेल. जर प्रत्येक मार्ग हा ५ किलोमीटरपेक्षा अधिक अंतराचा असेल तरच ही सवलत अनुज्ञेय आहे.

(के) (एक) मधुमेह झाल्याचे कळल्यानंतर एक वर्षाच्या कालावधीत केलेले मधुमेहाचे उपचार हे रोगाच्या प्राथमिक अवस्थेतील असल्याचे समजण्यात यावेत आणि मधुमेहाचे प्रथम निदान झाल्यानंतर, पहिल्या एका वर्षामधील उपचारासंबंधीच्या मागण्या, संबंधित प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याने, परिशिष्ट ६ मध्ये जोडलेल्या विहित नमुन्यात दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारावर संबंधित कार्यालयास स्वीकारता येतील. शासकीय कर्मचाऱ्याने रोगाचे प्रथम निदान झाल्याची तारीख याच्या मागणीमध्ये दर्शविणे आवश्यक आहे. शा.नि. न.वि. व सा.आ.वि. क्र. एमएजी-१०८३/६३३३८-एस, दिनांक ७ जून १९७४.

(दोन) शासकीय कर्मचाऱ्याच्या स्वतःच्या रोगाच्या प्राथमिक अवस्थेनंतरच्या उपचारासाठी प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्याने रोगाच्या प्राथमिक अवस्थेत दिलेले प्रमाणपत्र उपयोगात आणावे. दरवर्षी नवीन प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही. शा.नि., सा. आ. वि. क्र. एमएजी-०८६/१०३/आ-९, दिनांक १५ मे १९८६.

मात्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील इतर कोणत्याही व्यक्तीला सदर आजारावरील औषधोपचारांच्या खर्चाची प्रतिपूर्ती देताना एकदा आजार प्राथमिक अवस्थेत असताना प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर पुढील औषधोपचार चालू ठेवण्यासाठी ती व्यक्ती हयात असल्यासंबंधीचे प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्याचे अथवा कोणत्याही राजपत्रित अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र दरवर्षी घेण्यात यावे.

(८) " राज्य " म्हणजे महाराष्ट्र राज्य.

**३. शासकीय कर्मचाऱ्याने मोफत वैद्यकीय परिचर्येसाठी खर्च केलेल्या कोणत्याही रकमेची वैद्यकीय प्रतिपूर्ती :—**

(१) रुग्णाला विनामूल्य वैद्यकीय उपचाराचा हक्क राहील.

(२) जेव्हा पोट-नियम (१) खाली विनामूल्य वैद्यकीय उपचाराचा रुग्णाला हक्क असेल तेव्हा

प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे लेखी प्रमाणपत्र प्रस्तुत केल्यानंतर, त्याने अशा उपचारादाखल खर्च केलेल्या कोणत्याही रकमेची प्रतिपूर्ती शासनाकडून शासकीय कर्मचाऱ्यास करण्यात येईल.

**टीप.—** रुग्णाच्या निवासस्थानची शुश्रूषा १० दिवसांहून अधिक काळ चालू राहण्याची शक्यता आहे असे प्राधिकृत वेद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे मत असेल तर प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी, रुग्णावरील उपचारासाठी जरूर त्या सोयी सर्वांत जवळच्या ज्या शासकीय रुग्णालयात उपलब्ध असतील त्या शासकीय रुग्णालयात रुग्णाला पाठवील.

४. **सर्वांत जवळच्या शासकीय विशेषज्ञांनी केलेली किंवा इतर कोणत्याही वैद्यकीय अधिकाऱ्याने केलेली वैद्यकीय देखभाल आणि त्यांना अनुज्ञेय असलेला प्रवास भत्ता व फी आणि त्यासाठी शासकीय कर्मचाऱ्याचा प्रवास भत्ता.—**(१) जर प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे असे मत असेल की, स्वतःखेरीज आणखी कोणा व्यक्तीची वैद्यकीय देखभाल आवश्यक आहे अशी रुग्णाची परिस्थिती आहे, तर तो मुंबईच्या बाबतीत महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा संचालक, मुंबई यांच्या पूर्व मान्यतेने आणि मुफसल भागामध्ये संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा शल्यचिकित्सकाच्या पूर्वमान्यतेने आणि स्वतः जिल्हा शल्यचिकित्सक हाच प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी असेल तर संबंधित विभागाच्या आरोग्य सेवा उप संचालकाच्या पूर्वमान्यतेने ही मान्यता लेखी घेण्यात येईल—

(अ) रुग्णाला सर्वांत जवळच्या शासकीय विशेषज्ञाकडे किंवा त्याच्या मते रुग्णाला ज्याची वैद्यकीय देखभाल आवश्यक असेल अशा इतर कोणत्याही वैद्यकीय अधिकाऱ्याकडे पाठवू शकेल ; किंवा

(ब) जर प्रवास झेपणार नाही इतपत रुग्ण आजारी असेल तर अशा विशेषज्ञाला किंवा इतर वैद्यकीय अधिकाऱ्याला रुग्णाची देखभाल करण्यासाठी बोलावू शकेल.

**टीप.—** जर पूर्वपरवानगी घेण्यामुळे विलंब होऊन रुग्णाच्या प्रकृतीस धोका पोहोचण्याची शक्यता असेल तर प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्यास, या पोट-नियमाच्या (अ) आणि (ब) मध्ये दिल्याप्रमाणे उपाययोजना करता येईल व त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यास तो नंतर तत्काळ अहवाल पाठवील.

(२) पोट-नियम (१) च्या खंड (अ) खाली, सर्वांत जवळच्या शासकीय विशेषज्ञाकडे किंवा इतर वैद्यकीय अधिकाऱ्याकडे पाठवलेल्या रुग्णास, प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे त्या बाबतीतील लेखी प्रमाणपत्र प्रस्तुत केल्यानंतर, विशेषज्ञाच्या किंवा वैद्यकीय अधिकाऱ्याच्या मुख्यालयापर्यंत आणि तेथपासून परतीचा प्रवास भत्ता मिळण्याचा हक्क राहील.

(३) शासकीय विशेषज्ञ किंवा पोट-नियम (१), खंड (ब) अन्वये बोलावलेला कोणताही इतर वैद्यकीय अधिकारी यांना प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे त्या बाबतीतील लेखी प्रमाणपत्र सादर केल्यानंतर, रुग्णाच्या जागेपर्यंत जाण्यायेण्याच्या प्रवासाबद्दल प्रवास भत्ता मिळण्याचा हक्क राहील.

(४) जर शासकीय विशेषज्ञाने किंवा इतर वैद्यकीय अधिकाऱ्याने रुग्णाची तपासणी आपल्या रोगनिदान कक्षामध्ये (कन्सल्टिंग रूम) केली किंवा रुग्णाच्या निवासस्थानी केली तर त्याला, वैद्यकीय सल्ल्याकरिता प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्यास वाजवी वाटेल एवढी फी देण्यात येईल.

**५. रुग्ण जेथे आजारी पडतो ती जागा म्हणजे प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे मुख्यालय नसेल तेव्हा रुग्णाला आणि प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याला प्रवासभत्ता देणे.—**(१) रुग्ण जेथे आजारी पडतो ती जागा म्हणजे प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे मुख्यालय नसेल त्या बाबतीत—

(अ) रुग्णाला अशा मुख्यालयास येण्याजाण्याच्या प्रवासाबद्दल प्रवास भत्ता मिळण्याचा हक्क राहील ;

(ब) जर रुग्ण इतका आजारी असेल की त्याला प्रवास करता येणार नाही तर तो जेथे आजारी पडेल त्या ठिकाणी जाऊन प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी त्याची देखभाल करील आणि त्या ठिकाणी जाण्यायेण्यासाठी प्रवास भत्ता मिळण्याचा हक्क प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्यास राहील.

(२) (एक) पोट-नियम (१) च्या खंड (अ) खालील प्रवास भत्ताविषयक अर्जाबरोबर वैद्यकीय देखभाल आवश्यक होती अशा अर्थाचे, प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र असेल ;

(दोन) पोट-नियम (१) च्या खंड (ब) खालील प्रवास भत्ताविषयक अर्जाबरोबर रुग्ण हा प्रवास करण्यास असमर्थ होता अशा अर्थाचे प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र असेल.

**६. रुग्णासह त्याची देखभाल करणारा अधिकारी आणि त्याला अनुज्ञेय असलेला प्रवास भत्ता.—** नियम ४ आणि ५ खाली वैद्यकीय देखभालीसाठी रुग्णाला इतर कोणत्याही जागी प्रवास करावा लागला तर आणि वैद्यकीय देखभालीशिवाय त्याने प्रवास करणे असुरक्षित होईल असे प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्यास वाटले तर प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी एकतर स्वतः रुग्णाबरोबर त्याच्या घरापर्यंत जाऊ शकेल किंवा इतर कोणा सोबत्यास त्याच्याबरोबर पाठवण्याची व्यवस्था करू शकेल. जर हा सोबती म्हणजे शासकीय कर्मचारी असेल तर तो कामावर असताना प्रवास करीत असल्याचे मानण्यात येईल आणि त्याला दौऱ्यावर असल्याप्रमाणे, जाण्याच्या व परतण्याच्या प्रवासाबद्दल प्रवास भत्ता घेता येईल आणि जर तो शासकीय कर्मचारी नसेल तर त्याला रुग्ण ज्या वर्गाने प्रवास करील त्या योग्य अशा वर्गाचे प्रत्यक्ष एकेरी भाडे किंवा तो स्वतः ज्या वर्गाने प्रत्यक्ष प्रवास करील अशा खालच्या वर्गाचे भाडे मिळण्याचा हक्क राहील.

**७. प्रवास भत्त्याचे दर.—** (१) नियम ४ आणि ५ अन्वये केलेल्या प्रवासाबद्दलचा प्रवास भत्ता हा शासकीय कर्मचाऱ्यास दौऱ्यावर असताना अनुज्ञेय असणाऱ्या दरांनी देण्यात येईल.

(२) शासकीय कर्मचाऱ्याला स्वतःस ज्या वर्गाने प्रवास करण्याचा हक्क असेल त्याच वर्गाने प्रवास करण्याचा हक्क त्याच्या कुटुंबातील व्यक्तीला राहील.

(३) रुग्णाच्या देखभालीसाठी बोलावलेल्या शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही विशेषज्ञाला त्याच्या दर्जानुसार प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्यास वाजवी वाटेल अशा दरांनी प्रवास भत्ता मिळण्याचा हक्क राहील.

**८. शासकीय आणि अशासकीय रुग्णालयांमध्ये आंतररुग्ण म्हणून मोफत उपचार घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांने खर्च केलेल्या कोणत्याही रकमेची वैद्यकीय प्रतिपूर्ती**.—(१) रुग्णाला विनामूल्य उपचाराचा हक्क राहील.

(२) रुग्णावर एखाद्या रुग्णालयात आंतररुग्ण (Indoor patient) म्हणून उपचार होणे जरूर आहे असे प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्यास वाटेल त्या बाबतीत, जेथे आवश्यक त्या उपचाराच्या सोयी उपलब्ध असतील अशा शासकीय रुग्णालयात अशा उपचारांसाठी रुग्णाला पाठवण्यात यावे. अशा रुग्णालयात विनामूल्य मिळण्याचा रुग्णाला हक्क राहील.

(३) जेथे रुग्ण आजारी पडेल त्या जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयात आवश्यक त्या सोयी उपलब्ध नसतील, किंवा जेथे रुग्ण आजारी पडेल त्या ठिकाणी शासकीय रुग्णालयात जागा नसेल, किंवा उक्त रुग्णालयाच्या कर्मचारी वर्गात जादा काम पडत असेल तर, प्रधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा शल्यचिकित्सकाच्या पूर्वमान्यतेने आणि जिल्हा शल्यचिकित्सक हा स्वतःच प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी असेल त्या बाबतीत संबंधित विभागाच्या (Division) आरोग्य उप संचालकाच्या पूर्वमान्यतेने ही मान्यता लेखी घेण्यामुळे विलंब लागून रुग्णाच्या आरोग्याला धोका पोहोचत नसेल तर ती लेखीच घेण्यात येईल. जेथे जरूर तो उपचार पुरवणे प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याच्या मते शक्य असेल अशा ठिकाणाच्या किंवा त्या ठिकाणाजवळच्या (मग ते ठिकाण जिल्ह्याबाहेरचे असले तरी चालेल) शासकीय किंवा अशासकीय रुग्णालयात रुग्णाला पाठवील.

(४) शासकीय रुग्णालयात उपलब्ध नसणारे विशेष प्रकारचे उपचार पुरवणाऱ्या अशासकीय रुग्णालयात एखाद्या रुग्णाला पाठवणे त्याच्या हिताच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे असे प्राधिकृत देखभाल अधिकाऱ्यास वाटेल त्या बाबतीत तो मुंबईमध्ये महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा संचालकाच्या पूर्वमान्यतेने, आणि मुफसल क्षेत्रात, संबंधित जिल्ह्याच्या शल्यचिकित्सकाच्या पूर्वमान्यतेने आणि जिल्हाशल्यचिकित्सक हा स्वतःचा प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी असेल त्या बाबतीत संबंधित विभागाच्या आरोग्य सेवा उप संचालकाच्या पूर्वमान्यतेने, ही मान्यता लेखी घेण्यामुळे विलंब लागून रुग्णाच्या आरोग्याला धोका पोहोचत नसेल तर ती लेखीच घेण्यात येईल. विशेष उपचारासांठी शासनाने मान्यता दिलेल्या सर्वांत जवळच्या अशासकीय रुग्णालयात रुग्णाला पाठवील.

(५) पोट-नियम (१), (२), (३) आणि (४) अन्वये जो उपचार विनामूल्य मिळण्याचा हक्क शासकीय कर्मचाऱ्याला किंवा त्याच्या कुटुंबातील व्यक्तीला असेल त्या उपचारासाठी त्याने खर्च केलेल्या कोणत्याही रकमेची प्रतिपूर्ती, प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे जरूर ते प्रमाणपत्र आणि त्याच्या मागणीच्या पुष्ट्यर्थ प्रमाणके (Vouchers) सादर केल्यानंतर, त्याला करण्यात येईल ; परंतु प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्यास वाजवी वाटेल एवढ्याच रकमेची शासन प्रतिपूर्ती करील.

**९. रुग्णाच्या निवासस्थानी उपचार करणे**.—(१) योग्य ते शासकीय रुग्णालय नाही किंवा दूर अंतरावर आहे किंवा त्याचा आजार तीव्र स्वरूपाचा आहे या कारणास्तव प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याच्या मते रुग्णावर नियम ८ च्या पोट नियम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे उपचार करता येत नसतील तर, रुग्णाच्या निवासस्थानी उपचार देता येईल.

(२) जेव्हा पोट-नियम (१) अन्वये रुग्णावर त्याच्या निवासस्थानी उपचार करण्यात येईल तेव्हा त्याला नियम ८च्या पोट-नियम (२) अन्वये विनामूल्य असा जो उपचार मिळण्याचा हक्क प्राप्त झाला असता त्या उपचाराच्या खर्चाइतकी रक्कम, अशा उपचारावर त्याने केलेल्या खर्चादाखल मिळण्याचा हक्क राहील, मात्र आहारावरील खर्च यातून वगळण्यात येईल आणि प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र आणि प्रमाणके (Vouchers) सादर करावी लागतील.

(३) पोट-नियम (२) खाली अनुदेय असणाऱ्या रकमांची मागणी करताना, पुढील गोष्टी नमूद करणारे प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे लेखी प्रमाणपत्र मागणीबरोबर पाठवण्यात येईल.

(अ) पोट-नियम (१) मध्ये उल्लेख केलेले मत असण्याची कारणे ; आणि

(ब) पोट-नियम (२) मध्ये उल्लेख केलेल्या उपचाराचा खर्च.

**१०. औषधे पुरवणे आणि शासकीय दवाखान्यात आणि रुग्णालयात उपलब्ध नसलेल्या औषधांच्या रकमेची प्रतिपूर्ती करणे.**—प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याने विहित केलेली सर्व औषधे शक्यतोवर रुग्णावर जेथे उपचार करण्यात येईल त्या ठिकाणच्या शासकीय रुग्णालयातून किंवा दवाखान्यातून देण्यात येतील :

परंतु जेव्हा एखादे औषध, लस रक्तजल (Sera) किंवा इतर उपचारविषयक पदार्थ अशा रुग्णालयात सर्वसाधारणपणे उपलब्ध नसतील तेव्हा शासकीय कर्मचारी ती प्रथम खरेदी करू शकेल आणि नंतर त्याला, प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र आणि जरूर ती प्रमाणके सादर केल्यानंतर शासनाकडून त्याची प्रतिपूर्ती केली जाईल.

**टीप.**—जे पदार्थ औषधे नसून प्रामुख्याने अन्नाच्या स्वरूपाचे, शक्तिवर्धके (टॉनिके) किंवा प्रसाधनविषयक पदार्थ आहेत त्यांच्या खर्चाची प्रतिपूर्ती या नियमाखाली अनुज्ञेय नाही. हे पदार्थ अन्नविषयक पदार्थ, शक्तिवर्धके (टॉनिके) किंवा प्रसाधनविषयक पदार्थ आहेत की नाहीत हे ठरवण्यासाठी भारत सरकारने आपल्या कर्मचाऱ्यांकरिता तयार केलेल्या यादीचा अवलंब करण्यात येईल.

**११. वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या मागण्या सादर करणे.**—(१) या नियमाखाली अनुज्ञेय असणाऱ्या प्रतिपूर्तीच्या सर्व मागण्या, संबंधित शासकीय कर्मचाऱ्याच्या नियंत्रक प्राधिकाऱ्याकडे, वैद्यकीय देखभाल किंवा उपचार पूर्ण झाल्यापासून एक वर्षाच्या आत, सादर करण्यात येतील आणि त्या संबंधित शासकीय कर्मचाऱ्याचे भत्ते व मानधन ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात येत असेल त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात येतील.

(२) संबंधित शासकीय कर्मचाऱ्याच्या प्रवास भत्ता बिलांवर प्रतिस्वाक्षरी करण्यास सक्षम असणारे नियंत्रक प्राधिकारी प्रतिपूर्तीच्या सर्व मागण्यांवर प्रतिस्वाक्षरी करतील. अशा सर्व मागण्यांच्या पृष्ठ्यर्थ आवश्यक ती बिले, प्रमाणके, प्रमाणपत्रे इत्यादी सादर करण्यात येतील. नियंत्रक प्राधिकारी प्रतिस्वाक्षरी करण्यापूर्वी या मागण्या नियमांनुसार अनुज्ञेय आहेत याविषयी आपली खात्री करून घेतील.

**१२. वैद्यकीय देखभालीच्या संबंधात केलेला परंतु त्यात समाविष्ट न केलेला सेवांवरील खर्च.**—(१) या नियमानुसार विनामूल्य वैद्यकीय देखभाल व उपचार मिळण्याचा हक्क असणाऱ्या रुग्णाच्या वैद्यकीय देखभालीच्या किंवा उपचाराच्या संबंधात केलेल्या सेवांवर केलेला परंतु त्यात समाविष्ट न होणारा खर्च प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी ठरवील व तो खर्च रुग्णाकडून भरण्यात येईल.

(२) वैद्यकीय देखभाल किंवा उपचार यात एखाद्या सेवेचा समावेश होतो किंवा नाही असा कोणताही प्रश्न उपस्थित झाला तर तो महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा संचालकांकडे विचारार्थ पाठवण्यात येईल व आरोग्य सेवा संचालक आवश्यक तर तो शासनाकडे पाठवील. शासनाचा निर्णय अंतिम राहील.

**१३. मोफत वैद्यकीय देखभालीसाठी उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि ओरिसा यांच्या शासनाशी केलेली परस्पर व्यवस्था.**—महाराष्ट्र शासनाने उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि ओरिसा यांच्या शासनाशी त्या त्या शासनांच्या रुग्णालयांमध्ये शासकीय कर्मचाऱ्यांची वैद्यकीय देखभाल व त्यांच्यावर उपचार विनामूल्य करण्यासंबंधी पुढील शर्तीवर आपसात व्यवस्था केली आहे :—

(१) एका शासनाचा कर्मचारी इतर राज्यांच्या प्रदेशात कामासाठी राहिला असेल किंवा प्रवास करीत असताना आजारी होईल अशाच बाबतीत विनामूल्य वैद्यकीय उपचार (विशेष औषधांचा खर्च वगळून) मर्यादित राहतील.

(२) शासकीय कर्मचारी रजा घेऊन अन्य कोणत्याही राज्यात जातील अशा बाबतीत किंवा स्वतःच्या निवडीनुसार विशिष्ट वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सल्ला घेण्यासाठी किंवा विशिष्ट संस्थेत उपचार करुन घेण्यासाठी प्रवास करील त्याबाबतीत ही व्यवस्था लागू होणार नाही.

शा.नि., न.वि. व सा.आ.वि.क्र. एमएजी १०७६/७९८१९, दिनांक ६ मे १९६८.

**१४. कुटुंबातील व्यक्तींची संख्या**.—ज्यांना ३ पेक्षा कमी मुले असतील अशा कुटुंबांनी ३ जिवंत मुलांइतके आपले कुटुंब मर्यादित ठेवलेले नसेल किंवा त्यांना ३ पेक्षा जास्त जिवंत मुले असतील अशा कुटुंबांनी आपले कुटुंब सध्या आहे एवढेच मर्यादित ठेवलेले नसेल अशा कुटुंबांना वरील नियमानुसार शासकीय कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना मिळणाऱ्या विनामूल्य वैद्यकीय उपचारासंबंधीच्या सवलती मिळणार नाहीत.

**टीप**.—हा नियम, १५ ऑगस्ट १९६८ पासून अमलात आला आहे.

**१५. निर्बीजीकरण शस्त्रक्रिया केल्यानंतर त्या व्यक्तीला विनामूल्य वैद्यकीय उपचार अनुज्ञेय असणे**.—राज्यामध्ये कुटुंब नियोजन कार्यक्रम कार्यान्वित करण्यासाठी मंत्रिमंडळाच्या उप समितीने दिलेल्या अहवालावर आधारित कुटुंब नियोजन कार्यक्रमाच्या संबंधातील शासनाच्या धोरणानुसार १५ ऑगस्ट १९६८ रोजी ज्यांची ३ पेक्षा अधिक मुले जिवंत आहेत, अशा आईवडिलांनी (स्त्रि-पुरुषांनी) त्या तारखेनंतर त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींची संख्या आणखी वाढविली असली तरी सुद्धा जी १५ऑगस्ट १९६८ पूर्वी जन्मलेली आहेत. अशा मुलांना वैद्यकीय सोयी मिळण्याच्या हक्कास कोणतीही बाधा येता कामा नये. आईवडिलांना तसेच ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा अधिक असलेल्या जादा मुलाला विनामूल्य वैद्यकीय उपचारांसंबंधीच्या सवलती मिळणार नाहीत. विनामूल्य वैद्यकीय उपचाराच्या सवलती मिळण्याचा ज्यांना हक्क होता अशा मुलांना अनुज्ञेय असलेल्या विनामूल्य वैद्यकीय उपचाराच्या सोयी मिळण्याचे चालूच राहील. परंतु जननक्षम गटात असताना जर आईवडिलांनी (शासकीय कर्मचारी किंवा त्याची पत्नी) निर्बीजीकरणाची शस्त्रक्रिया करून घेतली असेल आणि अशी शस्त्रक्रिया जेथे करण्यात आली, त्या रुग्णालयाच्या किंवा दावाखान्याच्या प्रभारी असलेल्या सक्षम वैद्यकीय प्राधिकाऱ्याचे तशा अर्थाचे प्रमाणपत्र सादर केले असेल तर शस्त्रक्रिया केल्याच्या तारखेपासून वैद्यकीय सवलती मिळण्याचा त्यांना पुन्हा हक्क राहील. परंतु ठरवून दिलेल्या मार्यादेहून अधिक असलेल्या मुलास/मुलांना अशा सवलती मिळणार नाहीत.

शा.नि., न.वि. १५ व सा.आ.वि. क्र. एमएजी १०७१/ ४१८०१/एस. दिनांक २९ एप्रिल १९७४.

**१५-अ. मोफत वैद्यकीय उपचारांसाठी कर्मचाऱ्यास अपात्र ठरवण्यात आल्यानंतर, त्याने निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करून घेतल्यास, त्यानंतर त्यास मोफत वैद्यकीय उपचारांसाठी पात्र ठरवणे.**—शासकीय कर्मचाऱ्यास मोफत वैद्यकीय उपचारासाठी अपात्र ठरवण्यात आल्यानंतर त्याने निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करून घेतल्यास, उक्त कालावधीत वैद्यकीय देखभालविषयक नियमांचा कोणत्याही प्रकारे भंग झालेला नसल्यास, त्या शासकीय कर्मचाऱ्यास आणि त्याच्या विवाहसाथीस (स्पाऊस) त्यास वरीलप्रमाणे अपात्र ठरविण्यात आल्याच्या तारखेपासून मोफत वैद्यकीय उपचार मिळण्याचा हक्क प्राप्त झाल्याचे समजण्यात आले पाहिजे.

शा.नि., सा. आ. वि. क्र. टीबीसी, १०-८१/२७०८/ पीएच-९, दिनांक २४ जून १९८५.

**१६. निकडीच्या परिस्थितीमध्ये खाजगी रुग्णालयामध्ये केलेले आंतरउपचार, परदेशात केलेले उपचार, विशेषज्ञांनी केलेले उपचार आणि त्यांची प्रतिपूर्ती, साधनसामग्री आणि उप-यंत्रे यांवरील खर्चाची प्रतिपूर्ती.**—(१) शासकीय कर्मचाऱ्याने १८ विशेष आजारांच्याबाबतीत निकडीच्या परिस्थितीमध्ये काही प्रमाणात खाजगी रुग्णालयांमध्ये घेतलेल्या आंतर उपचारांकरिता त्याने केलेल्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा हक्क आहे.

शा.नि., सा. आ. वि., क्र. एमएजी. १०८१/ ४९०७/पीएच-९ए, दिनांक १९ ऑक्टोबर १९८३, १९ ऑक्टोबर १९८४ आणि २ जानेवारी १९८५.

शासन निर्णय, क्रमांक एमएजी. १०८१/४९०७/पीएच-९ए, दिनांक १९ ऑक्टोबर १९८३ च्या परिच्छेद ३ मध्ये नमूद केलेल्या दरानुसार, शासकीय रुग्णालयातील शुश्रुषालयीन दराच्या ५० टक्के रक्कम वसूल करून " रुग्णालयात ठेवण्यावर " (हॉस्पिटलायझेशन) झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात आली पाहिजे.

या उपचाराच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या मागण्या परिशिष्ट चार आणि पाचमधील " क " व " ड " ह्या विहित नमुन्यामध्ये सादर करण्यात आल्या पाहिजेत.

(२) राज्य शासकीय रुग्णालयांमध्ये ज्या रोगांसाठी अद्यापि पुरेशा सोयी नाहीत. अशा दिनांक २९ एप्रिल १९८५ च्या शासन निर्णयात जादा दाखल केलेल्या पुढील आजारांच्या बाबतीत, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना व त्याच्या कुटुंबियांना दिनांक २९ एप्रिल १९८५ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ५ मधील सूचीत दिलेल्या खाजगी रुग्णालयांमध्ये विशेषज्ञाकडील उपचाराचा फायदा घेता येईल :—

(एक) उपमार्ग साधक हृदय शस्त्रक्रिया (बायपास कॉरोनरी सर्जरी)

(दोन) मुत्रपिंड रोपण

(तीन) रक्ताचा कर्करोग

(चार) हृदयावरील शस्त्रक्रिया

अशा प्रकरणामध्ये प्रवासावरील खर्च वगळता, ज्या रुग्णालयामध्ये उपचार घेण्यात आले अशा संबंधित रुग्णालयाने आकारलेल्या संपूर्ण खर्चाची प्रतिपूर्ती करून देण्यात आली पाहिजे.

(३) ज्या आजारांसाठी भारतातील उपचारासाठी ज्या सोयी व्यापक प्रमाणात सुस्थापित झालेल्या नाहीत आणि आजारासाठी जे विदेशी उपचार उपलब्ध असल्याचे समजण्यात येते, अशा सोयीसाठी, संचालक, आरोग्य सेवा यांच्या अध्यक्षतेखालील समितीने निश्चित केलेल्या आजारांच्या बाबतीत वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस परवानगी देण्यात आलेली आहे. ही प्रतिपूर्तीची रक्कम असे उपचार भारतात मुंबई येथील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये घेण्यात आले असते तर जो खर्च आला असता त्या खर्चाएवढी मर्यादित असावी.

शा.नि. क्र. एमएजी. १०८४/४१५७/सीआर-१५६/पीएच-९ए, दिनांक २९ एप्रिल १९८५.

अशा प्रकरणामधील विमान प्रवासाच्या भाड्याच्या खर्चाची प्रतिपूर्तीसंबंधीचा विचार करण्यात येणार नाही. अशी अपवादात्मक प्रकरणे शासन निर्णय, क्रमांक एमएजी. १०८४/४१५७/सीआर-१५६/पीएच-९ ए, दिनांक २९ एप्रिल १९८५ च्या परिच्छेद १(३) मध्ये नमूद केलेली आहेत.

शा.नि., न.वि. व सा.आ.वि. क्र. एमएजी. १०८२/४१९ सीआर-६३/पीएच-९अ, दिनांक ३१ डिसेंबर १९८४.

(४) शासकीय कर्मचाऱ्याने घेतलेल्या उपचारासाठी ज्यांची अत्यंत आवश्यकता आहे अशी किमती उपयंत्रे व साधनसामग्री खरेदी करण्यावर झालेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीस परवानगी देण्यात आली आहे.

(५) टाटा रुग्णालयामध्ये कर्करोगावर केलेल्या उपचारांसाठी झालेल्या संपूर्ण वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती चालू ठेवण्यात आली पाहिजे. तथापि, स्पेशल नर्सिंग होममध्ये दाखल केल्यास झालेला खर्च पोट-नियम (९) मध्ये नमूद केल्याप्रमाणे विनियमित करण्यात येईल.

शा.नि. सा.आ.वि. क्र. एमएजी. १०८४/११६/पीएच-९ ए, दिनांक २१ जुलै १९८४ व २४ ऑगस्ट १९८४.

**१७. वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या पूर्वीच्या पद्धतीचे सुलभीकरण.**—शासकीय कर्मचाऱ्याला वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्यात होणारा विलंब टाळण्यासाठी वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची पूर्वीची कार्यपद्धती सुलभ करण्यात येत आहे. प्रमाणकांवर प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याने प्रतिस्वाक्षरी करण्याची आवश्यकता नाही.

प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी नमुना (यथास्थिती) " अ " किंवा " ब " मध्ये एक प्रमाणपत्र देईल आणि त्या प्रमाणपत्राच्या आधारे, शासकीय कर्मचारी बाजारातून औषधे व उपयंत्रे खरेदी करू शकेल आणि त्याची खर्चाच्या प्रतिपूर्तीची मागणी परिशिष्ट " दोन " आणि " तीन " मध्ये दिलेल्या नमुना " अ " किंवा " ब " मध्ये प्रमाणकासह सदर करू शकेल.

**१८. हृदय शस्त्रक्रिया, मूत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया, रक्ताचा कर्करोग आणि उपमार्ग साधक हृदय शस्त्रक्रिया (बायपास कॉरोनरी सर्जरी) यांसाठी आगाऊ रक्कम देणे.—** शासकीय कर्मचाऱ्यांना, हृदय शस्त्रक्रिया, मूत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया, रक्ताचा कर्करोग आणि उपमार्ग साधक हृदय शस्त्रक्रिया (बायपास कॉरोनरी सर्जरी) यांच्या बाबतीत उपयंत्रे आणि किंमती औषधे खरेदी करता येण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांना सहाय्य देण्यासाठी रुपये ४५,००० एवढी अगाऊ रक्कम किंवा उपयंत्रे आणि किंमती औषधे यांवरील प्रत्यक्ष खर्च, या पैकी जो कमी असेल तेवढ्या खर्चाची रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

शा.नि., सा.आ.वि. क्र. एमएजी. १०८३/४११९/ पीएच-९ ए, दिनांक २१ ऑगस्ट १९८५.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डी. टी. जोसेफ,**
शासनाचे सचिव.

## ६. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (वैद्यकीय मदत) नियम, १९६६

**१. संक्षिप्त नाव**.–(१) या नियमास, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (वैद्यकीय मदत) नियम, १९६६ असे म्हणता येईल.

(२) ते दिनांक १ ऑक्टोबर १९६५ पासून अंमलात आले आहेत असे मानण्यात येईल.

**२. व्याख्या**.—या नियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(१) " अधिनियम " म्हणजे मुंबई विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भते अधिनियम, १९५६ ;

(२) " प्राधिकृत वैद्यकीय परिचर्या अधिकारी " म्हणजे—

(एक) बृहन्मुंबईमध्ये अधीक्षक, सेंट जॉर्ज रुग्णालय, अधिष्ठता, किंवा उप अधीक्षक, जे. जे. रुग्णालय व अधीक्षक, जी. टी. रुग्णालय व कामा व ऑल्ब्लेस रुग्णालय व आमदार निवासाचा प्रभारी वैद्यकीय अधिकारी.

(दोन) नागपूर येथे अधिष्ठाता किंवा उप अधीक्षक, सरकारी वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर व जिल्हा शल्यचिकित्सक, नागपूर किंवा राज्य सरकार **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे याबाबत विनिर्दिष्ट करील असा इतर अधिकारी; आणि

(तीन) इतरत्र, जिल्ह्यातील आपल्या अधिकाऱ्यावर उपचार करण्यासाठी राज्य सरकारने नेमलेला जिल्ह्याचा प्रमुख वैद्यकीय अधिकारी ;

आणि त्यात अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल असा या नियमांच्या सर्व किंवा कोणत्याही उपबंधान्वये प्राधिकृत वैद्यकीय परिचर्या अधिकाऱ्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी उप-खंड (एक) किंवा (दोन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही सरकारी रुग्णालयाच्या अधिक्षकाने किंवा जिल्ह्याच्या प्रमुख वैद्यकीय अधिकाऱ्याने याबाबत लेखी आदेशाद्वारे यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या कोणताही अधिकारी याचा समावेश होतो ;

(३) " सरकारी रुग्णालय " म्हणजे राज्य सरकारने चालवलेले रुग्णालय किंवा दवाखाना आणि त्यात त्यास जोडलेल्या कोणत्याही शुश्रूषालयाचा समावेश होतो ;

(४) " वैद्यकीय मदत " म्हणजे प्राधिकृत वैद्यकीय परिचर्या अधिकाऱ्याने सरकारी रुग्णालयात किंवा आपल्या संमंत्रक कक्षात किंवा रुग्णाच्या घरी दिलेली वैद्यकीय मदत, आणि त्यात—

(एक) रोगनिदानाच्या प्रयोजनासाठी राज्यातील कोणत्याही सरकारी रुग्णालयात किंवा सरकारी प्रयोगशाळेत उपलब्ध असलेल्या व प्राधिकृत वैद्यकीय परिचर्या अधिकाऱ्याला आवश्यक वाटणाऱ्या विकृतीचिकित्सा, अणुजीवशास्त्रीय, क्ष-किरण शास्त्रीय किंवा अन्य तपासणी पद्धतीचा;

(दोन) प्राधिकृत वैद्यकीय परिचर्या अधिकाऱ्याशी विचारविनियम केल्यानंतर विशेषज्ञ किंवा वैद्यकीय अधिकारी ठरवील अशा मर्यादेपर्यंत व अशा रीतीने आवश्यक असल्याचे प्राधिकृत वैद्यकीय परिचर्या अधिकारी प्रमाणित करील अशा विशेषज्ञाशी किंवा अन्य वैद्यकीय अधिकाऱ्याशी मग तो सरकारी अधिकारी असो किंवा नसो, केलेल्या विचारविनिमयाचा समावेश होतो ;

(५) " रुग्ण " म्हणजे अधिनियमाच्या कलम ६ अन्वये वैद्यकीय मदत व उपचार करून घेण्याचा हक्क असलेला महाराष्ट्र विधानसभेचा किंवा महाराष्ट्र विधानपरिषदेचा सदस्य किंवा अशा सदस्यांच्या कुटुंबातील व्यक्ती ;

(६) " उपचार " यात, ज्या सरकारी रुग्णालयात रुग्णावर उपचार करण्यात येतो त्या रुग्णालयात उपलब्ध असलेल्या सर्व वैद्यकीय व शस्त्रक्रियेच्या सोयींचा उपयोग करण्याचा समावेश होतो ; तसेच, त्यात—

(एक) प्राधिकृत वैद्यकीय परिचर्या अधिकाऱ्याला आवश्यक वाटतील अशा विकृतीचिकित्सा, अणुजीवशास्त्रीय, क्ष-किरणशास्त्रीय, किंवा अन्य पद्धतीचा उपयोग,

(दोन) सामान्यपणे राज्यातील सरकारी रुग्णाल्यांत अशा रीतीने उपलब्ध नसलेली औषधे, लस, रक्तजल किंवा अन्य रोगनिवारक पदार्थांचा पुरवठा,

(तीन) रुग्ण बरा होण्यासाठी किंवा त्याची प्रकृती गंभीर रीत्या बिघडू नये म्हणून आवश्यक असल्याचे प्राधिकृत वैद्यकीय परिचर्या अधिकारी लेखी प्रमाणित करील अशी जी औषधे, लस, रक्तजल किंवा अन्य रोगनिवारक पदार्थ अशा रीतीने सामान्यपणे उपलब्ध नसतील व ज्यांच्याबाबतीत केंद्रीय सेवा (वैद्यकीय मदत) नियम, १९४४ अन्वये परतावा अनुज्ञेय नाही, अशा औषधांच्या यादीत ज्यांचा समावेश नसेल अशा औषधांचा, लसींचा, रक्तजलाचा किंवा अन्य रोगनिवारक पदार्थांचा पुरवठा ;

(चार) ज्या रुग्णालयात रुग्णाला दाखल केले असेल त्या रुग्णालयात सामान्यपणे देण्यात येणारी व रुग्णाच्या दर्जाला शोभणारी जी जागा दिली जाते अशी जागा ;

(पाच) ज्या रुग्णालयात रुग्णाला दाखल केले असेल त्या रुग्णालयात सामान्यपणे परिचारिका ज्या सेवा करतात त्या सेवा ;

(सहा) रोगाचे स्वरूप लक्षात घेऊन रुग्ण बरा होण्यासाठी किंवा त्याची प्रकृति गंभीर रीत्या बिघडू नये म्हणून जी शुश्रूषा आवश्यक असल्याचे प्राधिकृत वैद्यकीय परिचर्या अधिकारी लेखी प्रमाणित करील अशी विशेष शुश्रूषा ;

(सात) पथ्याहार;

यांचाही समावेश होतो ; परंतु त्यात उप-खंड (चार) मध्ये वर्णन केलेल्या जागेव्यतिरिक्त रुग्णाच्या विनंतीप्रमाणे जी जागा दिली जाते तिचा समावेश होत नाही.

**३. वैद्यकीय मदत**.—(१) रुग्णास विनामूल्य वैद्यकीय मदत मिळण्याचा हक्क असेल.

(२) जेव्हा रुग्णाला पोट-नियम (१) अन्वये विनामूल्य वैद्यकीय मदत मिळण्याचा हक्क असेल तेव्हा. अशा वैद्यकीय मदतीसाठी त्याने कोणतीही रक्कम भरली असेल तर त्यास राज्य सरकार ठरवील अशा रीतीने त्या रकमेची प्रतिपूर्ती राज्य सरकारकडून करण्यात येईल.

**४. उपचार**.—(१) रुग्णाला विनामूल्य उपचार करून घेण्याचा हक्क असेल.

(२) रुग्णाच्या हिताच्या दृष्टीने त्याला उपचारासाठी सरकारी रुग्णालयात पाठवणे इष्ट आहे असे प्राधिकृत वैद्यकीय परिचर्या अधिकाऱ्याचे मत असेल तेव्हा, तो रुग्ण जेथे आजारी पडला असेल त्या ठिकाणचे किंवा जिल्ह्यातील जे सरकारी रुग्णालय प्राधिकृत परिचर्या अधिकाऱ्याच्या मते आवश्यक ते उपचार करू शकत असेल अशा सरकारी रुग्णालयात त्या रुग्णाला विनामूल्य उपचार करून घेण्याचा हक्क असेल.

(३) पोट-निमय (२) अन्वये रुग्णाला सरकारी रुग्णालयात विनामूल्य उपचार करून घेण्याचा हक्क असेल तेव्हा अशा उपचारांसाठी त्याने रक्कम दिली असेल तर त्या रुग्णास राज्य सरकार ठरवील अशा रीतीने त्या रकमेची प्रतिपूर्ती राज्य सरकारकडून करण्यात येईल.

(४) प्राधिकृत वैद्यकीय परिचर्या अधिकाऱ्याने विहित केलेली सर्व औषधे, शक्य असेल तेथवर, बृहन्मुंबईमध्ये सेंट जॉर्ज रुग्णालयात व अन्यत्र प्राधिकृत वैद्यकीय परिचर्या अधिकारी त्याबाबत विनिर्दिष्ट करील अशा सरकारी रुग्णालयात देण्यात येतील :

परंतु कोणतीही औषधे, लस, रक्तजल किंवा अन्य रोगानिवारक पदार्थ सामान्यपणे अशा कोणत्याही रुग्णालयात उपलब्ध नसतील तेव्हा, त्या रुग्णास प्रथमतः ती विकत घेता येतील व त्यांच्या किंमतीची प्रतिपूर्ती, राज्य सरकार ठरवील अशा रीतीने प्राधिकृत वैद्यकीय परिचर्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व तसेच आवश्यक ती प्रमाणके हजर केल्यावर, राज्य सरकारकडून करण्यात येईल. (परिशिष्ट).

**५. विशेषज्ञाकडून उपचार**.—(१) प्राधिकृत वैद्यकीय परिचर्या अधिकाऱ्याच्या मते रुग्णाची स्थिती इतकी गंभीर स्वरूपाची किंवा विशेष स्वरूपाची आहे की, आपल्या खेरीज अन्य व्यक्तींच्या वैद्यकीय मदतीची आवश्यकता आहे, तर त्यास,—

(अ) त्याच्या मते त्या रुग्णाला ज्याच्या वैद्यकीय मदतीची आवश्यकता आहे अशा अगदी जवळच्या विशेषज्ञाकडे किंवा राज्यातील अन्य वैद्यकीय अधिकाऱ्याकडे त्या रुग्णाला पाठवता येईल ; किंवा

(ब) तो रुग्ण प्रवास न करू शकण्याइतका आजारी असेल, तर त्या रुग्णावर उपचार करण्यासाठी अशा विशेषज्ञाला किंवा अन्य वैद्यकीय अधिकाऱ्याला बोलावता येईल.

(२) पोट-नियम (१) च्या खंड (ब) अन्वये बोलावलेल्या विशेषज्ञाला किंवा अन्य वैद्यकीय अधिकाऱ्याला, प्राधिकृत वैद्यकीय परिचर्या अधिकाऱ्याने दिलेली लेखी प्रमाणपत्रे हजर करून ज्या ठिकाणी रुग्ण असेल तेथपर्यंत केलेल्या प्रवासाबद्दल प्रवास भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

**६. प्रवासात वैद्यकीय मदत**.— ज्या ठिकाणी रुग्ण आजारी पडला असेल ते ठिकाण प्राधिकृत वैद्यकीय परिचर्या अधिकाऱ्याचे मुख्यालय नसेल व रुग्णावर उपचार करणाऱ्या वैद्यक व्यवसायींचे किंवा सरकारी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे असे मत असेल की, प्रवासात आपण स्वतः किंवा अन्य व्यक्तीबरोबर असल्याशिवाय, रुग्णाने यथास्थिती, जिल्हा मुख्यालयापर्यंतचा किंवा बृहन्मुंबईपर्यंतचा प्रवास करणे रुग्णाच्या दृष्टीने सुरक्षित नाही तर, ती स्वतः रुग्णाबरोबर जाईल किंवा दुसऱ्या एखाद्या व्यक्तीला पाठविण्याची व्यवस्था करील. अशाबाबतीत, परिचर्या अधिकारी हा सरकारी कर्मचारी असेल तर तो कर्तव्यार्थ प्रवास करीत आहे असे मानण्यात येईल व त्यास जाण्याच्या व परतीच्या प्रवासाबद्दल दौऱ्यावरील प्रवासाप्रमाणे प्रवास भत्ता काढता येईल, आणि तो सरकारी कर्मचारी नसेल तर, त्यास प्रत्यक्ष खर्च मिळण्याचा हक्क असेल.

**७. आयुर्वैदिक किंवा होमिओपॅथिक उपचार**.—रुग्णावर आयुर्वेदिक किंवा होमिओपॅथिक उपचार करणे आवश्यक असेल तर त्यास यथास्थिति अधीक्षक, एम. ए. पोदार रुग्णालय, मुंबई, पुणे, नागपूर व नांदेड येथील आयुर्वेदिक रुग्णालयाचा अधीक्षक किंवा मुख्य वैद्यकीय अधिकारी किंवा मानसेवी प्रमुख वैद्यकीय अधिकारी होमिओपॅथिक रुग्णालय, मुंबई यांचा सल्ला घेता येईल आणि अशाबाबतीत, यथास्थिती अधीक्षक किंवा मुख्य वैद्यकीय अधिकारी या नियमांच्या प्रयोजनासाठी प्राधिकृत वैद्यकीय परिचर्या अधिकारी म्हणून मानण्यात येईल. अधीक्षक किंवा मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यास आपापल्या रुग्णालयात विकृती–चिकित्सा, अणूजीवशस्त्रीय, क्ष–किरण, शास्त्रीय किंवा अन्य तपासणी पद्धतीची व्यवस्था करता येईल.

**८. रुग्णाच्या निवासस्थानी उपचार**.—(१) प्राधिकृत वैद्यकीय परिचर्या अधिकाऱ्याच्या मते योग्य असे रुग्णालय नसल्यामुळे किंवा ते दूर असल्यामुळे किंवा आजारीपणाच्या तीव्रतेमुळे नियम ४, पोट–नियम (२) मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे रुग्णावर उपचार करणे शक्य नसेल तर त्या रुग्णाच्या निवासस्थानी त्याच्यावर उपचार करता येईल.

(२) पोट-नियम (१) अन्वये रुग्णावर त्याच्या निवासस्थानी उपचार करण्यात येईल तेव्हा, त्यास अशा उपचारासाठी आलेल्या खर्चाबद्दल, जर त्याच्यावर नियम ४, पोट–नियम (२) अन्वये उपचार केला असता तर त्यास या नियमान्वये विनामूल्य जो उपचार करून घेण्याचा हक्क प्राप्त झाला असता अशा उपचाराच्या खर्चाइतकी रक्कम मिळण्याचा त्यास हक्क असेल.

**९. या नियमान्वये अनुज्ञेय खर्चाखेरीज अन्य खर्चाची प्रतिपूर्ती करण्याचा हक्क असणार नाही**.—या नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, या नियमात स्पष्टपणे उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त, रुग्णास दिलेल्या कोणत्याही वैद्यकीय मदतीमुळे किंवा उपचारामुळे त्याला जो खर्च आला असेल त्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्याचा रुग्णाला हक्क प्राप्त होतो असे मानले जाणार नाही.

**१०. निरसन व व्यावृत्ती.**—महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (वैद्यकीय मदत) नियम, १९६३ हे उक्त नियमांचे निरसन करण्यापर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या गोष्टींच्या संबंधी असेल ते खेरीजकरून याद्वारे निरसित करण्यात येत आहेत.

## परिशिष्ट एक

## केंद्र/राज्य शासकीय कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय यांची वैद्यकीय देखभाल आणि/किंवा उपचार यांच्या संबंधात करण्यात आलेल्या वैद्यकीय खर्चाच्या परताव्याची मागणी करण्याकरिता करावयाच्या अर्जाचा नमुना

**टीप.**—प्रत्येक रुग्णाकरिता स्वतंत्र नमुना वापरावा.

१. शासकीय कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम (ठळक अक्षरात)

२. कर्मचारी ज्या कार्यालयात नोकरीत आहे त्या कार्यालयाचे नाव.

३. वित्तीय नियमांमध्ये व्याख्या केल्याप्रमाणे शासकीय कर्मचाऱ्याचे वेतन आणि इतर वित्तलब्धी स्वतंत्रपणे दर्शविण्यात याव्यात.

४. कामाचे ठिकाण

५. प्रत्यक्ष निवासस्थानाचा पत्ता

६. रुग्णाचे नाव आणि शासकीय कर्मचाऱ्याशी त्याचे / तिचे नाते.

**टीप.**—मुलाच्या बाबतीत वयसुद्धा नमूद करावे.

७. ज्या ठिकाणी रुग्ण आजारी झाला असेल ते ठिकाण

८. आजाराचे स्वरूप व कालावधी

९. मागणी केलेल्या रकमेचा तपशील :—

**वैद्यकीय देखभाल**

(एक) रोग लक्षणासाठी सल्ला देण्याची फी द्यावी–

(अ) ज्या वैद्यकीय अधिकाऱ्याचा सल्ला घेतला असेल त्याचे नाव व पदनाम आणि ज्या रुग्णालयाशी किंवा दवाखान्याशी तो संबंधित असेल त्या रुग्णालयाचे किंवा दवाखान्याचे नाव.

(ब) किती वेळा सल्ला घेण्यात आला ती संख्या आणि त्याच्या तारखा आणि प्रत्येक सल्ल्यासाठी दिलेली फी.

(क) रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्याच्या रोगचिकित्सा कक्षात (कन्सल्टिंग रुम) सल्ला घेण्यात आला की रुग्णाच्या निवासस्थानी सल्ला घेण्यात आला, ते नमूद करावे.

(दोन) रोग निदान करताना करण्यात आलेल्या विकृती चिकित्साविषयक, अणुजीवशास्त्रीय, क्ष-किरणशास्त्रीय किंवा इतर तत्सम चाचण्यांसाठी आकारण्यात आलेली फी त्यामध्ये पुढील गोष्टी नमूद कराव्यात—

(अ) ज्या रुग्णालयात किंवा प्रयोगशाळेत चाचण्या घेण्यात आल्या होत्या त्या रुग्णालयाचे किंवा प्रयोगशाळेचे नाव.

(ब) प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याच्या सल्ल्याने चाचणी घेण्यात आली होती किंवा कसे, घेण्यात आली असेल तर अशा अर्थाचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.

(तीन) बाजारातून खरेदी केलेल्या औषधांचा खर्च (औषधांची सूची व रोखीच्या पावत्या जोडण्यात याव्यात.)

**विशेषज्ञांचा सल्ला घेणे**

विशेषज्ञाला किंवा प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याव्यतिरिक्त किंवा प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्याव्यतिरिक्त एखाद्या अन्य वैद्यकीय अधिकाऱ्याला देण्यात आलेली फी, त्यामध्ये पुढील गोष्टी दर्शविण्यात याव्यात :—

(अ) ज्याचा सल्ला घेण्यात आला असेल त्या विशेषज्ञाचे किंवा वैद्यकीय अधिकाऱ्याचे नाव व पदनाम व तो ज्या रुग्णालयाशी संलग्न असेल त्या रुग्णालयाचे नाव.

(ब) किती वेळा सल्ला घेण्यात आला ती संख्या व जेव्हा सल्ला घेण्यात आला ती तारीख व प्रत्येक सल्ल्यासाठी आकारण्यात आलेली फी.

(क) सल्ला रुग्णालयात किंवा विशेषज्ञाच्या किंवा वैद्यकीय अधिकाऱ्याच्या रोगचिकित्सा कक्षात (कन्सल्टिंग रुम) किंवा रुग्णाच्या निवासस्थानी घेण्यात आला होता किंवा कसे.

(ड) त्या प्रांताच्या मुख्य प्रशासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याच्या पूर्वमान्यतेने व सल्ल्याने विशेषज्ञाचा किंवा वैद्यकीय अधिकाऱ्याचा सल्ला घेण्यात आला होता किंवा कसे. तसा सल्ला घेण्यात आला असेल तर तशा अर्थाचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे.

१०. मागणी केलेली एकूण रक्कम

११. सहपत्राची यादी

१२. कुटुंबातील व्यक्तींची संख्या म्हणजेच १५ ऑगस्ट १९६८ रोजी आणि त्यानंतर जिवंत असलेली मुले.

---

**शासकीय कर्मचाऱ्याने सही करून द्यावयाचे प्रतिज्ञापन**

मी याद्वारे जाहीर करतो की, या अर्जामध्ये केलेली निवेदने माझ्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी असून ज्या व्यक्तींवर वैद्यकीय खर्च करण्यात आला ती व्यक्ती पूर्णपणे माझ्यावर अवलंबून आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांची सही,<br>(कर्मचारी) ज्या कार्यालयाशी संबंधित<br>आहे त्या कार्यालयाचे नाव.

**परिशिष्ट दोन**

**शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक एमएजी/१०८४/११६/पीएच-९ए**

**दिनांक २१ जुलै १९८४.**

**परिशिष्ट "अ"**

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . येथे नोकरीत असलेल्या व श्री./श्रीमती . . . . . . . . . . . . . . . . . . . . यांची पत्नी/यांचा पती/यांचा मुलगा/यांची मुलगी/यांची आई/यांचे वडील/यांची बहिण असलेल्या श्री. /श्रीमती / कुमार / कुमारी . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . यांना पुढीलप्रमाणे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

**प्रमाणपत्र "अ"**

**(उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात न आलेल्या रुग्णाच्या बाबतीत द्यावयाचे.)**

मी, डॉ. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . याद्वारे असे प्रमाणित करतो की,

(अ) या रुग्णावर . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रुग्णालयात / माझ्या रोगचिकित्सा कक्षात (कन्सल्टिंग रुम) उपचार करण्यात आले होते आणि रुग्णास बरे वाटण्याकरिता/त्याची स्थिती अधिक खालावू नये याकरिता याबाबतीत मी लिहून दिलेली, खाली उल्लेखिलेली औषधे अत्यावश्यक होती. विहित केलेली औषधे ही, शासन निर्णय क्रमांक एमएजी-१०६८/६०११ (ए)-पी, दिनांक ११ फेब्रुवारी १९७१, एमएजी-१०६८/६०५११/(ए)-पी, दिनांक २९ एप्रिल १९७२ आणि शा.नि.क्र. एमएजी-१०७२/एस, दिनांक २४ सप्टेंबर १९७३, या अन्वये (वैद्यकीय खर्चाची) प्रतिपूर्ती मिळण्याजोग्या औषधांचा प्रवर्गात समाविष्ट करण्यात आली असून, ती रुग्णांना पुरवठा करण्याकरिता . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . (रुग्णालयाचे नाव) या रुग्णालयाच्या साठ्यात नाहीत व त्यामध्ये ज्यांच्याकरिता समान उपचार-शास्त्रीय मूल्य असणारे (रोगनिवारण करण्याची तितकीच क्षमता असणारे) अधिक स्वस्त पदार्थ उपलब्ध आहेत अशा दुकानातच तयार करून मिळणाऱ्या औषधांचा तसेच मूलतः अन्नपदार्थ, शक्तीवर्धके (टॉनिक्स) किंवा जंतुनाशके यांचा समावेश होत नाही.

| अनुक्रमांक | औषधाचे/उपयंत्राचे नाव व त्याचा प्रवर्ग | दररोजचे प्रमाण | एकूण आवश्यक असलेले प्रमाण |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . | | |
| २ | . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . | | |
| ३ | . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . | | |
| ४ | . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . | | |
| ५ | . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . | | |

(ब) रुग्णास . . . . . . . . . . . . . . . . . . .हा आजार असून/होता व . . . . . . . . . . . . . . . . पासून . . . . . . . . . . . . . . . . . . . . पर्यंत मी त्याच्यावर/तिच्यावर उपचार करीत आहे/होतो.

(क) रुग्णावर प्रसूतिपूर्व/प्रसूत्यत्तर उपचार करण्यात आले नाहीत/आले नव्हते.

(ड) क्ष-किरण चाचण्या, प्रयोगशाळा चाचण्या इत्यादिकरिता रुपये . . . . . . . . . . . . . . . . इतका खर्च करण्यात आला व तो करणे आवश्यक होते व माझ्या सल्ल्यावरून . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . (रुग्णालयाचे किंवा प्रयोगशाळेचे नाव) येथे या चाचण्या करण्यात आल्या.

(इ) रुग्णास रुग्णालयात दाखल करणे आवश्यक नाही/नव्हते.

ठिकाण . . . . . . . . . . . .

दिनांक . . . . . . . . . . . .

वैद्यकीय अधिकाऱ्याचे नाव, सही व पदनाम (अधिकारी)
ज्या रुग्णालयाशी/दवाखाना इत्यादीशी संबंधित असलेल्या
रुग्णालयाचे/दवाखान्याचे नाव व शिक्का.

**परिशिष्ट तीन**

**जोडपत्र "ब"**

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . येथे नोकरीत असलेल्या व श्री./श्रीमती . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . यांची पत्नी/यांचा पती/यांचा मुलगा/यांची मुलगी/यांचे विडील/ यांची आई असलेल्या श्री. /श्रीमती / कुमार / कुमारी . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . यांना पुढीलप्रमाणे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

**प्रमाणपत्र "अ"**

**(उपचाराकरिता रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या रुग्णाच्या बाबतीत द्यावयाचे.)**

(रुग्णालयातील त्या प्रकरणाच्या प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याने यावर स्वाक्षरी करावी.)

मी, डॉक्टर . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . याद्वारे असे प्रमाणित करतो की,——

(अ) या रुग्णास माझ्या /डॉ. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . (वैद्यकीय अधिकाऱ्याचे नाव व पदनाम) यांच्या सल्ल्यावरून रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

(ब) हा रुग्ण . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . येथे उपचार घेत असून रुग्णास बरे वाटण्याकरिता /त्याची स्थिती अधिक खालावू नये याकरिता याबाबतीत मी लिहून दिलेली, खाली उल्लेखिलेली औषधे अत्यावश्यक होती. विहित केलेली औषधे ही, या प्रमाणपत्रासोबत जोडलेल्या जोडपत्र-एक/जोडपत्र-दोन/जोडपत्र-तीनच्या शासन निर्णय क्रमांक एमएएस-१०६८/६०५११/(ए)/पी, दिनांक ११ फेब्रुवारी १९७१, क्र. एमएजी-१०७२/ ६००७२/एस, दिनांक २९ एप्रिल १९७२ व शा.नि.क्र. एमएजी-१०७२-६००७२-एस, दिनांक २४ सप्टेंबर १९७३ मध्ये औषधांच्या प्रवर्गात समाविष्ट करण्यात आली असून रुग्णांना पुरवठा करण्याकरिता . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . (रुग्णालयाचे नाव) या रुग्णालयातील साठ्यात ही औषधे उपलब्ध नाहीत व त्यामध्ये, ज्यांच्याकरिता समान उपचारशास्त्रीय मूल्य असणारे (रोगनिवारण करण्याची तितकीच क्षमता असणारे) अधिक स्वस्त पदार्थ उपलब्ध आहेत, अशा दुकानातच तयार करून मिळणाऱ्या औषधांचा तसेच मूलतः अन्नपदार्थ, शक्तिवर्धके किंवा जंतुनाशके यांचा समावेश होत नाही.

| अनुक्रमांक | औषधाचे/उपयंत्राचे नाव व त्याचा प्रवर्ग क्रमांक | दररोजचे प्रमाण | एकूण आवश्यक असलेले प्रमाण |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . | | | |
| २ . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . | | | |
| ३ . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . | | | |
| ४ . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . | | | |
| ५ . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . | | | |

(क) रुग्णास . . . . . . . . . . . . . . . . . हा आजार असून/होता व . . . . . . . . . . . . . . . . पासून . . . . . . . . . . . . . . . . . पर्यंत मी त्याच्यावर/तिच्यावर उपचार करीत आहे/होतो.

(ड) क्ष-किरण चाचण्या, प्रयोगशाळा चाचण्या इत्यादिकरिता रुपये . . . . . . . . . . . . . . . . इतका खर्च करण्यात आला व तो करणे आवश्यक होते व माझ्या सल्ल्यावरून . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . (रुग्णालय किंवा प्रयोगशाळेचे नाव) येथे या चाचण्या करण्यात आल्या.

ठिकाण . . . . . . . . . . . .

दिनांक . . . . . . . . . . . .

रुग्णालयातील या प्रकरणातील प्रभारी
अधिकाऱ्याचे नाव, स्वाक्षरी व पदनाम आणि
रुग्णालयाचे नाव व शिक्का.

परिशिष्ट चार

**नमुना "क"**

**तातडीच्या वैद्यकीय उपचारांकरिता शासकीय कर्मचाऱ्याला द्यावयाचे खर्चाचे प्रमाणपत्र**

(उपचार करणाऱ्या खाजगी व्यवसायीने द्यावयाचे)

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की—

.................................................. येथे .................................. या पदावर नोकरीस असलेल्या व ................................................................................................... या पत्त्यावर राहणाऱ्या श्री./श्रीमती .................................................................. यांची/यांचा, पत्नी/पती/मुलगा/मुलगी/ वडील/आई/भाऊ/बहीण श्री./श्रीमती ............................................................ यांच्यावर/हिच्यावर दिनांक .................................... पासून .................................... पर्यंत तातडीने उपचार करण्याची गरज असलेला रुग्ण म्हणून ........................................................ यांनी पुढील उपचार केले होते :—

| | |
|---|---|
| पुढील तक्रारींकरिता | ........................................................................ |
| | ........................................................................ |
| | ........................................................................ |
| दिसून आलेले प्रमुख लक्षण | ........................................................................ |
| | ........................................................................ |
| | ........................................................................ |
| आवश्यक ती तातडीची तपासणी व | ........................................................................ |
| तिचे निष्कर्ष. | ........................................................................ |
| | ........................................................................ |
| रोगनिदान | ........................................................................ |

उपचाराकरिता झालेला एकूण खर्च (जोडपत्र "ड") रुपये .................. इतका होता, व त्याचा तपशील नमुना "ड" मध्ये देण्यात आला आहे याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, तातडीच्या उपचारानंतर रुग्णाला पुढील उपचाराकरिता प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्यास भेटण्याचा सल्ला देण्यात आला होता.

| | | | |
|---|---|---|---|
| दिनांक | .................................................. | स्वाक्षरी | ............................................. |
| | | डॉक्टराचे नाव | ............................................. |
| ठिकाण | .................................................. | नोंदणी क्रमांक | ............................................. |
| | | रुग्णालयाचे नाव | ............................................. |

परिशिष्ट पाच

**नमुना "ड"**

**खाजगी रुग्णालयात तातडीचे उपचार करण्यात आलेल्या शासकीय कर्मचाऱ्याकरिता करण्यात आलेल्या खर्चाचे (तपशीलवार) प्रमाणपत्र**

(उपचार करणाऱ्या डॉक्टरने भरावयाचे व जोडपत्र "ड" ला जोडावयाचे)

रुग्णाचे नाव :

रुग्णालयात दाखल केल्याची तारीख :

रुग्णालयातून घरी पाठवल्याची तारीख :

रुग्णालयाचा नोंदणी क्रमांक :

(अ) (१) सल्ला :

(२) दररोज रु. ................................. या दराने दिनांक ................. पासून ................ पर्यंत एकूण .................. दिवसांचा रुग्णालयात ठेवल्याचा खर्च.

(३) शस्त्रक्रियेवरील खर्च :

(४) शस्त्रक्रियागारात केलेला खर्च :

(५) बधिरीकरणावरील खर्च :

(६) दिलेल्या भेटी (व्हिजिटस्) :

(अ) प्रत्येक भेटीसाठी (व्हिजिट) रु. ........... याप्रमाणे नेहमीच्या भेटीची संख्या.

(ब) प्रत्येक भेटीसाठी (व्हिजिट) रु. ........... प्रमाणे विशेष भेटीसाठी रुग्णाला ........... या डॉक्टरांकडे जितक्या वेळा पाठविले ती संख्या.

डॉक्टर ..................... यांच्याकडे दर भेटीसाठी (व्हिजिटला) रु. ........... या दराने जितक्या वेळा पाठविले ती संख्या.

डॉक्टर ..................... यांच्याकडे दरः भेटीसाठी (व्हिजिटला) रू..........(या दराने जितक्या वेळा पाठविले ती संख्या.

(७) दररोज रुपये ..........................या दराने:
...................... दिवस इन्क्युबेटरचा वापर केला.

(८) प्रतिदिनी रुपये ....................... या दराने:
..................... दिवस मॉनिटरचा वापर केला.

(९) तापसण्या :—

(अ) विकृतिचिकित्सा (पॅथॉलॉजी) प्रयोगशाळा. :

(ब) क्ष-किरण छायाचित्रे :

(क) प्रत्येक छत्स्पद विद्युतलेखासाठी (ईसीजी) रुपये ............. प्रमाणे छत्स्पद विद्युतलेखाचा खर्च. :

(ड) इतर

(ब) औषधे

| अनुक्रमांक | औषधाचे नाव | औषधाची किंमत (रुपये पैसे) |
|---|---|---|
| ............... | ......................................................................... | .......................... |
| ................ | ......................................................................... | .......................... |
| ............... | ......................................................................... | .......................... |
| | एकूण ... | .......................... |
| | एकूण बेरीज (अ + ब) ... | .......................... |

(यथार्थ अनुवाद)

**न. ब. पाटील,**

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.

परिशिष्ट सहा

**(केवळ मधुमेह झालेल्या रुग्णांवर उपचार केले असताना द्यावयाचे प्रमाणपत्र)**

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की—

श्री./श्रीमती/कुमारी ..........................................................................................

(श्री./श्रीमती/कुमारी ........................................................................ यांचे/यांची पती/पत्नी/ मुलगा/मुलगी/आई/वडील/भाऊ/बहीण)

........................................................................................ विभागाचे कर्मचारी हे

माझ्या वैद्यकीय सल्ला कक्षात / रुग्णालयात मधुमेहाच्या रोगावर उपचार घेत असून दिनांक ....................................................

पासून ...................................................................... पर्यंतच्या कालावधीत त्यांच्या रोगाची प्रारंभिक

अवस्था असताना त्यावर उपचार करण्यासाठी / रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यासाठी

त्यांना "इन्सुलीन", "नादीसन" वगैरे औषधे देण्यात आली होती. उपरोक्त रुग्णाची प्रकृती गंभीर झाल्यामुळे त्यास रुग्णालयात ठेवणे भाग पडले.

त्याच्या आजाराचे दिनांक ....................................................... रोजी निदान झाले.

अधिकृत वैद्यकीय परिचर्या अधिकारी
(नाव व पदनाम)

ठिकाण :

दिनांक :

रुग्णालय/वैद्यकीय सल्ला कक्ष/यातील
प्रभारी वैद्यकीय अधिकारी.

---

**टीप.—**प्रत्यक्ष शासकीय कर्मचाऱ्यावरील उपचारांच्या बाबतीत प्रमाणपत्र द्यावयाचे असेल तर कंसातील मजकूर वगळण्यात यावा.

## परिशिष्ट

[नियम ४ (३) **पहा**]

### विधानमंडळाच्या सदस्यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती

शासन निर्णय, नगरविकास व गृहनिर्माण विभाग,
क्रमांक एमएजी. १०६६/२६४९७-एस, दिनांक २९ ऑगस्ट १९६६

सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे पत्र क्रमांक १०२६५-एच, दिनांक २९ एप्रिल १९६६.

**शासन निर्णय.—**महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (वैद्यकीय मदत) नियम, १९६६ नियम ३ व ४ च्या पोट-नियम (१) अन्वये रुग्णास विनामूल्य वैद्यकीय मदत मिळण्याचा व उपचार करून घेण्याचा हक्क आहे. नियमात आणखी अशीही तरतूद करण्यात आली आहे की, रुग्णाला विनामूल्य मदत मिळण्याचा व उपचार करून घेण्याचा हक्क असेल तेव्हा, अशा वैद्यकीय मदतीसाठी व उपचारासाठी त्याने दिलेल्या रकमेची प्रतिपूर्ती राज्य सरकार ठरवतील अशा रीतीने राज्य सरकारकडून त्याला करण्यात येईल.

शासन आता असा निदेश देत आहे की, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (वैद्यकीय मदत) नियम, १९६६ मध्ये व्याख्या केलेल्या रुग्णाला जेव्हा जेव्हा वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करण्याचा हक्क असेल तेव्हा तेव्हा त्याने आपली मागणी, सरकारी कर्मचारी आपली मागणी ज्या प्रपत्रात सादर करतो त्या प्रपत्रात सादर करावी (प्रपत्र शासन निर्णयाला जोडले आहे). यथोचितरिक्या भरलेले व रुग्णांच्या प्राधिकृत वैद्यकीय परिचर्या अधिकाऱ्याने प्रतिस्वाक्षरित केलेले प्रपत्र वेतन, भत्ते इत्यादी देण्याच्या प्रयोजनासाठी, विधानसभेच्या/विधानपरिषदेच्या संबंधित सदस्याच्या आहरण व संवितरण अधिकारी असलेल्या जिल्हा कोषागार अधिकाऱ्याकडे सादर करावे. जिल्हा कोषागार अधिकारी त्यानंतर महाराष्ट्र विधानसभेच्या/विधानपरिषदेच्या सदस्याने महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (वैद्यकीय मदत) नियम, १९६६ अनुसार सादर केलेल्या बिलांचे परिनिरीक्षण करील व त्यानंतर विधानसभेच्या/विधानपरिषदेच्या सदस्याला रक्कम देईल.

### परिशिष्ट 'अ'

श्री./श्रीमती .................................................................. यांची/यांचे पत्नी/पती/मुलगा/मुलगी/ आई/वडील/बहीण/भाऊ श्री./श्रीमती/कुमार/कुमारी ........................................................ यांना दिलेले प्रमाणपत्र.

### प्रमाणपत्र 'अ'

### (उपचारासाठी रुग्णालयात दाखल न केलेल्या रुग्णांच्याबाबतीत द्यावयाचे)

मी, डॉक्टर .................................................................. याद्वारे प्रमाणित करतो की,—

(अ) मी, माझ्या संमंत्रक कक्षात / रुग्णाच्या निवासस्थानी दिनांक .............................. (येथे तारीख लिहावी) ला ............................ दिलेल्या सल्ल्याबाबत रु. .............................. फी आकारली.

(ब) मी माझ्या संमंत्रक कक्षात/रुग्णाच्या निवासस्थानी, दिनांक .......................... (येथे तारीख लिहावी) ला स्नायूतील (इन्ट्रामस्क्यूलर) इंजेक्शने/सब क्युटेनिअस इंजेक्शने देण्यासाठी रुपये फी ...................... आकारली.

(क) दिलेली इंजेक्शने प्रतिक्षमतेच्या किंवा रोगप्रतिबंधक प्रयोजनासाठी दिली होती/नव्हती.

(ड) ............................ रुग्णालयात/माझ्या संमंत्रक कक्षात रुग्णावर उपचार करण्यात आले व या संबंधात मी लिहून दिलेली खाली नमूद केलेली औषधे रुग्ण बरा होण्यासाठी/त्याची प्रकृती गंभीररित्या बिघडू नये म्हणून आवश्यक होती. लिहून दिलेल्या औषधांचा, भारत सरकारने तयार केलेल्या अनुज्ञेय नसणाऱ्या औषधांच्या यादीत समावेश नाही व खाजगी रुग्णांचा पुरवठा करण्यासाठी ती ...................................... (रुग्णालयाचे नाव) येथे साठवलेली नाहीत आणि त्यात, ज्या औषधी पदार्थासाठी तितक्याच रोगनिवारक मूल्याचे स्वस्त पदार्थ उपलब्ध आहेत असा एकस्वाधिकार औषधी पदार्थांचा समावेश नाही. तसेच त्यात जे मुख्यतः अन्नपदार्थ, प्रसाधने किंवा रोगाणुनाशके आहेत अशा औषधी पदार्थांचा समावेश नाही.

| | औषधाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १. | ........................................................ | ................................ |
| २. | ........................................................ | ................................ |
| ३. | ........................................................ | ................................ |

(ई) रुग्ण .......................... ने आजारी आहे/होता आणि दिनांक .................................. पासून दिनांक ......................................... पर्यंत मी त्याच्यावर उपचार करीत आहे/होतो.

(फ) रुग्णावर प्रस्तूतीपूर्व किंवा प्रसूतीनंतर उपचार केले होते/नव्हते.

(ग) क्ष-किरण, प्रयोगशाळा तपासणी इत्यादींसाठी केलेला रु. ............................... खर्च आवश्यक होता व ................................... (रुग्णालयाचे किंवा प्रयोगशाळेचे नाव) येथे माझ्या सल्ल्यानुसार अशी तपासणी करण्यात आली.

(ह) विशेषज्ञाच्या सल्ल्यासाठी मी रुग्णाला डॉक्टर ............................. यांचेकडे पाठविले आणि नियमान्वये आवश्यक असलेली * .................................. यांची आवश्यक ती मान्यता मिळविली होती.

(आय) रुग्णाला रुग्णालयात ठेवण्याची आवश्यकता होती/नव्हती.

वैद्यकीय अधिकाऱ्याची सही व तो ज्या
रुग्णालयात/दवाखान्यात आहे त्या
रुग्णालयाचे/दवाखान्याचे नाव.

ठिकाण :
दिनांक :

**टीप.**—लागू नसलेल्या बाबी खोडाव्यात बाब (अ) सक्तीची आहे आणि ती सर्व बाबतीत वैद्यकीय अधिकाऱ्याने भरली पाहिजे.

* येथे नियम ४(१) अन्वये ज्या अधिकाऱ्यांची मान्यता मिळवली त्या अधिकाऱ्याने पूर्ण पदनाम लिहावे.

## परिशिष्ट 'ब'

श्री./श्रीमती ................................................................. यांची/यांचे पत्नी/पती/मुलगा/मुलगी/आई/वडील/बहीण/भाऊ श्री./श्रीमती/कुमार/कुमारी ....................................................... यांना दिलेले प्रमाणपत्र.

### प्रमाणपत्र 'ब'

(उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या रुग्णांच्याबाबतीत द्यावयाचे)

### भाग 'अ'

(रुग्णालयात त्या रुग्णावर उपचार करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याने सही करावयाचे)

मी, डॉक्टर ................................................. याद्वारे ........................................ च्या सल्ल्यावरून प्रमाणित करतो की,——

(अ) रुग्णाला माझ्या, ................................................................ (वैद्यकीय अधिकाऱ्याचे नाव व पदनाम) सल्ल्यावरून रुग्णालयात दाखल केले होते.

(ब) ........................................... येथे, मी रुग्णावर उपचार करीत होतो आणि या संबंधात मी लिहून दिलेली खाली उल्लेख केलेली औषधे रुग्ण बरा होण्यासाठी/त्याची प्रकृती गंभीररीत्या बिघडू नये म्हणून आवश्यक होती. लिहून दिलेल्या औषधांचा, भारत सरकारने तयार केलेल्या अनुज्ञेय नसणाऱ्या औषधांच्या यादीत समावेश नाही व ती खाजगी रुग्णांना पुरवठा करण्यासाठी ........................................... (रुग्णालयाचे नाव) येथे साठवलेली नाहीत आणि त्यात, ज्या औषधी पदार्थासाठी तितक्याच रोगनिवारक मुल्याचे स्वस्त पदार्थ उपलब्ध आहेत अशा एकस्वाधिकार औषधी पदार्थांचा समावेश नाही तसेच त्यात जे मुख्यतः अन्नपदार्थ, प्रसाधने किंवा रोगाणुनाशके आहेत अशा औषधी पदार्थांचा समावेश नाही.

| | औषधाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १. | ........................................................ | ............................... |
| २. | ........................................................ | ............................... |
| ३. | ........................................................ | ............................... |
| ४. | ........................................................ | ............................... |
| ५. | ........................................................ | ............................... |

(क) दिलेली इंजेक्शने प्रतिक्षमतेच्या किंवा रोगप्रतिबंधक प्रयोजनासाठी दिली होती/नव्हती.

(ड) रुग्ण .......................... ने आजारी आहे/होता आणि दिनांक ................................... पासून दिनांक ......................................... पर्यंत मी त्याच्यावर उपचार करीत आहे/होतो.

(ई) क्ष-किरण, प्रयोगशाळा तपासणी इत्यादींसाठी केलेला रु. ............................... खर्च आवश्यक होता व ................................... (रुग्णालयाचे किंवा प्रयोगशाळेचे नाव) येथे माझ्या सल्ल्यानुसार अशी तपासणी करण्यात आली.

(फ) विशेषज्ञाच्या सल्ल्यासाठी मी, डॉक्टर .............................. यांना बोलाविले आणि नियमान्वये आवश्यक असलेली * .................................. यांची आवश्यक ती मान्यता मिळविली होती.

रुग्णालयातील त्या रुग्णावर उपचार
करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याची सही व
पदनाम आणि रुग्णालयाचे नाव.

## भाग ‘ ब ’

मी प्रमाणित करतो की, ..................................................... रुग्णालयात रुग्णावर उपचार करण्यात आले आणि खास परिचारिकांच्या ज्या सेवेसाठी रुपये .................... खर्च झाला (जोडलेली बिले व पावत्या पहाव्यात) त्या सेवा रुग्ण बरा होण्यासाठी/त्याची प्रकृती गंभीररित्या बिघडू नये म्हणून आवश्यक होत्या.

रुग्णालयातील त्या रुग्णावर उपचार
करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याची सही व
पदनाम आणि रुग्णालयाचे नाव.

---

* येथे नियम ४(१) अन्वये ज्या अधिकाऱ्याची मान्यता मिळविली त्या अधिकाऱ्याचे पूर्ण नाव व पदनाम लिहावे.

**महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य विद्यमान व माजी विधानमंडळ सदस्यांना वैद्यकीय सुविधा लागू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

शासन निर्णय क्रमांक एमएजी १०८५/३६२७/आरोग्य-९,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ ऑक्टोबर १९८८.

**शासन निर्णय**

महाराष्ट्र विधानमंडळाच्या विद्यमान सदस्यांना व त्यांच्या कुटुंबियांना ज्या वैद्यकीय सवलती लागू आहेत. त्याच सवलती विधानमंडळाच्या माजी सदस्यांनाही लागू करण्याबद्दलचा प्रश्न शासनाच्या काही काळ विचाराधीन होता.

२. शासन आता असे आदेश देत आहे की, महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणांसहित शासकीय कर्मचाऱ्यांसाठी असलेले तसेच विद्यमान विधानमंडळ सदस्यांना लागू केलेले खाली नमूद केलेले आदेश माजी आमदारांना व त्यांच्या कुटुंबियांनाही जसेच्या तसे लागू करण्यात येत आहेत :—

(१) एमएजी. १०८१/४९०७/पीएच-९, दिनांक १९ ऑक्टोबर १९८३.
(२) एमएजी. १०८१/४९०७/पीएच-९, दिनांक १९ ऑक्टोबर १९८४.
(३) एमएजी. १०८४/११६/पीएच-९, दिनांक २१ जुलै १९८४.
(४) एमएजी. १०८४/११६/पीएच-९, दिनांक २४ ऑगस्ट १९८४.
(५) एमएजी. १०८२/४१९/सीआर-६३/पीएच-९, दिनांक २१ डिसेंबर १९८४.
(६) एमएजी. १०८१/४९०७/पीएच-९, दिनांक २ जानेवारी १९८५.
(७) एमएजी. १०८४/४१५७/सीआर. १५६/पीएच-९, दिनांक २९ एप्रिल १९८५.
(८) एमएजी. १०८३/४११९/पीएच-९, दिनांक २१ ऑगस्ट १९८५.
(९) एमएजी. १०८१/२९१६/आरोग्य-९, दिनांक ४ फेब्रुवारी १९८६.
(१०) एमएजी. १०८६/१०३/आरोग्य-९, दिनांक १५ मे १९८६.
(११) एमएजी. १०८६/१५६४/आरोग्य-९, दिनांक १५ जुलै १९८६.
(१२) एमएजी. १०८६/२२६०/आरोग्य-९, दिनांक २७ एप्रिल १९८७.
(१३) एमएजी. १०८६/४९०७/आरोग्य-९, दिनांक १ सप्टेंबर १९८७.
(१४) एमएजी. १०८६/४९०७/(२)/आरोग्य-९, दिनांक १ सप्टेंबर १९८७.

३. उपरोक्त आदेशानुसार देण्यात येणाऱ्या वैद्यकीय सुविधांपैकी काही प्रमुख सुविधा खालीलप्रमाणे आहेत :—

(१) शासकीय रुग्णालयात विनामूल्य औषधोपचार.

(२) शासकीय रुग्णालयात उपलब्ध नसलेली औषधे बाहेरून विकत आणल्यास व प्राधिकृत अधिकाऱ्याने प्रमाणित केल्यास प्रतिपूर्ती करणे.

(३) हृदयावरील शस्त्रक्रिया, मूत्रपिंडरोपण, रक्ताचा कर्करोग, बायपास कॉरोनरी शस्त्रक्रिया यासाठी लागणारा खर्च तसेच त्यासाठी लागणाऱ्या उपकरणांची खरेदी, किंमती औषधे व औषधोपचार यांवरील संभाव्य खर्च इतके पण रुपये ४५ हजाराच्या कमाल मर्यादेपर्यंत अग्रीम मंजूर करणे.

(४) ज्या आजारांवरील औषधोपचारासाठी अद्याप भारतामध्ये सर्वत्र सोय उपलब्ध झालेली नाही. अशा आजारांसाठी शासनाने नेमलेल्या वैद्यकीय मंडळाच्या अनुमतीने घेतलेल्या परदेशातील औषधोपचारासाठी तसेच भारतामध्ये मान्यताप्राप्त संस्थांकडून घेतलेल्या उपचारावर केलेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करणे.

(५) आकस्मिक निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात आंतररुग्ण म्हणून घेतलेल्या औषधोपचाराच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी शासनाने ठरविलेल्या २१ आजारांवर औषधोपचार घेतल्यास संबंधित प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या संमतीने, वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करणे.

(६) कर्क रोगाच्या औषधोपचाराकरिता मान्यताप्राप्त रुग्णालयातील औषधोपचाराच्या खर्चाची प्रतिपूर्ती करणे.

४. उपरोक्त आदेशांनुसार देण्यात येणाऱ्या वैद्यकीय सुविधांसाठी विधानमंडळ सदस्यांच्या कुटुंबियांमध्ये महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ च्या नियम २(३) नुसार पुढील व्यक्तींचा समावेश होऊ शकेल :—

(१) माजी विधानमंडळ सदस्याची पत्नी किंवा पती.

(२) माजी विधानमंडळ सदस्यावर अवलंबून असतील अशी विधानमंडळ सदस्यांची औरस मुले, सावत्र मुले, कायदेशीर दत्तक घेतलेली मुले.

(३) माजी विधानमंडळ सदस्यावर पूर्णपणे अवलंबून असलेले त्याचे आई-वडील.

**टीप.**—महिला माजी विधानमंडळ सदस्याला तिच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या/तिच्याबरोबर रहात असलेल्या तिच्या आई-वडिलांची किंवा सासू-सासऱ्यांची निवड करता येईल.

(४) माजी विधानमंडळ सदस्यावर पूर्णपणे अवलंबून असलेला १८ वर्षे वयाखालील अविवाहित भाऊ.

(५) माजी विधानमंडळ सदस्यावर अवलंबून असलेल्या अविवाहित बहिणी व घटस्फोटीत बहिणी (वय लक्षात न घेता).

५. यासाठी होणारा खर्च महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने त्यांच्या संबंधित लेखाशीर्षामधून भागवावा.

६. हे आदेश वित्त विभागाच्या संमतीने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक सीआर-१३०७/व्यय-१३, दिनांक ११ ऑक्टोबर १९८८ नुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/

**र. शं. पिसे,**

शासनाचे उप सचिव.

**विधानमंडळ माजी सदस्यांना वैद्यकीय सुविधा लागू करणे.**

परिपत्रक

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

क्रमांक एमएजी १०८५/३६२७/आरोग्य-९, बम
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ एप्रिल १९८९.

**वाचा.**—शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी. १०८५/३६२७/आरोग्य-९, दिनांक १२ ऑक्टोबर १९८८.

**शासन परिपत्रक**

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी. १०८५/३६२७/आरोग्य-९, दिनांक १२ ऑक्टोबर १९८८ नुसार माजी विधानमंडळ सदस्यांना, शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असणाऱ्या वैद्यकीय सुविधा लागू करण्यात आल्या आहेत. शासन आता असे आदेश देत आहे की, माजी विधानमंडळ सदस्यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची रक्कम अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी (Drawing and Disbursing Officer) त्यांच्या संबंधित जिल्ह्यांचे कोषागार अधिकारी व उप कोषागार अधिकारी हे असतील.

२. वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या सवलतींसाठी विद्यमान विधानमंडळ सदस्यांसाठी जी पद्धती अनुसरली जाते तीच पद्धती माजी विधानमंडळ सदस्यांसाठी अनुसरण्यात यावी.

३. हा शासन निर्णय वित्त विभाग व विधान कार्य विभाग यांच्या संमतीने त्यांचा अनौपचारिक संदर्भ अनुक्रमे क्रमांक सीआर. १०७/८९/व्यय-१२, दिनांक ९ फेब्रुवारी १९८९ व क्रमांक ६०/चार, दिनांक १० एप्रिल १९८९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/

**र. शं. पिसे,**

शासनाचे उप सचिव.

**OFFICE OF THE ACCOUNTANT GENERAL**
**(A & E)-I**

M. K. Road, Bombay 400 020, Dated 16th January 1990
No. Tm/22ST/Ex-MLA/Med Rules.

To,

All Treasury Officers in Maharashtra State.

*Subject.*—Authorisation for drawal of Medical Reimbursement claims of Ex-MLA's, MLC's or their families.

Sir,

The scope of the Maharashtra Civil Services (Medical Attendance) Rules, 1961, and the Maharashtra Legislature Members (Medical Attendance) Rules, 1966 and also all Medical benefits/facilities available under different orders issued by the State Government from time to time, have now been made applicable to the Ex-MLA's, MLC's and their families also *vide* GR. Public Health Department, No. MAG/1085/3627/Health, dated 12th October 1988.

2. Accordingly Ex-MLA's, MLC's and their family members have now become eligible for medical attendance benefits and reimbursement of any expenditure for medical treatment incurred by them as admissible under rules to the sitting MLA's, MLC's, and other State Government employees.

3. The Government have further directed *vide* GRPHD, No. 1085/3627/Health-9, dated 11th April 1989 that the Treasury Officers/the Sub-Treasury Officers from where the Ex-MLA's, MLC's, is drawing his pension, shall be the drawing and disbursing officer in respect of reimbursement claims of EX-MLA's, MLC's or their family members preferred under these rules. The procedure for preferring medical reimbursement claims countersignature by authorised Medical Attendant and presenting the bill for payment at the Treasury Office as prescribed in Appendix to the Maharashtra Legislature Members (Medical Attendance) Rules, 1966 shall apply in the case of reimbursement claims of Ex-MLA's, MLC's or their family members.

4. The expenditure on this account shall be debitable to the head as under :—

2011 Parliament/State/Union Territory Legislature.

02 State/Union Territory-State Legislature.

101 Legislative Assembly.

102 Legislative Council.

5. The Treasury Officers are requested to follow the procedure outlined above, while dealing with the reimbursement claims of Ex-MLA's, MLC's and their family members.

The receipt of this letter may kindly be acknowledged.

Yours faithfully,

(Sd/-)
Accounts Officer/TM.

**माजी विधानमंडळ सदस्यांना वैद्यकीय सुविधा लागू करणे.**

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

शासन निर्णय क्रमांक एमएजी १०८९/१९३७/आरोग्य-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ मार्च १९९०.

**वाचा.—**(१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी. १०८५/३६२७/आरोग्य-९, दिनांक १२ ऑक्टोबर १९८८.

(२) शासन परिपत्रक, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी. १०८५/३६२८/आरोग्य-९, दिनांक ११ एप्रिल १९८९.

(३) महालेखापाल (लेखा व परीक्षा)-१, महाराष्ट्र यांचे परिपत्रक क्रमांक टीएम २२/एसटी/एइझा/एमएलए/मेडिकल रूल्स/४६७/४७८, दिनांक १७ जानेवारी १९९०.

**शासन निर्णय**

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी. १०८५/३६२७/आरोग्य-९, दिनांक १२ ऑक्टोबर १९८८ अन्वये महाराष्ट्र विधानमंडळ विद्यमान सदस्यांना व त्यांच्या कुटुंबियांना, शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणांसहीत लागू केलेले सर्व आदेश जसेच्या तसे माजी विधानमंडळ सदस्यांना लागू करण्यात आलेले आहेत. तसेच यासाठी वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची रक्कम अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून त्यांचे संबंधित जिल्ह्याचे कोषागार अधिकारी व उप कोषागार अधिकारी यांना घोषित करण्यात आलेले आहे. माजी विधानमंडळ सदस्यांना वैद्यकीय सुविधांचा लाभ सुलभतेने मिळावा म्हणून या संदर्भात खालीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे :—

(१) माजी विधानमंडळ सदस्य, ते जेथून निवृत्तिवेतन घेतात त्या अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई/जिल्हा कोषागारे/उप कोषागारे येथे त्यांची वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्तीची देयके (महाराष्ट्र कोषागार नियम, १८-अ नमुन्यात) सादर करण्यासाठी त्यांना आहरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

(२-अ) शासकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभागात औषधोपचार घेणाऱ्या माजी विधानमंडळ सदस्यांनी त्यांची वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्तीची देयके महाराष्ट्र कोषागार नियमातील नमुना क्रमांक १८-अ मध्ये संबंधित कोषागार अधिकाऱ्यांकडे सादर करावीत. ही देयके सादर करताना बाह्यरुग्ण विभागातील वैद्यकीय अधिकाऱ्याने निर्देशित केलेली औषधांची प्रमाणित यादी, परिशिष्ट-अ (प्रत सोबत जोडली आहे) व औषधांच्या पावत्या सोबत जोडणे आवश्यक आहे. अशा देयकांबरोबर सादर करण्यात आलेल्या औषधांच्या पावत्यांवर प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या प्रतिस्वाक्षरीची गरज नाही. तसेच महाराष्ट्र कोषागार नियमातील नमुना १८-अ मधील देयकांवर कोणत्याही अधिकाऱ्यांच्या प्रतिस्वाक्षरीची जरूरी नाही. **खाजगी रुग्णालयात घेतलेल्या बाह्यरुग्ण उपचाराची खर्चाची प्रतिपूर्ती होणार नाही.**

(२-ब) शासकीय रुग्णालयात आंतररुग्ण म्हणून औषधोपचार घेणाऱ्या माजी विधानमंडळ सदस्यांनी त्यांची अशा वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची देयके वरील (२-अ) प्रमाणेच परिशिष्ट " ब " सह (प्रत जोडली आहे) संबंधित कोषागार अधिकाऱ्याकडे सादर करावीत.

(३-अ) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी. १०८६/४९०७/आरोग्य-९, दिनांक १ सप्टेंबर १९८७ अन्वये आकस्मिक निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात आंतररुग्ण म्हणून घेतलेल्या औषधोपचाराच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत मार्गदर्शक तत्त्वे विहित करण्यात आली आहेत. त्यात उल्लेखिलेल्या २१ आजारांवरील औषधोपचार जर आकस्मिक निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात घेण्यात आला तर त्या खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील. मात्र ही प्रतिपूर्ती एकूण खर्चाच्या ८० टक्के परंतु जास्तीत-जास्त दहा हजार रुपयांपर्यंत मर्यादित राहील. तसेच ही प्रतिपूर्ती शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी. १०८९/६०८/आरोग्य-९, दिनांक १२ ऑक्टोबर १९८८ मधील तरतुदीनुसार अनुज्ञेय राहील. माजी विधानमंडळ सदस्यांनी अशा औषधोपचाराच्या खर्चाची देयके संबंधित जिल्ह्याच्या प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी (जिल्हा शल्यचिकित्सक) व मुंबईमध्ये शासकीय रुग्णालयाचे अधीक्षक यांचे संबंधित आजाराबाबतचे प्रमाणपत्र जोडून संबंधित अधिदान व लेखा अधिकारी/कोषागार, उप-कोषागार अधिकाऱ्यांकडे सादर करावीत. अधिदान व लेखा अधिकारी/कोषागार अधिकारी/उप कोषागार अधिकाऱ्यांना अशा प्रतिपूर्तीबाबत काही अडचणी असल्यास, त्यांनी ती देयके अभिप्रायासह सदर माजी विधानमंडळ सदस्याकडे परत पाठवावीत.

(३-ब) खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारापोटी खर्च झालेली रक्कम रुपये १०,००० चे वर असल्यास, अशी देयके संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून प्रमाणित करून त्यांच्या मार्गदर्शनानुसार तयार करून त्यांच्यामार्फत महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे पुढील कार्यवाहीकरिता पाठवावीत.

(४) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी. १०८४/४१५७/प्र.क्र. १५६/पीएच-९-अ, दिनांक २९ एप्रिल १९८५ नुसार हृदयावरील शस्त्रक्रिया, मूत्रपिंड रोपण, रक्ताचा कर्करोग व बायपास कोरोनरी सर्जरी याबाबत शासकीय रुग्णालयात, अद्यावत सोय उपलब्ध नसल्यामुळे काही मान्यताप्राप्त खाजगी रुग्णालयात वैद्यकीय उपचार करून घेण्यास परवानगी देण्यात आली आहे व त्यासाठी होणाऱ्या संपूर्ण खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय समजण्यात आली आहे. अशा खर्चाची देयके माजी विधानमंडळ सदस्यांनी जिल्ह्यामध्ये जिल्हा शल्य-चिकित्सकांचे व मुंबईमध्ये कोणत्याही शासकीय रुग्णालयाच्या अधीक्षकाचे प्रमाणपत्र जोडून अधिदान व लेखाअधिकारी/कोषागार/उप कोषागार अधिकाऱ्यांकडे प्रदानासाठी सादर करावीत. वर उल्लेखिलेल्या देयकांच्या बाबतीत आवश्यक तेथे प्रतिस्वाक्षरी करण्याबाबत शासन परिपत्रक नगरविकास, सार्वजनिक आरोग्य आणि गृहनिर्माण विभाग क्रमांक एमएजी. १०६९/११३७०/पी, दिनांक २४ एप्रिल १९७४ मधील आदेशाचे अनुपालन करण्यात यावे.

(५) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी. १०८३/४११९/पीएच-९. दिनांक २१ ऑगस्ट १९८५ अन्वये उपरोक्त परिच्छेद चारमध्ये उल्लेखिलेल्या आजारावरील औषधोपचाराचा संभाव्य खर्च अथवा ४५,००० रुपयांच्या कमाल मर्यादेपर्यंत अग्रिम घेता येईल. मात्र अशा अग्रिमासाठी अर्ज संबंधित जिल्हा शल्यचिकित्सक-५ मार्फत महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात यावा. महाराष्ट्र

विधानमंडळ सचिवालयाने असे अग्रिम मंजूर करतेवेळी संबंधित माजी विधानमंडळ सदस्यांकडून दोन जामीनदारांसह प्रतिपूर्ती बंधपत्र घ्यावे.

(६) अशा मंजूर केलेल्या अग्रिमाची परतफेड करण्याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

२. हे आदेश संसदीय कार्य विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक सीआर. १३८/९०/सेवा-५. दिनांक २६ फेब्रुवारी १९९० ला अनुसरुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

**र. शं. पिसे,**
शासनाचे उप सचिव.

महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१
कृत्रीम यंत्राची खरेदी दुरुस्ती इत्यादीवरील खर्चाची प्रतिपूर्ती
एकत्रित आदेश

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक : एमएजी १०९९/प्र. क्र. २१८/आरोग्य-३**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक :— १६ ऑगस्ट, १९९९**

निर्णय :— महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ च्या तरतुदीस अनुसरून कृत्रीम यंत्राची खरेदी व दुरुस्ती संदर्भात तसेच निरनिराळी उपकरणे या संदर्भात शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. (१) एमएजी १०८६/४९०७/आरोग्य–९, दिनांक २३.६.८८ (२) क्र. एमएजी १०८६/४९०७/आरोग्य–९, दिनांक ३० एप्रिल, ९१, (३) क्र. एमएजी १०९१/२५३०/सीआर २२१/९१, आ.७, दिनांक २४ फेब्रुवारी, ९३, (४) एमएजी १०९६/८७५/सीआर ३८/आरोग्य-७, दिनांक २१ जून, ९७ मधील आदेश अधिक्रमित करून पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियास सोबतच्या यादीमध्ये (परिशिष्ट "अ") नमूद केलेले कृत्रीम अवयव/उपयंत्रे यांची खरेदी/जुन्या ऐवजी नवीन खरेदी/दुरुस्ती/समायोजन यांवरील खर्चाची प्रतिपूर्ती देय आहे.

२. महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ नुसार मान्यताप्राप्त असलेल्या रुग्णालयातील संबंधित विशेषज्ञाने या उपकरणांवरील खरेदी/जुन्या ऐवजी नवीन खरेदी/दुरुस्ती/समायोजना आवश्यक म्हणून प्रमाणित केल्यास त्यावरील खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार करावयाची दुरुस्ती समायोजन हे संबंधित रुग्णालयाच्या ऑर्थोपेडीक विभागाचे प्रमुख, वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रमुख तसेच महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ नुसार मान्यताप्राप्त असलेल्या रुग्णालयातील प्रमुख जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या सल्ल्याने करण्यात येईल. तथापि प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने जेव्हा कृत्रीम उपयंत्राची दुरुस्ती किंवा काही बदल करावयाचा असेल तेव्हा ही खात्री करणे आवश्यक आहे त्या यंत्राची दुरुस्ती किंवा त्यावरील बदलांचा खर्च हा, जुन्या ऐवजी नवीन उपयंत्र खरेदी केले असते तर जितका खर्च आला असता त्यापेक्षा कमी असावा.

३. शासकीय कर्मचारी व त्यांचे कुटुंबियास श्रवणयंत्रावरील किंमतीची प्रतिपूर्तीही अनुज्ञेय राहील. मात्र ही प्रतिपूर्ती जिल्हा शल्यचिकित्सक, वैद्यकीय महाविद्यालयांचे अधिष्ठाते, महिला रुग्णालयांचे अधीक्षक यांच्या शिफारशीन्वये अनुज्ञेय राहील. श्रवणयंत्राची रक्कम संबंधित शासकीय कर्मचाऱ्यास न देता ती मंजुरी प्राधिकाऱ्याकडून परस्पर पुरवठा एजंटास देण्यात येईल.

४. असे निदर्शनास आले आहे की, काही उपयंत्रे व उपकरणे हृदयावरील शस्त्रक्रिया, बायपास कॉरोनरी सर्जरी, मुत्रपिंड रोपण व तशाच प्रकारच्या मोठ्या शस्त्रक्रियांसाठी अत्यंत आवश्यक असतात. अशा प्रकारची उपयंत्रे, उपकरणे पुन्हा वापरात आणता येत नाहीत. म्हणून शासन आता आदेश देत आहे की, महाराष्ट्र राज्य

सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ नुसार मान्यताप्राप्त असलेल्या खाजगी/शासकीय व आकस्मिकता प्रसंगी उपचार घेतलेल्या खाजगी रुग्णालयातील प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्यांनी विविक्षीत उपकरणे उक्त शस्त्रक्रियांसाठी आवश्यक असल्याचे व ती पुन्हा वापरात आणता येणार नसल्याचे प्रमाणित केले तर त्यावरील खर्चाची प्रतिपूर्तीही अनुज्ञेय राहील.

५. सोबतच्या यादीत नमूद केलेली इंट्रा ऑक्युलर लेन्स भारतीय बनावटीची असणे अत्यावश्यक राहील. कारणपरत्वे परदेशी बनावटीची इंट्रा ऑक्युलर लेन्स खरेदी केल्यास त्यावरील खर्चाची प्रतिपूर्ती भारतीय बनावटीच्या इंट्रा ऑक्युलर लेन्सच्या खर्चाशी सीमित राहून करण्यात येईल. येणाऱ्या फरकाचा भार संबंधित शासकीय कर्मचाऱ्यास सोसावा लागेल. कोणत्याही परिस्थितीत परदेशी बनावटीच्या इंट्रा ऑक्युलर लेन्सच्या खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहणार नाही. या आदेशान्वये भारतीय बनावटीच्या इंट्रा ऑक्युलर लेन्सच्या खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय ठरविण्यात आली असली तरी खाजगी रुग्णालयात इंट्रा ऑक्युलर लेन्स बसविण्यावरील केलेल्या खर्चाची, त्यावरील औषधोपचाराची अथवा मोतिबिंदु शस्त्रक्रियेवरील खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय रहणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**एल. जी. इप्पेवार,**
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव.

प्रति,

मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

सचिव, (सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुंबई

सचिव, राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई (दोन प्रती)

मुख्यमंत्र्यांचे सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई

मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई

मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

राज्यमंत्री (आरोग्य) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई

सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक

मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

- सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (५ प्रती)
- सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई (१० प्रती)
- सेंटलमेंट कमिशनर ॲण्ड डायरेक्टर ऑफ लॅड रेकॉर्डस्, पुणे (२ प्रती)

विभागीय आयुक्त (सर्व) (प्रत्येकी २ प्रती)

जिल्हाधिकारी (सर्व) (प्रत्येकी २ प्रती)

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) (प्रत्येक ५ प्रती)

महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा व परिक्षा) मुंबई (२ प्रती)

महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा व परिक्षा) नागपूर (२ प्रती)

सहसंचालक, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (१० प्रती)

चिफ ऑडीटर, लोकल फंडस् अकाऊंस्, मुंबई (१० प्रती)

कोषागार अधिकारी (सर्व) (प्रत्येकी ५ प्रती)

संचालक, आरोग्य सेवा, मुंबई (५० प्रती)

संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई (५० प्रती)

संचालक, आयुर्वेद, मुंबई (२५ प्रती)

संचालक, राज्य कामगार विमा योजना, मुंबई (२५ प्रती)

व्यवस्थापकीय संचालक, हाफकीन बायो-फार्मास्युटिकल कॉर्पोरेशन, परेल, मुंबई (२ प्रती)

अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (सर्व)

महासंचालक, माहिती व जनसंपर्क मंत्रालय, मुंबई (५ प्रती)

सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)

उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)

अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, (सर्व)

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व)

- प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई (५ प्रती)
- प्रोथोनोटरी व सिनियर मास्टर, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई (५ प्रती)

वित्त विभाग (कार्यासन सेवा ५), मंत्रालय, मुंबई (१० प्रती)

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

सर्व कार्यासन अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना कार्यासन), मंत्रालय, मुंबई (५० प्रती)

२. मंत्रालयीन विभागाच्या सर्व आस्थापना कार्यासनास विनंती करण्यात येते की, त्यांनी शासन निर्णयाच्या प्रती त्यांच्या सर्व संबंधित कार्यासनाना पाठवाव्यात. तसेच संबंधित कार्यासनाने त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना पाठवाव्यात.

**प्रत** :— निवड नस्ती (महत्त्वाचे आदेश), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

निवड नस्ती (आरोग्य-३) सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

- (**पत्राने**)

# APPENDIX–"A"

List of Equipments/Appliances accompanied to Government Resolution No. MAG1099/CR-218/PH-3, Dated 16th August 1999.

| Sr. No. | Names of Artifical Appliances |
|---|---|
| 1 | Unilateral long log brance without hip joint |
| 2 | Hip joint with pelvic band |
| 3 | Spinal Brace |
| 4 | Unilateral short leg brace |
| 5 | Shoe or Boot-protective or aiding to paralysed or weak leg |
| 6 | Bilateral hip joint with pelvic band/weak leg |
| 7 | Bilateral long leg brace without hip joint |
| 8 | Bilateral short leg Brace |
| 9 | Lumbe-secral or spinal support or Back support |
| 10 | Taylor's Brace |
| 11 | Milwaukee brace |
| 12 | Mermaid splint |
| 13 | Posterior slab |
| 14 | Cervical Brace four post |
| 15 | Bigid Cervical Collar with head extension |
| 16 | Cervical Collar |
| 17 | Dynamic Splint (Aluminium) |
| 18 | Cook-up Splint (Plain-aluminium) |
| 19 | Cook-up Splint (Plastic) or long opponens |
| 20 | Turn Buckle Splint |
| 21 | Nuckle Bender Splint |
| 22 | Aterior knee Guard Splint |
| 23 | Denis Brown Splint |
| 24 | Congenital Talipus Equino Varus/Valgus Splint |
| 25 | Short Opponens P.V.C. (Plastic) |
| 26 | Knee Cage |
| 27 | Long Opponens with M.P.Fl. Bar and finger |
| 28 | Extension (Plastic) Dynamic |
| 29 | Boot with C&E heel and arch support |
| 30 | C&E Heel |
| 31 | Arch Support |
| 32 | M.T. pad |
| 33 | M.T.E. Raising |
| 34 | T. Strap |
| 35 | Sponge heel |
| 36 | Wedge 1/8 |
| 37 | Universal raising 1 |

# APPENDIX–"A"

| Sr. No. | Names of Artifical Appliances |
|---|---|
| 38 | Foot drop splint |
| 39 | Below knee prosthetics (P.T.B. Type Prosthetics) |
| 40 | A.K. Prosthetics |
| 41 | Aluminium adjustable above knee right splint |
| 42 | Plastic shoulder abduction splint |
| 43 | Plaster of Paris or Gypsona cast |
| 44 | Modified shoes |
| 45 | Below Elbow Prosthetics |
| 46 | Hooks |
| 47 | Cosmetic Hand |
| 48 | Splint for C.D.H. |
| 49 | Splint for Elbow |
| 50 | Above Elbow and below elbow porsthetics |
| 51 | Corset |
| 52 | Wheel Chair |
| 53 | Protective shoes with microcellular rubber without nails often with additional gadgets like adjustable springs and rockers. |
| 54 | Crutches |
| 55 | Walking iron with plaster Casts |
| 56 | Calipers |
| 57 | Braces |
| 58 | Artifical-limbs |
| 59 | Heart Pace maker |
| 60 | Pulse Generator |
| 61 | Haemo Dyalisis |
| 62 | Inhaler |
| 63 | I.V. Sets |
| 64 | Scal Veins needle |
| 65 | Extra Cap Cathetor |
| 66 | Disposable Syringe and needle 10 c.c. And 2 c.c. |
| 67 | All type of infusion to transfusion |
| 68 | Guard Wire (T.shape) |
| 69 | Intra-Ocular Lens (Indian) |

**माजी विधानमंडळ सदस्यांना वैद्यकीय सुविधा लागू करणे—एकत्रिकरण.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक : एसएजी १०९९/प्र. क्र./२२१ आरोग्य-३**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ ऑगस्ट १९९९**

**शासन निर्णय**

शासन निर्णय,नगरविकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभाग, क्र. एमएजी–१०६६/२६४९७/एस, दिनांक २९ ऑगस्ट १९६६, (२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. एमएजी- १०८१/४९०७/पीएच-९ अ, दिनांक १९ ऑक्टोबर १९८३, (३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. एमएजी–१०८४/४१५७/ सीआर- १५६/पीएच–९–अ, दिनांक २९ एप्रिल १९८५, (४) क्र. एमएजी–१०८४/ ३७२७/आरोग्य–९, दिनांक १२ ऑक्टोबर १९८८, (५) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. एमएजी–१०८९/१९३७/आरोग्य–९, दिनांक २१ मार्च १९९०, (६) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. एमएजी–१०९२/१६९२/सीआर–२३३/ ९२/आरोग्य–७, दिनांक १९ डिसेंबर १९९२. (७) शासन परिपत्रक क्र. एमएजी–१०९६/सीआर–१५/आरोग्य–७, दिनांक ७ एप्रिल १९९८ हे सर्व आदेश रद्द करण्यात येत असून नवीन एकत्रित आदेश निर्गमित येत आहेत.

वरील शासन निर्णय १ ते ७ अन्वये आजी/माजी विधानमंडळ सदस्यांना तसेच माननीय मंत्रिमहोदांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ अनुसार शासकीय कर्मचाऱ्यांसाठी वैद्यकीय प्रतिपूर्ती संबंधातील सर्व आदेश हे तंतोतंत लागू करण्यात आले आहेत.

२. महाराष्ट्र मिनीस्टर्स (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६४ नुसार सर्व मंत्री महोदयांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी नेते यांचे वैद्यकीय देखभाल नियम, १९८१ नुसार सर्व विरोधी नेत्यांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती/ उप सभापती) व महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष/उपाध्यक्ष) यांचे पगार व भत्ते अधिनियम, १९५६, मधील कलम ७ व १२ अे नुसार विधानमंडळातील अध्यक्ष/सभापती/उप सभापती, यांना वैद्यकीय सुविधा लागू करण्यात आल्या आहेत. तसेच महाराष्ट्र विधानमंडळ सभासद (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६६ नुसार विधानमंडळ सभासदांनाही (आमदार) पुढीलप्रमाणे सुविधा लागू करण्यात आल्या आहेत.

२.१. (१) शासकीय रुग्णालयात विनामूल्य औषधोपचार.

(२) शासकीय रुग्णालयात उपलब्ध नसलेली औषधे बाहेरुन विकत आणल्यास व प्राधिकृत अधिकाऱ्याने प्रमाणित केल्यास प्रतिपूर्ती करणे.

(३) हृदयावरील शस्त्रक्रिया, मूत्रपिंडरोपण, रक्ताचा कर्करोग, बायपास कॉरोनरी शस्त्रक्रिया यासाठी लागणारा खर्च तसेच त्यासाठी लागणाऱ्या उपकरणांची खरेदी, किमती औषधे व औषधोपचार यांवरील संभाव्य खर्चाइतके रुपये ७५ हजाराच्या कमाल मर्यादेपर्यंत अग्रिम मंजूर करणे.

(४) ज्या आजारावरील औषधोपचारासाठी अद्याप भारतामध्ये सर्वत्र सोय उपलब्ध झालेली नाही. अशा आजारांसाठी शासनाने नेमलेल्या वैद्यकीय मंडळाच्या अनुमतीने घेतलेल्या परदेशातील औषधोपचारासाठी तसेच भारतामध्ये मान्यताप्राप्त संस्थांकडून घेतलेल्या उपचारावर केलेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करणे.

२.२ उपरोक्त आदेशानुसार देण्यात येणाऱ्या वैद्यकीय सुविधांसाठी विधानमंडळ सदस्यांच्या कुटुंबियांमध्ये महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ च्या नियम २(३) नुसार खालील व्यक्तींचा समावेश होऊ शकेल :—

(१) माजी विधानमंडळ सदस्यांची पत्नी किंवा पती.

(२) माजी विधानमंडळ सदस्यावर अवलंबून असतील अशी विधानमंडळ सदस्यांची औरस मुले, कायदेशीर दत्तक घेतलेली मुले.

(३) माजी विधानमंडळ सदस्यावर पूर्णपणे अवलंबून असलेले त्यांचे आई-वडील.

**टीप**–महिला माजी विधानमंडळ सदस्यावर तिच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या/तिच्याबरोबर रहात असलेल्या तिच्या आई-वडीलांची किंवा सासू-सासऱ्यांची निवड करता येईल.

(४) माजी विधानमंडळ सदस्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या अविवाहित बहिणी व घटस्फोटित बहिणी (वय लक्षात न घेता).

२.३ माजी विधानमंडळ सदस्य, ते जेथून निवृत्तीवेतन घेतात त्या अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई/ जिल्हा कोषागारे/उपकोषागारे येथे त्यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची देयके (महाराष्ट्र कोषागार नियम १८अ नमुन्यात) सादर करण्यात यावीत. हे अधिकारी आहरण अधिकारी असतील.

२.४ शासकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभागात औषधोपचार घेणाऱ्या माजी विधानमंडळ सदस्यांनी त्यांची वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्तीची देयके महाराष्ट्र कोषागार नियमातील नमुना क्रमांक १८अ मध्ये संबंधित कोषागार अधिकाऱ्यांकडे सादर करावीत. ही देयके सादर करताना बाह्यरुग्ण विभागातील वैद्यकीय अधिकाऱ्याने निर्देशित केलेल्या औषधांची प्रमाणित यादी, परिशिष्ट अ (प्रत सोबत जोडली आहे) व औषधांच्या पावत्या सोबत जोडणे आवश्यक आहे. अशा देयकांबरोबर सादर करण्यात आलेल्या औषधांच्या पावत्यांवर प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या प्रतिस्वाक्षरीची गरज नाही. तसेच महाराष्ट्र कोषागार नियमातील नमुना-१८(अ) मधील देयकावर कोणत्याही अधिकाऱ्याच्या प्रतिस्वाक्षरीची जरूरी नाही. **खाजगी रुग्णालयात घेतलेल्या बाह्यरुग्ण उपचाराच्या खर्चाची प्रतिपूर्ती होणार नाही.**

२.५ शासकीय रुग्णालयात **आंतररुग्ण** म्हणून औषधोपचार घेणाऱ्या माजी विधानमंडळ सदस्यानी त्यांची अशा वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची देयके वरीलप्रमाणेच **परिशिष्ट ब** सह (प्रत सोबत जोडली आहे) संबंधित कोषागार अधिकाऱ्यांकडे सादर करावीत.

३. आकस्मिक निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात आंतररुग्ण म्हणून घेतलेल्या औषधोपचाराच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत मार्गदर्शक तत्त्वे विहित करण्यात आली आहेत. त्यात उल्लेखिलेल्या २३ आजारांवरील

औषधोपचार जर आकस्मिक निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात घेण्यात आल्या तर त्या खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील. मात्र ही प्रतिपूर्ती एकूण खर्चाच्या ८० टक्के परंतु जास्तीत जास्त २० हजार रुपयांपर्यंत मर्यादित राहील. माजी विधानमंडळ सदस्यांनी अशा औषधोपचाराच्या खर्चाची देयके संबंधित जिल्ह्याच्या प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी (जिल्हा शल्यचिकित्सक) व मुंबईमध्ये शासकीय रुग्णालयाचे अधीक्षक यांचे संबंधित आजाराबाबतचे प्रमाणपत्र जोडून संबंधित अधिदान व लेखाधिकारी/कोषागार/उपकोषागार अधिकाऱ्यांकडे सादर करावीत. अधिदान व लेखा अधिकारी/कोषागार अधिकारी/उप कोषागार अधिकाऱ्यांना अशा प्रतिपूर्तीबाबत काही अडचणी असल्यास त्यांनी ती देयके अभिप्रायासह सदर माजी विधानमंडळ सदस्यांकडे परत पाठवावीत.

३.१ खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारापोटी खर्च झालेली रक्कम रुपये २०,००० च्यावर असल्यास, अशी देयके संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून प्रमाणित करून मार्गदर्शनानुसार तयार करून त्यांच्यामार्फत महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे पुढील कार्यवाहीकरिता पाठवावीत.

४. अतिगंभीर पाच आजारांबाबत (१) हृदयावरील शस्त्रक्रिया, (२) मूत्रपिंड रोपण, (३) रक्ताचा कर्करोग व (४) बायपास कोरोनरी सर्जरी (हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया), (५) ॲन्जीओप्लास्टी याबाबत शासकीय रुग्णालयात अद्ययावत सोय नसल्यामुळे काही मान्यताप्राप्त खाजगी रुग्णालयात वैद्यकीय उपचार करून घेण्यास परवानगी देण्यात आली आहे व त्यासाठी होणाऱ्या संपूर्ण खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय समजण्यात आली आहे. अशा खर्चाची देयके माजी विधानमंडळ सदस्यांनी जिल्ह्यामध्ये जिल्हा शल्यचिकित्सकांचे व मुंबईमध्ये कोणत्याही शासकीय रुग्णालयाच्या अधीक्षकांचे प्रमाणपत्र जोडून अधिदान व लेखाधिकारी/कोषागार/उप कोषागार अधिकाऱ्यांकडे प्रदानासाठी सादर करावीत. वर उल्लेखिलेल्या देयकांच्या बाबतीत आवश्यक तेथे प्रतिस्वाक्षरी करण्याबाबत शासन परिपत्रक, नगर विकास, सार्वजनिक आरोग्य आणि गृह विभाग क्रमांक एमएजी. १०६९/११३७०/पी, दिनांक २४ एप्रिल १९७४ मधील आदेशांचे अनुपालन करण्यात यावे.

५. उपरोक्त परिच्छेद ४ मध्ये उल्लेखिलेल्या **आजारावरील** औषधोपचाराचा संभाव्य खर्चाकरिता रुपये ७५,००० च्या कमाल मर्यादेपर्यंत **अग्रिम** घेता येईल. मात्र अशा अग्रिमासाठी अर्ज संबंधित जिल्हा शल्यचिकित्सकामार्फत महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात यावा. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने असे अग्रिम मंजूर करतेवेळी संबंधित माजी विधानमंडळ सदस्यांकडून दोन जामीनदारांसह **क्षतीपूर्ती बंधनपत्र** घ्यावे.

६. माजी विधानमंडळ सदस्यांना वैद्यकीय सुविधांचा लाभ सुलभतेने मिळावा म्हणून या संदर्भात खालीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे.

६.१. शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक एमएजी. १०८९/१९३७/आरोग्य-९. दिनांक २१ मार्च १९९० अन्वये माजी विधानमंडळ सदस्य जेथून निवृत्तिवेतन घेतात त्या अधिदान व लेखा कार्यालय मुंबई/ जिल्हा कोषागारे/उप कोषागारे येथे त्यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची देयके सादर करण्यासाठी त्यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. या शासन निर्णयात विहित केलेल्या पद्धतीप्रमाणेच शासन निर्णय, नगरविकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभाग, क्रमांक एमएजी. १०६६/२६४९७/एस, दिनांक २९ ऑगस्ट १९६६ नुसार महारष्ट्र विधानमंडळाच्या विद्यमान (आजी) सदस्यांसाठी वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या संदर्भात आपली मागणी सादर करण्याची पद्धत विहित केलेली आहे.

६.२. या पद्धतीच्या बाबत असे स्पष्ट करण्यात येते की, शासन निर्णय, दिनांक २९ ऑगस्ट १९६६ नुसार महाराष्ट्र विधानमंडळाच्या विद्यमान सदस्यांसाठी विहित करण्यात आलेली कार्यपद्धती विचारात घेता शासन विनिर्दिष्ट २३ आकस्मिक आजारांवरील खाजगी रुग्णालयात, उपचारार्थ होणाऱ्या विहित कमाल मर्यादेतील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रकरणी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने मंजुरी आदेश काढणे आवश्यक नाही. त्यामुळे उपरोक्त शासन निर्णय, दिनांक २९ ऑगस्ट १९६६ मध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता वाटत नाही.

६.३. तथापि, आजी–माजी विधानमंडळ सदस्यांच्या वेद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस विहित कमाल मर्यादा शिथिल करून **एक विशेष बाब म्हणून मंजुरी देण्याच्या प्रकरणी** महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने **मंजुरी आदेश काढणे आवश्यक राहील.**

६.४. तसेच परदेशी वैद्यकीय सेवा घेण्यासंबंधी व वरील गंभीर आजाराबाबतचे नियम शिथिल करून विधानमंडळाच्या आजी/माजी सदस्यांना एक " विशेष बाब " म्हणून वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मंजूर केल्यास, अशा प्रकरणी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने **मंजुरी आदेश काढणे आवश्यक** राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-

**एल. जी. इप्पेवार**,
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव.

**परदेशामध्ये घेतलेल्या वैद्यकीय उपचारांवर आणि भारतामध्ये विशेषज्ञांकडून घेतलेल्या उपचारांवर केलेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती तसेच अग्रीम देण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे—एकत्रित आदेश**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
निर्णय क्रमांक एमएजी १०९९/प्र. क्र. २३८/आरोग्य-३
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २१ ऑगस्ट १९९९

**निर्णय** .—

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी शासकीय कर्मचाऱ्यांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध करण्याकरिता निर्गमित केलेले शासन निर्णय क्र. (१) एमएजी/१०८४/४१५७/सीआर १५६/आ. ९, दिनांक २९.४.८५, (२) एमएजी/१०८३/४११९/पीएच ९, दिनांक २१.८.८५, (३) एमएजी/१०८८/३८३७/आ. ९, दिनांक २३.१.८९ व (४) एमएजी १०९५/सीआर ४५/आरोग्य-७, दिनांक १५.११.९७ अधिक्रमीत करून पुढील प्रमाणे एकत्रित आदेश निर्गमित करण्यात येत आहेत :—

**परदेशातील वैद्यकीय उपचार** :—

१. ~~**(एक)** नियमानुसार परदेशात~~ घेतलेल्या वैद्यकीय उपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती देण्यात येऊ नये.

**(दोन)** वरील **(एक)** येथील तरतुदीस केवळ अपवादात्मक प्रकरणी भारतामध्ये जे अद्याप व्यापक प्रमाणात उपलब्ध नसतील अशा प्रकारचे उपचार आवश्यक असणाऱ्या आणि ज्यामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांची, वैद्यकीय सल्ल्यावरून त्यांच्या स्वतःच्या खर्चाने उपचारासाठी परदेशात जाण्याची इच्छा असेल त्यावेळी यापुढे दिलेल्या निर्देशानुसार स्थापन करावयाच्या वैद्यकीय मंडळाने अशी प्रकरणे योग्य ठरविली तर संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी प्रतिपूर्ती देण्यासंबंधीचे प्राधिकार द्यावेत परंतु अशा प्रकरणी करण्यात येणारी वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती ज्या आजारावर भारतामधील मुंबईतील बॉम्बे हॉस्पिटल येथे उपचार घेतले असते तर जितका खर्च आला असता तितक्या खर्चाइतकी मर्यादित ठेवण्यात यावी अशा प्रकरणांमध्ये रुग्ण आणि/किंवा त्याची सोबत करणाऱ्या व्यक्तीच्या विमान भाडयाच्या प्रतिपूर्तीचा प्रश्न विचारात घेण्यात येऊ नये.

**(तीन)** खाली नमूद केलेल्या आजारावरील उपचार अद्याप भारतात सर्वसाधारणपणे उपलब्ध नाहीत, असे संचालक आरोग्य सेवा यांनी प्रमाणित केलेल्या प्रकरणी जे कर्मचारी स्वतःच्या प्रवास खर्चाने परदेशात उपचार करण्यास तयार असतील, अशा प्रकरणी, परदेशात घेतलेल्या वैद्यकिय उपचारावरील खर्चाच्या प्रतिपूर्तीचा विचार करण्यात येईल :—

(१) मृतदेह, मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया (कॅडॅव्हर किडनी ट्रान्सप्लान्ट) ;

(२) ज्यांच्यावर पूर्वीच परदेशात ह्रदय उपमार्ग शस्त्रक्रिया (बायपास सर्जरी) झालेली आहे अशा रुग्णाच्या

बाबतीत पुन्हा रक्तसंवहनी शस्त्रक्रिया करणे (रिव्हॅस्कुलरायझेशन)

(३) अस्थिमज्जा प्रतिरोपण (बोन मॅरो ट्रान्सप्लॅन्ट)

(४) अतिनिकट दृष्टिता (मायोपिया) विकार असणाऱ्या रुग्णाचा शस्त्रक्रियेद्वारा दृष्टी सुधार

(५) जटिल नील हृदयक्षति (सायनोट-हार्ट-लेशन) आणि हृदयविकारपिडीत नवजात अर्भके.

**२. (एक)** परदेशी उपचार घेण्यासाठी आवश्यकता प्रमाणित करण्याकरिता संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली वैद्यकीय मंडळ स्थापन करण्यात आलेले असून त्यामध्ये पुढील सदस्यांचा समावेश आहे :—

| | |
|---|---|
| (१) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (कुटुंब कल्याण, माता बालक यांचे आरोग्य आणि शाळांतील मुलांचे आरोग्य), पुणे. | सदस्य |
| (२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सदस्य |
| (३) वरिष्ठतम प्राध्यापक, औषध वैद्यक शास्त्र ग्रॅन्ट वैद्यक महाविद्यालय, मुंबई. | सदस्य |
| (४) वरिष्ठतम प्राध्यापक, शल्यचिकित्सकशास्त्र, ग्रॅन्ट वैद्यक महाविद्यालय, मुंबई. | सदस्य |

प्रतिपूर्तीसाठी करावयाच्या मागण्या पूर्व सहमतीसाठी विभाग प्रमुखामार्फत/प्रशासकीय विभागामार्फत करण्यात येतील आणि हे प्रमुख अशा सर्व मागण्या वैद्यकीय मंडळाकडे पाठवतील मंडळ, प्रतिपूर्तीची समर्थनीयता व मर्यादा यासंबंधात निश्चित स्वरूपाची शिफारशी करील. संदर्भाधीन उपचार भारतामध्ये उपलब्ध नसल्याचे आणि आजार वरील परिच्छेद १(तीन) खालील आजारांत अंतर्भूत असल्याचे देखील मंडळाने प्रमाणित केले पाहिजे, संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई वैद्यकीय मंडळाने दिलेले असे प्रमाणपत्र, पृष्ठांकित करून ते प्रकरण ज्याने मंडळाकडे पाठविले असेल, त्या संबंधित प्रशासनिक विभागाकडे/विभाग प्रमुखाकडे पाठवतील.

**(दोन)** भारत सरकारच्या ज्या कर्मचाऱ्यांची प्रकरणे राज्य मंडळाकडे पाठविण्यात येतील त्यांच्याबाबतीत संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, वैद्यकीय मंडळ, मुंबई यांनी प्रमाणपत्र पृष्ठांकित करून ते पुढील कार्यवाहीसाठी महासंचालक, आरोग्य सेवा, दिल्ली यांच्याकडे पाठवतील.

**३.** वरील प्रकरणी खर्च प्रतिपूर्तीच्या अनुज्ञेयतेसाठी मुंबई येथील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये खाजगी वॉर्डातील उपचारांसाठी खर्चाची जी अनुसूची वेळोवेळी अंमलात असेल ती स्वीकारण्यात येईल.

**मान्यता प्राप्त रुग्णालयातील वैद्यकीय उपचार** :—

~~**४.** परिच्छेद तीन (१ ते ५) मध्ये नमूद केलेल्या~~ ज्या विशिष्ठ उपचारांच्या संबंधात परदेशातील उपचार मिळण्यासाठी सर्वसाधारणपणे विनंतीवजा अर्ज करण्यात येतील आणि ज्यासाठी राज्य शासनाच्या रुग्णालयातील

उपचारांच्या सोयी अद्याप देखील अपुऱ्या आहेत त्या विशिष्ठोपचारांच्याबाबतीत शासन याद्वारे, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सोबतच्या परिशिष्ट " अ " मध्ये दिलेल्या यादीतील रुग्णालयांमधील विशिष्ठोपचार सेवेचा लाभ करून घेण्याची परवानगी देण्यात येत आहे. अशा प्रकरणांमध्ये विशिष्टोपचार सेवेचा लाभ करून घेण्यास महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ मधील नियम शिथिल करून विशिष्टोपचार सेवेचा लाभ करून घेतल्यास ज्या संबंधित रुग्णालयामध्ये उपचार घेण्यात आले असतील त्या रुग्णालयाने आकारलेल्या संपूर्ण खर्चाची प्रतिपूर्ती देण्यात यावी, मात्र त्यास प्रवास खर्चाचा अपवाद असेल. या रुग्णालयातील अधीक्षक, प्राधिकृत वैद्यकिय अधिकारी किंवा जो अधिकारी रुग्णालय प्रमुखाने घोषित केला असेल तो, शासकीय कर्मचारी/अधिकारी यांचेकरता " प्राधिकृत वैद्यकीय अधिकारी " असेल.

**अग्रिम सुविधा** :—

**५.** शासनाने खाली नमूद केलेल्या ५ गंभीर आजारावरील विशिष्ट उपचार करून घेण्याकरिता काही शासनमान्य खाजगी तसेच शासकिय रुग्णालयांत घेतलेल्या/मागणी केलेल्या औषधे व उपकरणे यावरील संभाव्य खर्चासाठी रुपये ७५,००० च्या कमाल मर्यादेपर्यंत अग्रिम मंजूर करण्यात येईल :—

**(एक) हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे**

**(दोन) हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया**

**(तीन) ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया**

**(चार) मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया**

**(पाच) रक्ताचा कर्करोग**

हे अग्रिम, मंजूर करण्यासंबंधिच्या अटी व शर्ती सोबतच्या परिशिष्ट **" ब "** मध्ये नमूद केल्या आहेत.

**६.** वरील प्रकरणी केलेल्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसंबंधीची सर्व देयके सोबत जोडलेल्या "क" व "ड" नमुन्यांत भरून प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या संमतीने सादर करणे आवश्यक आहे.

**७.** विशिष्ठ आजारांकरिता शासनाने मान्य केलेली रुग्णालयांची यादी परिशिष्ट अ मध्ये देण्यात आली आहे. (परिशिष्ट अ जोडले आहे)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**एल. जी. इप्पेवार,**
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव.

प्रति,

मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

सचिव, (सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुंबई.

सचिव, राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई (दोन प्रती),

मुख्यमंत्र्यांचे सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.

मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.

मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

राज्यमंत्री (आरोग्य) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक.

मुख्य सचिवांचे स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

- सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (५ प्रती).
- सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई (१० प्रती).
- सेंटलमेंट कमिशनर ॲण्ड डायरेक्टर ऑफ लॅड रेकॉर्डस्, पुणे (२ प्रती).

विभागीय आयुक्त (सर्व) (प्रत्येकी २ प्रती).

जिल्हाधिकारी (सर्व) (प्रत्येकी २ प्रती).

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) (प्रत्येकी ५ प्रती).

महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा व परीक्षा) मुंबई (२ प्रती).

महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा व परीक्षा) नागपूर (२ प्रती).

सहसंचालक, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (१० प्रती).

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (१० प्रती).

चिफ ऑडीटर, लोकल फंडस् अकाऊंटस्, मुंबई (१० प्रती).

कोषागार अधिकारी (सर्व) (प्रत्येकी ५ प्रती).

संचालक, आरोग्य सेवा, मुंबई (५० प्रती).

संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई (५० प्रती).

संचालक, आयुर्वेद, मुंबई (२५ प्रती).

संचालक, राज्य कामगार विमा योजना, मुंबई (२५ प्रती).

व्यवस्थापकिय संचालक, हाफकीन बायो-फार्मास्युटिकल कॉर्पोरेशन, परेल, मुंबई (२ प्रती).

अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (सर्व).

महासंचालक, माहिती व जनसंपर्क मंत्रालय, मुंबई (५ प्रती).

सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व).

उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व).

अधिष्ठाता, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, (सर्व).

जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद (सर्व).

जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व).

- प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई (५ प्रती).
- प्रोथोनोटरी व सिनियर मास्टर, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई (५ प्रती).

वित्त विभाग (कार्यासन सेवा ५), मंत्रालय, मुंबई (१० प्रती).

व्यवस्थापक, शासकिय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.

सर्व कार्यासन अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना कार्यासन), मंत्रालय, मुंबई (५० प्रती).

२. मंत्रालयीन विभागाच्या सर्व आस्थापना कार्यासनास विनंती करण्यात येते की, त्यांनी शासन निर्णयाच्या प्रती त्यांच्या सर्व संबंधित कार्यासनाना पाठवाव्यात. तसेच संबंधित कार्यासनाने त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना पाठवाव्यात.

**प्रत** :— निवड नस्ती (महत्त्वाचे आदेश), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

निवड नस्ती (आरोग्य-३) सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

(**पत्राने**)

## परिशिष्ट "अ"

**शासन निर्णय, क्रमांक एमएजी १०९९/प्र. क्र. २३८/आरोग्य ३, दिनांक २१ ऑगस्ट १९९९ च्या परिच्छेद ७ मध्ये नमूद केलेल्या शासन मान्य खाजगी रुग्णालयांची यादी.**

**महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ अन्वये विशिष्ठ आजारांबाबत त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या संस्थांना मान्यता देण्यात आली आहे.**

| अनु | आजाराचे नाव | | शासन मान्य संस्थेचे नाव |
|---|---|---|---|
| १(अ) | **हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया** | १ | सदर्न रेल्वेज, हेडक्वार्टर्स हॉस्पिटल, पेराम्बूर, मद्रास. |
| | | २ | ख्रिश्चन मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल, बेल्लोर. |
| | | ३ | के. ई. एम रुग्णालय, मुंबई. |
| | | ४ | जसलोक हॉस्पिटल, मुंबई. |
| | | ५ | बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई. |
| | | ६ | कस्तुरबा हॉस्पिटल, भोपाळ. |
| | | ७ | श्री चित्राई तिरुनल इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस ॲण्ड टेक्नॉलॉजी, त्रिवेंद्रम. |
| | | ८ | कंबाला हिल हॉस्पिटल ॲण्ड हार्ट इन्स्टिट्युट, मुंबई. |
| | | ९ | एन एम वाडीया इस्टिटयुट ऑफ कार्डीयालॉजी, पुणे. |
| | | १० | रुबी हॉल क्लिनीक, पुणे. |
| | | ११ | डॉ. के. जी. देशपांडे मेमोरियल सेंटर, नागपूर. |
| | | १२ | सेंट्रल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्स, नागपूर. |
| (ब) | **मुत्रपिंड प्रतिरोपण** | १ | ख्रिचन मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल, बेल्लोर. |
| | | २ | ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस, नवी दिल्ली. |
| | | ३ | पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्युट, चंदिगड. |
| | | ४ | जसलोक हॉस्पिटल, मुंबई. |
| | | ५ | रुबी हॉल क्लिनीक, पुणे. |
| (क) | **हृदय शस्त्रक्रियेची प्रकरणे** | १ | जी. बी. पंत हॉस्पिटल, दिल्ली. |
| | | २ | श्री. चित्राई तिरुनल इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस ॲण्ड टेक्नॉलॉजी, त्रिवेंद्रम. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ३ | पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्युट, चंदिगड. |
| | | ४ | सदर्न रेल्वेज, हेडक्वार्टर्स हॉस्पिटल, पेराम्बूर, मद्रास. |
| | | ५ | ख्रिश्चन मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल बेल्लोर. |
| | | ६ | कंबाला हिल हॉस्पिटल आणि हार्ट इन्स्टिट्युट, मुंबई. |
| | | ७ | सेंट्रल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्स, नागपूर. |
| | | ८ | के. ई. एम रुग्णालय, परेल, मुंबई. |
| | | ९ | ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस, नवी दिल्ली. |
| | | १० | बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई. |
| | | ११ | एसएसकेएम हॉस्पिटल, कलकत्ता. |
| | | १२ | कस्तुरबा हॉस्पिटल, भोपाळ. |
| | | १३ | वाडिया इन्स्टिट्युट ऑफ कार्डियालॉजी, पुणे. |
| | | १४ | रुबी हॉल क्लिनिक, पुणे. |
| | | १५ | डॉ. के. जी. देशपांडे मेमोरियल सेंटर, नागपूर. |
| | | १६ | जसलोक रुग्णालय, मुंबई. |
| **(ड)** | **ॲन्जीओप्लास्टी** | १ | सदर्न रेल्वेज, हेडक्वार्टर्स हॉस्पिटल, पेराम्बूर, मद्रास. |
| | | २ | ख्रिचन मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल, बेल्लोर. |
| | | ३ | के. ई. एम रुग्णालय, परेल, मुंबई. |
| | | ४ | जसलोक हॉस्पिटल, मुंबई. |
| | | ५ | बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई. |
| | | ६ | कस्तुरबा हॉस्पिटल, भोपाळ. |
| | | ७ | श्री चित्राई तिरुनल इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस ॲण्ड टेक्नॉलॉजी, त्रिवेंद्रम. |
| | | ८ | रुबी हॉल क्लिनीक, पुणे. |
| | | ९ | सेंट्रल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्स, नागपूर. |
| **(ई)** | **रक्ताचा कर्करोग** | १ | टाटा मेमोरियल हॉस्पिटल मुंबई. |
| | | २ | कॅन्सर इन्स्टिट्युट, अडयार, मद्रास. |
| | | ३ | इंडीयन कॅन्सर इन्स्टिट्युटच्या महाराष्ट्रातील सर्व संस्था (असल्यास). |

## परिशिष्ट— ब

**शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. एमएमजी–१०९९/प्र.क्र.२३८/आरोग्य–३ दिनांक २१ ऑगस्ट १९९९ चे सहपत्र**

**अग्रीम मंजुरीच्या अटी व शर्ती**

**(१) (अ)** महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ अनुसार जे शासकीय कर्मचारी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्यास पात्र आहेत अशा शासकीय कर्मचाऱ्यांना हे अग्रीम मंजूर करण्यात येईल.

**(ब)** अस्थायी शासकीय कर्मचाऱ्यांना दोन स्थायी कर्मचाऱ्यांचा जामीन देणे आवश्यक आहे.

**(क)** जर पती पत्नी दोघेही शासकिय कर्मचारी असतील तर अग्रीम दोघांपैकी एकालाच मंजूर करण्यात येईल.

**(२)** हे अग्रीम फक्त महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ च्या तरतूदीनुसार, व त्यासंबंधात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार ज्या उपकरणांच्या खरेदीवरील व औषधोपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय असेल तेव्हांच मंजूर करण्यात येईल.

**(३)** शासकीय कर्मचाऱ्याने आपल्या अग्रीमाच्या अर्जासोबत उपकरणाची खरेदी, किंमती औषधे व औषधोपचार यासाठी लागणारा संभाव्य खर्च व शस्त्रक्रियेची आवश्यकता दर्शविणारे शासकीय रुग्णालयामध्ये अथवा वेळोवेळी शासन मान्यता देण्यात आलेल्या खाजगी रुग्णालयाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

**(४)** हे अग्रीम उपकरणांची खरेदी, किंमती औषधोपचार यावरील संभाव्य खर्च याकरिता ७५,०००/- रुपयाच्या कमाल मर्यादेपर्यंत मंजूर करण्यात येईल. सदर अग्रीमाची रक्कम संबंधित कर्मचाऱ्यास प्रत्यक्ष शस्त्रक्रियेच्या दिनांकापूर्वी जास्तीत जास्त १५ दिवस अगोदर देण्यात यावी.

**(५)** नियमांचे योग्य पालन करुनच अग्रीम मंजूर करण्यात यावे. ज्या कारणासाठी हे अग्रीम मंजूर झाले आहे त्याच कारणांसाठी ते उपयोगात आणले गेले आहे हे पाहण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची राहील.

**(६) (अ)** काही अपरिहार्य कारणास्तव मंजूर झालेले अग्रीम खर्च न झाल्यास ते मंजूर झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीत वसूल करण्यात येईल अथवा शासकीय कर्मचाऱ्यास देय असलेल्या वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या रकमेतून समायेजित करण्यात येईल

**(ब)** जर अग्रीमाची संपूर्ण रक्कम वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या देयकामधून वसूल होण्यासारखी नसेल तर उरलेली रक्कम शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनातून अथवा इतर रकमेतून एकाच हप्त्यात वसूल करण्यात येईल.

**(७)** अग्रीम मंजूर झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वसूल झाले नाही तर त्यावर घरबांधणी अग्रीमासंबंधीच्या आदेशात व्याजाच्या कमीत कमी दराने व्याज आकारण्यात येईल.

**नियम क्रमांक ८** वरील नियमानुसार अग्रीम मंजूर करण्याचे अधिकार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसामान्य शर्ती) नियम, १९८१ च्या परिशिष्टामध्ये २ मध्ये नमूद केलेल्या विभागीय प्रमुखांना राहतील.

---

**वैद्यकीय सुविधा हृदय शस्त्रक्रिया, हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया, ॲन्जिओप्लास्टी, मूत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया व रक्ताचा कर्करोग यांवरील औषधोपचार, किमती औषधे, उपकरणे इत्यादींसाठी लागणारा खर्च भागविण्यासाठी कमाल रुपये ७५,००० अग्रिमाची मर्यादा रुपये १,००,००० पर्यंत वाढविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक : एमएजी. १०९५/सीआर-४५/आरोग्य-३**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक : ४ जुलै २०००.**

**वाचा.**—(१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी.१०९९/प्र.क्र. २३८/आरोग्य—३, दिनांक २१ ऑगस्ट १९९९.

**प्रस्तावना**

खाली नमूद केलेल्या ५ गंभीर आजारांवरील विशिष्ट उपचार करून घेण्याकरिता शासकीय व शासनमान्य खाजगी रुग्णालयातील औषधोपचार व उपकरणे यांवरील संभाव्य खर्चासाठी शासनाच्या समक्रमांकाच्या दिनांक १५ नोव्हेंबर १९९७ च्या शासन निर्णयान्वये कमाल रु.७५,००० च्या मर्यादेपर्यंत अग्रिम वाढविण्याबाबत मंजुरी देण्यात आली आहे :—

(१) हृदय शस्त्रक्रियांची उपकरणे

(२) हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया

(३) ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया

(४) मूत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया

(५) रक्ताचा कर्करोग

उपरोक्त ५ गंभीर आजारांवर शासकीय/शासन मान्यताप्राप्त खाजगी रुग्णालयात विशिष्टोपचार करण्यासाठी लागणाऱ्या उपकरणांची खरेदी, किंमती औषधे व औषधोपचार यांवरील संभाव्य खर्च विचारात घेऊन रु.७५,००० इतक्या अग्रिमाची कमाल मर्यादा रु. १,००,००० पर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचारात होता.

**शासन निर्णय —**

(१) हृदय शस्त्रक्रिया उपकरणे

(२) हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया

(३) ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया

(४) मूत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया

(५) रक्ताचा कर्करोग

या ५ गंभीर आजारांवर शासकीय/शासन मान्यताप्राप्त खाजगी रुग्णालयात विशिष्टोपचार करण्यासाठी येणारा संभाव्य खर्च विचारात घेऊन सध्या अस्तित्वात असलेल्या रु. ७५,००० इतक्या अग्रिमाची कमाल मर्यादा रु. १,००,००० पर्यंत वाढविण्यास या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात येत आहे.

अग्रिम मंजूर करण्याबाबतचे सर्वसाधारण सुधारित नियम या शासन निर्णायासोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये दिलेले आहेत. या नियमातील तरतुदींनुसार अग्रिम मंजूर करण्यापूर्वी प्रस्तावाची सखोल छाननी करण्याची जबाबदारी संबंधित कर्मचाऱ्यांच्या नियंत्रक अधिकाऱ्यांची राहील.

हे आदेश सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील व त्या दिनांकापर्यंत प्रलंबित प्रकरणांना लागू राहतील यापूर्वी निर्णित झालेल्या प्रकरणी उर्वरित अग्रिम मंजूर करण्याचे प्रस्ताव विचाराला घेतले जाणार नाहीत.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५८/वै.अ./सेवा-५, दिनांक १ मार्च २००० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल याच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

**एल. जी. इप्पेवार,**

शासनाचे अवर सचिव.

# सार्वजनिक आरोग्य विभाग

## शासन निर्णय

क्रमांक एमएजी. १०९५/सीआर-४५/आरोग्य-३, दिनांक ४ जुलै २००० चे सहपत्र

**नियम.**— (१) महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ नुसार जे शासकीय कर्मचारी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्यास पात्र आहेत अशा शासकीय कर्मचाऱ्यांना हे अग्रिम मंजूर करण्यात येईल.

(२) अस्थायी शासकीय कर्मचाऱ्यांना दोन स्थायी कर्मचाऱ्यांचा जामीन देणे आवश्यक आहे.

(३) जर पती-पत्नी दोघेही शासकीय कर्मचारी असतील तर अग्रिम दोघांपैकी एकालाच मंजूर करण्यात येईल.

**नियम.**— २. हे अग्रिम फक्त महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ नुसार शासन निर्णय, दिनांक २९ एप्रिल १९८५ च्या तरतुदीअन्वये ज्या उपकरणाच्या खरेदीवरील व औषधोपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय असेल तेव्हाच मंजूर करण्यात येईल.

**नियम.**— ३. शासकीय कर्मचाऱ्याने आपल्या अग्रिमच्या अर्जासोबत उपकरणांची खरेदी, किमती औषधे व औषधोपचार यासाठी लागणारा संभाव्य खर्च व शस्त्रक्रियेची आवश्यकता दर्शविणारे शासकीय रुग्णालयाचे अथवा संबंधित आजारासाठी मान्यता देण्यात आलेल्या रुग्णालयाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

**नियम.**— ४. हे अग्रिम रु. १,००,००० च्या कमाल मर्यादेपर्यंत अथवा उपकरणांची खरेदी, किमती औषधे व औषधोपचार यांवरील संभाव्य खर्च यापैकी जे कमी असेल तेवढ्या रकमेशी सिमित राहून मंजूर करण्यात येईल. सदर अग्रिमाची रक्कम संबंधित कर्मचाऱ्यास प्रत्यक्ष शस्त्रक्रियेच्या दिनांकापूर्वी जास्तीतजास्त १५ दिवस अगोदर देण्यात यावी.

**नियम.**— ५. नियमांचे योग्य पालन करूनच अग्रिम मंजूर करणे आणि ज्या कारणासाठी हे अग्रिम मंजूर झाले आहे त्याच कारणासाठी व ज्या शासकीय अथवा शासनमान्य रुग्णालयात उपचार करण्यासाठी घेतले असेल तेथेच ते उपयोगात आणले गेले आहे, हे पाहण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखांची राहील.

**नियम.**— ६. (अ) अग्रिम मंजूर झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत अग्रिमाची रक्कम वसूल करण्यात येईल. अथवा शासकीय कर्मचाऱ्यास देय असलेल्या वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या रकमेतून समायोजित करण्यात येईल.

(ब) जर अग्रिमाची संपूर्ण रक्कम वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या देयकामधून वसूल होण्यासारखी नसेल तर उरलेली रक्कम शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनातून अथवा इतर देय रकमेतून एकाच हप्त्यात वसूल करण्यात येईल.

**नियम.**— ७. अग्रिम मंजूर झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वसूल झाले नाही तर त्यावर घरबांधणी अग्रिमासाठी आदेश (admissible) असलेल्या व्याजाच्या कमीतकमी दराने व्याज आकारण्यात येईल.

**नियम.**— ८. वरील नियमानुसार अग्रिम मंजूर करण्याचे अधिकार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ च्या परिशिष्ट २ मध्ये नमूद केलेल्या विभाग प्रमुखांना राहतील.

**वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्यांची कुटुंब मर्यादा.**

## महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांक एमएजी. १०९५/प्र.क्र. ४५/आरोग्य-३

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ नोव्हेंबर २०००.

**पहा.**–(एक) शासन निर्णय, नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी. १०७६/७९८१९, दिनांक ६ मे १९६८.

(दोन) शासन निर्णय, नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी. १०७१/४१८०१/एस. दिनांक २९ एप्रिल १९७४.

(तीन) शासकीय पत्र, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक लोसंधो. २०००/प्रक्र. ५७/००/कु.क. १ दिनांक ९ मे २०००.

### प्रस्तावना

लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन पॉप्युलेशन डेव्हलेपमेंटमध्ये पारित केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने कुटुंब कल्याण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत आमुलाग्र बदल झाल्याने बदलत्या, परिस्थितीचा विचार करून राज्यांचे सर्वंकष लोकसंख्या धोरण शासनाने संदर्भाधीन अनुक्रमांक ३ नुसार जाहीर केले आहे. या धोरणानुसार दोन अपत्यापर्यंतचे कुटुंब म्हणेजच “छोटे कुटुंब” या संकल्पनेचा स्वीकार करण्यात आला आहे. या संकल्पनेअन्वये वैद्यकीय देखभाल नियमानुसार मिळणाऱ्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांचे कुटुंब २ (दोन) हयात अपत्यापर्यंत मर्यादित ठेवणाऱ्यांना पात्र ठरविण्याचा निर्णय घेण्यात आला त्यानुरुप महाराष्ट्र राज्य सेवा, (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ मध्ये सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

### शासन निर्णय

या प्रश्नाचा विचार करून याद्वारे महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ मधील नियम १४ व १५ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे :—

(अ) महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ मधील नियम, १४ ऐवजी पुढीलप्रमाणे नियम १४ वाचण्यात यावा.

१४—

“ज्यांना २ पेक्षा कमी अपत्ये असतील अशा कुटुंबांनी २ हयात अपत्याइतके आपले कुटुंब मर्यादित ठेवलेले नसेल किंवा ज्यांना २ पेक्षा जास्त हयात अपत्ये असतील अशा कुटुंबांनी आपले कुटुंब सध्या आहे एवढेच मर्यादित ठेवले नसेल.

अशा कुटुंबांना वरील नियमानुसार शासकीय कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना मिळणाऱ्या विनामूल्य वैद्यकीय उपचारासंबंधीच्या सवलती मिळणार नाहीत.”

(ब) महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ मधील नियम, १५ ऐवजी पुढालप्रमाणे नियम, १५ वाचण्यात यावा .—

१५—

"शासनाच्या धोरणानुसार दिनांक १ मे २००१ रोजी ज्यांची २ पेक्षा अधिक अपत्ये हयात आहेत अशा आईवडिलांनी (स्त्री/पुरुष) त्या तारखेनंतर त्यांच्या कुटुंबातील अपत्यांची संख्या वाढविता कामा नये. त्या तारखेनंतर त्यांच्या कुटुंबातील अपत्यांची संख्या वाढल्यास त्यानंतर जन्मलेल्या अपत्यांना आणि आईवडिलांना वैद्यकीय सोयी मिळण्याचा हक्क राहणार नाही. मात्र विनामूल्य वैद्यकीय उपचारांच्या सवलती मिळण्याचा हा नियम अंमलात येण्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या नियमानुसार ज्यांना हक्क होता अशा अपत्यांना अनुज्ञेय असलेल्या विनामूल्य उपचाराच्या सोयी मिळण्याचे चालूच राहील. तसेच जननक्षम गटात असताना जर आई किंवा वडीलांनी (शासकीय कर्मचारी किंवा त्यांची पत्नी) निर्बिजीकरणाची शस्त्रक्रिया करून घेतली असेल आणि अशी शस्त्रक्रिया जेथे करण्यात आली. त्या रुग्णालयाच्या किंवा दवाखान्याच्या प्रभारी सक्षम वैद्यकीय प्राधिकाऱ्यांचे तशा अर्थाचे प्रमाणपत्र सादर केले असेल तर शस्त्रक्रिया केलेल्या तारखेपासून वैद्यकीय सवलती मिळण्याचा त्यांना पुन्हा हक्क राहील. परंतु, ठरवून दिलेल्या मर्यादेहून अधिक अपत्यांना अशा सवलती मिळणार नाहीत."

३. या आदेशान्वये विहित केलेल्या कुटुंबाच्या कमाल मर्यादेची अट कोणत्याही परिस्थितीत शिथिल केली जाणार नाही.

**उपरोक्त नियमातील तरतूद दिनांक १ मे २००१ पासून अंमलात येईल.**

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५८/वै.अ./सेवा-५, दिनांक १ मार्च २००० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

**एल. जी. इप्पेवार,**

शासनाचे उप सचिव.

शासकीय कर्मचाऱ्यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी आकस्मिक
निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रुग्णालयातील
आंतररुग्ण उपचाराच्या वैद्यकीय खर्चाच्या
प्रतिपूर्तीच्या मंजूरीबाबत.

## महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांक एमएजी २००५/९/प्र.क्र. १/आरोग्य-३,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ मार्च २००५

**पहा.**—(१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी १०९१/३४५६/प्र.क्र.३२०/९१/आ.७, दिनांक १४ जानेवारी १९९३.

(२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी १०९९/प्र.क्र.४०/आ.३. दिनांक २९ जुलै १९९९.

(३) शासन शुध्दीपत्रक सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी १०९९/प्र.क्र. ४०/आ.३ दिनांक २५ फेब्रुवारी २०००.

(४) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी १०९५/प्र.क्र ४५/९५/आ. ३, दिनांक ४ जुलै २०००.

(५) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी १०९९/१३३३/प्र.क्र २०१/आ. ३, दिनांक २९ नोव्हेंबर २००४.

(६) आरोग्य सेवा संचालनालयाचे पत्र क्रमांक संआसे/आकस्मिक आजार/वैखप्र./मर्यादा/कक्ष-८ब/कक्ष-१/०५, दिनांक ३ जानेवारी २००५.

### प्रस्तावना

शासकीय कर्मचारी व त्याच्या कुटुंबियांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१, मधील तरतूदींच्या अधीन राहून, आकस्मिक उद्‌भवणाऱ्या २७ आजारांवर खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारावरील वैद्यकीय खर्चाची वेतन गटानुसार अनुज्ञेय ठरविण्यात आलेल्या टक्केवारीप्रमाणे परंतू प्रत्येक प्रकरणी रु. २०,००० च्या कमाल मर्यादित प्रतिपूर्तीस मंजूरी देण्याचे अधिकार विभाग प्रमुखांना आहेत. या मर्यादेवरील खर्चाच्या प्रतिपूर्तीची प्रकरणे संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागामार्फत सार्वजनिक आरोग्य विभाग व वित्त विभागाकडे विशेष बाब म्हणून मान्यतेच्यादृष्टीने सादर केली जातात. सद्यः स्थितीत औषधांच्या किंमतीत व उपचार पद्धतीवरील खर्चामध्ये झालेली वाढ तसेच अशी प्रकरणे निकाली काढण्यात लागणारा कालावधी इत्यादींचा विचार करता प्रचलित कमाल मर्यादित वाढ करणे व प्रतिपूर्तीच्या अनुज्ञेय रकमेची परिगणना करण्यामध्ये सुलभता आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक एमएजी १०९९/प्र.क्र.४०/आ.-३, दिनांक २९ जुलै १९९९ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

**(१) औषधोपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती** :—वेतनगटानुसार औषधोपचारावरील खर्चाच्या प्रतिपूर्तीची अनुज्ञेय रक्कम प्रस्तुत शासन निर्णायामधील तक्ता 'अ' मध्ये नमूद केली आहे. त्यामध्ये सुधारणा करण्यात येऊन आता वेतनश्रेणीचे वर्गीकरण न करता औषधोपचारावरील प्रत्यक्ष खर्चाच्या ९० टक्के रक्कम सरसकट अनुज्ञेय राहील.

**(२) खाजगी रुग्णालयामधील वास्तव्यावरील खर्चाची प्रतिपूर्ती** :—प्रस्तुत शासन निर्णयामधील तक्ता 'ब' मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :

**तक्ता 'ब'**

| अनु-क्रमांक | खाजगी रुग्णालयातील वास्तव्याचा प्रकार | वास्तव्यावरील खर्चाची प्रतिपूर्ती करावयाचा प्रचलित दर | वास्तव्यावरील खर्चाची प्रतिपूर्ती करावयाचा सुधारित दर |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | जनरल वॉर्ड (सर्व सामान्य कक्ष) | वेतनाच्या टप्प्याप्रमाणे प्रमाणे ९०%, ८५%, ८०% | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट ९५% अनुज्ञेय. |
| २ | जनरल वॉर्डच्या (सर्व सामान्य कक्षाच्या) बाजूचा बाथरूम नसलेला कक्ष. | प्रत्यक्ष खर्चाच्या ७५% | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट ९०% अनुज्ञेय. |
| ३ | बाथरुमसह स्वतंत्र कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या ६५% | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट ७५% अनुज्ञेय. |
| ४ | बाथरूमसह डबल बेडेड कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या ६०% | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट ७५% अनुज्ञेय. |
| ५ | बाथरूमसह वातानुकुलित कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या ५०% | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट ७५% अनुज्ञेय. |
| ६ | अतिदक्षता कक्ष (ICU) | प्रत्यक्ष खर्चाच्या ५०% | १००% अनुज्ञेय. |

(**विशेष टीप.**—वरील तक्ता 'ब' मधील अनुक्रमांक ५ येथे नमूद केलेला बाथरुमसह वातानुकुलित कक्ष हा केवळ जे अधिकारी विमान प्रवासासाठी पात्र आहेत. त्यांना अनुज्ञेय राहील.)

(३) **प्रतिपूर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजुरीचे अधिकारांबाबत** :—शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. एमएजी. १०९१/३४५६/प्र.क्र. ३२०/९१/आ-७, दिनांक १४ जानेवारी १९९३ प्रमाणे वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची कमालमर्यादा रु. २०,००० पर्यंत वाढविण्यात आली.

होती व ही मर्यादा सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक एमजी. १०९९/प्र.क्र. ४०/आ.३, दिनांक २९ जुलै १९९९ च्या शासन निर्णयास अनुसरुन शासन शुद्धिपत्रक सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक एमजी १०९९/प्र.क्र. ४०/आ.३, दिनांक २५ फेब्रुवारी २००० प्रमाणे उद्‌धृत करण्यात आली आहे. याबाबत आता पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे :—

(१) महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांमधील तरदतुदींच्या अधीन राहून रु. ४०,००० पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस मंजूरीचे अधिकार संबंधित विभागप्रमुखांना प्रदान करण्यात येत आहेत.

(२) प्रचलित पद्धतीनुसार रु. २०,००० वरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस एक विशेष बाब म्हणून मंजूरी देण्याबाबतची प्रकरणे सार्वजनिक आरोग्य विभाग व वित्त विभागास सादर केली जात होती. आता रु. ४०,००० वरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रकरणांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधीन राहून मंजुरी देण्याचे अथवा उचित निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागप्रमुखांना देण्यात येत आहेत.

(३) विहीत तरतुदीत न बसणाऱ्या प्रकरणी काही अपवादात्मक परिस्थितीत विशेष बाब म्हणून वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस मान्याता द्यावयाची असल्यास अशा प्रकरणी निर्णय घेण्यासाठी पुढे नमूद केल्याप्रमाणे समिती गठीत करण्यात येत असून या समितीकडे अशी प्रकरणे निर्णयार्थ सादर करण्यात यावीत :—

| | |
|---|---|
| (अ) अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरेग्य विभाग | अध्यक्ष |
| (ब) सचिव (व्यय), वित्त विभाग | सदस्य |
| (क) संबंधित प्रशासकीय विभागांचे सचिव | सदस्य |
| (ड) महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई | सदस्य |
| (ई) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई | सदस्य |
| (फ) उप सचिव (रुग्णसेवा), सार्वजनिक आरोग्य विभाग | सदस्य सचिव |

२. शासन याद्वारे असे निदेश देत आहे की, वर नमूद केल्याप्रमाणे विभागप्रमुख व प्रशासकीय विभागप्रमुख या स्तरावर प्रकरणांना मंजुरी देताना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्याकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यानंतर वेळोवेळी केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदी काटेकोरपणे तपासून मुंजूरी देण्यात यावी.

३. हा शासन निर्णय प्रलंबित प्रकरणांनादेखील लागू करण्यात यावा. मात्र यापूर्वीची निर्णयीत ठरलेली प्रकरणे पुन्हा सुरु करण्यात येऊ नये.

४. शासन विर्निदिष्ट २७ आकास्मिक व ५ गंभीर आजारांची यादी परिशिष्ट 'अ' येथे व शासनमान्य खाजगी रुग्णालयांची यादी परिशिष्ट 'ब' येथे जोडण्यात आली आहे. सर्व मंत्रालयीन व प्रशासकीय विभागानी हा शासन निर्णय त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व कार्यासने व कार्यालये यांना कळवण्याची व्यवस्था करावी.

५. हे आदेश महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे सभापती, उपसभापती, अध्यक्ष, उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री, मा. मंत्री, मा. राज्यमंत्री, विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानमंडळाचे विद्यमान व माजी सदस्य, शासकीय कर्मचारी व या सर्वांचे कुटुंबिय यांना लागू राहतील.

६. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ५८३/ सेवा-५. दिनांक १७ मार्च २००५ नुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेसानुसार व नावाने,

सही/-

**(ला. म. चौधरी)**

महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव.

प्रति :

मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई

अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव (सर्व), मंत्रालय, मुंबई

सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुंबई

* सचिव, राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई

मुख्यमंत्र्याचे सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई

* प्रंबधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई

* प्रंबधक, मा. लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई

* प्रंबधक, मा. उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई

* सचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

सचिव, महाराष्ट्र विद्यामंडळ सचिवालय, मुंबई

मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मुख्यामंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय, मंबई

मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

राज्यमंत्री (आरोग्य) यांचे स्वीय साहाय्यक, मंत्रालय, मुंबई

सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,

मुख्य सचिवांचे स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई

विभागातील आयुक्त (सर्व)

महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई

सेटलमेंट कमिशन ऑफ लँड रेकॉर्डस्, पुणे

जिल्हाअधिकारी (सर्व)

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

चीफ ऑडीटर, लोकल फंडस् अकाऊंटस्, मुंबई

कोषागार अधिकारी (सर्व)

महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई

संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

संचालक, आयुर्वेद, मुंबई

संचालक, राज्य कामगार विमा योजना, मुंबई

व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन बायोफार्मासिटीकल कॉर्पोरेशन, परेल, मुंबई

अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (सर्व)

सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)

उप संचालक, आरोग्य लेवा (सर्व)

अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (सर्व)

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

जिल्हा शल्पचिकित्सक, जिल्हा रुग्णालये (सर्व)

वैद्यकीय अधीक्षक, शासकीय रुग्णालय (सर्व)

व्व्वस्थापक. शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

वित्त विभाग (सेवा ५ कार्यासन), मंत्रालय, मुंबई (१० प्रती)

सर्व कार्यासन अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

सर्व मंत्रालयीन विभाग ( आस्थापना कार्यासन), मंत्रालय, मुंबई (५०प्रती)

२. हा शासन निर्णय मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अदिपत्याखालील सर्व कार्यालयांच्या निदर्शनास आणावा. निवडनस्ती (आरोग्य ३)

* (पत्राने)

---

**शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक एमएजी. २००५/९/प्र. क्र.१/आरोग्य-३,**

**दिनांक १९ मार्च २००५ चे सहपत्र**

**परिशिष्ट 'अ'**

**शासन विर्निदिष्ट २७ आकस्मिक व ५ गंभीर आजारांची यादी**

(१) हृदयविकाराचा झटका (Cardiac Emergency) प्रमस्तिक संहनी (Cerabrel Vascular), फुप्फुसाच्या विकाराचा झटका (Pulmonary Emergency) ॲन्जिओग्राफी चाचणी.

(२) अतिरक्तदाब (Hypertension)

(३) धनुर्वात (Titanus )

(४) घटसर्प (Diphtheria)

(५) अपघात (Accident), आघात संलक्षण (Shock Syndrome), हृदयाशी आणि रक्तवाहिनीशी संबंधित (Cardiological and Vascular).

(६) गर्भपात (Abortions)

(७) तीव्र उदर वेदना/आंत्र अवरोध (Acute abdominal pains/ Intestinal obstruction).

(८) जोरदार स्त्राव (Severe Haeorrhage).

(९) गॅस्ट्रो-एन्ट्रायटिस (Gastro- Entreitis).

(१०) विषमज्वर (Typhoid).

(११) निश्चतेनावस्था (Coma).

(१२) मनोविकृतीची सुरुवात (Onset of Psychiatric disorder ).

(१३) डोळ्यातील दृष्टीपटल सरकणे (Retinal detachment in the eye ).

(१४) स्त्रीरोगशास्त्र आणि प्रसूतीशास्त्र संबंधित यांच्याशी आकास्मिक आजार (Gynaecological and obstetric Emergency ).

(१५) जननमूत्र आकास्मिक आजार (Genito-urinary Emergency ).

(१६) वायू कोथ (Gas Gangrine ).

(१७) कान, नाक किंवा घसा यांमध्ये विजातीय पदार्थ गेल्यामुळे निर्माण झालेले आकस्मिक आजार (Foreign Body in Ear, Nose or Throat Emergency ).

(१८) ज्यामध्ये तातडीने शस्त्रक्रिया करणे आवश्यक असते अशा जन्मजात असंगती (Cogenital Anamolies reqiring urgent surgical intervention ).

(१९) ब्रेन ट्युमर (Brain Tumour ).

(२०) भाजणे (Burns ).

(२१) इपिलेप्सी (Epilepsy ).

(२२) ॲक्युट ग्लॅकोमा (Acute Glaucoma ).

(२३) स्पायनस स्कॉड (मज्जारज्जू) संबंधात आकस्मिक आजार.

(२४) उष्माघात

(२५) रक्तासंबंधातील आजार

(२६) प्राणी चावल्यामुळे होणारी विषबाधा

(२७) रसायनामुळे होणारी विषबाधा

---

# सन २०११ चा महा. अधिनियम क्रमांक २३ चे कलम ३ नुसार समाविष्ट करण्यात आले.

**गंभीर आजार-भाग-२**

(१) हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे (Heart Surgery ).

(२) हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया (Bye Pass Surgery ).

(३) ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया.

(४) मूत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया (Kidney Transplantation ).

(५) रक्ताचा कर्करोग (Blood Cancer ).

**शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक एमएजी. २००५/९**

**प्र.क्र. १/आ. ३, दिनांक १९ मार्च २००५ चे सहपत्र**

**परिशिष्ट " ब "**

शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्टोपचारावरील खर्चाची शासकीय रुग्णालयांप्रमाणे प्रतिपूर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांची अद्ययावत यादी :—

| अनुक्रमांक | आजाराचे नाव | शासनमान्य संस्थेचे नाव |
|---|---|---|
| (१) | हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया व हृदयावरील इतर शस्त्रक्रिया. | (१) सदर्न रेल्वेज, हेडक्वॉर्टर्स हॉस्पिटल, पेराम्बूर, मद्रास. |
| | | (२) ख्रिश्चन मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल, बेल्लोर. |
| | | (३) के. ई. एम. रुग्णालय, मुंबई. |
| | | (४) जसलोक हॉस्पिटल, मुंबई. |
| | | (५) बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई. |
| | | (६) कस्तुरबा हॉस्पिटल, भोपाळ. |
| | | (७) श्री चित्राई तिरुनल इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस ॲण्ड टेक्नॉलॉजी, त्रिवेंद्रम. |
| | | (८) कंबाला हिल हॉस्पिटल ॲंड हार्ट इन्स्टिट्युट, मुंबई. |
| | | (९) एन. एम. वाडीया इन्स्टिट्युट ऑफ कार्डीयालॉजी, पुणे. |
| | | (१०) रुबी हॉल क्लिनीक, पुणे. |
| | | (११) डॉ. के. जी. देशपांडे मेमोरियल सेंटर, नागपूर. |
| | | (१२) सेंट्रल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्स, नागपूर. |
| | | (१३) जी. बी. पंत हॉस्पिटल, नवी दिल्ली. |
| | | (१४) पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्युट, चंदिगड. |
| | | (१५) ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस, नवी दिल्ली. |

(१६) एसएसकेएम हॉस्पिटल, कलकत्ता.

(१७) डॉ. इनामदार हॉस्पिटल, पुणे.

(१८) दिनदयाळ नॅशनल हॉस्पिटल, पुणे.

(१९) सीम्स हॉस्पिटल, नागपूर.

(२०) कमलनयन बजाज रुग्णालय, औरंगाबाद.

(२१) राजेबहाद्दूर हार्ट फौंडेशन प्रा. लि., नाशिक.

(२२) अवंती इन्स्टिट्युट ऑफ कार्डिऑलॉजी, नागपूर.

(२३) हिलिंग टच ऑन्जिओग्राफी ॲण्ड कार्डिक सर्जरी सेंटर, नाशिक.

(२४) ऑरेंज सिटी हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्युट.

(२५) स्पंदन हार्ट इन्स्टिट्युट आणि रिसर्च सेंटर, नागपूर

(२६) गिरिराज हॉस्पिटल ॲण्ड इन्सेटिव्ह केअर युनिट, बारामती, पुणे.

(२७) दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, पुणे.

(२८) काळबांडे हार्ट ॲण्ड चेस्ट हॉस्पिटल, औरंगाबाद.

(२९) अर्नेजा हार्ट इन्स्टिट्युट, नागपूर.

(३०) क्रिसेंड नर्सिंगहोम आणि इंटेन्सिव्ह कॉर्डियाक केअर युनिट, नागपूर.

(३१) जळगांव हार्ट इन्स्टिट्युट लिमिटेड द्वारा संचलित इंडो अमेरिकन कार्डिओव्हेंस्कुलर सेंटर, जळगांव.

(३२) एशियन हार्ट इन्स्टिट्युट, वांद्रे, मुंबई.

(३३) सरस्वती मेडिकल फौंडेशन ॲण्ड रिसर्च सेंटर, कोल्हापूर.

(३४) पुना हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, पुणे.

(२) मूत्रपिंड प्रतिरोपण.

(१) ख्रिश्चन मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल, बेल्लोर

(२) ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस, नवी दिल्ली.

(३) पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिटयुट, चंदिगड.

(४) जसलोक हॉस्पिटल, मुंबई.

(५) रुबी हॉल क्लिनीक, पुणे.

(६) सोलापूर किडनी केअर सेंटर ॲण्ड रिसर्च सेंटर, सोलापूर.

(७) कमलनयन बजाज रुग्णालय, औरंगाबाद.

(८) राधिकाबाई मेघे मेमोरियल मेडिकल ट्रस्ट जवाहरलाल नेहरु वैद्यकीय महाविद्यालय व आचार्य विनेबा भावे ग्रामीण रुग्णालय,वर्धा.

(९) इन्स्टिट्युट ऑफ युरॉलॉजी, पुणे.

(१०) क्रिसेंड नर्सिंगहोम आणि इंटेन्सिव्ह कॉर्डियाक केअर युनिट, नागपूर.

(११) के. ई. एम. रुग्णालय, पुणे.

(१२) पुना हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, पुणे.

(१३) डॉ. राघोजी किडनी हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर प्रा. लि., सोलापूर.

(३) रक्ताचा कर्करोग व इतर कर्करोग

(१) टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई.

(२) कॅन्सर इन्स्टिट्युट, अडयार, मद्रास.

(३) इंडियन कॅन्सर इन्स्टिट्युटच्या महाराष्ट्रातील सर्व संस्था (असल्यास)

(४) बालाभाई नानावटी रुग्णालय, मुंबई.

(५) कॅन्सर रिलीफ सोसायटी, नागपूर.

(६) अश्विनी रुरल कॅन्सर रिसर्च ॲण्ड रिलीफ सोसायटी, बार्शी.

(७) श्री. सिद्धेश्वर कॅन्सर सोसायटी, सोलापूर.

(८) संत तुकाराम मेडीकल रिसर्च सेंटर, महर्षी दयानंद मार्ग, अकोला.

(९) दिनदयाळ नॅशनल हॉस्पिटल, पुणे.

(१०) शेठ नंदलाल धुत रुग्णालय, औरंगाबाद.

(११) हेमोटॉलॉजी क्लिनिक, प्रयोगशाळा व रुग्णालय, नागपूर.

(१२) उद्धव मेमोरियल हॉस्पिटल, नाशिक.

| | | |
|---|---|---|
| | | (१३) राधिकाबाई मेघे मेमोरीयल मेडीकल ट्रस्ट जवाहरलाल नेहरू वैद्यकीय महाविद्यालय व आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, वर्धा |
| | | (१४) दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, पुणे. |
| | | (१५) डॉ. रविंद्र कोडलीकर हॉस्पिटल, औरंगाबाद. |
| | | (१६) काळबांडे हार्ट ॲण्ड चेस्ट हॉस्पिटल, औरंगाबाद. |
| | | (१७) दौलत मेमोरियल हॉस्पिटल, औरंगाबाद. |
| | | (१८) बगाडीया हॉस्पिटल, अकोला. |
| (४) | लहान मुलांचे | (१) बाई जेरबाई वाडीया रुग्णालय, मुंबई. |
| | | (२) दौलत मेमोरियल हॉस्पिटल, औरंगाबाद. |
| (५) | ऑर्थोपेडीक उपचार | (१) ऑर्थोपेडीक हॉस्पिटल, महालक्ष्मी, मुंबई. |
| | | (२) ऑल इंडिया इन्स्टिटयुट ऑफ फिजीकल मेडीसीन ॲण्ड रिहॅबिलिटेशन, महालक्ष्मी, मुंबई. |
| | | (३) म्हशाळकर शिंदे ऑर्थोपेडिक सेंटर ॲण्ड ॲक्सीडेंट सेंटर, सांगली. |
| | | (४) शुअरटेक अपोलो मेडिकल सेंटर, नागपूर. |
| | | (५) कर्ण हॉस्पिटल, सातारा. |
| | | (६) डॉ. पी. बी. मगदूम ऑर्थोपेडीक सर्जन ट्रामा केअर हॉस्पिटल. मिरज, जि. सांगली. |
| | | (७) डॉ. अशोक पाटील क्लिनिक, सांगली. |
| | | (८) देसाई ॲक्सिडेंट ॲण्ड जनरल हॉस्पिटल, भोसरी, पुणे. |
| (६) | मधुमेह | (१) रहेजा रुग्णालय, मुंबई. |
| (७) | मणक्याचे विकार, खुब्याचे विकार, वेदनायुक्त सांध्याचे विकार व ते बदलण्याची शस्त्रक्रिया, दुर्बिणीद्वारे गुडघ्याच्या विकाराचे निदान व उपचार. | (१) संचेतो इन्स्टिटयुट फॉर ऑर्थोपेडिक रिहॅबिलिटेशन, पुणे. |
| | | (२) स्वास्थीयोग प्रतिष्ठान चॅरिटेबल ट्रस्ट फॅक्चर ॲण्ड ऑर्थोपेडिक हॉस्पिटल, मिरज. |
| | | (३) सुश्रुत मेडीकल केअर ॲण्ड रिसर्च सोसायटीचे हर्डीकर हॉस्पिटल, पुणे |
| | | (४) सुश्रुत हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, नागपूर. |

| | | |
|---|---|---|
| | | (५) म्हशाळकर शिंदे ऑर्थोपेडिक सेंटर ॲण्ड ॲक्सीडेंट सेंटर, सांगली |
| | | (६) पुना हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, पुणे |
| | | (७) साईनाथ ऑर्थोपेडिक हॉस्पिटल, भोसरी, पुणे |
| (८) | कॉम्प्युटराईज्ड रेस्टींग इलेक्ट्रोकार्डिओग्राम, कॉम्प्युटराईज्ड ट्रेडगील स्ट्रेस टेस्ट, व्हेक्टीरोकार डायग्राम, कलर डॉपलर एको कार्डीओग्राफी, परमनन्ट पेसमेकर ॲनालायसेस, ॲम्बुलेटरी व्होल्टर मॉनिटरींग. | (१) डॉ. शशांक सुभेदार नॅशनल हार्ट सेंटर ॲण्ड क्लिनिक, नागपूर (या रुग्णालयास निरनिराळ्या चाचण्यांच्या संदर्भात मान्यता दिलेली आहे.) |
| (९) | पोलिओ अस्थिव्यंगोपचार | (१) ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ फिजीकल मेडिसीन ॲण्ड रिहॅबिलिटेशन, महालक्ष्मी, मुंबई. |
| (१०) | मेंदुवरील शस्त्रक्रिया व उपचार | (१) अश्विनी सहकारी रुग्णालय, सोलापूर |
| | | (२) कमलनयन बजाज रुग्णालय, औरंगाबाद |
| | | (३) शुअरटेक अपोलो मेडिकल सेंटर, नागपूर |
| | | (४) पुणे इन्स्टिट्युट ऑफ युरोलॉजी, पुणे |
| | | (५) एस. पी. इन्स्टिट्युट ऑफ न्युरोसायन्स, सोलापूर |
| | | (६) गिरीराज हॉस्पिटल ॲण्ड इन्सेटिव्ह केअर युनिट, बारामती, पुणे. |
| | | (७) लोटस हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, कोल्हापूर |
| | | (८) पुना हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, पुणे |
| | | (९) लाईफ लाईन हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर, नाशिक. |
| | | (१०) शिरोडकर हॉस्पिटल ट्रस्ट, डोंबिवली |
| | | (११) देसाई ॲक्सिडेंट ॲण्ड जनरल हॉस्पिटल, भोसरी पुणे. |

(१) वोक्हार्ट हॉस्पिटल लि., नागपूर हृदय विकार शस्त्रक्रिया-(Heart Surgery).

(२) के. एल. ई. एस. हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर, बेळगाव.

(३) ऋषिकेश मेडिकल फौंडेशन ॲण्ड रिसर्च सेंटरचे श्री समर्थ सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, नाशिक.

(४) वोक्हार्ट हॉस्पिटल, मुंबई-ऑर्थोपेडिक, मेंदू व मणक्याचे विकार.

(५) जहांगीर हॉस्पिटल, पुणे-हृदय, हृदय उपमार्ग, ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया.

(६) लोटस हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, कोल्हापूर, अस्थिरोग व कर्करोग.

(७) गिरीजा हॉस्पिटल, सातारा.

वोक्हार्ट हॉस्पिटल लिमिटेड, नागपूर या खाजगी संस्थेस राज्य शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना हृदय विकारावरील शस्त्रक्रिया करून घेण्यास शासन मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

शासन निर्णय क्रमांक एमएजी. २७०५/२४५/प्र.क्र. ८७/आरोग्य-३,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ मार्च २००५.

**शासन निर्णय**

शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. एमएजी. १०९९/प्र.क्र. २३८/आरोग्य-३, दिनांक २१ ऑगस्ट १९९९ च्या परिच्छेद ७ मध्ये नमूद केल्यानुसार शासन मान्य खाजगी रुग्णालयाची यादी प्रस्तुत शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये दर्शविण्यात आली आहे. त्यामध्ये सुधारणा करून वोक्हार्ट हॉस्पिटल लिमिटेड, नागपूर या खाजगी संस्थेस राज्य शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना हृदय विकारावरील शस्त्रक्रिया करून घेतल्यास, त्याप्रित्यर्थ होणाऱ्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती ही शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय प्रतिपुर्तीप्रमाणे अनुज्ञेय ठरण्यास सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक जीरुखा. २०००/प्र.क्र. १०१/आरोग्य-३, दिनांक २६ सप्टेंबर २००० मधील नमूद मार्गदर्शक तत्त्वाच्या अधिन राहून या निर्णयान्वये सदर संस्थेस शासन मान्यता देण्यात येत आहे. या अन्वये खालील बाबींचे प्रकर्षाने पालन प्रस्तुत संस्थेने करणे आवश्यक राहील :—

(१) मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील कलम ४१ अे नुसार खाजगी रुग्णालयांनी १०% रुग्णांवर मोफत व १०% रुग्णांवर सवलतीच्या दराने उपचार करणे.

(२) मुंबई नर्सिंग होम अधिनियम, १९४९ अन्वये विहित केलेल्या निकषानुसार प्रशिक्षित वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वर्ग उपलब्ध असणे.

(३) खाजगी रुग्णालये/संस्थेमध्ये ज्या आजारावर उपचार करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. त्या आजाराचे संशोधन करण्यासाठी तसेच चाचण्यांच्याअंती झालेल्या निदानानुसार शस्त्रक्रिया करण्यासाठी आवश्यक ती यंत्रसामग्री व साधनसामग्री उपलब्ध असणे.

(४) शासकीय रुग्णालयात ज्या दराने फी आकारली जाते, त्या दराने फी आकारली जावी.

(५) खाजगी रुग्णालये/संस्थेने भारत/राज्य सरकारमार्फत कार्यान्वित केलेल्या राष्ट्रीय कार्यक्रमांच्या मोहिमेत सक्रिय भाग घेणे आवश्यक आहे.

२. उपरोक्त आजारावरील उपचार व औषधोपचाराकरिता वोक्हार्ट हॉस्पिटल्स लिमिटेड, नागपूर या संस्थेने आकारलेल्या संपूर्ण वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील. अतितात्काळ बाब वगळता सदर संस्थेतील मान्यताप्राप्त उपचाराखेरीज अन्य कोणत्याही औषधोपचारासाठी शासकीय कर्मचाऱ्यांस प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्यांची पूर्वसंमती घेणे आवश्यक राहील.

३. हे आदेश मा. मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री, मा. मंत्री, मा. राज्यमंत्री महोदय, महाराष्ट्र विधानमंडळाचे विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती, उपसभापती तसेच महाराष्ट्र विधानसभा/परिषदेचे विद्यमान सदस्य, माजी सदस्य व त्यांच्या कुटुंबियांना सुद्धा अनुज्ञेय ठरविण्यात येत आहेत.

४. हे आदेश शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

**ला. म. चौधरी,**

महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव.

प्रति,

मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,

प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,

सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुंबई,

सचिव, राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

मुख्यमंत्र्यांचे सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई,

मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई,

मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

राज्यमंत्री (आरोग्य) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,

सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,

मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,

* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,

सेटलमेंट कमिशनर ॲण्ड डायरेक्टर ऑफ लँड रेकॉर्डस्, पुणे,

विभागीय आयुक्त (सर्व)/जिल्हाधिकारी (सर्व),

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),

महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता), (लेखा परीक्षा), मुंबई,

महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा व अनुज्ञेयता), (लेखा परीक्षा), नागपूर,

सहसंचालक, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

चिफ ऑडिटर, लोकल फंडस् अकाऊंटस, मुंबई,

कोषागार अधिकारी (सर्व),

महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई,

संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई,

संचालक, आयुर्वेद, मुंबई,

संचालक, राज्य कामगार विमा योजना, मुंबई,

व्यवस्थापकीय संचालक, हाफकीन बायो-फार्मास्युटीकल कॉर्पोरेशन, परेल, मुंबई,

अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (सर्व),

महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई,

सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व),

उप संचालक, आरोग्य सेवा (सर्व),

अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (सर्व),

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),

जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व),

* प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई,

* प्राथोनोटरी व सिनियर मास्टर, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई,

वित्त विभाग (कार्यासन सेवा-५), मंत्रालय, मुंबई,

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई,

सर्व कार्यासन अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई,

सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना कार्यासन), मंत्रालय, मुंबई,

डॉ. विक्रम सिंग रघुवंशी, सेंटर मॅनेजर, वोक्हार्ट हॉस्पिटल्स लिमिटेड, २७, कॉर्पोरेशन कॉलनी, नॉर्थ अंबाझरी रोड, नागपूर ४४३ ००१.

२. मंत्रालयीन विभागाच्या सर्व आस्थापना कार्यासनास विनंती करण्यात येते की, त्यांनी शासन निर्णयाच्या प्रती त्यांच्या सर्व संबंधित कार्यासनास पाठवाव्यात. तसेच संबंधित कार्यासनाने त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना पाठवाव्यात.

निवडनस्ती (आरोग्य-३), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

***पत्राद्वारे**

**शासकीय निवृत्तीवेतनधारकांना आणि त्यांच्या पती किंवा पत्नीस शासकीय रुग्णालयातून विनाशुल्क सेवा देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

शासन निर्णय क्रमांक एमएजी, १००३/१३५७/प्र.क्र. १४२/आरोग्य-३,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ एप्रिल २००५.

वाचा.—शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक जीरुफी. १०००/प्र.क्र. ९०/आरोग्य-३, दिनांक १० जुलै २००१.

**प्रस्तावना**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या उपरोक्त शासन निर्णयान्वये शासकीय रुग्णालयांतून देण्यात येणाऱ्या विविध रुग्णसेवेकरिता आकारण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. तथापि या शुल्क आकारणीतून वरील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट “अ” येथील नमूद संवर्गातील व्यक्ती/लाभधारकांना रुग्णसेवा शुल्क भरण्यापासून सूट देण्यात आली आहे. शासकीय व जिल्हा परिषद निवृत्तीवेतनधारक आणि त्यांच्या पती किंवा पत्नी यांचा समावेश या संवर्गात करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय**

राज्य शासनाच्या विद्यमान निवृत्तीवेतन योजनेचा लाभ घेणाऱ्या शासकीय व जिल्हा परिषद निवृत्ती वेतनधारकांना आणि त्यांच्या पती किंवा पत्नीस सर्व शासकीय रुग्णालयात विनाशुल्क उपचाराची सवलत देण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे. यास अनुसरुन ;

(१) संदर्भाधीन क्रमांक १ च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट “अ” मधील शासकीय रुग्णालयात विनाशुल्क वैद्यकीय उपचारांची सवलत मिळत असलेल्या संवर्गाच्या यादीत अनुक्रमांक १६ येथे “शासकीय व जिल्हा परिषद निवृत्तीवेतनधारक आणि त्यांच्या पती किंवा पत्नी” संवर्गाचा समावेश करण्यात येत आहे.

(२) प्रस्तुत सवलत हे आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून लागू राहील.

२. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३८/०५/सेवा व क्र. ११/०५/व्यय-१३, दिनांक ३० मार्च २००५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

**प्र. क. प्रधान,**

महाराष्ट्र शासनाचे उप सचिव.

प्रति,

राज्यपालांचे सचिव, मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई,
महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई,
सहसंचालक आरोग्य सेवा, मुंबई/पुणे,
सर्व मंडळाचे उप संचालक,
सर्व महाविद्यालये व दंत महाविद्यालयाचे अधिष्ठाता,
सर्व मनोरुग्णालये व क्षय रुग्णालयाचे अधीक्षक,
सर्व स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक,
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा शल्यचिकित्सक,
सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी,
सर्व कुटीर/ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक,
प्रसिद्ध संचानलानय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (प्रसिद्धीयादी),
* प्राथोनोटरी व सिनियर मास्टर, हायकोर्ट, मुंबई (पत्राने),
* रजिस्टार, हायकोर्ट अपिलेट साईड, मुंबई (पत्राने),
मा. लोक आयुक्त/उप लोक आयुक्त यांचे सचिव (पत्राने)
महालेखापाल, (लेखा परीक्षा), (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व कोषागार अधिकारी, मुंबई,
कार्यासन अधिकारी (सेवा ५/व्यय १३), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
मंत्रालयाचे इतर सर्व विभाग,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे स्वीय सहाय्यक,
सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक,
वित्त मंत्र्यांचे स्वीय सहाय्यक,
इतर सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक,
सार्वजनिक, आरोग्य विभागातील सर्व अधिकारी/सर्व कार्यासने,
निवडनस्ती (आरोग्य-३),

---

***पत्राद्वारे**

**शासकीय कर्मचारी/अधिकारी यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती प्रकरणी ५ गंभीर आजारांमध्ये सर्व प्रकारच्या कर्करोगांचा समावेश करणे व पाच गंभीर आजारावरील खर्च भागविण्यासाठी रुपये १,००,००० एवढ्या अग्रिमाची मर्यादा रुपये १,५०,००० पर्यंत वाढविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

शासन निर्णय क्रमांक एमएजी, २००५/प्र.क्र. २५१/आ.-३,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० फेब्रुवारी २००६.

वाचा.— (१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी. १०८४/४१५७/सीआर-१५६, दिनांक २९ एप्रिल १९८५.

(२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी. १०९९/३८३७/आ.-९, दिनांक २३ जानेवारी १९८९.

(३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी. १०९५/प्र.क्र. २३८/आ.-३, दिनांक २१ ऑगस्ट १९९९.

(४) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी. १०९५/सीआर-४५/आ.-३, दिनांक ४ जुलै २०००.

(५) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी. १०९५/सीआर-४५/आ.-३, दिनांक ४ जुलै २०००.

(६) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी. २००५/९/प्र.क्र. १/आ.-३, दिनांक १९ मार्च २००५.

**शासन निर्णय**

संदर्भाधीन क्र. ४ येथे करण्यात आलेल्या दिनांक ४ जुलै २००० च्या शासन निर्णयान्वये खाली नमूद केलेले पाच गंभीर आजार अंतर्भूत आहेत.

(१) हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे

(२) हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया

(३) ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया

(४) मूत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया

(५) रक्ताचा कर्करोग

वरील गंभीर आजारामध्ये अंतर्भूत रक्ताच्या कर्करोगाशिवाय, इतर सर्व प्रकारच्या कर्करोगाचे वाढते प्रमाण, आजारातील गांभीर्य व उपचारावर उद्भवणारा खर्च या सर्व बाबी लक्षात घेऊन, अ. क्र. ५ येथील रक्ताचा कर्करोग या ऐवजी कर्करोग असा बदल करण्याची बाब विचाराधीन होती. यास अनुसरून पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत :

(अ) प्रस्तुत दिनांक ४ जुलै २००० च्या शासन निर्णयातील विनिर्दिष्ट ५ गंभीर आजाराच्या यादीतील अ.क्र. ५ येथील रक्ताचा कर्करोग याऐवजी कर्करोग अशी सुधारणा करण्यात येत आहे आणि या आजारावर शासकीय अथवा शासनमान्य खाजगी रुग्णालयात आंतररुग्ण तसेच बाह्यरुग्ण उपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

(ब) प्रस्तुत दिनांक ४ जुलै २००० च्या शासन निर्णयान्वये व उपरोक्त 'अ' येथील सुधारणेसह पाच गंभीर आजारावरील शासकीय अथवा शासनमान्य खाजगी रुग्णालयातील औषधोपचार व आवश्यक उपकरणांची खरेदी करण्यासाठी येणारा संभाव्य खर्च विचारात घेऊन प्रचलित रु. १,००,००० अग्रिमांची मर्यादा रुपये १,५०,००० (रु. एक लाख पन्नास हजार फक्त) एवढी वाढविण्यात येत आहे.

(क) अग्रिम मंजूर करण्याबाबतचे सर्वसाधारण नियम संदर्भाधीन अ. क्र. ५ येथील शासन निर्णय दिनांक ४ जुलै २००० सोबतच्या परिशिष्ट 'अ' प्रमाणेच राहतील.

३. हे आदेश शासन निर्णय निर्गमित झालेल्या दिनांकापासून अंमलात येतील, तथापि या आदेशाच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीत औषधोपचार घेतलेल्या अनिर्णित प्रकरणाना अथवा आदेशाच्या दिनांकास औषधोपचार सुरू असणाऱ्या प्रकरणांना देखील हे देखील हे आदेश लागू राहतील. मात्र या आदेशांच्या दिनांकापूर्वी निर्णयीत झालेली प्रकरणे पुन्हा सुरू करण्यात येऊ नयेत.

४. सदर आदेश महाराष्ट्र राज्याचे मंत्री महोदय, विधानमंडळाचे सभापती, उप सभापती, अध्यक्ष, उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानमंडळाचे विद्यमान व माजी सदस्य, शासकीय कर्मचारी व सर्वांचे कुटुंबीय यांन लागू राहतील.

५. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्र. १३/सेवा-५, दिनांक १९ जानेवारी २००६ नुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

**र. मो. आडे,**

कार्यासन अधिकारी.

**के.ई.एम. हॉस्पिटल, पुणे या खाजगी संस्थेस राज्य शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना हृदय विकारावरील शस्त्रक्रिया करून घेण्यास शासन मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

शासन निर्णय क्रमांक एमएजी, ३००६/३१९/प्र.क्र. १६०/आरोग्य-३,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ मे २००६.

**शासन निर्णय**

शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक एमएजी. २००५/९/प्र.क्र. १/आरोग्य-३, दिनांक १९ मार्च २००५ च्या परिच्छेद ४ मध्ये नमूद केल्यानुसार शासनमान्य खाजगी रुग्णालयाची यादी प्रस्तुत शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट 'ब' मध्ये दर्शविण्यात आली आहे. त्यामध्ये सुधारणा करून के.ई.एम. हॉस्पिटल, पुणे या खाजगी संस्थेस राज्य शासकीय कर्मचारी व त्याच्या कुटुंबियांना हृदय विकारावरील शस्त्रक्रिया करून घेतल्यास, त्याप्रित्यर्थ होणाऱ्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करण्यास, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक जीरुखा. २०००/प्र.क्र. १०१/आरोग्य-३, दिनांक २६ सप्टेंबर २००० मधील नमूद मार्गदर्शक तत्त्वाच्या अधीन राहून या निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात येत आहे. या अन्वये खालील बाबींचे प्रकर्षाने पालन प्रस्तुत संस्थेने करणे आवश्यक राहील :—

(१) मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील कलम ४१ ए नुसार खाजगी रुग्णालयांनी १०% रुग्णांवर मोफत व १०% रुग्णांवर सवलतीच्या दराने उपचार करणे.

(२) मुंबई नर्सिंग होम अधिनियम, १९४८ अन्वये विहित केलेल्या निकषानुसार प्रशिक्षित वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वर्ग उपलब्ध असणे.

(३) खाजगी रुग्णालये/संस्थेमध्ये ज्या आजारावर उपचार करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. त्या आजाराचे संशोधन करण्यासाठी तसेच चाचण्यांच्या अंती झालेल्या निदानानुसार शस्त्रक्रिया करण्यासाठी आवश्यक ती यंत्रसामुग्री व साधनसामुग्री उपलब्ध असणे.

(४) शासकीय रुग्णालयात ज्या दराने फी आकारली जाते, त्या दराने फी आकारली जावी.

(५) खाजगी रुग्णालये/संस्थेने भारत/राज्य सरकारमार्फत कार्यान्वित केलेल्या राष्ट्रीय कार्यक्रमांच्या मोहिमेत सक्रिय भाग घेणे आवश्यक आहे.

२. उपरोक्त आजारावरील उपचार व औषधोपचाराकरिता के.ई.एम. हॉस्पिटल, पुणे या संस्थेने आकारलेल्या संपूर्ण वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील. अतितात्काळ बाब वगळता सदर संस्थेतील मान्यताप्राप्त उपचाराखेरीज अन्य कोणत्याही औषधोपचारासाठी शासकीय कर्मचाऱ्यांस प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्यांची पूर्वसंमती घेणे आवश्यक राहील.

३. हे आदेश मा. मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री, मा. मंत्री, मा. राज्यमंत्री महोदय, महाराष्ट्र विधानमंडळाचे विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती, उप सभापती तसेच महाराष्ट्र विधानसभा/परिषदेचे विद्यमान सदस्य, माजी सदस्य व त्यांच्या कुटुंबियांना सुद्धा अनुज्ञेय ठरविण्यात येत आहेत.

४. हा आदेश शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

**र. मो. आडे,**

कार्यासन अधिकारी.

प्रति

मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई

प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुंबई

सचिव, राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई

मुख्यमंत्र्याचे सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई

मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मुख्यामंत्र्यांचे सचिवालय, मंबई

मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

राज्यमंत्री (आरोग्य) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,

मुख्य सचिवांचे स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

* सचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई

सेटलमेंट कमिशन ॲण्ड डायरेक्टर ऑफ लँड रेकॉर्डस्, पुणे

विभागीय आयुक्त (सर्व)/जिल्हाअधिकारी (सर्व)

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा), मुंबई

महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा), नागपूर

सहसंचालक, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

चीफ ऑडीटर, लोकल फंडस् अकाऊंटस्, मुंबई

कोषागार अधिकारी (सर्व)

महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई

संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

संचालक, आयुर्वेद, मुंबई

संचालक, राज्य कामगार विमा योजना, मुंबई

व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन बायोफार्मास्युटीकल कॉर्पोरेशन, परेल, मुंबई

अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (सर्व)

महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई

सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)

उप संचालक, आरोग्य लेवा (सर्व)

अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (सर्व)

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व)

* प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई

* प्रोथोनोटरी व सिनियर मास्टर, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई

वित्त विभाग (कार्यासन ५ सेवा), मंत्रालय, मुंबई

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

सर्व कार्यासन अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई,

सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना कार्यासन), मंत्रालय, मुंबई,

मेडिकल डायरेक्टर, के. ई. एम. हॉस्पिटल, ४४९ सरदार मुरलीयार रोड, रास्ता पेठ, पुणे-११

२. मंत्रालयीन विभागाच्या सर्व आस्थापना कार्यासनास विनंती करण्यात येते की, त्यांनी शासन निर्णयाच्या प्रती त्यांच्या सर्व संबंधित कार्यासनास पाठवाव्यात. तसेच संबंधित कार्यासनाने त्याच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख यांना पाठवाव्यात.

निवड नस्ती (आरोग्य ३), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

---

***पत्राद्वारे**

२. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुंबई
३. मा. लोकआयुक्त/उप लोक आयुक्त, महाराष्ट्र , मुंबई
४. महाराष्ट्र राज्याचे मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
५. मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव/सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई
६. मा. मुख्यमंत्र्याचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक मंत्रालय, मुंबई

८. मा. मंत्री ( आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
९. मा. राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
१०.सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
११.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१२.सेटलमेंट कमिशनर ॲन्ड डायरेक्टर ऑफ लँड रेकॉड्र्स, पुणे
१३.विभागीय आयुक्त (सर्व)
१४.जिल्हाधिकारी (सर्व)
१५.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१६.महालेखापाल, महाराष्ट्र,महाराष्ट्र,लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा, मुंबई/नागपूर.
१७.सहसंचालक,अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१८.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१९. चिफ ऑडिटर, लोकल फंडस अकाऊंटस, मुंबई
२०. कोषागार अधिकारी (सर्व)
२१. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
२२. संचालक वैदयकीय शिक्षण व संशोधन, मंबई
२३. संचालक, राज्य कामगार विमा योजना, मुंबई
२४. व्यवस्थापकीय संचालक, हाफकीन बायोफार्मास्युटिकल कॉर्पोरेशन, परेल, मुंबई
२५. सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
२६. उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व )
२७. अधिष्ठाता, शासकीय वैदयकीय महाविदयालय, (सर्व)
२८.जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा रुग्णालय ( सर्व)
२९. जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व)
३०. प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई
३१. प्रोथोनोटरी व सिनीयर मास्टर, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई
३२. वित्त विभाग (कार्यासन सेवा ५), मंत्रालय, मुंबई
३३. व्यावस्थापक, शासकीय मध्यावर्ती मुद्रणालय, मुंबई
३४.सर्व उप सचिव, अवर सचिव व कार्यासन अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
३५. सर्व मंत्रालयीन विभाग ( आस्थापना कार्यासन), मंत्रालय, मुंबई मंत्रालयीन विभागाच्या सर्व आस्थापनास विनंती करण्यात येते की , त्यांनी शासन निर्णयाच्या प्रती त्यांच्या सर्व

संबंधीत कार्यासनांना/ कार्यालयांना पाठवाव्यात.

३६.मुख्य कार्यकारी अधिकारी, बॉम्बे हॉसिप्टल/ जसलोक हॉस्पिटल/लिलावती हॉस्पिटल/हिंदुजा हॉस्पिटल संचालक, आरोग्य सेवा , मुंबई यांच्यामार्फत.

३७. निवड नस्ती (महत्वाचे आदेश), सार्वजनिक आरोग्या विभाग , मंत्रालय मुंबई.

३८. निवडनस्ती, राकावि-२, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

डॉ. इथापे हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड
संगमनेर, जि. अहमदनगर ४२२६०५ या खाजगी
रुग्णालयास वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीसाठी शासन
मान्यता देणेबाबत.

13 AUG 2014

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग,
शासन निर्णय क्र. मान्यता-२०१३/प्र.क्र. १६६ /१३/राकावि-२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २१ जुलै, २०१४.

वाचा :-१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.जीरुखा-२०००/प्र.क्र.१०१/आरोग्य-३ दिनांक २६.९.२०००

२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.एमएजी-२००८/९/प्र.क्र.१/आरोग्य-३. दिनांक १९.३.२००५

३) आरोग्य सेवा संचालनालयाचे पत्र क्र.संआसे/डॉ. इथापे हॉस्पिटल /संगमनेर/ नं.क्र.Q /४७/२०१२/ टे-१/ कक्ष ३/१३/दि ५ मार्च २०१३

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ व त्या अनुषंगाने वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांनुसार **डॉ. इथापे हॉस्पीटल**, ताजणे मळा , नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अहमदनगर ४२२६०५ या रुग्णालयास राज्य शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना कॅन्सर या आजारावर उपचार व शस्त्रक्रिया करण्याकरीता व त्याप्रित्यर्थ होणा-या वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती अनुज्ञेय ठरविण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. सदर रुग्णालयाने खालील अटींचे प्रकर्षाने पालन करणे आवश्यक राहील.

१) मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० मधील कलम ४१ अे नुसार १०% रुग्णांवर मोफत व १०% रुग्णांवर सवलतीच्या दराने उपचार करणे.

२) मुंबई शुश्रुषा गृहे अधिनियम १९४९ अन्वये विहित केलेल्या निकषानुसार प्रशिक्षित वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वर्ग उपलब्ध करणे.

३) ज्या आजारावर उपचार करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. त्या आजाराचे संशोधन करण्यासाठी तसेच चाचण्यांअंती झालेल्या निदानानुसार शस्त्रक्रिया करण्यासाठी आवश्यक ती यंत्रसामुग्री रुग्णालयामध्ये उपलब्ध असणे.

४) शासकीय रुग्णालयात ज्या दराने फी आकारली जाते, त्या दराने फी आकारली जावी.

५) केंद्र शासन, राज्य शासनामार्फत कार्यान्वित केलेल्या राष्ट्रीय कार्यक्रमांच्या मोहिमेमध्ये सक्रीय सहभाग घेणे आवश्यक राहील.

६) सदर रुग्णालयाने मुंबई नर्सिंग होम ॲक्टनुसार नोंदणीचे वेळोवेळी नुतनीकरण करणे आवश्यक राहील.

२. वरीलप्रमाणे मान्यता दिलेल्या आजारांसंबधीच्या उपचार व शस्त्रक्रियेकरीता सदर रुग्णालयाने आकारलेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती विहीत नियमानुसार अनुज्ञेय राहील. अतितात्काळ बाब वगळता सदर रुग्णालयातील मान्यताप्राप्त उपचाराखेरीज अन्य कोणत्याही औषधोपचारासाठी शासकीय कर्मचा-यास प्राधिकृत वैद्यकीय अधिका-यांची पुर्वसंमती घेणे आवश्यक राहील.

३. हा शासन निर्णय मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री, मा.राज्यमंत्री, मा.सभापती व मा.उपसभापती महाराष्ट्र विधान परिषद, मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळाचे मा.विरोधी पक्षनेते तसेच महाराष्ट्र विधानसभा / परिषदेचे विद्यमान सदस्य, माजी सदस्य आणि त्यांच्या कुटुंबियांना सुध्दा लागू राहील.

४. सदर शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून लागू होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु.द.पडवळ)
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव.

प्रति,

मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
मा.मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/ सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुंबई.
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने).
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई (पत्राने)

विभागीय आयुक्त (सर्व)
पोलीस आयुक्त / पोलीस अधिक्षक (ग्रामीण) - (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परीक्षा), मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परीक्षा), नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
संचालक, आयुर्वेद, मुंबई.
संचालक, राज्य कामगार विमा योजना, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, हाफकीन बायो-फार्मास्युटीकल कॉर्पोरेशन, परेल, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई.
उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)
महाप्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने)
प्रोथोनोटरी व सिनियर मास्टर, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने)
व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना), मंत्रालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सादर शासन निर्णय त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभागप्रमुख व कार्यालयप्रमुख यांच्या निदर्शनास आणून द्यावा.
निवड नस्ती (राकावि-२)
स्वीय सहायक, प्रधान सचिव (आरोग्य), मंत्रालय, सा.आ.वि.मुंबई-१.
डॉ. इथापे हॉस्पिटल, ताजणे मळा , नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अहमदनगर-४२२६०५

शासकीय कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या मंजूरीबाबत.... प्रतिपूर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजूरीच्या अधिकारांबाबत सुधारणा .

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः वैखप्र-२०१६/प्र.क्र.१६/२०१६/राकावि-२
गो. ते. रुग्णालय आवार, १० वा मजला,
मंत्रालय, मुंबई - ०१
दिनांक: १६ मार्च, २०१६

वाचा :-

१) शासन निर्णय क्रमांकः वैखप्र-२०११/प्र.क्र.३३३/११/राकावि-२, दि. १६ नोव्हेंबर, २०११

प्रस्तावना :-

शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल), नियम, १९६१ मधील तरतुदीच्या अधीन राहून, आकस्मिक उद्भवणाऱ्या २७ आजारांवर खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारांवरील तसेच ५ गंभीर आजारांवर, शासनाने संपूर्ण खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारावरील, वैद्यकीय खर्चाच्या प्रत्येक प्रकरणी रु.१.०० लाख च्या कमाल मर्यादेत, प्रतिपूर्तीस मंजूरी देण्याचे अधिकार विभाग प्रमुखांना आहेत. या मर्यादेवरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची प्रकरणे संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडे सादर केली जातात. सद्य:स्थितीत औषधाच्या किंमतीत व उपचार पध्दतीवरील खर्चामध्ये झालेली वाढ तसेच अशी प्रकरणे निकाली काढण्यास लागणारा कालावधी इत्यादींचा विचार करता प्रचलित कमाल मर्यादेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. वैखप्र-२०११/प्र.क्र.३३३/११/राकावि-२, दि. १६ नोव्हेंबर, २०११ मध्ये प्रतिपूर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजूरीचे अधिकारांबाबत खालीलप्रमाणे सुधारणा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

१) महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधीन राहून **रु. ३,००,०००/- (अक्षरी रुपये-तीन लाख फक्त)** पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस मंजूरीचे अधिकार संबंधित विभागांच्या विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात येत आहेत.

२) रु. ३.००,०००/- (अक्षरी रुपये-तीन लाख फक्त )वरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रकरणांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधीन राहून मंजूरी देण्याचे अथवा उचित निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार संबंधित **मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देण्यात येत आहेत.**

२) शासन याद्वारे असे निर्देश देत आहे की, वर नमूद केल्याप्रमाणे विभागप्रमुख व प्रशासकीय विभागप्रमुख या स्तरावर प्रकरणांना मंजूरी देताना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यांनतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदी काटेकोरपणे तपासून मंजुरी देण्यात यावी.

३) **हा शासन निर्णय प्रलंबित प्रकरणांना देखील लागू करण्यात यावा.**

४) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी हा शासन निर्णय त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व कार्यासने व कार्यालये यांना कळविण्याची व्यवस्था करावी.

५) हे आदेश महाराष्ट्र राज्याच्या विधानमंडळाचे सभापती, उपसभापती, अध्यक्ष, उपाध्यक्ष,महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री,मा.मंत्री,मा.राज्यमंत्री,विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानमंडळाचे विद्यमान व माजी सदस्य,शासकीय कर्मचारी व या सर्वांचे कुटुंबिय यांना लागू राहतील.

६) हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ५/१६/सेवा-५, दिनांक-१५/०२/२०१६ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०३१६१५५३०५१६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay Hanumant Karanjekar

Digitally signed by Sanjay Hanumant Karanjekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b99b44ea258328f478ad96b0055c84973eb45cf0720231d99a94225c705bc1be, cn=Sanjay Hanumant Karanjekar
Date: 2016.03.23 17:09:52 +05'30'

(सं. ह. करंजेकर)
महाराष्ट्र शासनाचे, उप सचिव

प्रत,

मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, (सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई ( दोन प्रती).
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव/सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (५ प्रती)
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती)
सेटलमेंट कमिशनर ॲण्ड डायरेक्टर ऑफ लँड रेकॉर्डस, पुणे (२ प्रती)
विभागीय आयुक्त (सर्व) (प्रत्येक २ प्रती)
जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे) (प्रत्येक २ प्रती)
मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद (२ प्रती)
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परिक्षा), मुंबई (२ प्रती)
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परिक्षा), नागपूर (२ प्रती)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (१० प्रती)
सहसंचालक, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई. (१० प्रती)
चीफ ऑडिटर लोकल फंडस अकाऊटंस, मुंबई ( १० प्रती)
सर्व कोषागार अधिकारी, (प्रत्येकी ५ प्रती)
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई (५० प्रती)
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई (५० प्रती)
संचालक, आयुर्वेद, मुंबई (२५ प्रती)
संचालक, राज्य कामगार विमा योजना, मुंबई (२५ प्रती)
व्यवस्थापकीय संचालक, हाफकीन बायो-फार्मास्युटिकल कॉर्पोरेशन, परेल, मुंबई (२ प्रती)
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई (५ प्रती)
सह संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व)
प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई.
प्रोथोनोटरी व सिनियर मास्टर, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई (५ प्रती)

वित्त विभाग (कार्यासन सेवा-५), मंत्रालय, मुंबई (१० प्रती)
व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई (२ प्रती)
सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना कार्यासन), मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती (राकावि-२), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,मुंबई.

---

२. मंत्रालयीन विभागाच्या सर्व आस्थापना कार्यासनास विनंती करण्यात येते की, त्यांनी शासन निर्णयाच्या प्रती त्यांच्या सर्व संबंधित कार्यासनांना पाठवाव्यात. तसेच संबंधित कार्यासनाने त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना पाठवाव्यात.

******

## वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीबाबतचे देयक सादर करताना खालील कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. सदस्यांचे वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत मा. प्रधान सचिव यांचे नावे मागणीपत्र. सदर पत्रामध्ये रुग्ण व्यक्ती सदस्यांची नातेवाईक असल्यास, रुग्ण सदस्यांवर अवलंबून असल्याचे नमूद करावे.

२. कुटुंब मर्यादित असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

३. कुटुंबातील व्यक्ती शासकीय वा निमशासकीय सेवेत आहेत किंवा कसे याबाबतचे प्रमाणपत्र.

४. रुग्णालयात घेतलेल्या औषधोपचारासाठी झालेल्या खर्चाचे रुग्णालयाने साक्षांकित केलेले मूळ देयक (रुग्णालयाचे देयक तपशीलवार असणे अनिवार्य आहे).

५. उपचारादरम्यान रुग्णालयाबाहेरुन घेतलेल्या औषधांच्या रुग्णालयाने साक्षांकित केलेल्या मूळ पावत्या व फार्म-डी मधील नमुन्यानुसार सदरहू औषधांची साक्षांकित केलेली यादी.

६. उपचारादरम्यान रुग्णास दिलेल्या औषधोपचारामध्ये टॉनिक/अल्कोहलाचा समावेश नसण्याबाबत आणि रुग्णासाठी वापरलेली उपकरणे नष्ट केल्याबाबत (Disposable items) वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.

७. आंतररुग्ण म्हणून उपचार घेतले असल्यास वैद्यकीय खर्चाचा तपशील दर्शविणारा नमूना “ क ” व “ ड ” वर उपचार करणाऱ्या डॉक्टरांची स्वाक्षरी नाव नोंदणी क्रमांक असणे आवश्यक आहे.

८. नमुना “ ड ”.

९. परिशिष्ट १ (वैद्यकीय खर्चाच्या परताव्याची मागणी करण्याकरिता करावयाच्या अर्जाचा नमुना).

१०. प्राधिकृत वैद्यकीय अधिकारी (जिल्हा शल्यचिकित्सक) यांचे आजाराबाबतचे प्रमाणपत्र (सिव्हिल सर्जन यांचे प्रमाणपत्र).

११. मूळ देयकासह संपूर्ण देयकाच्या ९ छायांकित प्रती.

१२. डिस्चार्ज कार्ड.

१३. मेडिकल लिस्ट.

१४. रुग्णालयातील वास्तव्याचा दाखला.

१५. वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा प्रस्ताव कोणत्याही विमा कंपनीकडे/शासकीय/निमशासकीय/खाजगी प्राधिकरणाकडे केला नाही अथवा करणार नाही असा आशय नमूद असलेले पत्र.

## ११. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (अपंग सदस्यांना सोयी) आदेश, १९६९

**१.** (१) या आदेशाला, मुंबई विधानमंडळ सदस्य (अपंग सदस्यांना सोयी) आदेश, १९६९ असे म्हणता येईल.

(२) तो दिनांक १ नोव्हेंबर १९६८ पासून अंमलात आला आहे असे मानण्यात येईल.

**२.** जो सदस्य अंध असेल किंवा अन्यथा अपंग असेल, आणि सभापतीच्या किंवा अध्यक्षाच्या मते सदस्याच्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यात सहाय्याची आवश्यकता असेल अशा कोणत्याही सदस्याला राज्य शासनाकडून, जी व्यक्ती अशा सदस्याला त्याच्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी सहाय्य देण्यास समर्थ असेल अशा व्यक्तीची सेवा उपलब्ध करून देता येईल ; परंतु कोणत्याही बाबतीत अशा सदस्यास सहाय्य करण्यासाठी अशा व्यक्तीला सभागृहात प्रवेश करण्याचा किंवा बसण्याचा हक्क असणार नाही.

## १२. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (स्वीय सहायकांची नेमणूक) नियम, १९८१

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**—(१) या नियमांना महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (स्वीय सहायकाची नेमणूक) नियम, १९८१ असे म्हणता येईल.

(२) नियम ४, पोट-नियम (२) खेरीजकरून, हे नियम १ एप्रिल १९८१ रोजी अंमलात आले असल्याचे मानण्यात येईल. नियम ४, पोट-नियम (२) हा हे नियम ज्या महिन्यात काढण्यात येतील त्या लगतनंतरच्या महिन्याच्या १ तारखेस अंमलात येतील.

२. **व्याख्या.**—संदर्भानुसार अन्यथा अपेक्षित नसेल तर, त्या नियमांत,—

(अ) " अधिनियम " म्हणजे महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे पगार व भत्ते अधिनियम (सन १९५६ चा मुंबई अधिनियम ४९).

(ब) " सदस्य " म्हणजे विधानसभेचा किंवा यथास्थिती विधानपरिषदेचा सदस्य, परंतु यात मंत्री, राज्यमंत्री किंवा उप मंत्री किंवा सभापती किंवा उप सभापती, किंवा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष किंवा विरोधी पक्षनेता किंवा पगारी संसद सचिव याचा समावेश होत नाही.

(क) " स्वीय सहायक " म्हणजे या अधिनियमाच्या कलम ६, पोट-कलम (३) अन्वये सदस्याने त्याच्या स्वेच्छानिर्णायिनुसार स्वीय सहायक म्हणून नेमणूक केलेली व्यक्ती.

३. **स्वीय सहायकाची विनामूल्य सेवा.**—प्रत्येक सदस्यास, तो पदावर असेपर्यंत संपूर्ण काळपर्यंत स्वीय सहायकाची विनामूल्य सेवा मिळण्याचा हक्क असेल.

४. **स्वीय सहायकाची नेमणूक.**–(१) सदस्यांस, त्याच्या कुटुंबातील व्यक्तीव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीस त्याचा स्वीय सहायक म्हणून नेमता येईल.

(२) स्वीय सहायक म्हणून नेमलेली व्यक्ती, ही किमान शैक्षणिक पात्रता म्हणून शासकीय कार्यालयात लिपिकाच्या पदावरील सेवाप्रवेशासाठी शासनाने विहित केलेली आवश्यक पात्रता म्हणजेच, मॅट्रिकची परीक्षा किंवा कोणत्याही, सांविधिक मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेसारखी तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेला असेल आणि नेमणूक केलेली व्यक्ती मॅट्रिक आहे ही गोष्ट स्वीय सहायकाची नेमणूक करणाऱ्या सदस्यांकडून प्रमाणित करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या नियमांच्या प्रयोजनाकरिता, " कुटुंबातील व्यक्ती " म्हणजे, पती, पत्नी, मुलगा, वडील, आई, भाऊ किंवा बहीण.

५. **नेमणुकीचा किंवा सेवासमाप्तीचा आदेश.**–स्वीय सहायकाच्या बाबतीत नेमणुकीचा किंवा सेवासमाप्तीचा आदेश हा या नियमास जोडलेल्या नमुना " अ " मध्ये असेल. स्वीय सहायकाची नेमणूक ही त्याची सेवा अगोदरच समाप्त करण्यात आली नसल्यास सदस्याचा पदावधी एवढ्या मुदतीसाठीच असेल, सदस्य हा, यथास्थिती नेमणुकीच्या किंवा सेवासमाप्तीच्या आदेशाची एक प्रत, ज्या ठिकाणाहून तो आपला पगार घेत असेल त्या कोषागाराच्या किंवा उप कोषागारांच्या प्रभारी अधिकाऱ्यांस, सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय आणि त्या स्वीय सहायकासही पाठवील.

**(६) स्वीय सहायकाचे पारिश्रमिक.—**(१) स्वीय सहायक हा, सदस्यांकडे जोपर्यंत काम करत असेल, तोपर्यंत त्यास दरमहा रुपये @२५,००० इतके पारिश्रमिक मिळण्याचा हक्क असेल त्यास कोणताही प्रवास किंवा दैनिक किंवा इतर कोणतेही भत्ते मिळण्याचा हक्क असणार नाही.

(२) ** वगळण्यात आले.

**(७) स्वीय सहायक हा शासकीय कर्मचारी नसणे.–** या नियमान्वये स्वीय सहायक म्हणून नेमणूक केलेली व्यक्ती ही कोणत्याही कारणासाठी शासकीय कर्मचारी समजण्यात येणार नाही.

**नमुना " अ "**

(नियम ५ पहा)

(एक)

मी, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (स्वीय सहायकाची नेमणूक) नियम, १९८१ च्या नियम ५ अन्वये, श्री./श्रीमती ........................................................ पासून स्वीय सहायक म्हणून यांची नेमणूक करीत आहे.

* मी असे प्रमाणित करतो की, या पदासाठी आवश्यक असलेली किमान पात्रता म्हणजेच मॅट्रिकची परीक्षा ते/त्या उत्तीर्ण झालेल्या/झाल्या आहेत.

(सही) ......................

ठिकाण ..................
महाराष्ट्र विधानसभा सदस्य/

दिनांक ...................
महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य.

प्रत रवाना :—

(१) प्रभारी अधिकारी, कोषागार किंवा उप कोषागार
(जेथून सदस्य पगार घेत असेल ते).

(२) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई ४०० ०३२.

(३) श्री./श्रीमती .......................................
(स्वीय सहायक).

---

* ज्या महिन्यात हे नियम करण्यात आले त्या लगतनंतरच्या महिन्याच्या १ तारखेस किंवा त्यानंतर करण्यात आलेल्या किंवा चालू ठेवलेल्या नेमणुकीस लागू असेल.

@ महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (स्वीय सहायक नेमणूक) (सुधारणा) नियम २०१६ चा नियम पोट-नियम (१) (अ) अनुसार दिनांक २४ ऑगस्ट २०१६ पासून " रुपये १५०००" ऐवजी " रुपये २५००० " समाविष्ट करण्यात आले. (महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय अधिसूचना क्र. ४१६२ दिनांक ४ फेब्रुवारी २०१७).

** महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (स्वीय सहायक नेमणूक) (सुधारणा) नियम २०१६ चा नियम ६ चे पोट-नियम (१) (ब) अनुसार दिनांक २४ ऑगस्ट २०१६ पासून वगळण्यात आले.

**(दोन)**

महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (स्वीय सहायकाची नेमणूक) नियम, १९८१ च्या नियम ५ अन्वये माझ्याकडे स्वीय सहायक म्हणून काम करणाऱ्या श्री./श्रीमती ................................... यांची सेवा .................................. पासून मी समाप्त करीत आहे.

(सही) ....................................

ठिकाण ..................

महाराष्ट्र विधानसभा सदस्य/

दिनांक ...................

महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य.

प्रत रवाना :—

(१) प्रभारी अधिकारी, कोषागार किंवा उप कोषागार (जेथून सदस्य पगार घेत असेल ते).

(२) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई ४०० ०३२.

(३) श्री./श्रीमती ...................................... (स्वीय सहायक).

**१३. विधानमंडळ सदस्यांना नवीन मोटारगाडी खरेदी करण्याकरिता सवलत देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**संसदीय कार्य विभाग**

शासन निर्णय क्र. सुविधा. १०९७/प्र. क्र. १६/दोन,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ ऑक्टोबर १९९८

**संदर्भ.—**शासन निर्णय, संसदीय कार्य विभाग, क्र. सुविधा. १०९७/
प्र. क्र. १६/दोन, दिनांक १८ जुलै १९९८.

**शासन निर्णय**

उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे निर्गमित करण्यात आलेला निर्णय या शासन निर्णयाद्वारे अधिक्रमित करण्यात येत आहे आणि या संदर्भात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :—

विधानमंडळ सदस्यांना राज्यामध्ये लोकहिताच्या कामास्तव वेळोवेळी दौरे करावे लागतात. सध्या त्यांना त्यांच्या मतदारसंघाचा दौरा करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महिन्यातून १५ दिवस शासकीय वाहन दिले जाते. तथापि, असे वाहन तात्काळ उपलब्ध नसते. तसेच ज्या गाड्या उपलब्ध असतात, त्या कधी कधी सुस्थितीत नसतात. त्यामुळे वाहनाअभावी सदस्यांची गैरसोय होते. अशा परिस्थितीत सदस्यांना स्वतःचे वाहन असणे नितांत निकडीचे झाले आहे. त्या अनुषंगाने सदस्यांना नवीन मोटारगाडी खरेदी करण्यासंदर्भात काही सुविधा देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. या संदर्भात शासनाने असा निर्णय घेतला आहे की, विधानमंडळ सदस्यांनी नवीन मोटारगाडी खरेदी करण्यासाठी बँक किंवा इतर माध्यमांमार्फत कमाल रुपये ५,००,००० पर्यंत कर्ज घ्यावे आणि कर्जाच्या रकमेवरील व्याजदरापैकी १० टक्के दरापर्यंतच्या व्याजाची रक्कम किंवा त्यापेक्षा कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध झाले असल्यास, प्रत्यक्षात आकारण्यात आलेल्या व्याजदराची रक्कम बँकेने किंवा वित्तीय संस्थेने विहित केलेल्या मुदतीपुरती, किंवा कर्ज घेतलेल्या तारखेपासून कमाल ५ वर्षाच्या कालावधीपुरती, यापैकी जो कालावधी कमी असेल, तेवढ्या मुदतीपुरती, शासनाकडून भरणा करण्यात येईल किंवा प्रतिपूर्ती करून देण्यात येईल. सदरहू रक्कम पुढील परिच्छेद क्रमांक ४ मध्ये स्पष्ट केल्यानुसार महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडून, पुढे नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून, बँकेकडे किंवा इतर वित्तीय संस्थेकडे भरण्यात येईल किंवा सदस्यांना प्रतिपूर्ती करण्यात येईल,—

(अ) बँक किंवा इतर वित्तीय संस्थांकडून विहित केलेल्या मुदतीमध्ये कर्जाच्या मुद्दलाचे व व्याजाचे हप्ते सदस्यांकडून नियमितपणे भरण्यात येतील.

(ब) व्याजाची रक्कम शासनामार्फत परस्पर बँक किंवा वित्तीय संस्थेत भरावयाची झाल्यास, कर्ज घेणाऱ्या सदस्याचे खाते मुंबईतच असले पाहिजे.

(क) ज्या सदस्यांचे मुंबईव्यतिरिक्त अन्यत्र असलेल्या बँकेत/वित्तीय संस्थेत कर्ज खाते असेल, अशा सदस्यांनी त्यांच्या कर्जाच्या मुद्दलाच्या हप्त्याची व व्याजाची रक्कम, बँकेकडे किंवा वित्तीय संस्थेकडे प्रथम भरावी व त्यापैकी १० टक्के सरळ व्याजाच्या रकमेची किंवा त्यापेक्षा कमी असलेल्या प्रत्यक्ष आकारण्यात आलेल्या सरळ व्याजाच्या रकमेची प्रतिपूर्ती, योग्य त्या पावत्या अथवा संबंधित कागदपत्रे सादर केल्यानंतर, विधानमंडळ सचिवालयाकडून केली जाईल.

(ड) एखाद्या सदस्याने त्याच्याकडून बँकेस किंवा वित्तीय संस्थेस देय असलेला कर्जाचा किंवा व्याजाचा किंवा दोन्हींचा विहित मुदतीत भरणा केला नाही तर प्रस्तुत व्याजाची सवलत तात्पुरती बंद करण्यात येईल व सदस्याने त्याच्याकडील संपूर्ण थकबाकी व त्यावरील दंडणीय व्याज (जर काही असल्यास), भरल्याशिवाय, विधानमंडळ सचिवालयाकडून व्याजाचा भरणा अथवा व्याजाची प्रतिपूर्ती (Reimbursement) केली अथवा केली जाणार नाही.

(इ) विधानमंडळ सदस्यांना कर्जमंजूर झाल्यानंतर कर्जे करारपत्राची साक्षांकित प्रत, कर्ज परतफेडीच्या विवरणपत्रासह, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयास व माहितीस्तव संसदीय कार्य विभागात पाठविण्यात यावी, जर कर्जावरील व्याजदरामध्ये काही बदल झाला तर त्यानुसार सुधारित परतफेडीच्या विवरणपत्राची प्रत विधानमंडळ सचिवालयाकडे व संसदीय कार्य विभागाकडे पाठविण्यात यावी, त्यानंतर बँकेने किंवा वित्तीय संस्थेने विहित केलेल्या मुदतीत सदस्यांना मुद्दलाचे व व्याजाचे हप्ते भरावे लागतील आणि सदरहू कर्जाच्या मुद्दलाच्या रकमेवरील व्याजापैकी १० टक्के सरळ व्याजाची (सिम्पल इंटरेस्टची) किंवा त्यापेक्षा कमी असलेल्या व प्रत्यक्षात आकारण्यात आलेल्या व्याजदराची रक्कम विधानमंडळ सचिवालयातर्फे बँकेकडे अथवा वित्तीय संस्थेकडे भरण्यात येईल.

(फ) कर्जाची व्याजासह परतफेड होण्यापूर्वी सदस्य निरर्ह (डिसक्वॉलिफाय) करून त्यास काढण्यास आले तर त्या तारखेपासून त्याला या योजनेखाली मिळणारी सवलत बंद करण्यात येईल.

*(ग) सदस्यांना प्रस्तुत सवलत त्यांच्या प्रत्येक टर्ममध्ये एकदा देण्यात यावी व ही सवलत मिळण्याकरिता जर सदस्याने पूर्वी वाहन खरेदीसाठी घेतलेल्या कर्जावरील हप्त्याची परतफेड झाली नसेल आणि जर सदस्याने नवीन वाहन खरेदीसाठी कर्जाची मागणी केली, तर पूर्वी त्याने घेतलेल्या जुन्या वाहनावरील व्याज प्रतिपूर्तीची वरील सवलत बंद करण्यात येईल व नवीन वाहन खरेदीसाठी त्यांनी घेतलेल्या कर्जावरील व्याजाची प्रतिपूर्ती त्यांना सुधारित वाढीव कर्जाच्या सवलतीसह देण्यात येईल.

३. सदर योजनेनुसार लागू असलेली सवलत पीठासीन अधिकारी, मंत्री, राज्यमंत्री व विरोधी पक्षनेते हे विधानमंडळ सदस्य म्हणून घेऊ शकतील.

---

* सदर नोंद शासन निर्णय क्र. सुविधा. २००५/प्र.क्र. ७६/दोन, संसदीय कार्य विभाग, दिनांकित २३ फेब्रुवारी २००६ अन्वये दाखल करण्यात आली.

४. विधानमंडळ सदस्यांना अनुज्ञेय असलेले वेतन व भत्ते आणि इतर सुविधा या संदर्भातील रकमा त्यांना अदा करण्यासाठी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते. वास्तव, प्रस्तुत शासन निर्णयानुसार नवीन मोटारगाडी खरेदी करण्याकरिता सदस्यांनी घेतलेल्या कर्जावरील व्याजापैकी १० टक्के व्याजाची किंवा त्यापेक्षा कमी असलेल्या व प्रत्यक्षात आकारण्यात आलेल्या व्याजाची रक्कम, बँक किंवा वित्तीय संस्थेकडे भरण्याबाबत किंवा सदस्यांना प्रतिपूर्ती करण्याबाबत विधानमंडळ सचिवालयाकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

५. हा शासन निर्णय दिनांक २४ एप्रिल १९९८ पासून लागू करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व अनौपचारिक संदर्भ क्रमांक सीआर. १२१२/व्यय-४, दिनांक २९ सप्टेंबर १९९८ अन्वये दिलेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रतिमा म. उमरजी,**
सचिव,
महाराष्ट्र शासन.

**विधानमंडळ सदस्यांना नवीन मोटारगाडी खरेदी करण्यासाठीच्या सवलतीमध्ये सुधारणा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**संसदीय कार्य विभाग**

शासन निर्णय, क्रमांक सुविधा. २००५/प्र.क्र. ७६/दोन,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २३ फेब्रुवारी २००६.

**संदर्भ : शासन निर्णय.–** संसदीय कार्य विभाग, क्रमांक सुविधा. १०९७/प्र.क्र. १६२/दोन, दिनांक १८ जुलै १९९८ व दिनांक २८ ऑक्टोबर १९९८.

**प्रस्तावना–**

राज्यातील विधानमंडळ सदस्यांना त्यांच्या मतदारसंघामध्ये दौरा करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महिन्यातून १५ दिवस शासकीय वाहन उपलब्ध करून देण्यात येते. तथापि, असे वाहन तात्काळ उपलब्ध होत नसल्यामुळे अथवा ते सुस्थितीत नसल्यामुळे वाहनाअभावी सदस्यांची गैरसोय होते असे निदर्शनास आले व त्यामुळे विधानमंडळ सदस्यांनी त्यांच्या वापरासाठी नवीन मोटारगाडी खरेदी करण्यासाठी बँका किंवा इतर माध्यमाद्वारे कमाल रुपये ५,००,००० पर्यंत कर्ज घ्यावे आणि कर्जाच्या रकमेवरील व्याज दरापैकी १० टक्के दरापर्यंतच्या व्याजाची रक्कम किंवा त्यापेक्षा कमी व्याज दराने कर्ज उपलब्ध झाले असल्यास, प्रत्यक्षात आकारण्यात आलेल्या व्याज दराची रक्कम बँकेने किंवा वित्तीय संस्थेने विहित केलेल्या मुदतीपुरती किंवा कर्ज घेतल्याच्या तारखेपासून कमाल ५ वर्षांच्या कालावधीपुरती, शासनाकडून प्रतिपूर्ती करण्यात यावी, असा निर्णय शासनाने उपरोक्त आदेशान्वये घेतला होता. यासंदर्भात दिनांक २८ ऑक्टोबर १९९८ च्या शासन निर्णयात परिच्छेद २ (ग) येथे अशी अट विहित केली आहे की, सदस्य हा जरी एका टर्मपेक्षा अधिक टर्मकरिता निवडून आला किंवा नामनिर्देशित झाला तरी त्याला प्रस्तुत वाहन सवलत एकदाच मिळेल.

२. सध्या बाजारामध्ये नवीन नवीन मोटारगाड्यांचे मॉडेल्स येत असून, त्यांच्या किंमतीदेखील दिवसेंदिवस वाढत आहेत. तसेच एखादा सदस्य जर पुन्हा निवडून आला आणि सुधारीत दराने कर्ज घेऊन वाहन खरेदी करण्याची त्याला निकड भासली तर असे वाहन खरेदी करण्यासाठी त्या सदस्याला व्याज रकमेची प्रतिपूर्ती अनुज्ञेय करण्यात यावी, अशी मागणी सदस्यांकडून करण्यात येत आहे. याशिवाय जुने वाहन कालानुरूप बदलणेही आवश्यक असते यासाठी, सदस्यांना त्यांच्या प्रत्येक टर्मच्या कालावधीत वाहन खरेदी करण्याची सुविधा देणे तसेच त्यांनी याकरिता घेतलेल्या कर्जावरील व्याजाच्या रकमेच्या प्रतिपूर्तीची योग्य अशी सवलत देणे याबाबी शासनाच्या विचाराधीन होत्या.

**शासन निर्णय.**—उपरोक्त वस्तुस्थिती आणि सदस्यांची मागणी यांचा सर्वकष विचार करून शासनाने याबाबत आता पुढील प्रमाणे निर्णय घेतले आहेत :—

(१) उपरोक्त शासन निर्णयान्वये विधानमंडळ सदस्यानी नवीन मोटार गाडी खरेदी करण्याकरिता बँक किंवा इतर माध्यमाद्वारे कर्ज घेण्यासाठी रु. ५ लाख इतक्या रकमेची कमाल मर्यादा विहित करण्यात आली होती. ही मर्यादा आता कमाल रु. १० लाख इतकी वाढविण्यात येत आहे.

(२) सदस्याने घेतलेल्या कर्जाच्या रकमेवरील व्याज प्रतिपूर्तीसाठी विहित करण्यात आलेली १० टक्के दरापर्यंतच्या व्याज रकमेच्या प्रतिपूर्तीची मर्यादा आता ८ टक्के इतकी करण्यात येत आहे.

(३) संदर्भांकित दिनांक २८ ऑक्टोबर १९९८ च्या शासन निर्णयामध्ये परिच्छेद २(ग) येथील सध्याची व उपरोक्त प्रस्तावनेमध्ये नमूद करण्यात आलेली अट रद्द करून, त्याऐवजी खालील अटीचा समावेश करण्यात येत आहे :—

"२(ग) सदस्यांना प्रस्तुत सवलत त्यांच्या प्रत्येक टर्ममध्ये एकदा देण्यात यावी व ही सवलत मिळण्याकरिता जर सदस्याने पूर्वी वाहन खरेदीसाठी घेतलेल्या कर्जावरील हप्त्यांची परतफेड झाली नसेल आणि जर सदस्याने नवीन वाहन खरेदीसाठी कर्जाची मागणी केली. तर पूर्वी त्याने घेतलेल्या जुन्या वाहनावरील व्याज प्रतिपूर्तीची वरील सवलत बंद करण्यात येईल व नवीन वाहन खरेदीसाठी त्यांनी घेतलेल्या कर्जावरील व्याजाची प्रतिपूर्ती त्यांना सुधारीत वाढीव कर्जाच्या सवलतीसह देण्यात येईल."

३. दिनांक २८ ऑक्टोबर १९९८ च्या शासन निर्णयातील परिच्छेद २(अ) ते (फ) मधील अटी आहेत तशाच यापुढेही लागू राहतील.

४. वरील निर्णय तात्काळ अंमलात येतील.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाने अनौपचारिक संदर्भ क्रमांक १०६/०६/व्यय-४, दिनांक १६ फेब्रुवारी २००६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव, महाराष्ट्र शासन.

**विधानमंडळ सदस्यांना नवीन मोटारगाडी खरेदी करण्यासाठीच्या सवलतीमध्ये सुधारणा करण्याबाबत**

## महाराष्ट्र शासन
## संसदीय कार्य विभाग

शासन निर्णय, क्रमांक सुविधा. २०११/प्र.क्र. ४/दोन,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक : ३१ जानेवारी २०११.

**संदर्भ : शासन निर्णय.**–(१) संसदीय कार्य विभाग, क्रमांक सुविधा. १०९७/प्र.क्र. १६२/दोन, दिनांक १८ जुलै १९९८ व दिनांक २८ ऑक्टोबर १९९८.

(२) संसदीय कार्य विभाग, क्रमांक सुविधा. २००५/प्र.क्र. ७६/दोन, दिनांक २३ फेब्रुवारी २००६ व शुद्धिपत्रक, दिनांक १६ मार्च २००६.

**प्रस्तावना–**

राज्यातील विधानमंडळ सदस्यांना त्यांच्या मतदारसंघामध्ये दौरा करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महिन्यातून १५ दिवस शासकीय वाहन उपलब्ध करून देण्यात येते. तथापि, असे वाहन तात्काळ उपलब्ध होत नसल्यामुळे अथवा ते सुस्थितीत नसल्यामुळे, वाहनाअभावी सदस्यांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आल्याने, विधानमंडळ सदस्यांनी त्यांच्या वापरासाठी नवीन मोटारगाडी खरेदी करण्यासाठी बँका किंवा इतर माध्यमाद्वारे कमाल रुपये ५ लाख इतक्या रकमेपर्यंत कर्ज घ्यावे आणि सदर कर्जाच्या रकमेवरील व्याज दरापैकी १०% दरापर्यंतच्या व्याजाची रक्कम किंवा त्यापेक्षा कमी व्याज दराने कर्ज उपलब्ध झाले असल्यास, प्रत्यक्षात आकारण्यात आलेल्या व्याज दराची रक्कम बँकेने किंवा वित्तीय संस्थेने विहित केलेल्या मुदतीपुरती किंवा कर्ज घेतल्याच्या तारखेपासून कमाल ५ वर्षांच्या कालावधीपुरती, शासनाकडून प्रतिपूर्ती करण्यात यावी, असा निर्णय शासनाने उपरोक्त संदर्भातील अनुक्रमांक १ येथील आदेशान्वये घेतला आहे. तसेच प्रस्तुत कर्जाची मर्यादा रु. ५ लाखावरून रु. १० लाखाइतकी आणि त्या कर्जावरील व्याज प्रतिपूर्तीसाठी विहित करण्यात आलेल्या १०% प्रतिपूर्तीची मर्यादा ८% इतकी करण्याचा निर्णय शासनाने उपरोक्त अनुक्रमांक २ येथील आदेशान्वये घेतला आहे.

२. सध्या बाजारामध्ये नवीन नवीन मोटारगाड्यांचे मॉडेल्स येत असून, त्यांच्या किमतीदेखील दिवसेंदिवस वाढत आहेत. तसेच विधानमंडळ सदस्यांना मोटारगाडी खरेदीसाठी बँका किंवा इतर माध्यमाद्वारे सध्या जी कर्ज सुविधा उपलब्ध आहे, त्या कर्जाच्या रकमेवरील व्याजदरामध्येदेखील वाढ झाली आहे. यास्तव, सदस्यांनी मोटारगाडी खरेदीसाठी घेतलेल्या कर्जावरील व्याजाच्या रकमेच्या प्रतिपूर्तीमध्ये सवलत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय.**—उपरोक्त वस्तुस्थिती आणि त्यासंदर्भात विधानमंडळ सदस्यांची मागणी यांचा सर्वंकष विचार करून शासनाने असा निर्णय घेतला आहे की, विधानमंडळ सदस्याने मोटारगाडी खरेदीसाठी उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयांतील तरतुदींनुसार घेतलेल्या कर्जाच्या रकमेवरील व्याज प्रतिपूर्तीसाठी विहित करण्यात आलेली ८% दरापर्यंतच्या व्याज रकमेच्या प्रतिपूर्तीची मर्यादा आता १०% इतकी करण्यात यावी.

२. उपरोक्त संदर्भाधीन दिनांक २८ ऑक्टोबर १९९८ च्या शासन निर्णयातील परिच्छेद २(अ) ते (फ) मधील अटी, तसेच दिनांक २३ फेब्रुवारी २००६ च्या शासन निर्णयातील परिच्छेद २(ग) मधील अट आणि प्रस्तुत शासन निर्णयांतील इतर सर्व तरतुदी आहेत तशाच यापुढेही लागू राहतील.

३. वरील निर्णय दिनांक १ एप्रिल २०१० पासून लागू करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाने अनौपचारिक संदर्भ क्रमांक १५/११/व्यय-४, दिनांक १५ जानेवारी २०११ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत असून, प्रस्तुत निर्णय शासनाच्या वेबसाईटवर टाकण्यात आला आहे व त्यांचा संगणक संकेतांक २०११०२०३१४४०२०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ह. बा. पटेल,**
सचिव, महाराष्ट्र शासन.

**विधानमंडळ सदस्यांना नवीन मोटारगाडी खरेदी करण्यासाठीच्या सवलतीमध्ये सुधारणा करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**

**संसदीय कार्य विभाग**

शुद्धिपत्रक क्रमांक : सुविधा, २००५/प्र. क्र. ७६/दोन,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ मार्च २००६

**संदर्भ.**—(१) शासन निर्णय, संसदीय कार्य विभाग, क्र. सुविधा १०९७/प्र. क्र. १६२/दोन, दिनांक १८ जुलै १९९८ व दिनांक २८ ऑक्टोबर १९९८.

(२) शासन निर्णय, क्र. सुविधा २००५/प्र. क्र. ७६/दोन, दिनांक २३ फेब्रुवारी २००६.

**शुद्धिपत्रक :—**

या विभागाच्या वरील विषयांकित समक्रमांकाच्या दिनांक २३ फेब्रुवारी २००६ च्या शासन निर्णयातील परिच्छेद २(१) मध्ये " विधानसभा सदस्यांनी " या शब्दाऐवजी " विधानमंडळ सदस्यांनी " असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव, महाराष्ट्र शासन.

## १४. आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम मार्गदर्शक तत्त्वे

### महाराष्ट्र शासन
### नियोजन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
शासन परिपत्रक क्रमांक : स्थाविका-१०९६/प्र. २६/का. १४४५
दिनांक २८ सप्टेंबर १९९८

**प्रस्तावना :—**

स्थानिक गरजांवर आधारित आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम राज्यांत वित्तीय वर्ष १९८४-८५ पासून राबविण्यात येत आहे. हा कार्यक्रम राबविण्याची कार्यपद्धती, कामाचे आराखडे तयार करणे, कामावरील खर्चासाठी विविध यंत्रणांना निधी वितरणाची पद्धती, कामाचे संनियंत्रण, कामांना मंजुरी देणारी कार्यपद्धती, जिल्हा नियोजन व विकास मंडळांतर्गत गठित केलेली समिती, या कार्यक्रमांतर्गत अनुज्ञेय असणारी व अनुज्ञेय नसणारी कामे इत्यादीबाबतचे शासन निर्णय यापूर्वीच वेळोवेळी निर्गमित केलेले आहेत.

२. आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमाशी संबंधित विविध मुद्यांबाबत वेळोवेळी शासनाने काढलेल्या शासन निर्णयांचा संदर्भ घ्यावा लागतो. दैनंदिन कामकाजात ही माहिती सुटसुटीतपणे, थोडक्यात व तत्काळ उपलब्ध व्हावी व सर्व संबंधितांना ती मार्गदर्शक ठरावी असा या परिपत्रकाचा हेतू आहे.

**परिपत्रक :—**

आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांसंदर्भात शासनाने यापूर्वी रवाना केलेले सर्व शासन निर्णय/परिपत्रके विचारात घेऊन सर्व माहितीचे एकत्रित संकलन करून ही माहिती सर्व संबंधितांच्या माहितीसाठी रवाना करण्यात येत आहे. या परिपत्रकातील बाबींवर निर्णय घेताना मूळ आदेशांचा आधार घ्यावा.

**(१) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम उद्देश :—**

जिल्हा वार्षिक योजना राबिताना स्थानिक लोकांना उपयुक्त असलेली व सहजरित्या पूर्ण होतील अशी लहान लहान कामे योजनेच्या अग्रक्रमाने मागे राहतात. अशा कामांत लहान नाल्यांवरील फरश्या, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, मोऱ्यांची कामे, शाळांच्या खोल्या वगैरे सारख्या लहान लहान कामांचा अंतर्भाव आहे. अशी कामे घेण्यासाठी शासनाने १९८४-८५ या आर्थिक वर्षापासून स्थानिक गरजांवर आधारित लहान लहान कामांचा विशेष कार्यक्रम राबविण्यास सुरूवात झाली. या कार्यक्रमांचे नामाभिधान आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम असे शासन निर्णय, स्थाविका-१०९६/प्र.क्र.१५/का.१४४५, दिनांक २६ जून १९९६ अन्वये करण्यात आले आहे. या कार्यक्रमामध्ये हाती घ्यावयाची

कामे, कामाचा आराखडा तयार करण्याची पद्धती, कामे कार्यान्वित करण्यासाठीची पद्धती, खर्चाचा हिशोब, कामांना प्रशासकीय मंजुरी देणे, कामांचे संनियंत्रण व खर्चाच्या आकड्यांचा ताळमेळ याबाबत निर्णय घेऊन हा कार्यक्रम कार्यान्वित करण्यात येत आहे.

(२) **आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घ्यावयाच्या कामांना मंजुरी देण्यासाठी समिती :—**

आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत कामांना मंजुरी देण्यासाठी खालीलप्रमाणे समिती राहील :—

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | जिल्ह्याचे संपर्कमंत्री | .. | अध्यक्ष |
| (२) | जिल्हा नियोजन व विकास मंडळावर सदस्य असलेले— | | |
| | (अ) विधानसभा सदस्य | .. | सदस्य |
| | (ब) विधानपरिषद सदस्य | .. | सदस्य |
| (३) | जिल्हापरिषदेचे अध्यक्ष | .. | सदस्य |
| (४) | जिल्हाधिकारी | .. | सदस्य |
| (५) | मुख्य कार्यकारी अधिकारी— जिल्हा परिषद | .. | सदस्य |
| (६) | जिल्हा नियोजन अधिकारी | .. | सचिव |

शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. स्थाविका-१०९३/२७६/ प्र.क्र.४८/ का. १४४५, दिनांक १० फेब्रुवारी १९९४.

मुंबई शहर व उपनगरासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त हे सदस्य म्हणून राहतील आयुक्त जर बैठकीस हजर राहू शकले नाहीत तर ते आपला प्रतिनिधी म्हणून अतिरिक्त आयुक्त अथवा उपायुक्त यांना पाठवतील.

शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. स्थाविका-१०९३/२७६/ प्र.क्र.४८/ का. १४४५, दिनांक २९ सप्टेंबर १९९४.

संबंधित आमदारांनी ९० टक्के कामे सुचवावीत व उरलेली १० टक्के कामे जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या इतर सदस्यांनी सुचवावीत.

शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. स्थाविका-१०९७/प्र.क्र.८/ का. १४४५, दिनांक २६ नोव्हेंबर १९९७.

शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. स्थाविका-१०९८/प्र.क्र.१०९/ का. १४४५, दिनांक २१ ऑगस्ट १९९८.

आमदारांनी सुचविलेल्या ९० टक्के कामांना जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासकीय मंजुरी द्यावी व त्या कामांना वर नमूद केलेल्या समितीने कार्योत्तर मंजुरी द्यावी. उरलेल्या १० टक्के कामांना (जिल्हा नियोजन व विकास मंडळावरील इतर सदस्यांनी सुचविलेल्या) समितीची मंजुरी मिळाल्यावरच जिल्हाधिकारी प्रशासकीय मंजुरी देतील.

अर्धशासकीय पत्र क्र. डीपीसी-१०८४/ सीआर-२१/ पीआरजी-२, दिनांक २२ ऑगस्ट १९८४.

**(३) कामे कार्यान्वित करण्याची कार्यपद्धती :—**

जिल्हाधिकाऱ्यांनी कामांना प्रशासकीय मंजुरी दिल्यानंतर, जिल्हा परिषद क्षेत्रांतील कामे जिल्हा परिषदांकडे, नगरपालिका/परिषदा क्षेत्रांतील कामे नगरपालिका/परिषदांकडे, तर राज्यस्तरांवरील कामे शासकीय यंत्रणेकडे सुपूर्द केली जातात. मुंबई शहरांमध्ये ही कामे शासकीय यंत्रणांकडे, बृहन्मुंबई महानगरपालिका व महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ (म्हाडा) यांचेकडे सुपूर्द केली जातात. एखाद्या अभिकरणाला विशिष्ट काम करणे शक्य नसेल तर त्याबद्दल त्यांनी तशी लेखी विनंती केल्यास दुसऱ्या अभिकरणाकडे ती कामे सोपविण्यात येतात.

शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. स्थाविका-१०९२/ प्र. क्र. २१/ योजना-६, दिनांक १६ मार्च १९९२.

**(४) जिल्हा परिषदांना निधी उपलब्ध करून देण्याची कार्यपद्धती :—**

आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमाखालील कामांना निधीचे वितरण ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या शासन निर्णय, क्रमांक झेडपीए-१०९०/सीआर-१६५२/२४, दिनांक ७ जानेवारी १९९२ अन्वये दिलेल्या सूचनेनुसार करण्यात येते. जिल्हाधिकारी गरजेनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना निधी वितरित करतात. परंतु, ते जिल्हा परिषदेच्या कार्यान्वयीन यंत्रणेला परस्पर निधी वितरित करू शकत नाहीत. खर्चाचा आढावा घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी दर तीन महिन्यांनी निधी वितरित करावा, म्हणजे जिल्हा परिषदेकडे वर्षअखेर जास्त निधी शिल्लक राहणार नाही. जिल्हा परिषदेने वित्तीय वर्ष संपल्यानंतर एका आठवड्याचे आत शिल्लक निधी शासनाकडे परत करावा. निधी परत करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेची राहील व पाठपुरावा करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील. जिल्हा परिषदेने केलेल्या कामांवरील प्रत्यक्ष खर्चाच्या ३ टक्के रक्कम अभिकरण शुल्क म्हणून कापून घ्यावी.

शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. एसपीडी-१०९१/सीआर-१२/ योजना-६, दिनांक १५ जानेवारी १९९२.

**(५) नगरपरिषदा/महानगरपालिका/महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण मंडळ (म्हाडा), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व अन्य निमशासकीय यंत्रणांना निधी उपलब्ध करून देण्याची कार्यपद्धती :—**

या कार्यक्रमाखाली कामे करण्यासाठी नगरपरिषदा, महानगरपालिका, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण इ. निमशासकीय संस्थांना अनुदान पद्धतीनुसार निधी वितरित केला जातो. हा निधी त्रैमासिक पद्धतीने वितरित करण्यात येईल व आधी दिलेला निधी पूर्ण खर्च झाल्याशिवाय अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिला जाणार नाही. तसेच या कार्यक्रमासाठी आधीच्या वित्तीय वर्षात

दिलेला निधी त्याच कार्यक्रमासाठी वापरला गेला आहे किंवा नाही याबद्दलचा दाखला प्राप्त झाल्याशिवाय पुढील वर्षातील पहिल्या तिमाहीचा निधी मुक्त करण्यात येणार नाही. निमशासकीय संस्थांनी त्यांच्याकडील मागील वर्षातील शिल्लक निधी शासनाकडे पुढील तीन महिन्यांमध्ये परत केला नाही तर अशी शिल्लक रक्कम नगरविकास विभागातर्फे त्यांना वितरित करण्यात येणाऱ्या अनुदानातून वळती करून घेण्यात येईल.

**(६) जिल्हा परिषदेच्या समित्यांची मंजुरी घेण्याबाबत :—**

आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमाखालील कामे जिल्हा परिषदेमार्फत कार्यान्वित होत असताना जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर त्याच कामांना पुन्हा जिल्हा परिषदेच्या वर्क्स कमिटी, स्थायी समिती, सर्वसाधारण समिती यांची पुन्हा मान्यता घेण्याची आवश्यकता नाही. मात्र, निविदा, मागविण्यासाठी विहित पद्धत जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या अधिनियमानुसार संबंधित समितीच्या अनुमतीने अंमलात आणली जावी.

शासन निर्णय नियोजन विभाग क्र. स्थाविका-१०९३/प्र.क्र.५८/योजना-६, दिनांक २ जुलै १९९४.

**(७) नगरपरिषद/नगरपालिका यांनी द्यावयाची मंजुरी :—**

तांत्रिक मंजुरी देण्याचे अधिकार शा.फ.न.वि. सा.आ. विभाग, क्र. एमआयएस. १०७७/३४३/युडी-२३, दिनांक १४ सप्टेंबर १९७७ व महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाचे पत्र क्र. एमआयएस-१०८१/९५/आयबी/आ-७, दिनांक ८ ऑक्टोबर १९८७ अन्वये म.पा.पु. व ज.नि. मंडळाच्या जिल्ह्यातील संबंधित अभियंत्यांना दिलेले आहेत. तसेच दिनांक १४ सप्टेंबर १९७७ च्या परिपत्रकात नगरपरिषद/नगरपालिका यांनी अवलंबिण्याची कार्यपद्धती देखील नमूद केलेली आहे.

**(८) आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमाखाली राखीव असलेला निधी :—**

या कार्यक्रमांतर्गत प्रत्येक आर्थिक वर्षासाठी उपलब्ध होणाऱ्या निधीमधून पाणीपुरवठा योजना, प्राथमिक शाळा, खोल्यांचे बांधकाम व दुरूस्ती तसेच अनुसूचित जातीच्या विकासासाठी हाती घेण्यात येणाऱ्या कामांसाठी अनुक्रमे २० टक्के, २० टक्के व १० टक्के इतकी तरतूद प्रत्येक जिल्ह्याला देण्यात येणाऱ्या तरतुदीतून राखून ठेवण्यात यावी.

शासन पत्र, नियोजन विभाग क्र. स्थाविका-१०९६/सीआर-४७/का-१४४५, दिनांक १२ सप्टेंबर १९९६.

**(९) कार्यक्रमांतर्गत निधीचे वाटप कार्यकक्षा, पद्धती व कामाची कमाल आर्थिक मर्यादा :—**

सर्व विधानसभा सदस्य, विधानपरिषद सदस्य व मा. राज्यपालांनी नियुक्त केलेल्या आमदारांना दरवर्षी रु. ६० लक्ष प्रमाणे निधी देण्यात येतो. आमदारांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना कामे सुचवावयाची असतात. त्या कामाचे आराखडे व अंदाजपत्रके तयार झाल्यावर संबंधित जिल्हाधिकारी त्या कामांना प्रशासकीय मंजुरी देतात. वि.स.स. हे आपल्या मतदारसंघातील कामे सुचवितात. परंतु विधानपरिषद सदस्य/मा. राज्यपाल

शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. स्थाविका-१०९८/प्र.क्र. ८/का-१४४५ दिनांक १६ मार्च १९९८ व क्र. स्थाविका-१०९७/प्र.क्र. ३/का. १४४५, दिनांक ८ ऑगस्ट १९९७.

नियुक्त वि.स.स. ला एकापेक्षा अधिक जिल्ह्यांमध्ये कामे सुचविणे अनुज्ञेय आहे. आमदारांना मिळणाऱ्या निधीच्या दीडपट रकमेएवढी कामे आमदारांनी सुचवावयाची असतात. दुसऱ्या वर्षापासून मात्र मिळणाऱ्या निधीतून पहिल्या वर्षअखेर अपूर्ण राहिलेल्या कामांसाठी लागणारी रक्कम प्रथम उपलब्ध करून दिल्यानंतर उरलेल्या रकमेच्या दीडपट एवढी कामे मंजूर करावीत.

शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. स्थाविका-१०९७/प्र.क्र.८/का-१४४५, दिनांक १६ मार्च १९९८.

आमदारांच्या शेवटच्या वर्षाच्या कालखंडामध्ये सुचविलेल्या आधीच्या कामांपैकी अपूर्ण राहिलेल्या कामांसाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून दिल्यानंतर उरलेल्या रकमे एवढ्या रकमेची कामे मंजूर करावी. या कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या कामांचा खर्च हा १० लक्ष रु. एवढ्या कमाल मर्यादेपर्यंत तर कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यासाठी रु. १५ लक्षपर्यंत मर्यादित राहील.

शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. स्थाविका-१०९२/सीआर १३/यो. ६, दिनांक १८ जानेवारी १९९३ व क्र. स्थाविका-१०९४/प्र.क्र. २९/का. १४४५, दिनांक ६ एप्रिल १९९४.

**(१०) आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमाखाली राज्यातील जिल्ह्यांसाठी व बृहन्मुंबईसाठी हाती घ्यावयाच्या योजना :—**

या कार्यक्रमाखाली राज्यातील जिल्ह्यांसाठी व विशेषतः बृहन्मुंबईसाठी हाती घ्यावयाच्या योजनांची यादी परिशिष्ट 'अ' मध्ये दिली आहे. यादीमध्ये नमूद केलेल्या कामांशिवाय कोणतीही कामे शासनाने अनुमतीशिवाय हाती घेण्यात येऊ नयेत.

शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. स्थाविका-१०९२/मातब/सीआर-१३, यो. ६, दिनांक १८ जानेवारी १९९३.

**(११) आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमाखाली मार्गदर्शक तत्त्वांत अनुज्ञेय नसणाऱ्या कामांची यादी :—**

स्थानिक विकास कार्यक्रमाखाली मार्गदर्शक तत्त्वांमध्ये बसत नसणाऱ्या कामांची यादी परिशिष्ट 'ब' मध्ये जोडली आहे.

शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. स्थाविका-१०९६/प्र.क्र. ५०/का. १४४५, दिनांक १६ मार्च १९९६.

**(१२) सुधारित अंदाजपत्रकांना मान्यता देण्याचे अधिकार व कार्यपद्धती :–**

या कार्यक्रमाखाली मंजूर करण्यात आलेल्या कामांच्या मूळ अंदाजपत्रकात काही अपरिहार्य तांत्रिक बदल किंवा जिल्हा दरसूचीमुळे झालेल्या वाढीमुळे जर वाढ होत असेल तर रु. १० लाखापर्यंतच्या सुधारित अंदाजपत्रकांना मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी व सदस्य-सचिव, जिल्हा नियोजन व विकास मंडळ यांना प्रदान करण्यात येत आहेत. रु. १० लाखापेक्षा अधिक वाढ असलेली कामे सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात यावीत.

**(१३) आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या कामाचे परिरक्षण व देखभाल करण्याचे हमीपत्र घेण्याबाबत :—**

शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. स्थाविका-१०९६/४१८/का. १४४५, दिनांक १८ फेब्रुवारी १९९६.

आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांना मंजुरी देण्यापूर्वी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडून अथवा अभिकरणाकडून कामे पूर्ण झाल्यावर त्याचे परिरक्षण व देखभाल करण्यास संबंधित स्वराज्य संस्था तयार असल्याबाबतचे हमीपत्र (परिशिष्ट 'क' येथे जोडल्याप्रमाणे) घेतल्यावरच कामांना मंजुरी देण्यात यावी.

**(१४) शासकीय व निमशासकीय अभिकरणांना अभिकरण शुल्क देण्याबाबत :-**

शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. एसपीडी-१०८८/सीआर-३/यो. ६, दिनांक १ जून १९८९ व दि. ८ जून १९९०.

आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमातून जिल्हा परिषदेमार्फत कार्यान्वित केलेल्या कामांवर एकूण प्रत्यक्ष खर्चाच्या ३ टक्के अभिकरण शुल्क तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग व इतर शासकीय अभिकरणांना पी.डब्ल्यू.डी. मॅन्युअलप्रमाणे अभिकरण शुल्क देण्यात यावे. हे शुल्क प्रथमच मंजूर केलेल्या कामांना लागू राहील.

**(१५) आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत कामांना कार्योत्तर मंजुरी देण्याबाबत :–**

शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. स्थाविका-१०९१/७४/सीआर-२, यो-६, दिनांक ६ फेब्रुवारी १९९१.

शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. एसडीपी-१०८५/५०७/सीआर-७/पीआरजी-२, दिनांक ४ नोव्हेंबर १९८५ अन्वये जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या निर्णयानुसार कार्यक्रमाच्या मार्गदर्शक तत्त्वाच्या अधीन राहून कामांना मंजुरी द्यावी व नंतर कामे कार्यात्तर मंजुरीसाठी नियोजन विभागाकडे पाठवावीत असे आदेश होते. यामध्ये बदल करून शासन निर्णय, क्र. एसडीपी-१०९०/७४/सीआर-२/योजना-६, दिनांक २ जानेवारी १९९१ अन्वये कामाचा आराखडा व वेळोवेळी मंजूर केलेली कामे कार्योत्तर मंजुरीसाठी नियोजन विभागाकडे न पाठविता. संबंधित विभागीय आयुक्तांकडे पाठवावीत. विभागीय आयुक्तांना या आदेशाद्वारे या कार्यक्रमाच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अधीन राहून कामांना कार्योत्तर मंजुरी देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी या कार्यक्रमाची अंमलबजावणी सुलभ व्हावी म्हणून पुढीलप्रमाणे वेळापत्रक अंमलात आणावे :—

| | | |
|---|---|---|
| (१) जानेवारी-फेब्रुवारी | : | जिल्हा नियोजन व विकास मंडळ यांचे सदस्य संबंधित कार्यान्वयीन अधिकारी इत्यादींकडून कामाच्या सूचना/प्रस्ताव मागविणे. |
| (२) १० मार्च पर्यंत | : | सुचविलेली कामे नियमानुसार आहेत किंवा नाहीत याची तपासणी करणे. |
| (३) १५ एप्रिल पर्यंत | : | प्रथमदर्शनी नियमात बसणारी कामे तांत्रिकदृष्ट्या योग्य आहेत किंवा नाहीत याची संबंधित अधिकाऱ्यांकडून पडताळणी करणे. |

(४) ३१ मे पर्यंत : आराखड्याला समितीची मंजुरी घेणे.

(५) ३० जून पर्यंत : कार्यक्रमांचा आराखडा कार्योत्तर मंजुरीसाठी पाठविणे.

आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घेतलेल्या कामांची माहिती अद्ययावत ठेवण्याच्या दृष्टीने तसेच कार्यक्रमाच्या अंमलबजावणीवर संनियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने या कार्यक्रमाखाली एकूण हाती घेण्यात आलेली कामे, पूर्ण झालेली कामे, अपूर्ण कामे याबाबतची माहिती दिनांक ६ फेब्रुवारी १९९१ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट-५ मध्ये जिल्हाधिकाऱ्यांकडून दरवर्षी ३१ मे पर्यंत विभागीय आयुक्तांनी संकलित करावी व ती दिनांक ३१ जुलै पर्यंत शासनाकडे पाठवावी.

**(१६) कामे पूर्ण झाल्यावर फलक लावणे :–**

आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमाखाली घेतलेली बांधकामाची कामे पूर्ण झाल्यावर त्याच्या दर्शनी भागावर खालीलप्रमाणे फलक लावण्यात यावा :—

| |
|---|
| आमदारांच्या स्था.वि.का. अंतर्गत घेतलेले काम |
| कामाचे वर्ष |
| खर्च |

या कार्यक्रमाखालील कामे जेव्हा बांधकाम स्वरूपाची नसतील तेव्हा लाकडी अगर तत्सम फलक लावणे शक्य असल्यास लावावा.

शासन निर्णय नियोजन विभाग क्र. स्थाविका-१०९२/तपासणी/सीआर/सीआर-९८/योजना-६, दिनांक १९ ऑगस्ट १९९२.

**(१७) कामांचे तपासणी अहवाल :–**

शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र. एसडीपी-१०९०/४४०/भेटपथक/योजना-६, दिनांक २९ नोव्हेंबर १९९० अन्वये या कार्यक्रमांतर्गत कामांना भेटी देण्यासाठी पथक निर्माण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे आधीच्या वर्षात या कार्यक्रमांतर्गत मंजूर केलेल्या कामांपैकी रॅण्डम सॅम्पलींग पद्धतीने किमान १५ ते २० कामे निवडून त्या कामांची नमुना पाहणी करून व त्याचे अहवाल विहित प्रपत्रमध्ये शासनाकडे पाठविण्यात यावेत. याबाबतचे प्रपत्र परिशिष्ट 'ड' येथे जोडले आहे.

शासन निर्णय नियोजन विभाग क्र. स्थाविका-१०९७/प्र.क्र. २८३/का. १४४५, दिनांक २० जून १९९८.

**(१८) प्रशासकीय मान्यता दिलेली कामे रद्द करणे :–**

जागेच्या अभावी किंवा तांत्रिक बाबतीत काही अडचणी उद्‌भवल्यास कामे रद्द करता येतील. परंतु आराखडे व अंदाजपत्रके तयार झाल्यावर, सुचविलेले काम रद्द करता येणार नाही.

**(१९) एखाद्या मतदारसंघामधील गाव दुसऱ्या जिल्ह्यामध्ये येत असल्यास करावयाची कार्यवाही :-**

शासन निर्णय नियोजन विभाग क्र. स्थाविका-१०९७/प्र.क्र. २५९/का. १४४५, दिनांक २३ जुलै १९९८.

एखाद्या मतदार संघामधील गाव अथवा विभाग दुसऱ्या जिल्ह्यामध्ये असल्यास, ज्या जिल्ह्यामध्ये ते गाव/विभाग येत असेल त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी हे गाव/विभाग ज्या जिल्ह्यांमध्ये अंतर्भूत होत असेल त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना लोकसंख्येच्या निधी उपलब्ध करून द्यावा.

**(२०) कामे सुचविण्याची पद्धत :–**

वि.प.स. व मा. राज्यपालांनी नियुक्त केलेल्या आमदारांनी त्यांच्या नाममुद्रीत पत्रावर स्वतःच्या सहीने निधी वाटपाबाबत जिल्ह्यांचे विकल्प द्यावेत तसेच सर्व आमदारांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे कामे सुचविताना त्यांच्या नाममुद्रीत पत्रावर स्वतःच्या स्वाक्षरीने कामे सुचवावीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मुरलीधर नाले,**

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

**आमदार स्थानिक विकास कार्यक्रम**
**मार्गदर्शक तत्त्वे**

**महाराष्ट्र शासन**

**नियोजन विभाग**

शासन परिपत्रक क्रमांक : स्माविका-२००४/प्र.क्र. २७/का. १४४५

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ एप्रिल २००४.

**वाचा.**—(१) शासन परिपत्रक, नियोजन विभाग क्र. स्थाविका-१०९६/प्र.क्र. २६/का. १४४५, दिनांक २८ सप्टेंबर १९९८.

**परिपत्रक**

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाच्या अनुषंगाने नियोजन विभाग, परिपत्रक क्र. स्थाविका-१०९६/प्र.क्र. २६/का. १४४५, दिनांक २८ सप्टेंबर १९९८ अन्वये शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/परिपत्रके इत्यादी विचारात घेऊन या कार्यक्रमाचा उद्देश, या कार्यक्रमांतर्गत घ्यावयाच्या कामांना मंजुरी देण्यासाठी समिती, कामे कार्यान्वित करावयाची कार्यपद्धती तसेच जिल्हा परिषदा/नगरपरिषदा/महानगरपालिका/महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व अन्य निम-शासकीय यंत्रणाना निधी उपलब्ध करून देण्यासाठी कार्यपद्धती, कामांना कार्योत्तर मंजुरी देण्याबाबत शासकीय व निम-शासकीय अभिकरणांना अभिकरण शुल्क देण्याबाबत, घेण्यात येणाऱ्या कामांसाठी परिरक्षण व देखभाल करण्याचे हमीपत्र घेणे, सुधारित अंदाजपत्रकांना मान्यता देण्याचे अधिकार व कार्यपद्धती तसेच मार्गदर्शक तत्त्वात अनुज्ञेय असलेल्या व नसलेल्या कामांची यादी जोडण्यात आली आहे. याशिवाय विधिमंडळ सदस्यांनी कामे सुचविण्याची पद्धत इत्यादीबाबत संदर्भाधीन परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत.

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाशी संबंधित वरील परिच्छेदात उल्लेख केल्याप्रमाणे परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते. तथापि, सदर परिपत्रकासोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये कामांची विषयानुसार/स्वरूपानुसार विभागणी करून यादी तयार केलेली नसल्यामुळे आता विषयानुसार व कामांचे स्वरूप विचारात घेऊन या परिपत्रकासोबत अनुज्ञेय कामांचे सुधारित परिशिष्ट "अ" जोडण्यात येत आहे. या परिपत्रकातील बाबींवर निर्णय घेताना मूळ आदेशाचा आधार घेण्यात यावा व योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशा सूचना देण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वि. ला. ढोले,**
उप सचिव.

## परिशिष्ट-अ

**एक : बांधकामे**

**(ए) पाटबंधारे —**

१. कोल्हापूर पद्धतीचे बंधारे (रु. १५.०० लाख) (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९७/प्र.क्र. ८/का. १४४५, दिनांक १६ मार्च १९९८ व क्र. स्थाविका-१०९८/प्र.क्र. २२५/का. १४४५, दिनांक ५ नोव्हेंबर १९९८).

२. लघु पाटबंधाऱ्यांची कामे (रु. १५.०० लाख)

३. वनराई बंधारे जिल्हा कृषि व मृदसंधारण विभागाकडून करणे (शासन निर्णय क्र. स्थाविका-२००२/प्र.क्र. ३७८/का. १४४५, दिनांक २७ नोव्हेंबर २००२).

**(बी) रस्ते—**(शासन निर्णय क्र. एसडीपी-१०८५/५०७/सीआर-७/पीआरजी-२, दिनांक २४ एप्रिल १९८५, ४ नोव्हेंबर १९८५ व शासन निर्णय क्र. एसडीपी-१०८८/सीआर-१/योजना-६, दिनांक १२ सप्टेंबर १९८८).

(१) **रस्त्यांची कामे** (१०.०० लाख)

(अ) लहान रस्ते (खडीकरण)

(ब) मिसिंग लिंक

(क) छोटे पूल

(ड) ३ कि.मी. पर्यंत लांबीच्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे (सा.बां.वि. च्या प्रमाणकानुसार) (पी.डब्ल्यू.डी. नॉर्म्स) तसेच ३ मीटरपेक्षा जास्त रुंदीचे रस्ते घ्यावयाचे असल्यास, संबंधित नगरपालिका/नगरपरिषदा यांची पूर्वानुमती घेणे आवश्यक आहे. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९७/प्र.क्र. २३३/का. १४४५, दिनांक १३ जुलै १९९८).

(इ) नळकंडी पूल

(उ) साकव

(फ) नाल्यांची कामे

(ब) रस्त्यावरील मोरींची कामे

(भ) लहान नाल्यावर फर्शी बांधणे

(म) फूट ब्रीज

(य) ड्रेनेजची कामे

(र) सिमेंट प्लगची कामे (शासन परिपत्रक क्र. एसडीपी-१०८९/१६४/सीआर-१०/योजना-६, दिनां ५ मे १९८९ व पत्र दिनांक १ फेब्रुवारी १९९२ पत्र क्र. स्थाविका-१०९४/६४०/का. १४४५, दिनांक २ ऑगस्ट १९९५).

२. रस्त्याच्या काँक्रीटीकरणाची कामे : (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९४/प्र.क्र. २९/का. १४४५, दिनांक ६ एप्रिल १९९४). रस्त्याच्या काँक्रीटीकरणाची मर्यादा व खर्च यांचे निकष यापूर्वी खडीकरण व डांबरीकरणाच्या कामाप्रमाणे असतील व काही कामे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रमाणकानुसार घेणे आवश्यक राहील.

३. डोंगरी भागातील रस्त्यांच्या वळणावर, नदीच्या काठावर व उघड्या विहिरींवर संरक्षक भिंती/कठडे बांधणे. सदर कामाच्या देखभालीची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांची राहील. त्याप्रमाणे त्या संस्थांकडून देखभाल करण्याची हमीपत्र घेण्यात यावे. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९४/प्र.क्र. २९/का. १४४५, दिनांक ६ एप्रिल १९९४).

४. नवीन रस्त्यांसाठी मातीकाम करणे, रस्त्याचे रुंदीकरण करणे, रस्त्याचे चढाव सुधारणे इ. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९९/प्र.क्र. ७/का. १४४५, दिनांक १६ जून १९९९).

५. हॉटमिक्स पद्धतीने रस्त्यांची कामे रु. १०.०० लाखाच्या मर्यादेत (शासन निर्णय क्र. स्थाविका-२०००/प्र.क्र. ४०८/का. १४४५, दिनांक १० जुलै २००१).

६. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास एकात्मिक विकास रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत प्रतीवर्षी रुपये २० लाखाच्या मर्यादेत निधी उपलब्ध करणे. (शासन निर्णय क्र. स्थाविका-२०००/प्र.क्र. ३९५/का. १४४५, दिनांक २९ नोव्हेंबर २००२).

**(सी) पाणीपुरवठा—** (शासन निर्णय क्र. एसडीपी-१०८५/५०७/सीआर-७/पीआरजी-२, दिनांक २४ एप्रिल १९८५) पाणीपुरवठ्याची कामे (रु. १०.०० लाख) (ग्रामविकास विभागाच्या प्रमाणकानुसार)

१. ग्रामीण पाणीपुरवठ्याच्या कायम स्वरुपाच्या लहान लहान योजना.

२. ज्या गावासाठी नळ पाणीपुरवठा योजना अगोदरच झाल्या असतील अशा गावातील वाड्यांसाठी जादा पाईप लाईन टाकून वाड्यांना पाणीपुरवठा करण्यासंबंधी कामे. तसेच पाण्याची टाकी बांधणे.

३. गावातील वाड्यांसाठी विंधन विहिरी.

४. शहरी भागातील पाणीपुरवठ्याची कामे.

५. ग्रामीण पाणीपुरवठ्यासाठी सामुहिक विहिरींचे बांधकाम. ग्रामविकास विभागाने सार्वजनिक विहिरींचे बांधकामासाठी जे निकष ठरवून दिलेले आहेत, त्या निकषानुसार आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सामुहिक विहिरींचे बांधकाम अनुज्ञेय राहील. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९४/प्र.क्र. २९/का. १४४५, दिनांक ६ एप्रिल १९९४).

६. शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. स्थाविका-२००१/प्र.क्र. ३२०/का. १४४५, दिनांक ३ नोव्हेंबर २००० व ३१ मार्च २००१ अन्वये निर्गमित शासन आदेश रद्द करून आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत पाणीपुरवठा योजना घेण्यासाठी लोकवर्गणीची घातलेली अट रद्द करण्याबाबत निर्णय (शासन निर्णय क्र. स्थाविका-२०००/प्र.क्र. ३२०/का. १४४५, दिनांक ७ जुलै २००१, दिनांक ३ मे २००१ पासून आदेश अंमलात).

**(डी) सामाजिक सभागृह—**(शासन निर्णय क्र. एसडीपी-१०८५/५०७/सीआर-७/पीआरजी-२, दिनांक २४ एप्रिल १९८५, शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९४/प्र.क्र. २९/का. १४४५, दिनांक ६ एप्रिल १९९४, शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९८/प्र.क्र. ३७/का. १४४५, दिनांक १८ ऑगस्ट १९९८ व क्र. स्थाविका-२०००/प्र.क्र. ३३५/का. १४४५, दिनांक ३ फेब्रुवारी २००१).

१. सामाजिक सभागृह (रु. १०.०० लाख)

२. अनुसूचित जाती/जमातीच्या वस्त्यांमधील समाजमंदिराच्या दुरुस्तीची कामे (शासन निर्णय एसडीपी-१०८८/सीआर-१/योजना-६, दिनांक ७ फेब्रुवारी १९८९).

३. समाजमंदिर व कम्युनिटी हॉलची कामे घेणे :—

शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९२/मातब/सीआर-१३/योजना-६, दिनांक १८ जानेवारी १९९३ सोबत जोडलेल्या परिशिष्ट-१ मध्ये अनुक्रमांक ५ व अनुक्रमांक २९ अन्वये समाजमंदिर व कम्युनिटी हॉलची वेगवेगळी कामे अनुज्ञेय आहेत. तसेच एका गावात अगोदरच समाजमंदिर असले तरी अनुसूचित जाती जमातीच्या निरनिराळ्या गरजांनुसार दुसरे समाजमंदिर बांधणे अनुज्ञेय आहे. परंतु जाती विरहीत समाज निर्माण करण्याचे शासनाचे धोरण असल्यामुळे व निरनिराळ्या समाजात व धर्मात एकात्मिकता साधण्याच्या धोरणामुळे यापुढे एका गावी समाजमंदिरे आणि कम्युनिटी हॉलची वेगवेगळी कामे न घेता दोन्हीही कामांच्या ऐवजी एकच सामाजिक सभागृह (कम्युनिटी हॉल) लोकांच्या गरजेनुसार बांधण्यात यावे. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९४/प्र.क्र. २९/का. १४४५, दिनांक १९ ऑक्टोबर १९९४) असा शासनाने फेरविचारांती निर्णय घेतलेला आहे. खर्चाची कमाल आर्थिक मर्यादा रु. १०.०० लाख आहे. खाली नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून सामाजिक सभागृहाची कामे (कम्युनिटी हॉल) घेण्यात यावीत.

३.१. या कम्युनिटी हॉलसाठी वरील खर्चाच्या मर्यादेत आवश्यकतेनुसार संडास व मुतारींची व्यवस्था करता येईल.

३.२. वर नमूद केलेल्या खर्चाच्या मर्यादेत टाईप डिझाईनप्रमाणे कामे घेण्यात यावीत. टाईप डिझाईन्स् स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यात येत आहेत. तोपर्यंत नेहमीच्या पद्धतीप्रमाणे वर नमूद केलेल्या खर्चाच्या मर्यादेत कामे घेण्यात यावीत.

३.३. जर एखाद्या जनहितकारी संस्थेने खर्चाचा भार घेतल्यास अथवा देणगी दिल्यास वर नमूद केलेल्या खर्चाच्या मर्यादेत कामे घेण्यास परवानगी देण्यात येत आहे. परंतु मिळणारी देणगी ही पूरक असावी व ती शासनातर्फे होणाऱ्या खर्चापेक्षा जास्त असू नये. मात्र कोणत्याही परिस्थितीतवरील खर्चाच्या मर्यादेबाहेर खर्च करण्यात येऊ नये. तसेच कम्युनिटी हॉलची मालकी शासकीय यंत्रणेकडे राहील.

३.४. वरील अटीं व्यतिरिक्त शासनाने वेळोवेळी घालून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे या कामांनाही लागू होतील.

३.५. समाजमंदिराची/सामाजिक सभागृहाची कामे यापूर्वीच मंजूर करण्यात आली असतील व ती घेण्यात आली असतील ती पूर्ण करावीत. परंतु नवीन कामे मात्र वरील मार्गदर्शक तत्त्वानुसार यापुढे घेण्यात यावीत. (संदर्भातील परिपत्रक दिनांक २८ सप्टेंबर १९९८ नुसार).

४. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत राज्यामध्ये बांधण्यात येणारी सभागृहे स्थानिक लोकांच्या गरजा लक्षात घेऊन बांधण्यात यावीत (शासन निर्णय नियोजन विभाग क्र. स्थाविका २०००/प्र.क्र. ३३५/का. १४४५, दिनांक ३ फेब्रुवारी २००१).

५. नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रांसाठी गरजेनुसार एकापेक्षा जास्त मात्र जातीविरहित समाज निर्माण करण्याचे धोरण पाहता (एका वॉर्डात एकच) सामाजिक सभागृह बांधणे. (शा.नि.क्र. स्थाविका-२००२/प्र.क्र. ३८८/का. १४४५, दिनांक २५ मार्च २००३.

**(ई) व्यायामशाळा.**—(शासन निर्णय क्र. एसडीपी-१०८५/५०७/सीआर-७/पीआरजी-२, दिनांक २४ एप्रिल १९८५).

१. व्यायामशाळा.—(रु. १०.०० लाख)

२. आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी बांधलेल्या व्यायामशाळांना रु. ५०,००० पर्यंत क्रीडा साहित्य व इतर उपकरणे खरेदी करणे अनुज्ञेय आहे. हे साहित्य स्थानिक विक्रेत्याकडून खरेदी करणे अनुज्ञेय असून या खरेदीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी हे सक्षम अधिकारी म्हणून राहतील. साहित्य खरेदीच्या अटी शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९७/प्र.क्र. १२७/का. १४४५, दिनांक १७ मार्च १९९८ अन्वये अनुज्ञेय राहील.

**(एफ) स्मशानभूमी.**—(शासन पत्र क्रमांक एसडीपी-१०८७/सीआर-९५/पीआरजी-२, दिनांक १३ जानेवारी १९८८).

१. स्मशानभूमीची कामे.—(रु. १०.०० लाख)

**(जी) चावडी.**—(शासन निर्णय क्र. एसडीपी-१०८८/सीआर-१/योजना-६, दिनांक १२ सप्टेंबर १९८८ व क्र. स्थाविका-१०९४/६०/आमदार/का. १४४५, दिनांक २४ ऑक्टोबर १९९४).

१. चावडी.—(रु. १०.०० लाख)

**(एच) ग्राम सचिवालय.**—(शासन निर्णय क्र. स्थाविका-२०००/प्र.क्र. ३६/का. १४४५, दिनांक ५ फेब्रुवारी २०००).

१. ग्राम सचिवालय.—(रु. ५.०० लाख)

**(आय) सार्वजनिक वाचनालय.**—(शासन परिपत्रक क्र. एसडीपी-१०८८/सीआर-१/योजना-६, दिनांक १२ सप्टेंबर १९८८).

१. सार्वजनिक वाचनालयाचे बांधकाम.—(रु. १०.०० लाख).

२. वाचनालयाच्या बांधकाम खर्चातील १० टक्के रक्कम वाचनालयाकरिता पुस्तके खरेदीसाठी व त्यांच्या रक्षणासाठी रॅक्स व कपाटे खरेदीसाठी अनुज्ञेय. इमारत बांधकामासाठी महापालिका हद्दीत रु. १०.०० लाख, जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी व अन्यत्र 'अ' वर्ग वाचनालय रु. ६.०० लाख, 'ब' वर्ग वाचनालयासाठी रु. ४.०० लाख, 'क' वर्ग वाचनालयासाठी, रु. २.०० लाख, 'ड' वर्ग वाचनालयासाठी रु. १.०० लाख एवढी मर्यादा (शा.नि.क्र. स्थाविका-१०९९/प्र.क्र. २२/का. १४४५, दिनांक ६ मार्च २०००).

**(जे) कंपाऊंड हॉल.—**(संरक्षक भिंत) (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९१/प्र.क्र. ३९३/सीआर-३५/योजना-६, दिनांक २९ जानेवारी १९९२).

१. सामाजिक सभागृह, स्मशानभूमी, प्राथमिक शाळा (मान्य संकल्पचित्रात असल्यास), आश्रमशाळा, पाळणाघरे, पोस्टमार्टम रूम इत्यादी अनुज्ञेय कामांना कंपाऊंड वॉल अथवा कुंपण घालण्याची कामे पुढील अटींच्या अधीन राहून घेता येईल.

१.१. कंपाऊंड वॉल अथवा कुंपण घालण्याच्या कामाचा अंतर्भाव मार्गदर्शक तत्त्वातील (स्थानिक विकास कार्यक्रमाच्या) अनुज्ञेय कामात करण्यात यावा. मात्र हे एक वेगळे काम न समजता तो अनुज्ञेय मूळ कामाचाच एक भाग समजण्यात यावा. याचाच अर्थ असा की कुंपण घालण्याचे काम हे स्वतंत्र काम म्हणून अनुज्ञेय ठरणार नाही किंवा अस्तित्वात असलेल्या कामाला केवळ कुंपण घालणे अनुज्ञेय राहणार नाही.

१.२. कुंपण घालण्याच्या कामाचा खर्च हा वेगळा अनुज्ञेय न समजता मूळ कामाच्याच खर्चाचा (अनुज्ञेय कामाच्या) एक भाग असेल व तो मूळ कामाच्याच एकूण खर्चाच्या (रु. १०.०० लाख) मर्यादेच्या अधीन असेल. जेथे खर्चाची कमाल मर्यादा कमी असेल तेथे त्या मर्यादेपर्यंत असेल.

१.३. कुंपण घालण्याच्या कामाचे टाईप डिझाईन व आवश्यकता मूळ कामाच्या बांधकामाशी पूरक असेल. मूळ कामाला टाईप डिझाईनमध्ये तरतूद नसल्यास हे काम अनुज्ञेय ठरणार नाही.

१.४. कुंपण घालण्याची मुभा ही १९९२-९३ पासून घेण्यात येणाऱ्या नवीन कामांनाच अनुज्ञेय ठरेल. त्या अगोदरच्या कामांना कुंपण घालण्याचा खर्च अनुज्ञेय ठरणार नाही.

२. राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा/ग्रामपंचायती यांच्या क्षेत्रातील सध्या अस्तित्त्वात असलेल्या स्मशानभूमींना कुंपण घालणे/त्यावर शेडस् घालणे. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९२/मातब/सीआर-१३/योजना-६, दिनांक १८ ऑगस्ट १९९२).

३. डोंगर उतारावर जेथे घोषित गलिच्छ वस्त्या असतील तेथे डोंगरावरील दरडी कोसळू नयेत म्हणून संरक्षक भिंत बांधणे तसेच समुद्राच्या वा नदीकाठी जेथे घोषित गलिच्छ वस्त्या असतील तेथे संरक्षक भिंत बांधणे. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९२/मातब/सीआर-१३/योजना-६, दिनांक १८ ऑगस्ट १९९२).

४. वन विभागाच्या जमिनीवर त्यांचे परवानगीने जंगली जनावरांपासून संरक्षण होण्यासाठी कंपाऊंड वॉल अथवा कुंपण घालणे. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९८/प्र.क्र. २८३/का-१४४५, दिनांक १७ मार्च १९९९).

५. नगरपरिषद व जिल्हा परिषदेच्या शाळांना कुंपण घालणे. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९९/प्र.क्र. ५८/का-१४४५, दिनांक १२ एप्रिल १९९९).

**दोन–शिक्षण :**

१. आदिवासी क्षेत्रात आश्रमशाळा (रु. १०.०० लाख).

२. प्राथमिक शाळांच्या नवीन खोल्या (बांधकामाची कमाल मर्यादा : आदिवासी विभाग रु. १.३० लाख, बिगर आदिवासी विभाग रु. १.२० लाख), (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९७/प्र.क्र. २०८/का-१४४५, दिनांक ९ जुलै १९९९).

३. प्राथमिक शाळा खोलीची विशेष दुरुस्ती (शासन निर्णय क्र. एसडीपी-१०८५/सीआर-७/पीआरजी-२, दिनांक ४ नोव्हेंबर १९८५).

४. ग्रामपंचायतीच्या बालवाडीकरिता इमारत बांधणे. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९४/प्र.क्र. २९/का-१४४५, दिनांक ६ एप्रिल १९९४). बालवाड्यांचे काम ग्रामपंचायत हद्दीत घेऊन त्यांच्या देखभालीची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीकडे राहील व त्याप्रमाणे हमीपत्र घेणे आवश्यक राहील.

५. अनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयांमध्ये संगणक उपलब्ध करणे (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९८/प्र.क्र. ७२/का-१४४५, दिनांक ५ नोव्हेंबर १९९८) एका शाळेला जास्तीत जास्त रुपये १०.०० लाखांच्या मर्यादेत खरेदी करण्यास अनुमती (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९८/प्र.क्र. २९८/का-१४४५, दिनांक ३० सप्टेंबर १९९९).

६. विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाच्या अनुदानित असलेल्या आश्रमशाळांना संगणक सुविधा उपलब्ध करणे. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९८/प्र.क्र. २९८/का-१४४५, दिनांक १६ मे २०००).

७. शालेय शिक्षण विभागाच्या क्र. आयटीपी-२०००/(७२/२०००)/संगणकीकरण कक्ष, दिनांक ३१ ऑगस्ट २००० च्या निर्णयानुसार (परिच्छेद ३) शाळापात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या माध्यमिक शाळांकरिता रु. २.०० लाखांपर्यंत निधी एकदाच (वन टाइम ग्रँट) पुस्तके घेण्याकरिता अनुज्ञेय करणे. (शासन निर्णय क्र. स्थाविका-२००२/प्र.क्र. २३३/का-१४४५, दिनांक १६ सप्टेंबर २००२).

**तीन—क्रीडा विषयक :**

१. शासनाच्या तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या प्राथमिक/माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, आदिवासी विकास विभागातर्फे चालविण्यात येणाऱ्या आश्रमशाळा यांच्या क्रीडांगणाची कामे. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९७/प्र.क्र. ४१/का-१४४५, दिनांक ११ जून १९९८).

२. शासनाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या सर्व स्तरावरील तसेच, विविध मान्यताप्राप्त एकविध खेळांच्या अधिकृत संघटनांद्वारा आयोजित राज्य, राष्ट्रीय तसेच, आंतरराष्ट्रीय स्पर्धा यासाठी निधी उपलब्ध करणे (शासन निर्णय क्र. स्थाविका-२००३/प्र.क्र. ३४८/का-१४४५, दिनांक ८ मे २००२).

३. नगरपालिका क्षेत्रात उद्यानाच्या विकासासाठी व उद्यानात बालकांसाठी क्रीडा साहित्य उपलब्ध करून देणे रु. १.०० लाखाच्या मर्यादेत (शासन निर्णय क्र. स्थाविका-२००२/प्र.क्र. २८१/का-१४४५, दिनांक ६ सप्टेंबर २००२).

**चार—आरोग्य विषयक :**

१. दिनांक १२ सप्टेंबर १९९८ रोजी अस्तित्त्वात असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात जेथे सोय नाही तेथे पोस्टमार्टम रूमचे बांधकाम. (शासन निर्णय क्र. एसडीपी-१०८८/प्र.क्र. १/योजना-६, दिनांक १२ सप्टेंबर १९८८).

२. दिनांक ३१ ऑगस्ट १९८९ रोजी अस्तित्त्वात असलेल्या नगरपरिषदांच्या दवाखान्यात/नगरपरिषद क्षेत्रातील ग्रामीण रुग्णालयात जेथे अगोदरच अशी सोय नाही तेथेच पोस्टमार्टम रूमचे बांधकाम. (शासन निर्णय क्र. एसडीपी-१०८८/११/योजना-६, दिनांक ३१ ऑगस्ट १९८९).

३. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या जीवनदायी योजनेच्या निधीचा जो ट्रस्ट स्थापन केला आहे त्यासाठी एक वेळ मदत म्हणून निधी वर्ग करण्यास अनुमती. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९७/प्र.क्र. ३/का-१४४५, दिनांक २० ऑक्टोबर १९९९).

**पाच—सार्वजनिक सुविधा :**

**(ए) स्वच्छता :**

१. ग्रामपंचायती/नगरपरिषदा/महानगरपालिकांच्या हद्दीत सार्वजनिक उपयोगासाठी संडास बांधणे, हे संडास ग्रामपंचायत/नगरपरिषदा/महानगरपालिका यांच्या मालकीचे असतील व त्यांच्या देखभालीची जबाबदारी संबंधित संस्थेला घ्यावी लागेल. तसेच हे संडास सार्वजनिक उपयोगासाठी उपलब्ध असावेत. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९२/मातब सीआर १३/योजना-६, दिनांक १८ जानेवारी १९९३).

२. महानगरपालिका, नगरपालिका व नगरपरिषद क्षेत्राला सार्वजनिक ठिकाणी सुलभ शौचालये बांधणे, मात्र स्थानिक विकास कार्यक्रमातून कोणत्याही एका सुलभ शौचालयामागे रु. १०.०० लाखांच्या मर्यादेपर्यंत खर्च करण्यात यावा. त्यावरील अतिरिक्त खर्च संबंधित महानगरपालिका, नगरपालिका अथवा नगरपरिषद यांनी सोसावा. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९२/मातब/सीआर-१३/योजना-६, दिनांक १८ जानेवारी १९९३ व क्र. स्थाविका-१०९४/प्र.क्र. २९/का-१४४५, दिनांक ६ एप्रिल १९९४).

३. सार्वजनिक उपयोगासाठी मुताऱ्या बांधणे (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९४/प्र.क्र. २९/का-१४४५, दिनांक ६ एप्रिल १९९४).

४. प्राथमिक शाळा खोल्यांच्या आवारात संडास/मुतारी बांधणे. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९४/प्र.क्र. २९/का. १४४५, दिनांक ६ एप्रिल १९९४).

५. ग्रामपंचायत हद्दीत गटार बांधणे. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९४/प्र.क्र. २९/का-१४४५, दिनांक ६ एप्रिल १९९४).

या कामाचा अंतर्भाव ड्रेनेजच्या कामामध्ये होत असल्यामुळे सदरचे काम घेण्यात यावे.

६. महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषदा क्षेत्रात सुलभ शौचालयाचे बांधकाम :—

शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९२/मातब/सीआर-१३/योजना-६, दिनांक १८ जानेवारी १९९३ सोबत जोडलेल्या परिशिष्ट १, अ.क्र. ४० अन्वये सुलभ शौचालयाच्या बांधकामाच्या खर्चाची मर्यादा रु. ५.०० लाख आहे. बृहन्मुंबई शहरापुरती ही मर्यादा रु. १०.०० लाख इतकी राहील. इतर अटी पूर्वीप्रमाणे असतील.

७. फिरते शौचालयासाठी लागणारी ट्रॉली खरेदी करणे, ट्रॉलीची देखभाल/दुरुस्ती संबंधित महानगरपालिकेने/नगरपरिषदेने स्वखर्चाने करावी. (शासन निर्णय क्र. स्थाविका-२००२/प्र.क्र. २८६/का-१४४५, दिनांक ११ सप्टेंबर २००२).

८. स्वच्छता अभियानांतर्गत लागणाऱ्या यंत्रसामग्रीचा (फिरती ट्रॉली) खरेदी करणे. (शासन निर्णय, क्र. स्थाविका-२००२/प्र.क्र. ३४१/का-१४४५, दिनांक १२ नोव्हेंबर २००२).

९. कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी फिरत्या ट्रॉलीला वाहून नेण्यासाठी ‘क’ वर्ग नगरपरिषदांसाठी ‘ट्रॅक्टर’ खरेदी करणे. (शासन निर्णय क्र. स्थाविका-२००२/प्र.क्र. ३४१/का-१४४५, दिनांक १२ मार्च २००३).

१०. घनकचरा व्यवस्थापन व सुविधा निर्माण करणे. (शा.नि.क्र. स्थाविका. २००४/प्र.क्र. ४३/का. १४४५, दिनांक २० फेब्रुवारी २००४.

**(बी) वीजपुरवठा :**

१. सार्वजनिक रस्त्यावर दिवाबत्तीची सोय करणे. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९५/प्र.क्र. ४१/का-१४४५, दिनांक १९ नोव्हेंबर १९९६ व २९ नोव्हेंबर १९९६).

२. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या कामांसाठी काही अटींवर ट्रान्सफॉर्मर व इतर विद्युत साहित्य खरेदी करणे (शासन निर्णय क्र. स्थाविका-२००२/प्र.क्र. १९१/का-१४४५, दिनांक १८ ऑक्टोबर २००२.)

**(सी) परिवहन :** (शासन निर्णय क्र. स्थाविका-२०००/प्र.क्र. २४९/का-१४४५, दिनांक २५ ऑक्टोबर २०००).

१. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या ग्रामीण भागातील एस.टी. थांब्यावर ६०,००० रुपये खर्चाच्या मर्यादेपर्यंत निवारे (Sheds) बांधणे. (ह्या थांब्याची परिरक्षणे, देखभाल इ. जबाबदारी ग्रामपंचायतीवर राहील आणि त्यासाठी ह्या कार्यक्रमातून निधी दिला जाणार नाही. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९२/मातब/सीआर १३/योजना-६, दिनांक १८ ऑगस्ट १९९२).

२. राज्यातील समुद्रकिनारे, नद्या, खाड्या येथे जलवाहतुकीच्या उपयोगासाठी सध्या उतारू धक्का अस्तित्त्वात नाही तेथे उतारू धक्के बांधणे. या धक्क्यांची देखभाल करण्याची जबाबदारी शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थांनी उचलणे आवश्यक राहील. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९२/मातब/सीआर-१३/योजना-६, दिनांक १८ ऑक्टोबर १९९२.)

३. एसटी महामंडळाचे जागेवर प्रवाशांसाठी प्रतिक्षालय व वाहतूक नियंत्रण कक्ष बांधणे. (शासन निर्णय क्र. स्थाविका-२००१/प्र.क्र. १४३/का-१४४५, दिनांक ३१ ऑगस्ट २००१) रु. १०.०० लाखांच्या मर्यादेत.

**सहा—इतर सुविधा :**

१. ज्या झोपडपट्ट्यांमध्ये (घोषित गलिच्छ वस्त्या) सार्वजनिक सुविधा निर्माण करण्याची शासनाची जबाबदारी आहे अशा ठिकाणी सार्वजनिक उपयोगाकरिता स्नानगृहे, संडास, अस्तित्त्वात असलेल्या संडासाची दुरुस्ती, पायवाटा, सार्वजनिक स्वरूपाचा पाणीपुरवठा व दिवाबत्ती अशी सामान्य स्वरूपाची कामे. (शासन निर्णय क्र. एसडीपी-१०८७/३४३/सीआर-१८/पीआरजी-२, दिनांक ९ डिसेंबर १९८७ आणि क्र. स्थाविका-१०९२/मातब/सीआर-१३/योजना-६, दिनांक १८ जानेवारी १९९३).

२. ज्या जिल्ह्यात जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या सभा घेण्यासाठी पुरेशी व्यवस्था नाही अशा जिल्ह्याच्या ठिकाणी सभागृह बांधणे, या बांधकामाचा खर्च कोणत्याही परिस्थितीत रु. १०.०० लाखांपेक्षा जास्त असू नये. (शासन निर्णय क्र. एसडीपी-१०८९/१७७/सीआर-११/योजना-६, दिनांक ४ मे १९८९).

३. पोलीस चौकीचे बांधकाम गृह विभागाने विहित केलेल्या आर्थिक व अन्य निकषांप्रमाणे परंतु कोणत्याही परिस्थितीत कामाचा खर्च रु. १०.०० लाखांच्या विहित मर्यादेत असला पाहिजे. (शासन निर्णय क्र. एसडीपी-१०८९/३५१/सीआर-१८/योजना-६, दिनांक ७ सप्टेंबर १९८९ व क्र. स्थाविका-१०९१/४७२/योजना-६, दिनांक ३१ ऑक्टोबर १९९१).

४. जिल्हा मुख्यालय/तालुका मुख्यालय येथे शासकीय कार्यालयाच्या परिसरात जनतेसाठी प्रतिक्षा कक्ष बांधणे (शासन निर्णय क्र. एसडीपी-१०९०/४१३/प्र.क्र.-१६/योजना-६, दिनांक १५ ऑक्टोबर १९९०).

५. महानगरपालिका क्षेत्रात मोकळ्या जागेचे मैदानात/उद्यानात रूपांतर करणे व त्यास तारेचे कुंपण करणे (मोकळ्या जागेचे मैदानात/उद्यानात रूपांतर करणे व त्यास तारेचे कुंपण घालणे ही कामे वेगवेगळी न समजता एकाच कामाचा भाग म्हणून समजण्यात यावी.) जुन्या कुंपणाऐवजी नवीन कुंपण घालणे या कामात अनुज्ञेय राहणार नाही. (शासन निर्णय क्र. एसडीपी-१०९०/७४/सीआर-२/योजना-६, दिनांक १७ सप्टेंबर १९९१).

६. राज्याला नद्या व तळी येथे सार्वजनिक उपयोगासाठी कपडे धुण्यासाठी घाट बांधणे. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९२/मातब/सीआर-१३/योजना-६, दिनांक १८ जानेवारी १९९३).

७. थंड हवेच्या ठिकाणी अथवा पर्यटन स्थळी पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी सिमेंटचे संरक्षक कट्टे बांधणे. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९४/प्र.क्र. २९/का-१४४५, दिनांक ६ एप्रिल १९९४).

थंड हवेच्या ठिकाणी अथवा पर्यटन स्थळी फार मोठ्या प्रमाणावर पर्यटक येतात. अशा डोंगराच्या परिसरात असणाऱ्या स्थळांवर काही धोकादायक जागांमुळे पर्यटकांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत संरक्षक कट्ट्यांचे काम घेण्यास परवानगी देण्यात येत आहे.

८. ग्रामपंचायतीसाठी व्यासपीठ/रंगमंच (स्टेज) बांधणे. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९४/प्र.क्र. २९/का-१४४५, दिनांक ६ एप्रिल १९९४) सदर व्यासपीठ/रंगमंच (स्टेज) चे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्याची देखभालीची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीवर राहील. याबाबत ग्रामपंचायतीकडून हमीपत्र घेणे आवश्यक राहील.

९. शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयामध्ये माहिती तंत्रज्ञान वापरासाठी खर्च करणे. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९८/प्र.क्र. २९८/का-१४४५, दिनांक २२ डिसेंबर १९९८).

१०. विधानमंडळ सदस्यांना संगणक उपलब्ध करणे (शासन निर्णय क्र. स्थाविका-२०००/प्र.क्र. २२३/का-१४४५, दिनांक २ नोव्हेंबर २०००).

**सात :—बृहन्मुंबई व इतर महानगरपालिका क्षेत्रातील विशेष कामे :**

१. महानगरपालिका क्षेत्रातील उपकर आकारण्यात आलेल्या चाळीमधील (सेरस्ड बिल्डींग) गल्ल्या, गटारे व सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधणे व त्यांची दुरुस्ती, दुरुस्त न होणाऱ्या संडासाची पुनर्बांधणी व दुरुस्ती, सार्वजनिक न्हाणी गृहे बांधणे, सार्वजनिक जिने, पॅसेज व व्हरांडे यांची दुरुस्ती अशी कामे, (शासन निर्णय, क्र. स्थाविका-१०९४/प्र.क्र. २९/का-१४४५, दिनांक ६ एप्रिल १९९४). त्याचप्रमाणे पिण्याच्या पाण्याच्या पद्धतीच्या (Piped Water Systems) दुरुस्तीची कामे, मात्र चाळीच्या इमारतीची दुरुस्ती, भिंतींना प्लॅस्टर लावणे, रंग लावणे, विद्युतीकरण करणे अशी कामे या अंतर्गत घेता येणार नाहीत. (शासन निर्णय क्र. एसडीपी-१०८७/सीआर-१८/पीआरजी-२, दिनांक ९ डिसेंबर १९८७ व शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९२/मातब/सीआर-१३/योजना-६, दिनांक १८ जानेवारी १९९३.

२. महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी/शासकीय/महानगरपालिका यांच्या मालकीच्या जागांवरील घोषित गलिच्छ वस्त्यांत (Declared Slums) सार्वजनिक उपयोगाची (Public Utility) म्हणून बालवाड्या व्यायामशाळा इत्यादी सुविधांची कामे (शासन निर्णय क्र. एसडीपी-१०८७/३४३/सीआर-१८/पीआरजी-२, दिनांक ९ डिसेंबर १९८७).

३. महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारतीमधील अशी विशिष्ट दुरुस्तीची कामे जसे की, गल्ल्या, गटारे, सार्वजनिक स्वच्छतागृहे व संडास यांची दुरुस्ती व पिण्याच्या पाण्याच्या पद्धतीच्या (Piped Water Systems) दुरुस्तीची कामे, मात्र अशा इमारतींची दुरुस्ती, भिंतींना प्लॅस्टर लावणे, रंग लावणे, विद्युतीकरण करणे अशी कामे या कार्यक्रमाखाली घेता येणार नाहीत. (शासन शुद्धिपत्रक क्र. एसडीपी-१०८८/७३/योजना-६, दिनांक १९ सप्टेंबर १९८८ व शासन निर्णय क्र. एसडीपी-१०८९/२२३/योजना-६, दिनांक १ जुलै १९८९).

४. (१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय मालकीच्या बी.डी.डी. चाळी व बी.आय.टी. चाळी यामधील वर क्र. ३ मध्ये उल्लेखिलेली दुरुस्तीची कामे, एका चाळीच्या अशा कामावरील खर्च मात्र रु. १०.०० लाखाच्या मर्यादेत असला पाहिजे. (शासन निर्णय क्र. एसडीपी-१०८९/३५१/सीआर-१८/योजना-६, दिनांक २ सप्टेंबर १९८९).

(२) महानगरपालिकेच्या मालकीच्या शाळांच्या विशेष दुरुस्तीची कामे, मात्र एका शाळेच्या दुरुस्तीच्या कामांवरील अंदाजित खर्च रु. १०.०० लाख रुपयांपेक्षा जास्त असून नये. तसेच दुरुस्तीमधील नैमित्तिक दुरुस्ती व रंग काढणे या बाबींचा समावेश नसावा. खाजगी इमारतीतील महानगरपालिकेच्या शाळेच्या दुरुस्तीची कामे मात्र या कार्यक्रमाखाली घेता येणार नाहीत. (शासन निर्णय क्र. एसडीपी-१०८९/३५१/सीआर-१८/योजना-६, दिनांक २ सप्टेंबर १९८९).

(३) खालील अटींच्या अधीन राहून महानगरपालिका क्षेत्रात पाळणाघरे बांधण्याची कामे :—

(शासन निर्णय क्र. एसडीपी-१०८९/३५१/सीआर-१८/योजना-६, दिनांक २ सप्टेंबर १९८९).

(३.१) या बांधकामावरील खर्च रु. १०.०० लाखापेक्षा जास्त असू नये.

(३.२) या पाळणा घराची मालकी शासनाची अथवा महानगरपालिकेची राहील.

(३.३) अशी कामे घेण्यापूर्वी पाळणाघरे चालविण्याची तसेच त्यांची देखभाल/परिरक्षण करण्याची व्यवस्था प्रथम ठरविण्यात यावी.

(३.४) क्र. एसडीपी-१०८७/३४३/सीआर-१८/पीआरजी-२, दिनांक ९ डिसेंबर १९८७ च्या शासन निर्णयानुसार बालवाड्या चालविण्यासाठी ज्या अटींवर रजिस्टर्ड संस्था/विश्वस्त संस्था यांना देण्याची मुभा आहे. त्याच धर्तीवर आवश्यक असल्यास ही पाळणा घरे रजिस्टर्ड विश्वस्त संस्थांना चालविण्यास देण्यात येतील.

(३.५) पाळणाघर चालविण्यासाठी पाळणे व इतर साहित्य इ. खर्च त्या रजिस्टर्ड/विश्वस्त संस्थांना करावा लागेल.

४. महानगरपालिकेच्या अथवा शासनाच्या मालकीच्या रस्त्यांवर पदपथ (फुटपाथ) बांधणे किंवा त्यांची विशेष दुरुस्ती ही कामे, प्रत्येक कामाचा खर्च रु. १०.०० लाख ह्या विहित मर्यादेत असला पाहिजे. नैमित्तिक वा किरकोळ दुरुस्तीची कामे मात्र घेता येणार नाहीत. (शासन निर्णय क्र. एसडीपी-१०८९/३५१/सीआर-१८/योजना-६, दिनांक २ सप्टेंबर १९८९).

५. महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेच्या मालकीच्या वगी यामध्ये रु. १.०० लाखाच्या मर्यादेत बसणारे पुढे नमूद केलेल्या प्रकारचे पक्क्या स्वरूपाचे बसवायचे (फिक्चर्स) खेळाचे साहित्य बसविणे. (शासन निर्णय क्र. एसडीपी-१०८९/३५१/सीआर-१८/योजना-६, दिनांक २१ डिसेंबर १९८९).

१. लोखंडी घसरगुंडी.

२. हत्तीवरील घसरगुंडी.

३. रेनबो.

४. बास्केट बॉल पिलर्स.

५. लोखंडी पाळणे इत्यादी.

६. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या/म्हाडाच्या मालकीच्या सध्या अस्तित्वात असलेल्या बगीच्यांना कुंपण घालणे. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९५/मातब/सीआर-१३/योजना-६, दिनांक १८ ऑगस्ट १९९२).

७. बृहन्मुंबईत महानगरपालिका आणि म्हाडा यांच्या मालमत्तेवर किंवा प्रकल्पावर अतिक्रमण न होण्याच्या दृष्टीने कंपाऊंड बांधणे. (शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९२/मातब/सीआर-१३/योजना-६, दिनांक १८ ऑगस्ट १९९२).

८. बृहन्मुंबईत महानगरपालिका क्षेत्रात स्माशानभूमीमध्ये खालीलप्रमाणे कायम स्वरूपाच्या सुविधा पुरविणे. (शासन निर्णय, क्र. स्थाविका-१०९२/मातब/सीआर-१३/योजना-६, दिनांक १८ जानेवारी १९९३).

१. लोकांना थांबण्यासाठी शेड्स बांधणे.

२. लोकांना बसण्यासाठी बाकडी टाकणे.

३. हातपाय धुण्यासाठी पाणीपुरवठ्याची सोय करणे.

४. आवश्यकतेप्रमाणे प्रेताच्या दहनासाठी स्टँड बांधणे.

वरील चारही प्रकारच्या कामासाठी एकत्रितपणे खर्च रु. १०.०० लाखाच्या मर्यादेपर्यंत करता येईल.

९. बृहन्मुंबईमध्ये उपकर आकारण्यात येणाऱ्या 'अ' वर्गीय चाळींची दुरुस्ती करणे, मात्र एका इमारतीमागे रु. १०.०० लाख मर्यादेपर्यंतच्या म्हाडाच्या (घर दुरुस्ती मंडळ) निकषाप्रमाणे अनुज्ञेय असलेली कामे घेण्यात यावीत. (शासन निर्णय, क्र. स्थाविका-१०९२/मातब/सीआर-१३/योजना-६, दिनांक १८ जानेवारी १९९३).

१०. घोषित केलेल्या गलिच्छ वस्त्यामध्ये म्हाडा किंवा महानगरपालिका यांनी बांधलेल्या जुन्या सार्वजनिक संडासांची दुरुस्ती करणे. (शासन निर्णय, क्र. स्थाविका-१०९५/मातब/सीआर-१३/योजना-६, दिनांक १८ जानेवारी १९९३).

११. महानगरपालिका क्षेत्रात खालील कामे अनुज्ञेय. (शासन निर्णय, क्र. स्थाविका-२०००/ प्र.क्र. २२५/का-१४४५, दिनांक २२ जून २००१).

**१२. सौंदर्यीकरण—**

(१२.१) **मैदान बाग.—**सुशोभित कुंपण, मैदानाच्या बाजूला झाडांची लागवड, आसनांची सोय, कचरापेटी, प्रकाश योजना, पक्क्या स्वरूपाची खेळणी, पाणपोई.

(१२.२) **समुद्रकिनारा.—**स्वच्छतागृह, प्रकाश योजना, कचरापेटी, पाणपोई, सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना.

(१२.३) **तलाव.—**सुशोभित कुंपण, तलाव स्वच्छ करणे, (गाळ काढणे वगळून), प्रकाश योजना, लादीच्या मार्गीका, झाडांची लागवड, कचरापेटी, आसने.

(१२.४) **नदी.—**घाट बांधणे, झाडांची लागवड, प्रकाश योजना, सुरक्षा व्यवस्था, कचरापेटी, स्वच्छतागृहे.

(१२.५) **किल्ला.**—झाडांची लागवड, बगीचा, प्रकाश योजना, ऐतिहासिक माहितीचे फलक.

(१२.६) **वाहतूक बेट.**—सुशोभित कुंपण, हिरवळ, प्रकाश योजना, रॉक गार्डन इत्यादी.

(१३) पदपथ तयार करणे.

(१४) रस्ते दुभाजक व संरक्षक कठडे बांधणे (ज्यामुळे अपघाताचे प्रमाण कमी होईल.)

(१५) हायमास्टचे दिवे बसविणे.

(१६) रस्त्यावरील झाडांच्या संरक्षणासाठी ट्रीगार्ड बसविणे.

(१७) शासकीय तसेच महानगरपालिका रुग्णालयांना ॲम्बुलन्स तसेच खासदार निधीप्रमाणे साहित्य खरेदी करण्यास अनुमती देणे.

(१८) आठवडी बाजारात ओटे बांधणे.

(१९) लहान लहान बाजारपेठांचे बांधकाम.

(२०) महानगरपालिका व म्हाडाच्या मालमत्तेवर अतिक्रमण होऊ नये म्हणून कुंपण घालणे.

**आठ.—प्रकल्पबाधित गावठाण :**

१. प्रकल्पबाधित गावठाणातील रस्ते, समाजमंदिरे, शाळा, खोल्या इत्यादींच्या विशेष दुरुस्तीची कामे. (शासन निर्णय, क्र. एसडीपी-१०८९/२१/योजना-६, दिनांक ८ जून १९८९).

**नऊ.—नैसर्गिक आपत्तीपोटी पुनर्वसनाची कामे :**

१. राज्यामध्ये नैसर्गिक आपत्तीपोटी पुनर्वसन कार्यासाठी रु. ५.०० लाखाच्या मर्यादेत निधी उपलब्ध करणे. (शासन निर्णय, क्र. स्थाविका-२००२/प्र.क्र. २६८/१४४५, दिनांक ३१ ऑक्टोबर २००२).

**दहा.—नागरी सामाजिक वनीकरण :**

शासन निर्णय, नगरविकास विभाग, क्रमांक जीईएन-१०८९/१४८७/सीआर-९९/८९/नवि-१६, दिनांक १८ ऑगस्ट १९८९ अन्वये घेण्यात येणारी नागरी सामाजिक वनीकरणाची कामे.

लोकोपयोगी लहान कामाच्या निधीतून देण्यात येणारी रक्कम शासनाने आपला वाटा म्हणून द्यावयाच्या एकूण ५० टक्के निधी इतकी मर्यादित असेल. (शासन निर्णय, क्र. एसडीपी-१०९०/७४/ सीआर-२/योजना-६, दिनांक २ जानेवारी १९९१).

(शा.म.मु.) एचबी ११६२-३३ (५००—७-२०१७)

## परिशिष्ट ब

## आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमाच्या मार्गदर्शक तत्त्वात बसत नसणाऱ्या कामांची नमुना यादी

१. जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या अखत्यारीत नसलेली कामे.

**उदा.** कोणत्याही प्रकारच्या कार्यालयीन इमारती, ग्रामपंचायत, भवन, निवासस्थाने, विश्रामगृहे, टी. व्ही. सेंटर, बचत भवन इत्यादी इमारतींच्या खर्चासाठी पूरक निधी (ही सर्व राज्यस्तरीय कामे आहेत.)

२. खाजगी संस्थांची/सहकारी संस्थांची/वैयक्तिक लाभधारकांची कामे.

३. रु. १०.०० लाखापेक्षा जास्त अंदाजित खर्चाची म्हणजे मोठ्या स्वरूपातील कामे.
**उदा.** स्टेडियमचे बांधकाम.

४. कोणत्याही प्रकारची (प्राथमिक शाळा खोलीची व विशिष्ट वस्त्यातील समाजमंदिराची विशेष दुरुस्ती वगळून) दुरुस्तीचे कामे.

५. ग्रामपंचायत इत्यादी संस्थांसाठी लोकवर्गणीपोटी सुचविलेल्या तरतुदी.

**उदा.** पाण्याची लाईन, वीज पुरवठा इत्यादींसाठी अनामत ठेव (Security Deposit) भरणे, इत्यादी.

६. एखाद्या मोठ्या कामाला कमी पडणारी पूरक म्हणून तरतूद.

७. एखाद्या मोठ्या कामासाठी निरनिराळ्या स्रोतातून निधी मिळविण्याच्या प्रयत्नात एक स्रोत म्हणून ह्या कार्यक्रमाखाली तरतूद सुचविणे.

८. मोठ्या कामांचे (रुपये १०.०० लाखाच्या वरील) भाग करून ती लहान कामे करून घेणे.

९. खाजगी संस्थांना/सहकारी संस्थांना अनुदान.

१०. घरकुले.

११. स्मारके/स्मृती.

१२. होड्या, वीजखांब इत्यादी प्रकारची स्टॉक म्हणून खरेदी.

१३. प्राथमिक शाळाखोली सोडून इतर शाळा/विद्यालये/महाविद्यालये यांच्या इमारती, त्यांना कुंपण घालणे इत्यादी.

१४. रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण करणे.

१५. हॉटमिक्स हॉटलेड खरेदी.

## परिशिष्ट क

### कामाच्या परिरक्षण व देखभालीचे हमीपत्र

स्थानिक विकास कार्यक्रमातून .......................................................................................... ............................................................................................................. हे काम ग्रामपंचायत/ नगरपालिका/नगरपरिषद/जिल्हा परिषद/महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिस्सारण मंडळ/म्हाडा या संस्थेमार्फत/ अभिकरणामार्फत घेण्यात येत असून, सदरचे काम पूर्ण झाल्यावर त्याची देखभाल/परिरक्षण करण्यात ही/हे ग्रामपंचायत/नगरपरिषद/नगरपालिका/जिल्हा परिषद इत्यादी अभिकरण करण्यास तयार आहे.

ठिकाण :

संस्थेचे/अभिकरणाचे नाव व शिक्का.

दिनांक :

## परिशिष्ट ड

### स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घेतलेल्या कामाच्या जिल्हास्तरावरील पथकाकडून केलेल्या तपासणीसंबंधीचा अहवाल

| | |
|---|---|
| १. जिल्ह्याचे नाव | |
| २. (अ) अहवालाचे वर्ष<br>(ब) तपासणीचा दिनांक | |
| ३. पथकातील अधिकाऱ्यांची नावे व पदनामे | १.<br>२.<br>३.<br>४. |
| ४. पथकाने भेट दिलेल्या कामांची नावे व ज्या गावात ही कामे असतील त्या गावाचे नाव.<br>(अ) कामे केलेल्या यंत्रेणेचे नाव<br>(ब) काम केव्हा मंजूर करण्यात आले.<br>(क) कामाला प्रत्यक्ष केव्हा सुरुवात केली.<br>(ड) काम केव्हा पूर्ण झाले. | |
| ५. कामाचे स्वरूप व मंजूर केलेला अंदाजित खर्च. | |
| ६. काम नियोजित ठिकाणी घेतले आहे किंवा कसे व ते पूर्ण झाले आहे किंवा कसे. | |
| ७. कामावर एकूण झालेला खर्च रुपये. | |
| ८. काम पूर्ण झाले नसल्यास पूर्ण न होण्याची कारणे व काम केव्हा पूर्ण होणे अपेक्षित आहे. | |
| ९. कामांचा सर्वसाधारण दर्जा कसा आहे. | |

**परिशिष्ट ड**–पुढे चालू

| | |
|---|---|
| १०. काम मंजूर करताना जो उपयोग दाखविला होता त्याप्रमाणे त्याचा उपयोग केला जातो किंवा नाही व नसल्यास कारणे. | |
| ११. कामामध्ये काही त्रुटी निदर्शनास आल्या आहेत का, असल्यास कोणत्या. | |
| १२. त्रुटी निदर्शनास आल्या असल्यास त्या दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली. | |
| १३. काम पूर्ण झाले असल्यास काम पूर्ण झाल्याबद्दलचा दाखला दिला आहे का व ते काम संबंधित यंत्रणेकडून हस्तांतरित करण्यात आले किंवा कसे. | |
| १४. शेरा | |

**आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत अनुज्ञेय निधीत वाढ करून प्रतिविधानसभा मतदारसंघ तसेच प्रतिविधानपरिषद सदस्य निधी प्रतिवर्षी रु. २००.०० लक्ष करणे.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**

शासन निर्णय क्र. : स्थाविका. २०११/प्र.क्र. ३४/का-१४८२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक : १३ मे २०११.

**वाचा.**—शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. स्थाविका. २०१०/प्र.क्र. ६१/का. १४८२, दिनांक १२ जुलै २०१०.

**प्रस्तावना :**

जिल्हा वार्षिक योजना राबविताना स्थानिक लोकांना उपयुक्त असलेली व सहजरीत्या पूर्ण होतील अशी लहान लहान कामे योजनेच्या अग्रक्रमात मागे राहू शकतात. अशा कामांमध्ये लहान नाल्यांवरील फरश्या, कोल्हापूर पद्धतीने बंधारे, मोऱ्यांची कामे, शाळाखोल्या वगैरे यांसारख्या लहान कामांचा समावेश आहे. अशी कामे करता येण्यासाठी शासनाने सन १९८४-८५ या आर्थिक वर्षापासून स्थानिक गरजांवर आधारित लहान लहान कामांचा विशेष कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली. या कार्यक्रमाचे नामाभिधान "आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम" असे करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत सध्या प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता प्रतिविधानसभा मतदारसंघ तसेच प्रतिविधानपरिषद सदस्य रु. १५०.०० लक्षची तरतूद केली जाते. बांधकाम साहित्याच्या किमतीत झालेली वाढ, वाहतुकीच्या किमतीत झालेली वाढ यामुळे आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत प्रतिविधानसभा मतदारसंघ तसेच प्रतिविधानपरिषद सदस्य अनुज्ञेय असलेल्या या निधीत वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

सन २०११-१२ या आर्थिक वर्षापासून आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत विधानपरिषद सदस्यांना तसेच विधानसभा मतदारसंघांना व राज्यपाल नामनियुक्त विधानसभा सदस्यांना सध्या अनुज्ञेय असलेल्या रु. १५०.०० लक्ष निधीत वाढ करून, प्रतिविधानसभा मतदारसंघ तसेच प्रतिविधानपरिषद सदस्यांसाठी व राज्यपाल नामनियुक्त विधानसभा सदस्यांसाठी हा निधी प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता रु. २००.०० लक्ष (रु. दोनशे लक्ष फक्त) करण्यात येत आहे. मात्र विधानपरिषद सदस्यांना त्यांचा आर्थिक वर्षाचा कार्यकाल विचारात घेऊन त्या प्रमाणात कमाल रु. २००.०० लक्षच्या मर्यादेत प्रति आर्थिक वर्षी निधी अनुज्ञेय असेल.

२. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचा अनौपचारिक संदर्भ १५७/११/व्यय-८, दिनांक २६ एप्रिल २०११ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०११०५१३१०५९३३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. कृ. जगताप,**
शासनाचे सहसचिव.

**आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत ग्रंथालयांना संगणक उपलब्ध करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**नियोजन विभाग**

शासन निर्णय क्रमांक : स्थाविका-२००६/प्र.क्र. १४३/का. १४४५

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ जुलै २००६.

**संदर्भ.—**(१) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. स्थाविका-१०९९/प्र.क्र. २२/का. १४४५, दिनांक ३० मार्च २०००.

(२) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. स्थाविका-२००५/प्र.क्र. ८७/का. १४४५, दिनांक ३० मार्च २००५.

**शासन निर्णय**

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सार्वजनिक वाचनालयाचे बांधकाम करण्यास तसेच पुस्तके, कपाटे, रॅक्स इत्यादी साहित्यासाठी आवश्यक निधी महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय नियम, १९७० अन्वये सध्या ग्रंथालयांना शिक्षण विभागाकडून देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या ५० टक्के रक्कम, (कमाल मर्यादा रु. १० लक्ष) आमदाराच्या शिफारशीनुसार आमदार स्थानिक विकास कार्यक्रमामधून (विहित खरेदी पद्धतीच्या अधीन) मंजूर करण्यास वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये शासनाने मंजुरी दिलेली आहे. या साहित्यात अशा सार्वजनिक ग्रंथालयासाठी संगणक उपलब्ध नसल्यास एक संगणक मा. आमदारांच्या शिफारशीनुसार आमदार स्थानिक विकास कार्यक्रमातून विहित खरेदी पद्धतीच्या व एकूण खर्चाच्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून मंजूर करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. मात्र, या संगणकाची देखभाल वा इतर आनुषंगिक दैनंदिन खर्च इत्यादी सदरहू वाचनालयास सोसावा लागेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**निं. बा. रायलापूरकर,**
शासनाचे उप सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई